THE BOOK WAS DRENCHED

TEXT PROBLEM WITHIN THE BOOK ONLY

Osmania University Library

Call No M921 S27B

Name Of Book श्रीशंकराचार्य

Name Of Authur बोडस

UNIVERSAL LIBRARY

OU_192179

UNIVERSAL LIBRARY

CHECKED 1958

# श्रीशंकराचार्य

व

# त्यांचा संप्रदाय.

लेखक


श्रीयुत **महादेव राजाराम बोडस,**

एम्. ए. एल्एल्. बी. वकील, हायकोर्ट, मुंबई.


---


मुद्रक

रा. रा. केशव रावजी गोंधळेकर, जगद्धितेच्छु प्रेस,

५०७ शनवार पेठ, पुणे.

---

ान १९२३. प्रथमावृत्ति शाके १८४५

---

किमत रु. १॥

Printed by Keshav Raoji Gondhalekar in his

Jagadhitechu Press, 507 Shanwar, Poona City, and Published by

Mahadev Rajaram Bodas, Girgaum, Bombay No. 4.

Checked 196[illegible]

# प्रस्तावना.

पूर्वार्धांतील पांच लेख प्रथम "विविधज्ञानविस्तार" मासिकांत गतवर्षी "शंकराचार्यांचे मठ" या नांवानें प्रसिद्ध झाले, ते पुष्कळांच्या सूचनेवरून क्वचित् स्थळीं फेरफार करून पुस्तकरूपानें छापले आहेत. तसेंच उत्तरार्धांतील "अद्वैतमीमांसा" अष्टाध्यायी प्रथम १८९३ सालीं केसरी पत्रांत अग्रलेख-रूपानें प्रसिद्ध झाली; व त्याचवेळीं कुळकर्णी गोखले आणि मंडळी यांनीं पुस्तकरूपानें प्रसिद्ध केली. तें पुस्तक आतां दुर्मिळ झाल्यामुळें व विषय एकच असल्यामुळें ती लेखमालाही या पुस्तकांत पुन्हां छापली आहे. मासिकाच्या व वर्तमानपत्राच्या स्थलसंकोचामुळें दोन्ही लेखमाला त्रोटक स्वरूपाच्या झाल्या आहेत. विषक व्यापक आणि विवेचन त्रोटक, असें हें पुस्तक वाचकांची जिज्ञासा पूणपणें तृप्त करणार नाहीं हें खरें; तथापि विषयप्रवेश करून देऊन अधिक अभ्यासाला प्रवृत्त करील अशी आशा आहे. शंकराचार्यांसारख्या सर्वतोमुखी पण अज्ञात पुरुषाची सामान्य लोकांसही ओळख व्हावी व वेदांतासारख्या गहन विषयाचें अध्ययन सर्व-साधारण व्हावें या हेतूने हे लेख प्रथम लिहिण्यांत आले; व एकत्र संक-लित केल्यास अधिक फलदायी होतील असें वाटल्यावरून पुस्तकरूपानें आतां छापिले आहेत. शांकरभाष्यासारखे ग्रंथ हल्लीं केवळ युनिव्हर्सिटी परिक्षेत आहेत ते सुशिक्षित हिंदूंचे नित्यपाठांत आले पाहिजेत. सनातन धर्म काय आहे, जैन बौद्धांनीं क्रांती कोणती केली, व शंकराचार्योनीं पुन-रुद्धार कसा केला हे विषय हिंदुमात्रास अवगत असले पाहिजेत. पण आज त्यांचें ज्ञान यूरोपियन ग्रथांतून मिळवावें लागत आहे. स्वधर्माचें ज्ञान परक्या दुर्बिणींतून मिळविण्याऐवजीं प्रत्यक्ष करून घेण्याकडे सर्वांची प्रवृत्ति व्हावी याच उद्देशानें हें पुस्तक प्रसिद्ध करण्यांत येत आहे; व तो उद्देश थोड्या अंशानें जरी सफल झाला तरी प्रयत्नाचें सार्थक झाल्यासारखें होईल.

# अनुक्रमणिका.

## पूर्वार्ध


| अध्याय | विषय | पृष्ठ |
|---|---|---|
| १ | उपन्यास ... ... ... | १ |
| २ | शंकराचार्यांचें कार्य ... ... | १७ |
| ३ | गुरुपरंपरा ... ... ... | ३३ |
| ४ | शिष्यपरंपरा ... ... ... | ५२ |
| ५ | संकेश्वरमठ ... ... ... | ६९ |
| ६ | परिशिष्टें ... ... ... | ८३–१०४ |
| | परिशिष्ट क ... ... .. | ८३ |
| | परिशिष्ट ख ... ... ... | ९१ |
| | परिशिष्ट ग ... ... ... | १०३ |


## उत्तरार्ध.


| | | |
|---|---|---|
| | अद्वैतमीमांसा ... ... ... | १०५–१७६ |
| १ | प्रो० डयूसनचें व्याख्यान ... ... | १०५ |
| २ | धर्मसुधारणेचा समेट ... ... | ११४ |
| ३ | अद्वैतमताचा इतिहास ... ... | १२१ |
| ४ | स्वप्नदृष्टांत ... ... | १३१ |
| ५ | प्राच्य व पाश्चात्य तत्त्वज्ञानांची तुलना ... | १४१ |
| ६ | अद्वैतमताचें वैशिष्टय ... ... | १४९ |
| ७ | प्रारब्धसिद्धांत ... ... | १५८ |
| ८ | ज्ञानमाहात्म्य ... ... | १६८ |

# श्रीशंकराचार्य

## व

## त्याचा संप्रदाय.

## पूर्वार्ध

### अध्याय पहिला.

### उपन्यास.

**अष्टवर्षे चतुर्वेदी द्वादशे सर्वशास्त्रकृत् ।**
**षोडशे कृतवान् भाष्यं द्वात्रिंशे मुनिरभ्यगात् ॥**

भरतखंडाच्या प्राचीन व अर्वाचीन इतिहासांत श्रीशंकराचार्यांइतकें सर्व-विश्रुत नांव दुसरें नाहीं म्हटलें तरी चालेल. वैदिक व पौराणिक काळांत अनेक पराक्रमी राजे व तपस्वी ऋषि झाले. ब्राह्मण, आरण्यकें, पुराणें, रामायण महाभारतासारखे इतिहास, इत्यादिकांत हजारो महात्म्यांचीं नांव आपणांस परिचित आहेत; पण नांवापलीकडे त्यांचा महिमा आज दृग्गोचर होत नाही. किंबहुना त्या व्यक्ति कधीकाळी हयात होत्या, किंवा काल्पनिक होत्या, याविषयींही शंका निघाल्या आहेत. राम, कृष्ण, पांडव, कौरव यांचीं चरित्रें इतिहास आहेत कीं कल्पित पुराणे आहेत, हा वाद करणारे लोक अजूनही आढळतात. तसेच सुदास, दिवोदास, श्वेतकेतु, भरत, हरिश्चंद्र, वसिष्ठ, विश्वामित्र वगैरे व्यक्ति ऐतिहासिक असल्या तरी नांवापलीकडे त्यांच्या चरित्राविषयीं खात्रीलायक माहिती आपणांस आज उपलब्ध नाहीं. गौतमबुद्धाच्या अवतारापासून भरतखंडाचा ऐतिहासिक काल मानण्याचा अर्वाचीन प्रघात आहे, व हल्लीं बौद्धावताराचे युग आहे

असें आमच्या पौराणिकांचेंही मत आहे. पुनः पुनः धर्मसंस्थापना करण्याकरितां श्री विष्णूंनीं आठ अवतार घेतले, ते कलियुगापूर्वीं होते. शंकराचा कलियुगांतील अवतार, कुतर्क आणि अज्ञान यांचा नाश करून सत्स्वरूपी ब्रह्मज्ञानाचा प्रसार करण्याकरितां श्री शंकराचार्यांच्या रूपानें झाला.

**" यद्यद्विभूतिमत्सत्त्वं श्रीमदूर्जितमेव वा ।**
**तत्तदेवावगच्छ त्वं मम तेजोंऽशसंभवम् ॥ "**

या भवगदुक्तीप्रमाणें प्रत्येक महात्मा कमीअधिक प्रमाणानें ईश्वरांशच असतो. तेव्हां भारतीय समाजाचें धार्मिक परिवर्तन करणारे गौतमबुद्ध आणि शंकराचार्य हे दोघेही ऐतिहासिक पुरुष अनुक्रमें विष्णूचे आणि शंकराचे अवतार मानले गेले यांत नवल नाहीं. बत्तीस वर्षांचे आयुष्यांत आसेतु-हिमाचल दिग्विजय करून चिरस्थायी धर्मसंस्थापना करणारा पुरुष अलौकिक होय यांत शंका नाहीं.

शंकराचार्यांचा काल, चरित्र, आणि ग्रंथ यांचेसंबंधानें अजून पुष्कळ वाद आहे; किंबहुना सर्व मुद्द्यांचा सांगोपांग विचार करून विस्तृतपणें लिहिलेलें आचार्यांचें संकलित चरित्र अजून तयार झालेंच नाहीं म्हटलें तरी चालेल. आचार्यांच्या शिष्यांनीं व सांप्रदायिकांनीं लिहिलेले शंकर-विजय ग्रंथ आठ दहा आहेत, व भाविक लोकांची जिज्ञासा तृप्त करण्यास ते पुरे आहेत; परंतु ऐतिहासिकदृष्ट्या त्यांना विशेष महत्त्व देतां येत नाहीं. आणि अर्वाचीन काळच्या आकांक्षा त्यांनीं पुऱ्या पडत नाहींत. थिऑसोफिस्ट, चिनी, जपानी इतिहासकार, आणि अर्वाचीन युरोपियन संशोधक, यांच्या परिश्रमानें गौतमबुद्ध आणि त्याचा सांप्रदाय यांविषयीं पुष्कळ विश्वसनीय माहिती आतां उपलब्ध झाली आहे; व गौतमबुद्धाचीं कित्येक चरित्रेंही लिहिलीं गेलीं आहेत. बौद्धपंथाचें खिस्ती धर्माशीं बरेंच साम्य असल्यानें म्हणा, किंवा खिस्ती नवा करार बौद्धधर्माच्या स्फूर्तीतेंच फल अशी पुष्कळ विद्वानांची समजूत असल्यानें म्हणा, अर्वाचीन खिस्ती ग्रंथकारांचें लक्ष साहाजिकपणें बौद्धधर्माकडे विशेष लागलें; व तितक्याच

अंशानें बौद्धधर्माचें हिंदुस्थानांतून उच्चाटन करणाऱ्या शंकराचार्यांकडे दुर्लक्ष झालें. तत्त्वज्ञानाची आवड असलेल्या जर्मन ग्रंथकारांनीं मात्र शांकर-वेदांताचें मनःपूर्वक अध्ययन केलें. शोपेनहोर, हार्टमन, ड्यूसेन प्रभृतींनीं अद्वैतमताची यूरोपांत ओळख करून दिली. पण खुद्द शंकराचार्यांच्या चरित्रासंबंधानें कोणीं यूरोपियन पंडितांनीं अजून विशेष शोध केलेला दिसत नाहीं. इकडील प्राच्य संशोधकांमध्येंही कै. तेलंग, प्रो. पाठक व एक दोन द्राविडी ग्रंथकारांखेरीज कोणाचें या विषयाकडे लक्ष गेलेलें दिसत नाहीं, ही खेदाची गोष्ट आहे. शंकराचार्यांचे अनेक मठ आहेत. हजारों रुपयांचीं इनामें व जहागिरी त्यांस चालत आहेत. सनातनधर्मीयां-पैकीं शेंकडा पाउणशें लोक शांकरमताचे असून त्यांमध्यें शेंकडों श्रीमंत व विद्वान् लोक आहेत. परंतु खुद्द शंकराचार्यांसंबंधानें विश्वसनीय माहिती गोळा करून लोकांपुढें मांडण्याचें कार्य अजून कोणी करीत नाहीं; इतकेंच नाहीं, तर दोन शिवाय बाकीचे शंकरविजय ग्रंथ छापून प्रसिद्ध करण्याचें कामही कोणी आंगावर घेत नाहीं. यूरोपांतील एकाद्या यःकश्चित् राजाची किंवा ग्रंथकाराची जी माहिती गोळा करण्यांत येते तिचा दशांश किंवा शतांशही श्रीशंकराचार्यांसारख्या अलौकिक व असामान्य धर्मप्रवर्तकाविषयीं आम्हांजवळ असू नये, ही फार लाजीरवाणी गोष्ट आहे. शंकराचार्यांच्या नांवानें हत्ती पालख्या मिरविणारे व पाद्यपूजेच्या द्रव्यानें राजविलास भोगणारे जगद्गुरु आपल्या परात्पर गुरूंस अजीबात विसरले आहेत असें म्हणण्यास हरकत नाहीं. सात आठ वर्षांपूर्वीं ब्रह्मीभूत झालेले श्रृंगेरी-पीठस्थ श्री शिवाभिनव—सच्चिदानन्दस्वामी यांनीं आद्य आचा-र्यांची जन्मभूमि निश्चित करून पवित्र करण्याचें महत्कार्य केलें; पण मठांचें उत्पन्न खाणाऱ्या अलीकडील दुसऱ्या कोणाही जगद्गुरूंनीं किंवा मठस्थ आश्रितवर्गानें आचार्यांसंबंधीं आपलें कर्तव्य बजावलें नाहीं असें मोठ्या कष्टानें म्हणावें लागतें.

भरतखंडांतील एका अद्वितीय पुरुषाविषयींची ही अनास्था दूर होऊन त्याच्या चरित्राकडे इतिहाससंशोधकांचें अधिक लक्ष लागावें या उद्देशानें हा विषय हातीं घेतला आहे. आचार्यांच्या चरित्राचीं अनेक अंगें

आहेत. त्यांचा काल व तत्कालीन परिस्थिति, त्यांचा जीवनवृत्तांत, दिग्विजय, धर्मसंस्थापना, ग्रंथ आणि संप्रदाय, असा एक एक विषय स्वतंत्र लेखाला पुरेसा आहे. आज त्यांपैकीं शंकराचार्यांचे नांवानें चालणाऱ्या अनेक मठांविषयीं विचार करण्याचें योजिलें आहे. हा विचार अर्थातच केवळ ऐतिहासिक दृष्ट्या व कोणत्याही एका मठाचा किंवा तत्कालीन मठाधिकाऱ्याचा पक्ष न स्वीकरतां करावयाचा आहे. मठामठांत, व एकाच मठांतील एकाहून अधिक हक्कदारांमध्यें, आजपर्यंत इतके तंटे झाले आहेत व अजूनही चालू आहेत, कीं हे शंकराचार्यांचे मठ अद्वैताऐवजी द्वैताचाच फैलाव करण्यास स्थापन झाले असें कोणीं म्हटल्यास वावगें होणार नाहीं. सर्व वासनांचा त्याग केलेल्या संन्याशांच्या या भांडणांत पडण्याचें आपणाला कारण नाहीं, व लोकांचाही फायदा नाहीं. द्वैताचा प्रसार करणारे हे अद्वैती मठ कसे, केव्हां, व कां स्थापन झाले, त्यांनीं धर्मजागृतीचें कोणतें कार्य केलें, व त्यांच्यापासून सनातन धर्माचे पुनरुज्जीवनाचे कामीं कितपत सहाय्य झालें, या ऐतिहासिक मुद्द्यांचें आपणाला संक्षेपानें विवेचन करावयाचें आहे. या मठांविषयीं ज्या अनेक भ्रामक कल्पना लोकांत पसरल्या आहेत त्या दूर होऊन यथार्थ ज्ञान झाल्यास पुष्कळ तंटे कमी होऊन भावी धर्मशुद्धीचे कार्यास चांगलें साहाय्य होईल.

आद्य शंकराचार्योंविषयीं विश्वसनीय माहिती मिळण्याचीं अनेक साधनें हल्लीं उपलब्ध झालीं आहेत, व नवीन सांपडत आहेत. ही सामुग्री सहा प्रकारची आहे; ( १ ) शंकरविजय, व तत्सदृश नांवाचीं आचार्य-चरित्रें आणि इतर सांप्रदायिक ग्रन्थ; ( २ ) मठांतील मठाम्नाय, गुरुपरंपरा आणि इतर पुरावा; ( ३ ) ताम्रपत्रें, सनदा, शासनें, अग्रहार वगैरे राजकीय लेख; ( ४ ) खुद्द आचार्यांच्या ग्रन्थांतील उल्लेख; ( ५ ) दुसऱ्या वैदिक, जैन व बौद्ध ग्रन्थकारांचे आचार्य, त्यांचीं मतें, व त्यांचा संप्रदाय यांविषयींचे उल्लेख; आणि (६) ग्रीक, चिनी, जपानी, अरबी वगैरे परस्थ लोकांचे लेख. ही सर्व सामग्री संकलित करून चिकित्सक बुद्धीनें आचार्योंचें चरित्र लिहिलें गेल्यास, भरतखंडांतील मध्ययुगीन

धर्मजागृतीवर पुष्कळच प्रकाश पडेल यांत शंका नाहीं. यांपैकीं पहिले दोन प्रकारचे पुरावे फार महत्वाचे होत; पण ते असावे तसे विश्वसनीय नाहींत. आणि दुर्दैवानें मठाधिकाऱ्यांकडून या कामीं व्हावी तशी मदत होत नाहीं. मठाधिपतींना ऐतिहासिक माहितीचें महत्व वाटत नाहीं; इतकेंच नाहीं तर खरा पुरावा झांकून ठेवून किंवा नाहींसा करून आद्य आचार्य अतिप्राचीन काळीं अवतीर्ण झाले, व ईश्वरावतार असल्यामुळें त्यांचें चरित्र दिव्य चमत्कारांनीं भरलें होतें असें दाखवून आपल्या मठाचें व संप्रदायाचें माहात्म्य वाढविण्याकडे या मठाधिपतींची मुख्यतः प्रवृत्ति झालेली आहे. शिवाय कित्येक मठांमध्यें वर्चस्वाविषयीं परस्पर चुरस लागल्यामुळें बनावट लेखही तयार करण्यांत आले; व कांहीं शंकरादिग्विजय आणि गुरुपरंपरा नांवाचे ग्रंथ तशाच प्रकारचे असावेत असें मानण्यास आधार आहे. शृंगेरी व कुंभकोणम्, शृंगेरी व कुडलगी, शृंगेरी, कुडलगी आणि संकेश्वर, शृंगेरी व द्वारका, या मठांमधील तंटे पुष्कळ वर्षें चालू होते, व अजूनही थोडे बहुत धुमसत आहेत. जगद्गुरु म्हणविणाऱ्या स्वामींना सरकारदरबारीं:अर्जदार किंवा वादी म्हणून उभें राहण्याचे अनेक प्रसंग आले आहेत, व सामान्य जनांप्रमाणें खरे खोटे पुरावे करण्याचें पापही पत्करावें लागलें आहे. प्राचीन मठांपैकीं ज्योतिर्मठांत अधिकारीच नाहीं, व पुरींतील गोवर्धन मठाचे स्वामी अलीकडेच स्वयंप्रतिष्ठित झाले आहेत म्हणतात. द्वारका मठाची गुरुपरंपरा दाखविण्यांत येते; पण गादीवरील खरे स्वामी दक्षिणेंत मूलबागळ येथें जाऊन राहिले, व खुद्द द्वारकेंत मुसलमानी अंमलामुळें आचार्य-संप्रदाय तीन चारशें वर्षें लुप्तच झाला होता. तो चाळीस वर्षांपूर्वीं श्री राजराजेश्वरांनीं पुन्हां जिवंत केला असें म्हणतात. करवीर मठाचे कागदपत्र वगैरे सर्व दप्तर सन १७७३ त कोन्हेरराव पटवर्धनांनीं करवीर मठ जाळला तेव्हां जळून गेले. कुडलगी मठ तर आतां लुप्तप्राय झाला आहे. शिवगंगा, पुष्पगिरी, हंपी, वगैरे कित्येक शाखा व अर्वाचीन मठ आहेत, पण तेथील ग्रंथसंग्रहाचें अजून काळजीपूर्वक शोधन झालें नाहीं. तात्पर्य, आद्य आचार्यांविषयीं खरी विश्वसनीय माहिती शृंगेरी व कुंभकोणम् या दोन मठांतच सांपडणार आहे;व कदाचित् हंपी मठांतील

विद्यारण्यांच्या संग्रहांतही पुष्कळ मिळेल. परंतु कुंभकोणम् आणि शृंगेरी मठांचे दरम्यान वाद असल्यामुळें बहुधा ती माहिती पुढें येत नाहीं, व इतरांसही प्राप्त होत नाहीं, महाराष्ट्रांत भाऊबंदकीच्या कलहांत अनेक महत्त्वाचे ऐतिहासिक लेख नाहींसे झाल्याचे दाखले आहेत, याचाच हा एक मासला आहे. आत्मप्रौढीपेक्षां सत्यान्वेषणाची इच्छा अधिक प्रबळ असलेले मठाधिपति गादीवर येईपर्यंत ही स्थिति अशीच कायम रहाणार.

खुद्द आचार्यांचे ग्रंथ तत्त्वज्ञानपर असल्यामुळें तत्कालीन स्थलांचे, पुरुषांचे किंवा गोष्टींचे उल्लेख क्वचितच सांपडतात. पाटलीपुत्र व स्रुघ्न शहरें, पूर्णवर्मा राजा व तामील कवि संबंध यांचा नामनिर्देश आढळल्यावरून कै. तेलंगप्रभृतींनीं आचार्यांचा काल ठरविण्याचा प्रयत्न केला आहे. तसेंच कुमारिल, प्रभाकर, दिग्नाग, धर्मकीर्ति, देवार्धिगाणि, सिद्धसेन दिवाकर वगैरे वैदिक, बौद्ध व जैन ग्रन्थकारांच्या मतांचें खंडन केल्यामुळें शंकराचार्य त्यांचे पश्चात् झाले असेंहि अनुमान करण्यांत आलें आहे. या खंडणमंडणकारांचा अनुक्रम येणेंप्रमाणें आहे:—

१ वैदिक—गौतमसूत्रावरील भाष्यकार वात्स्यायन...३ रें किंवा ४ थें श.
२ बौद्ध—दिग्नागाचार्य—प्रमाणसमुच्चय...पांचवें शतक.
३ वैदिक—उद्योतकार—वार्तिक...सहावें शतक.
४ बौद्ध—धर्मकीर्ति—वार्तिक...सातवें शतक.
५ जैन—समंतभद्र—आप्तमीमांसा...सहावें व सातवें शतक.
६ वैदिक—कुमारिलभट्ट—तंत्रवार्तिक...सातवें शतक.
७ जैन—अकलंक—अष्टशति...आठवें शतक.
८ वैदिक—शंकराचार्य—भाष्यें...आठवें व नववें शतक.
९ वैदिक—सुरेश्वराचार्य—वार्तिक...आठवें व नववें शतक.
१० बौद्ध—धर्मोत्तराचार्य—टीका...नववें शतक.
११ वैदिक—वाचस्पति आणि उदयन...अकरावें व बारावें शतक.

ग्रंथांतर्गत प्रमाणांवरून हा अनुक्रम निश्चित झाल्यास शंकराचार्यांचा अवतारकाल सामान्यत्वें ठरविण्यास सोपें जाईल. देवार्धिगाणि, सिद्धसेन-

दिवाकर, समंतभद्र, अकलंक, विद्यानंद वगैरे समकालीन ठरल्यास शंकराचार्यांचा काल अधिकच निश्चित होईल. हिंदुस्थानांतील जैन बौद्ध ग्रन्थांचें व अद्वैतभिन्न संप्रदायांच्या ग्रन्थांचें प्रकाशन अजून पुष्कळच व्हावयाचें आहे. तसेंच तिबेट, चीन, ब्रह्मदेश, सिंहलद्वीप, जावा, सयाम येथील ग्रन्थही अजून अज्ञात आहेत. या देशांतून राज्यसत्ता सुस्थिर होऊन प्राचीनविद्येचें पुनरुज्जीवन होईल, तेव्हांच भरतखंडाचा खरा इतिहास तयार होईल.

खुद्द शंकराचार्यांसंबंधाचे दोन ताम्रपट पुढें आले आहेत;पण ते कितपत विश्वसनीय आहेत तें आज सांगतां येत नाहीं. हे दोन्ही ताम्रपट द्वारका मठांत सांपडले. पैकीं सुधन्वा राजाच्या ताम्रपटावर मिति युधिष्ठिर शक २६६३ आश्विन शु. १५, म्हणजे इसवी सनापूर्वी ४३७ वर्षे अशी आहे व ताम्रशासन देणारा सुधन्वा राजा सोमवंश चूडामणि युधिष्ठिर-परंपरेंतील आहे. द्वारकामठस्थ जंत्रीप्रमाणें आद्य शंकराचार्यांचा जन्म युधिष्ठिर शक २६३१ वैशाख शुक्ल पंचमीस झाला, व ३२ व्या वर्षीं म्हणजे युधिष्ठिर शक २६६३ कार्तिक शुक्ल पौर्णिमा रोजीं निर्याण झालें. म्हणजे सुधन्वा राजाचें ताम्रशासन निर्याणाचे पूर्वी एक महिना दिलें असावें. अस्सल ताम्रपट बाहेर येईपर्यंत, व सुधन्वा राजा कोठें व कधीं झाला हें निश्चित होईपर्यंत, या ताम्रपटावर भरंवसा ठेवतां येत नाहीं. ताम्रपटांतील मजकूर वादग्रस्त आहे, व युधिष्ठिर शक तर मुळींच खरा मानतां येत नाहीं. दुसरा ताम्रपट, गुर्जरमंडलाधीश्वर सर्वजिद्वर्मा राजानें विक्रमार्क संवत्सर ९४१ वैशाख शु० ४ चा शारदापीठस्थ श्रीनृसिंहाश्रम स्वामींचे नांवानें दिला आहे. हे नृसिंहाश्रम स्वामी, द्वारकापीठावरील २९ वे, विक्रम सं. ९६० ज्येष्ठ व. ४ पर्यंत होते. द्वारकापीठावर हक्क सांगणाऱ्या मूलबागल स्वामीच्या गुरुपरंपरेंत नृसिंहाश्रम स्वामी मुळींच नाहींत. अस्सल ताम्रपट पुढें येऊन सर्वजिद्वर्मा राजाचा पत्ता लागेपर्यंत या ताम्रपटाचेंहि विशेष महत्त्व मानतां येत नाहीं. निरनिराळ्या मठांच्या गुरुपरंपरा किती परस्परविरोधी आहेत, हें पुढें दाखविण्यांत येईल. त्यावरून व कोणत्याही स्वामींच्या नांवावरून ऐतिहासिक अनुमान काढणें धोक्याचें आहे.

आद्य शंकराचार्योचीं सविस्तर चरित्रें म्हणून जे अनेक शंकरविजयग्रंथ प्रसिद्ध आहेत, त्यांचाही येथें विचार करणें वावगें होणार नाहीं. मद्रास हायकोर्टाचे वकील नारायणशास्त्री बी. ए. बी. एल. यांनीं आपल्या "Age of Sankara" ग्रंथाचे पहिले भागांत दहा शंकरविजयांचा उल्लेख केला आहे ते येणेंप्रमाणें:—

१ श्री चित्सुखाचार्य विरचित शंकरविजय, किंवा बृहच्छंकरविजय.
२ आनंदगिरीकृत शंकरविजय, किंवा प्राचीन शंकरविजय.
३ विद्याशंकर ऊर्फ शंकरानन्दकृत शंकरविजय, किंवा "व्यासाचलीय"
४ गोविंदनाथकृत शंकरविजय किंवा "आचार्यचरित" अथवा "केरलीय शंकरविजय.
५ राजचूडामणिदीक्षित-कृत शंकरविजय किंवा "शंकराभ्युदय"
६ अनंतानंदगिरीकृत शंकरविजय, गुरुविजय, किंवा "आचार्य-विजय."
७ वल्लीसहाय कविकृत शंकरविजय, किंवा "आचार्यदिग्विजय"
८ सदानन्दकृत "शंकरदिग्विजयसार"
९ चिद्विलास-कृत "शंकरविजयविलास."
१० माधवाचार्य ऊर्फ विद्यारण्यकृत "शंकरदिग्विजय किंवा 'संक्षेपशंकरविजय.'

यांशिवाय कित्येक मठांत पुण्यश्लोकमंजरी, गुरुपरंपरास्तोत्रें, आणि मठाम्नायसेतु प्रचलित आहेत. "गौडपादोल्लास, हरिमिश्रीय, पतंजलिविजय, बृहद्राजतरंगिणी, हयग्रीववध, मणिप्रभा, गुरुरत्नमालिका, सुषुमविमर्श वगैरे ग्रंथांतूनही शंकराचार्यांसंबंधानें अनेक उल्लेख आहेत. पण ते सर्व ग्रंथ प्रसिद्ध झाल्यावांचून कांहीं अनुमान करतां येत नाहीं. जिनविजय, मध्वविजय, मणिमंजरी वगैरे विरोधी ग्रंथांत शंकराचार्यांची निंदाही आढळते. मध्वविजयांत शंकराचार्यांना मणिमान् दैत्याचा अवतार ठरवून वायूचा अवतार मध्वाचार्य,यांनीं त्यांचा पराभव केल्याचें लिहिलें आहे.केरलोत्पत्तिग्रंथांत शंकराचार्यांच्या अनेक कथा आहेत, त्यांमध्यें आचार्यांचा समकालीन केरल सिंहासनस्थ "चेरमान पेरूमल्ल" राजा मुसलमान होऊन मक्केच्या यात्रेला गेला व तेथें अबदुल रहिमान नांवानें राहून झफार गांवीं मेला,

अशी एक गोष्ट आहे. ती खरी असेल तर झफार येथील थडग्यावर हिजरी २१६ म्हणजे इ.स. ८२१–२२ सन आहे, त्यावरून शंकराचार्यांचा काल बराच निश्चित होतो.

वर लिहिलेल्या दहा शंकरविजयांपैकीं माधवाचार्यकृत "श्रीमच्छंकर-दिग्विजय" पुणें आनंदाश्रमांत व आनन्दगिरिकृत "शंकरविजय" कलकत्याच्या "बिब्लिओथिका इंडिका" ग्रंथमालेंत छापले आहेत. बाकीचे आठ अजून अप्रकाशित आहेत. आनंदगिरीच्या ग्रंथांत आचार्यांचें चरित्र-कथन फारसें नसून फक्त विरोधी मतवादांचें खंडण आहे. आचार्यांचें निर्याण बद्रिकाश्रमीं हिमालयांत झालें नसून कांची ( कांजीव्हरम् ) शहरांतच झालें, ही एक विशेष गोष्ट या शंकरविजयांत आहे; ती मठांच्या वादांत बरीच महत्त्वाची आहे. आचार्य-भाष्यावर टीका करणारा आनंदगिरि आचार्यांनंतर चार पांचशें वर्षांनीं झाला व तो कांची मठाचे गादीवर होता. तोच या ग्रंथाचा कर्ता असेल, तर हा ग्रंथ अर्थातच कांची अथवा कुंभकोण मठाचा पक्षपाती आहे, हें उघड आहे विद्यारण्याचा दिग्विजय पुण्यास छापल्यामुळें या प्रांतीं विशेष प्रसिद्ध आहे. परंतु हल्लींची छापील प्रत चुकलेली व अविश्वसनीय आहे. छापील प्रतींत पुष्कळ प्रक्षिप्त आहे व मूळ माधवाचार्यांच्या संक्षेपशंकरविजय ग्रंथाहून फार भिन्न आहे असें म्हणतात. मद्रासच्या नारायण शास्त्रींच्या मतें ५०–६० वर्षांपूर्वी शृंगेरी व कुंभकोण मठांमध्यें तंटा उद्भवला होता, तेवेळीं शृंगेरीचा पक्ष समर्थन करण्याकरितां एका मठस्थ पंडितानें हा दिग्विजय नवा बनावट केला व आनंदाश्रमानें तो पुरा शोध न करतां छापिला.कांची मठाचें महत्त्व नाहींसें करण्याकरितां, आद्य आचार्यांचें निर्याण कांचीस न होतां बदरिकाश्रमीं हिमालयांत झालें, अशी नवी कथा या दिग्विजयांत घुसडून दिली. तसेंच यांतील दुसऱ्या कित्येक गोष्टी निराधार आणि प्रक्षिप्त आहेत. सबब हा "दिग्विजय" ग्रंथ अगदीं अविश्वसनीय आहे, असें द्राविड संशोधकांचें मत आहे. बाकीच्या आठांपैकीं अनंतानंदगिरी हा आनंदगिरीच असावा; आणि नं. ७ वल्लीसहाय, नं. ८ सदानंद, आणि नं ९ चिद्विलास हे विद्यारण्याप्रमाणें शृंगेरीमठानुयायी असल्यामुळें,सदरहु तीन्ही "विजयां"चें

स्वरूप सामान्यतः सारखेंच असावें. चिद्विलासाचा ग्रंथ संवादरूप आहे. आणि नं. ५ राजचूडामणि-कृत शंकराभ्युदय प्रशंसात्मक काव्य असावें.

नं. १, बृहतशंकरविजय, नं. ३ व्यासाचलीय, आणि नं. ४ केरलीय 'शंकरविजय' हीं चरित्रें मात्र महत्त्वाचीं दिसतात. गोविंदनाथाचा केरलीय 'शंकरविजय' आचार्यांच्या जन्मभूमींत लिहिला असल्यामुळें विशेष विश्वसनीय असावा. चित्सुखाचार्य-कृत "बृहत्शंकरविजय" हा सर्वांपेक्षां विस्तृत आणि प्राचीन असून शंकराचार्यांच्या समकालीन शिष्यानें लिहिला अशी समजूत असल्यामुळें सर्वांनीं प्रमाणभूत मानला आहे. परंतु तो समग्र ग्रंथ प्रसिद्ध झाल्यावांचून आणि त्याचा कर्ता चित्सुखाचार्य कोणता, हें निश्चित झाल्यावांचून त्यावर विश्वास ठेवतां येत नाहीं. सदर 'विजयां'त कर्त्यानें आत्मचरित्रही दिलें आहे. गोकर्ण क्षेत्रांतील विष्णुशर्मा नांवाचा ब्राम्हणपुत्र बालपणापासून आचार्यांचा सहाध्यायी होता; व पुढें आमरण त्यांचेजवळ संन्यास घेऊन राहिला. पुढें द्वारकेच्या शारदापीठावर ब्रह्मस्वरूपाचार्यांचे मागून युधिष्ठिर शके २६९१ ( ख्रि. श. पूर्वी ४०९ ) वर्षी चैत्र व. ८ ला मठाधिपति झाला. याचेंच नांव चित्सुखाचार्य. बृहत्शंकरविजय खरोखर यानेंच लिहिला असेल, तर समकालीन शिष्यानें प्रत्यक्ष माहितीनें लिहिला असल्यामुळें अत्यंत विश्वसनीय मानला पाहिजे. या ग्रंथाचे, १ पूर्वाचार्यसत्पथ, २ शंकराचार्यसत्पथ, आणि ३ सुरेश्वराचार्यसत्पथ, असे तीन भाग आहेत. त्यांपैकीं दुसराच फक्त हल्लीं उपलब्ध झाला आहे. शंकराचार्यांचे नांवावर मोडणारे सर्व प्रकीर्ण ग्रंथ यांत एकत्र केले आहेत. यावरून तो कोणी अर्वाचीन कर्त्यानें केलेला ग्रंथ चित्सुखाचार्यांचे नांवावर दडपून दिलेला असावा, अशी शंका येते. "चित्सुखी" अथवा "प्रत्यक्षतत्त्वदीपिका" या प्रसिद्ध ग्रंथाचा कर्ता चित्सुखाचार्य निःसंशय अर्वाचीन होता; कारण त्यानें उदयन, न्यायलीलावतिकार वल्लभ, वाचस्पति वगैरे अर्वाचीन ग्रंथकारांचा उल्लेख केला आहे, व माधवाच्या 'सर्वदर्शनसंग्रहा''वर वृत्ति लिहिली आहे. वरील बृहच्छंकरविजय त्याचाच असल्यास तो विद्यारण्याच्या मागाहून लिहिला गेला हें उघड आहे. "व्यासाचलीय" विजयाचा कर्ता शंकरानंद आत्मपुराण, भगवद्गीता-तात्पर्यबोधिनी ऊर्फ शंकरानंदी, वगैरे प्रसिद्ध

ग्रंथांचा कर्ता असून सायणाचार्यांचा गुरु होता; अर्थात् विद्यारण्याचा पूर्वकालीन किंवा समकालीन होता. सबब या ग्रंथाचें महत्त्व विशेष मानलें पाहिजे परंतु तोही प्रसिद्ध होईपर्यंत निश्चयात्मक कांहींच लिहितां येत नाहीं तात्पर्य, हीं दहा चरित्रें पुढें ठेऊन परस्पर ताडून पाहिल्याखेरीज त्यांचेविषयीं कोणतेंही अनुमान काढणें ठीक होणार नाहीं. या "विजयां" प्रमाणेंच प्रत्येक मठांत मठाम्नाय आणि गुरुपरंपरा रूढीनें चालत आली आहेत, त्यांचेंही तत्त्वान्वेषणबुद्धीनें परीक्षण झालें पाहिजे. हे मठाम्नाय कोणीं रचले, ते प्रत्येक मठांत भिन्न कां, त्यांतील खरा आणि पूर्वाचार्यसंमत कोणता, आणि त्यांतील भेद कसे उत्पन्न झाले, हा इतिहाससंशोधकानें विचार करण्यासारखा विषय आहे. तसेंच प्रत्येक मठाची गुरुपरंपरा कितपत खरी आहे, तिला जोडलेले काल किती विश्वसनीय आहेत, हेंही ठरविलें पाहिजे. अलीकडे मठाम्नायांचे नांवाखालीं ज्या प्रक्षिप्त रूढी मठांचे व्यवस्थेंत शिरल्या आहेत, आणि त्यांमुळें जी अनवस्था माजली आहे, ती दूर करण्याला हें तिलतंडुलपृथःकरण करणें फारच आवश्यक आहे. आज उपलब्ध असलेल्या माहितीवरून अनुमान केलें तर, हे सर्व शंकरविजय आणि मठाम्नाय विद्यारण्याच्या वेळीं किंवा तदनंतर तयार झाले असावेत असें दिसतें. तेराव्या शतकाचे पूर्वींचा खात्रीलायक ग्रंथ अजून आढळलेला नाहीं.

शंकराचार्यांचा काल आणि चरित्रांतील पुष्कळ गोष्टी अजून वादग्रस्त आहेत.पण कांहीं गोष्टी निर्विवाद आणि सर्वसंमत आहेत, त्या अवतरणांतर्गत श्लोकांत दिल्या आहेत.आठव्या वर्षीं पूर्ण वेदाध्ययन, बाराव्यांत शास्त्राध्ययन, सोळावे वर्षीं शारीरभाष्यरचना,व बत्तिसावे वर्षीं निर्याण,असे मुख्य टप्पे आहेत. शिवाय पांचव्या वर्षीं उपनयन आणि आठव्या वर्षीं संन्यास याही गोष्टी प्रमाण मानल्या जातात.आचार्यांचा आजा विद्याधिराज,बाप शिवगुरु आणि आई आर्याम्बा हीं केरल देशांत कालटी गांवीं रहात होती. विद्याधिराज आणि शिवगुरु विद्वान् असून कालटी गांव त्यास अग्रहार म्हणजे इनाम होता. म्हणजे ते त्या गांवाचे इनामदार होते. पुत्रसंतानाकरितां शिवगुरु आणि आर्याम्बा या उभयतांनीं कडकडीत तपश्चर्या केली. त्यामुळें शिव

प्रसन्न होऊन दिग्विजयी पण अल्पायुषी पुत्र त्यांस लाभला. बालपणीं पितृवियोग आणि आठव्या वर्षी संसारविरक्तता झाल्यानें आचार्यांनीं ब्रह्मचर्यातून एकदम संन्यास घेतला. गृहस्थ व वानप्रस्थ आश्रम झाल्याशिवाय संन्यास घेण्याची रूढि तेव्हां नव्हती; किंबहुना संन्यास घेणें बौद्धभिक्षूंचें अनुकरण मानलें जात असल्यामुळें, वैदिकमार्गी तो गौणच समजत.परंतु 'यदहरेव विरजेत् तदहरेव प्रव्रजेत्, ब्रह्मचर्यादेव प्रव्रजेत' इत्यादि जाबालश्रुतींचा आधार देऊन पुढें शंकराचार्यांनीं आपल्या बालसंन्यासाचें मंडण केलें. शंकराचार्यांचे आश्रमगुरु गोविंदयति होते व आश्रम ओंकार मांधाता क्षेत्रांत घेतला, हें प्रसिद्ध आहे. पण गोविंदयतींचे साक्षात् गुरु प्रसिद्ध गौडपादाचार्य होते कीं नाहीं. हें मात्र संशयास्पद आहे; कारण त्यांचे कालांत २०० किंवा ३०० वर्षांचें अंतर असलें पाहिजे. ईश्वरकृष्णाच्या सांख्यकारिकांवरील गौडपाद-कृत भाष्याचें चिनी भाषेंत भाषांतर सहाव्या शतकाचे प्रारंभीं झालें. तसेंच गौडपादाचार्यांपूर्वी श्रीशंकर, विष्णु ब्रह्मा, वसिष्ठ, शक्ति, पराशर, व्यास आणि शुक अशी गुरुपरंपरा देण्यांत येते, तीही पौराणिकच समजली पाहिजे.

आचार्यांचा बदरिकाश्रमांत शास्त्राभ्यास, वाराणसीक्षेत्रांत भाष्यरचना, नंतर दिग्विजय, आणि शेवटीं शृंगेरीस कायम निवास, या गोष्टीही निश्चितसारख्याच आहेत. दरम्यान स्वदेशीं जाऊन मातोश्रींचा अंत्यसंस्कार केल्याची आख्यायिकाही खरी असेल. सामान्य मनुष्याप्रमाणेंच या गोष्टी झाल्या असल्यामुळें त्यांत असंभवनीय कांहीं नाहीं. क्वचित् स्थळीं ३६ व्या वर्षी निर्याण लिहिलें आहे; पण बहुमतानें ३२ वें वर्षच अखेरचें मानलें आहे. आचार्यांचें निर्याण कांची ( कांजीव्हरम् ) क्षेत्रांत झालें कीं बदरिकाश्रमीं हिमालयांत झालें याविषयीं कुंभकोण आणि शृंगेरी मठाचे दरम्यान मोठा वाद आहे आनंदगिरीनें कांची पक्ष दिला आहे, व माधवाचार्य दुसरा पक्ष स्वीकारतात. तसेंच आचार्यांचें जन्मस्थान कालटी गांव नसून मद्रासच्या पूर्वभागांतील चिदंबरम् गांव होतें असेंही कोणी म्हणतात; पण त्याला फारसा आधार नाहीं. शृंगेरीपीठस्थ **श्रीशिवाभिनव-सच्चिदानंद** स्वामींनीं **कालटी** गांवच जन्मस्थान ठरवून सन १९१० सालीं त्या

गांवाचा मोठ्या समारंभानें जीर्णोद्धार केला. त्यामुळें जन्मस्थानाचा वाद आतां मिटल्यासारखा झाला आहे. विद्यारण्यकृत शंकरविजयांत कालटी ग्रामाचा उल्लेख आहे. पण कालवशात् गांवाचा मागमूसही नाहींसा झाला होता. त्रावणकोर दरबारच्या साहाय्यानें शृंगेरी-पीठस्थांनीं या गांवचें ठिकाण कोचीन संस्थानांत शोरानूर—अर्नाक्यूलम् रेल्वेवरील अंगमल्ली स्टेशनापासून पांच मैलांवर पूर्णा ऊर्फ पेरियर नदीचे कांठीं दाट जंगलांत शोधून काढलें. आर्याबा पूजन करीत होती तो वटवृक्ष व कृष्णमंदिर, आणि शेजारींच त्या साध्वीची दहनभूमि आणि डोह सांपडले; व दरसाल तेथें स्नानाकरितां आजूबाजूची मोठी यात्रा जमते त्याचें कारण शोधून तेंच आचार्यांचें जन्मस्थान कायम केलें. शृंगेरी स्वामींनीं सन १९१० साली फेब्रुवारीचे २१ तारखेला म्हणजे शके १८३१ माघ शु. १२ रोजीं कालटीच्या नदीतीरावर कुंभाभिषेकपूर्वक शंकराचार्यमूर्ति आणि शारदामूर्ति यांची प्रतिष्ठा व नवीन मठाची आणि वेदशास्त्राच्या शाळेची स्थापना केली. चार लाख रुपये खर्चून नदीला घाट, वडाला पार, दोन सुंदर मंदिरें, मठाची इमारत, आणि सभोंवतीं नवीन वस्ती केली. त्यामुळें जेथें बारांशें वर्षें भयंकर श्वापदांचें जंगल होतें, तेथें सुंदर क्षेत्र निर्माण झालें. प्रत्येक शांकरसांप्रदायिकानें या नवीन क्षेत्राची एकदां तरी यात्रा करण्याचा प्रघात पाडला, तर फार उत्तम होईल. जन्मस्थानाप्रमाणें कांची क्षेत्रीं आचार्यांची समाधि खरोखर आहे कीं काय या वादाचाही लवकर निर्णय लागून, असल्यास तिचाही जीर्णोद्धार होईल तर फार चांगलें. कांहीं कारणांनीं शंकराचार्यांस व त्यांच्या मातोश्रीस त्यांच्या ज्ञातिबांधवांनीं बहिष्कृत केलें होतें व त्यांनीं त्यांच्या कृतघ्नतेबद्दल शाप दिला, अशा दंतकथा आहेत; पण त्यांना खात्रीलायक आधार नाहीं.

शंकराचार्य मलबारांतील नंबुदिरी ऊर्फ नंबूरी ब्राह्मणाच्या कुळांत जन्मले हें प्रसिद्ध आहे, व अजूनही त्यांनीं बांधिलेल्या बदरी—नारायणाच्या मंदिरांत नंबूरी पुजारी लागतो. हे नंबूरी मूळचे आंध्र देशांतले असावेत; कारण ख्रिस्ती शकाच्या पांचव्या शतकांत कदंब वंशांतील मयूरवर्मा राजानें त्यांना मलबारांत आणून वसविले अशी आख्यायिका आहे. या नंबूरी ब्राह्मणांत

'आध्यन' म्हणून सर्वांत उच्च दर्जाचा पोटभेद आहे. त्यांना आदरानें इतर लोक नंबुद्रीपाद असें म्हणतात. ते सर्व गृहस्थाश्रमी असतात, व संन्यास निषिद्ध मानतात. आचार्यांनीं संन्यास घेतल्यामुळें त्यांच्या भाऊबंदांनीं त्यांच्या मातोश्रीस बहिष्कृत केलें व तिचा अंत्यसंस्कार करण्यास कोणी तयार होईना; यावरून ते नंबुद्रीपाद पोटभेदापैकीं असावेत असें वाटतें. हल्लीं मलबारांत मोपला बंडवाल्यांनीं नंबुद्रीपादांस मुसलमानी दीक्षा देण्याचा सपाटा लावल्यानें केवढा तरी हाहाकार उडाला. यावरून हे ब्राह्मण कडकडीत धर्माचरणी असले पाहिजेत हें उघड होतें. आंध्र देशाचा उदय ख्रिस्ती शतकापूर्वीपासूनच होऊं लागला; व अशोकानंतर मौर्य साम्राज्याचे तुकडे पडतांच आंध्रांनीं डोकें वर काढलें. आंध्र, आंध्र-भृत्य, राष्ट्रकूट, पल्लव, कदंब, चालुक्य या सर्व आंध्रांच्या शाखा होत्या. त्यांचेमध्यें सातवाहन, पुलकेशी, कृष्णराज, वीरबुक्क, वगैरे अनेक पराक्रमी पुरुष झाले. त्यांनीं एकामागून एक साम्राज्यें स्थापिलीं. गुप्तांनंतर उत्तर हिंदुस्थान हळूहळू शक, हूण वगैरे विदेशी म्लेच्छांनीं पादाक्रांत केलें. पण आंध्रांनीं नर्मदेच्या खालीं त्यांना येऊं दिलें नाहीं. अल्लाउद्दीन खिलजीस देवगिरीच्या यादवांनीं खानदेशांतच तोंड दिलें, व पुढें मीरकासिमाची लाट आनागोंदीच्या राजांनीं मागें हटविली. आंध्रांचे अर्वाचीन वंशज मराठे; त्यांनीं अखेरीस मोंगलांना दिल्लींत कोंडलें. नर्मदा आणि कृष्णा—तुंगभद्रा नद्यांच्या मधला मुलुख आंध्र. तेथील लोकांत उत्तरेकडील आर्यांची बुद्धिमत्ता आणि द्राविडांचें स्थैर्य,गांभीर्य, वगैरे विविध गुण समतोल प्रमाणानें मिसळलेले दिसतात. त्यांनीं उत्तरेकडील म्लेंच्छांच्या स्वाऱ्या, व दक्षिणेकडील रानटी अनार्यांचा संपर्क, या दोहोंपासून आर्यधर्माचें रक्षण केलें. प्राचीन काळीं वाली-सुग्रीवांनीं रावणाला लंकेंत हांकून दिलें, तसेंच अर्वाचीन कालांत शिवाजीच्या मराठ्यांनीं औरंगझेबाला जर्जर केलें. दिग्नागासारखे बौद्ध आचार्य व शंकराचार्यांसारखे सनातनधर्मसंस्थापक आंध्रांत निपजले. इतर धर्मप्रचारकांची बुद्धि एकमार्गी होती, पण सर्वसंग्राहकता आणि आकलनशक्ति शांकरसंप्रदायाइतकी दुसरे कोणांत दिसून येत नाहीं. कुशाग्रबुद्धि, विद्वत्ता, कल्पकता वगैरे गुण अन्यत्र आढळतात;

पण तर्कवितर्कांच्या जाळ्यांत न गुरफटतां सत्य सिद्धांत अचूक दाखविणें हें फक्त शंकराचार्यांनाच साधलें. बुद्धीचा समतोलपणा हा जो प्राचीन आंध्रांचा व हल्लींच्या महाराष्ट्रीयांचा विशेष गुण तो शंकराचार्यांच्या ग्रंथांत पूर्णपणें दिसून येतो. "नहि पूर्वजो मूढ आसीदित्यात्मनाऽऽपि मूढेन भवितव्यमित्यत्र किंचिदस्ति प्रमाणम्" या एका वाक्यांत शंकराचार्यांच्या एकंदर विचारसरणीची गुरुकिल्ली आहे.

आचार्यांच्या जन्मकालाविषयीं व निर्याणकालाविषयीं पुष्कळ वाद आहे, हें वर सांगितलेंच आहे. तो एक स्वतंत्र विषयच होईल. तूर्त आपल्या मुख्य विषयाच्या संदर्भाकरितां त्याचें थोडेंसें दिग्दर्शन केलें म्हणजे पुरे. जन्मकालासंबंधानें प्राचीन आणि अर्वाचीन असे दोन मुख्य पक्ष, व प्रत्येकांत दोन दोन उपपक्ष आहेत. प्राचीन पक्षांत शंकरदिग्विजयकार, मठाधिकारी, व इतर सांप्रदायिक लोक आहेत. पाश्चात्त्यविद्याविभूषित संशोधक अर्वाचीन पक्षांत येतात. द्वारकामठांत सांपडलेली एक जंत्री आचार्यांचा जन्म युधिष्ठिर शक २६३१ वैशाख शु. पंचमी, म्हणजे ख्रिस्ती सनांपूर्वीं ४६९ वर्षें देते व निर्याण युधिष्ठिर शक २६६३ कार्तिक पौर्णिमा देते. चित्सुखाचार्य, पुण्यश्लोकमंजरी, आनंदागिरी, आणि व्यासाचल, हे आचार्यांचें निर्याण "कल्यब्दैश्च शरेक्षणाध्वनयनैः" म्हणजे गतकली २६२५ किंवा ख्रि. पू. ४७५ म्हणतात. पण जिनविजय "ऋषिर्बाणस्तथाभूमिर्मर्त्याक्षौ (२५५७) व ताम्राक्ष अथवा रक्ताक्षी संवत्सर असा शक देतो. हे सर्व ग्रंथकार आचार्यांचा अवतार ख्रिस्ती सनापूर्वीं पांचव्या शतकांत, म्हणजे गौतमबुद्धाचे वेळीं धरतात. शृंगेरी मठवाले त्यांत सुधारणा करून आचार्यकाल ख्रिस्ती सनापूर्वीं ४८ ते १२ मानतात; पण त्याला आधार नाहीं, इतकेंच नाहीं तर दुसरे पीठाधिकारी सुरेश्वराचार्य यांना ७७३ वर्षें व पुढें विद्यारण्याचे कालापर्यंत आणून पोचविण्याकरितां नऊ आचार्यांना ६०७ म्हणजे सरासरीनें प्रत्येकाला ६८ वर्षें द्यावीं लागतात. विद्यारण्याच्या पूर्वींच्या कालाची तोंडमिळवणी करण्याकरितांच ही जंत्री तयार केलेली दिसते. दुसऱ्या परंपरेंत वर्षें भरण्याकरितां दुसरे पुष्कळ स्वामी जास्त घातले आहेत.

अर्वाचीन पक्षाचा मुख्य आधार "निधिनागेभवन्ह्यद्बे विभवे मासि माधवे" हा श्लोक व त्याच अर्थाचा सदानन्दकृत शंकरविजयसारांतील " प्रासूत तिष्यशरदामतियातवत्यामेकादशाधिकशतोनचतुःसहस्त्र्याम् " म्हणजे १११ कमी चार हजार वर्षे हा गतकलिकाल. या हिशेबानें आचार्य-काल सन ७८८ ते ८२० येतो; व तोच अलीकडील संशोधकांना बहु-संमत झाला आहे. या मतानें जन्म वैशाख शु. १० झाला; व तीच तिथी कोठें कोठें मानतात. तेलंगप्रभृति, भाष्यांतील पाटलीपुत्र पूर्णवर्मा वगैरे नामनिर्देशांवरून, शंकराचार्याला शेंदीडशें वर्षे अगोदर म्हणजे सातवे शतकांत ढकलतात; पण हें केवळ अनुमान आहे. सन ८२० हा निर्याण काल मानल्यास, मागील व पुढील सर्व संगति जुळून सुरेश्वराचार्याला ७७३ वर्षे, आणि पुढील नऊ आचार्यांना ६०७ वर्षे देण्याची विचित्र कल्पनाही करावी लागत नाहीं. कारण आचार्यनिर्याणापासून विद्यारण्याचा अभिषेककाल १३८० पर्यंतच्या दहा स्वामींना ५६० वर्षे फार होत नाहींत या दहा पिढ्यांचा इतिहास अजून बरोबर मिळालेला नाहीं. तथापि त्या तूर्त खऱ्या मानण्यास हरकत नाहीं. शंकराचार्यांप्रमाणें कुमारिल-भट्टाला व त्यानें उल्लेख केलेल्या कालिदासालाही खिस्ती सनापूर्वी ढकलण्याचा प्रयत्न झाला आहे. पण कालिदासप्रभृति नवरत्नें विक्रमादित्याच्या वेळीं म्हणजे पांचव्या शतकाचे अखेरीस होती हें आतां निश्चित झालें आहे. बौद्ध आचार्य दिग्नाग आणि जैन पंडित वसुबंधु यांचाही काल तोच. तदनंतर धर्मकीर्ति आणि भर्तृहरि, तदनंतर कुमारिलभट्ट, व तदनंतर मंडणमिश्र आणि शंकराचार्य, ही ऐतिहासिक प्रणालिका आतां बदलणें शक्य नाहीं. मद्रासकडील नारायणशास्त्री वगैरे अलीकडील विद्वान्, हा प्राचीन-नवीनाचा विरोध टाळण्याकरितां, दोन शंकराचार्यांची कल्पना करतातः—एक आद्य शंकराचार्य व दुसरा अभिनव-शंकराचार्य. हा अभिनवशंकराचार्य कांची ऊर्फ कुंभकोण मठाच्या गादी-वरील ३८ वा स्वामी होता असेंही म्हणतात. पण ही केवळ कपोलकल्पित कल्पना आहे, व ती कुंभकोण मठांतून निघालेली दिसते. शृंगेरी—प्रभृति इतर मठांना किंवा शंकरविजयांच्या कर्त्यांना ती माहीत नाहीं, व इतर

मान्य ग्रंथांतूनही तिला आधार नाहीं. मठांनीं स्वीकारलेला युधिष्ठिर शक व गतकालि प्रथम आला कोठून, हें मात्र गूढ इतिहाससंशोधकांनीं उकलण्यासारखें आहे. युधिष्ठिर शक व गतकालि मोजण्यांत थोडा घोटाळा आहे, पण बहुधा कालवाचक श्लोकांत लेखकांची कांहीं तरी चूक झाली असावी. ग्रंथांचे शुद्ध पाठ मिळेपर्यंत हें गूढ असेंच राहणार. शुद्धग्रंथप्रकाशनाचें काम लक्ष लक्ष जहागिरी भोगणाऱ्या मठाधिपतींनीं केलें पाहिजे.

---

## अध्याय दुसरा.

—:०:—

## शंकराचार्यांचें कार्य.

**चतुर्दिक्षु प्रसिद्धासु प्रसिध्यर्थं स्वनामतः ।**
**चतुरोऽथ मठान् कृत्वा शिष्यान् संस्थापयद्विभुः ॥**

शृंगेरी—मठाम्नाय.

श्रीशंकराचार्यांच्या जन्मकाळासंबंधानें चार पक्ष झाले आहेत असें पूर्वीं सांगितलें. पैकीं दोन प्राचीन, व दोन अर्वाचीन. प्राचीनांपैकीं एक पक्ष आचार्यांना खिस्ती शकापूर्वीं ६ व्या किंवा ५ व्या शतकांत नेतो. द्वारका व कांची मठांचा या पक्षाकडे कल आहे. शिवरहस्यांत कलियुगाचीं दोन हजार वर्षें गेल्यानंतर शंकराचार्यांचा अवतार सांगितला आहे. **भविष्योत्तर** पुराणांत खालील श्लोक आहेः—

**कल्यादौ द्विसहस्रान्ते लोकानुग्रहकाम्यया ।**
**चतुर्भिःसह शिष्यैस्तु शंकरोऽवतरिष्यति ॥**

**लिंग, कूर्म, वायु** आणि **मार्कंडेय** पुराणांतही आचार्यांच्या अवताराचा उल्लेख आहे. पण या पुराणांचा काल निश्चित नसल्यामुळें कांहीं अनुमान करतां येत नाहीं. द्वारकामठांतील एका ग्रंथांत आचार्यांचा जन्म युधिष्ठिर

शके २६३१ या वर्षीं म्हणजे खिस्ती शकापूर्वीं ४७० सालीं दिला आहे. मद्रासचे नारायण शास्त्री याच आधारावरून खिस्ती शकापूर्वीं ५०९ ठरवितात. चित्सुखाचार्यांच्या बृहत्‌शंकरविजयांतील म्हणून पुढील श्लोक देतातः—"वन्ह्यध्वशास्त्रनयनांक—युधिष्ठिराब्दे । द्वात्रिंशतं हि शरदो धरणीं विभूष्य." म्हणजे युधिष्ठिर शक २६६२ सालीं, बत्तिसावे वर्षी, आचार्यांचें निर्याण झालें. आनंदगिरीच्या प्राचीन शंकरविजयांतील "कल्यब्दैश्च शरेक्षणाध्वनयनैः सत्कामकोटिप्रभे । पीठे न्यस्य सुरेश्वरं समवितुं सर्वज्ञसंज्ञं मुनिम् ॥" हा श्लोक देतात. पण प्रसिद्ध पुस्तकांत तो सांपडत नाहीं. उलट कलकत्त्यास छापलेल्या **आनन्दगिरीकृत शंकरविजयांत** ६३व्या प्रकरणांत, सुरेश्वराचार्याला श्रृंगेरी मठावर स्थापून नंतर आचार्य कांची नगराकडे गेले, असा उल्लेख आहे. जिनविजयांत " नन्दाः पूर्णं भूश्च नेत्रे मनुजानां च वामतः ॥ म्हणजे युधिष्ठिर शक २१५९ असा शंकराचार्यांचा निर्याणकाल दिला आहे. जिनविजयांत सुधन्वा राजाचा उल्लेख आहे व त्याच्या ताम्रपटांत युधिष्ठिर शक २६६३ दिला आहे. तात्पर्य, हे युधिष्ठिर शक देणारे सर्व आधार घोटाळ्याचे आहेत; व त्यावरून आचार्यांचा काल ठरविणें अशक्य आहे. युधिष्ठिर शक व गतकलि जवळ जवळ मानतात, व ख्रिस्ती शकापूर्वीं गतकली ३१०१ धरतात. या मताप्रमाणें शंकराचार्य हे गौतमबुद्ध व जैन महावीर यांचे समकालीन ठरतात; पण तें अशक्य आहे. ही आपत्ति टाळण्याकरितां कांची-मठवाले दोन शंकराचार्य मानतात. एक आद्य, बुद्धाच्या पूर्वींचे किंवा समकालीन; व दुसरे, कांचीपीठावरील अडतिसावे **धीरशंकरेन्द्र** सरस्वती सन ७८८ सालीं झालेले. थिओसोफिस्ट लोकही दोन शंकराचार्य मानतात, व मॅडम ब्लाव्हेट्स्कीच्या Secret Doctrine मध्यें त्यांना गौतमबुद्धाचे अवतार ठरविलें आहे; पण लिड्बेटर म्हणतात, तें खोटें आहे ! हा अंतर्ज्ञान्यांचा वाद अर्थातच सामान्य चर्मचक्षु लोकांस कळणें अशक्य आहे. दुसरा प्राचीन पक्ष श्रृंगेरी मठाचा आचार्यजन्म खिस्ती शकापूर्वीं ४४ वर्षें व निर्याण इ. स. पूर्वीं १२ सालीं झालें असा आहे. बंगलोरचे सूर्यनारायणराव म्हणतात, श्रृंगेरी आचार्यांचे पूजेच्या समळींत गुरुपरंपरेची पोथी आहे, त्यांत हा काल

म्हणजे शक विक्रमार्क १४ वैशाख शु. ५ ईश्वर संवत्सर असा दिला आहे, तेव्हां तो खराच असला पाहिजे.* हा पक्ष सुरेश्वराचार्यांचें आयुष्य ८०० वर्षें मानतो.

अर्वाचीन पक्ष दोन. एक तेलंग, भांडारकर, टिळक प्रभृति शंकराचार्यांना सातव्या शतकांत घालणारे, आणि दुसरा पाठक प्रभृति आठव्या व नवव्या शतकांत घालणारे. या दोन पक्षांत फक्त शंभर सवाशें म्हणजे थोडेंच अंतर आहे; पण तें फार महत्त्वाचें आहे. विक्रमादित्य व कालिदासादि नवरत्नें यांचा काल सहावे शतकाचें मध्य, आणि भर्तृहरि व धर्मकीर्ति यांचा काल सातवे शतकाचें मध्य,असें आतां निश्चित ठरलें आहे. हुऐनत्संग, श्रीहर्ष, बाणभट्ट व सुबंधु यांचाही काल सातवें शतक आहे. नंतर कुमारिलभट्ट व त्यांचे मागून त्यांचे मेहूणे मंडनामिश्र. शंकराचार्य अर्थात् त्यांचे मागून झाले असले पाहिजेत. **सदानंदकृत शंकरविजयसारां**तील " प्रासूत तिष्यशरदामतियातवत्यामेकादशाधिक· शतोनचतुःसहस्रयाम् ॥" किंवा **पुण्यश्लोकमंजरीं**तील " निधिनागेभवन्ह्यब्दे विभवे मासि माधवे " हीं वचनें आचार्यकाल गतकालि ३८८९ देतात. त्याप्रमाणें इ. स. ७८८ साल येतें, व तें अर्वाचीन सर्व शोधांना जुळतें. मानभावांच्या ' दर्शन-प्रकाश ' ग्रंथांत ' युग्मपयोधिरसान्वितशाके ' म्हणजे शके ६४२ सालीं शंकराचार्यांनीं गुहाप्रवेश केला, असें लिहिलें आहे. त्यावरून लो. टिळक आचार्यांना सातव्या शतकांत ढकलतात. + पण मानभावांचा दर्शनप्रकाश ग्रंथ विशेष प्रमाणभूत आणि विश्वसनीय मानतां येत नाहीं. का. बा. पाठकांनीं कालनिर्णय ठरविला आहे तो असाः– **भर्तृहरि** इ. स. ६५०, काशिकाकार **जयादित्य** इ. स. ६६१, न्यासकार **जिनेन्द्रबुद्धि** इ. स. ७००, **कुमारिल** इ. स. ७५०, व

---

* A History of Vijayanagar, by B. Surya Narayan Rao. p. XVI.

+ गीतारहस्य, पृ. ५५९.

**शाकटायन** इ. स. ८१४,+ शृंगेरी पीठावरील दुसरे शिष्य **सर्वज्ञात्म-**श्रीचरण ऊर्फ **नित्यबोधघनाचार्य** आपल्या 'संक्षेपशारीरकांत' मनुकुलादित्य राजाचा उल्लेख करतात, तो चालुक्य वंशांतील पहिला किंवा दुसरा **विक्रमादित्य** असल्यास **नित्यबोधघनाचार्य** इ. स. ७४७ चे सुमारास झाले, व शंकराचार्य त्याचे पूर्वी मानले पाहिजेत, असें डॉ. भांडारकर म्हणतात. पण ही देखील नुसती कल्पनाच आहे. सारांश, शंकराचार्यांच्या कालाचा वाद आतां शंभर वर्षांच्या मर्यादेंत येऊन राहिला आहे, ही गोष्ट लहान सहान नाहीं. भारती युद्ध आणि कलियुगारंभ यांच्या काला-विषयींही अजून पुष्कळ वाद आहे. हल्लीं पंचांगोक्त गतकलिमान पुष्कळांना संमत नाहीं. मदुरेचे वेलांडी **गोपाळ अय्यर** म्हणतात, कलियुगारंभच इ.स.पूर्वी ११७७ वर्षी झाला. कसेंही असो, केवळ युधिष्ठिर शक किंवा गतकलि यांचे आधारानें शंकराचार्यांचा काल ठरविणें धोक्याचें आहे.

शंकराचार्यांच्या मठांत संग्रह केलेल्या ग्रंथांत व कागदपत्रांत पुष्कळ ऐतिहासिक माहिती मिळाली असती, पण दुर्दैवानें ती नाहींशीं झाली; व थोडीबहुत शिल्लक राहिली असल्यास मठाधिपतींकडून मिळत नाहीं. या नाशाला कारण मराठे व विशेषेंकरून पेशव्यांचे ब्राह्मण सरदार झाले, ही गोष्ट मोठ्या दुःखाची पण नमूद करणें भाग आहे. शंकराचार्यांचे मठांचा विध्वंस पेशव्यांचे सरदारांनीं केला याविषयीं ऐतिहासिक पुरावा आतां वासुदेव शास्त्री खरे यांनीं छापलेल्या ऐतिहासिक लेख-संग्रहांत प्रसिद्ध झाला आहे. हरिपंत फडक्यांच्या सैन्यानें द्वारका मठ सन १७७५ सालीं लुटला, आणि कोन्हेरराव पटवर्धनांनीं करवीर मठ सन १७७६ सालीं जाळून टाकला. परशुराम भाऊंनीं सन १७९१ सालीं टिपूच्या स्वारींत म्हैसुरांतील कुडलगी मठाचा नाश केला, व त्याच वेळीं रघुनाथराव पटवर्धनांच्या लमाणांनीं शृंगेरी मठाचा विध्वंस केला. ज्या शृंगेरी मठाला टिपु सुलतानानेंही देणग्या व जहागिरी दिल्या त्या मठाचें सर्वस्व-हरण ब्राह्मण पटवर्धन सरदारांनीं करावें हें उद्वेगजनक आहे. मठांतील देवदेवतार्चनही लुटल्यामुळें शृंगेरी-

+Indian Antiquary, Vol, 44, p. 18.

स्वामी उपोषण करूं लागले. या पापामुळें आपले राज्यावर संकट येईल अशी पुण्याचे दरबारांत नाना फडणिसास भीति उत्पन्न झाली. स्वामींची नुकसान-भरपाई करण्याविषयीं नाना फडणिसांनीं पुष्कळ आग्रह केला, पण पटवर्धनांनीं ऐकलें नाहीं. पेशवाईचे अखेरीस सर्व सरदारांची नैतिक अवनति, स्वार्थपरायणता आणि खुद्द पेशव्यांचें दौर्बल्य यामुळें असलीं पापाचरणें वाढून मराठेशाहीचा अंत झाला असला पाहिजे. गांवांतील धनिक सावकार मठांचा आश्रय करीत म्हणून मठ लुटले जात असें म्हणत. कसेंही असो, या जाळपोळीनें मठांतील कागदपत्र नाहींसे झाले तें नुकसान मात्र आतां भरून येण्यासारखें नाहीं. श्रृंगेरी, कुडली, करवीर व द्वारका येथें आतां कांहीं कागदपत्र नाहींत. ज्योतिर्मठ लुप्तप्राय आहे आणि जगन्नाथमठ नामशेष आहे. हंपी, शिवगंगा वगैरे मठ अर्वाचीन आहेत. कांची अथवा कुंभकोण मठाचे पीठाधिकारी आपणांस प्राचीन समजतात व आपलेजवळ पुरावा आहे म्हणतात; पण तो अजून बाहेर पडत नाहीं. शिवाय या मठाचें अनेक वेळां स्थलांतर झाल्यामुळें मूळ कागदपत्रें सुरक्षित राहिलीं असतील कीं नाहीं याविषयीं शंकाच आहे.

आचार्यांचें जन्मस्थान कालटी गांव अलीकडे सांपडलें हा मोठा शोध लागला म्हटलें पाहिजे, तें सर्वांशीं नष्ट होऊन सभोंवतालची सर्व जागा ख्रिस्ती लोकांचे मालकीची झाली होती, ती सन १९१० सालीं श्रृंगेरीपीठस्थ आचार्यांनीं २७००० रुपयांस ३० एकर खरेदी घेऊन तेथें हल्लींचीं मंदिरें, मठ व घांट बांधिले. ख्रिस्ती शकाचे दुसरे शतकापासून सीरियन ख्रिश्चन लोकांची वसाहत मलबारांत झाली होती तेथेंच भरतखंडांत धर्मक्रांति करणाऱ्या जगद्‌गुरूंचा अवतार झाला हा विलक्षण योगायोग होय. आचार्यांची जन्मभूमि बाराशें वर्षें ख्रिस्ती लोकांचे ताब्यांत राहिल्यानंतर विसाव्या शतकांत मोठ्या प्रयासानें तिचा शोध लागावा, ही दैवगति विचित्र आहे. या जीर्णोद्धाराचें श्रेय तीन पुरुषांस आहे, एक श्रृंगेरी पीठस्थ स्वामी **श्री सच्चिदानंदशिवाभिनवनृसिंहभारती**, दुसरे तेव्हांचे त्रावणकोरचे दिवाण **व्ही. पी. माधवराव**. व तिसरे म्हैसूरचे माजी चीफ जस्टिस **रामचंद्र अय्यर**. निर्जन अरण्याचें आतां सुंदर क्षेत्र झालें आहे,

व तेथें वन्य श्वापदांचे आरोळ्यांऐवजीं नित्य वेदशास्त्रपठण ऐकूं येतें. आचार्यांचें जन्मस्थान निश्चित ठरलें तसा जन्मकालाचाही कायमचा निर्णय होईल, तर भरतखंडाच्या प्राचीन व अर्वाचीन इतिहासाची विभाजक मध्यरेषा मुक्रर होईल.

इसवी सनाचें आठवें शतक सर्व जगांत क्रांतिकारक होतें. यूरोपांत शार्लमेनचें एकछत्री राज्य होऊन भावी आस्ट्रियन व जर्मन साम्राज्यांचा पाया घातला गेला. मध्य आशियांतील तार्तर लोक चीनांत हल्ले करूं लागले होते, व हिंदुस्थानांत हूण आणि शक राज्यविस्ताराकरितां झटत होते. अरबस्तानांत महंमद पैगंबरानें नवा धर्म स्थापून त्याच्या लाटा पूर्व पश्चिम दिशांस पसरूं लागल्या होत्या; व लवकरच सिंध प्रांतांत त्यांचा प्रवेश झाला. महंमदी जुलमाला त्रासून सीरियन व नेस्टोरियन पंथाचे खिस्ती मलबारांत येऊन सुरक्षित राहिले, त्यामुळें एकेश्वर भक्तीची लोकांस ओळख होऊं लागली होती. भरतखंडांत बौद्ध व जैन पंथांच्या उत्कर्षाची सीमा होऊन नवीन कर्मकांडी वैदिकांची व त्यांची झटापट सुरू झाली होती. कांची, नालंद, धान्यकटक, काश्मीर, विक्रमशिला, या प्रसिद्ध विद्यापीठांतून अनेक पंडित निर्माण होत असत. दिग्नाग, धर्मकीर्ति, भर्तृहरि यांसारखे बौद्ध, समंतभद्र अकलंकासारखे जैन, कुमारिल, प्रभाकरासारखे मीमांसक, उद्योतकार प्रशस्तपादासारखे नैयायिक, शाकटायन चंद्रासारखे वैय्याकरण, व सुबंधु, बाण, भवभूतिसारखे कवि यांनीं लोकांच्या बुद्धीला मनस्वी चालन देऊन जुन्या नव्या कल्पनांचें तुंबळ युद्ध लावलें होतें. भरतखंडाच्या सर्व भागांत लहान मोठ्या राज्यांच्या व राजघराण्यांच्या सिनेमांतील चित्रपटाप्रमाणें भराभर उलथापालथी होत होत्या. दक्षिण हिंदुस्थानांत विदेशी व विधर्मी लोकांचा प्रवेश फारसा न झाल्यामुळें हीं स्थित्यंतरें अधिक शुद्ध व व्यवस्थित स्वरूपाचीं होतीं. आंध्रांत बौद्धिक उन्नति झाली, तसे द्रविडांत भक्तीवर भर देणारे साधुसंत झाले. शैव संबंघार आणि वैष्णव नामाल्वार यांची संतपरंपरा कांची शहरांत उदय पावून सामान्य जनसमाजांत ईश्वरभक्तीचा प्रसार होऊं लागला. जिकडे तिकडे तत्त्वशोधनाविषयीं प्रबल जिज्ञासा उत्पन्न झाली होती. कदंब चालुक्य,

पल्लव, गंग, चोल, वगैरे घराण्यांतील वीरांनीं राज्यें स्थापून विद्वानांचाही उत्कर्ष वाढविला. त्यामुळें सातव्या व आठव्या शतकांत दक्षिण देशांत विलक्षण जागृति उत्पन्न झाली होती. याच जागृतीचा परिणाम शंकराचार्यांचा अवतार होय असें म्हणण्यास हरकत नाहीं कार्लाईलचे मताप्रमाणें कोणत्याही महात्म्याचा उदय होण्यापूर्वी तत्कालीन परिस्थिति अनुकूल व्हावी लागते; तशी शंकराचार्यांचें अद्वैतमत ग्रहण करण्याला लोकांचे मनाची योग्य स्थिती झाली होती. बौद्ध, जैन, नैयायिक, मीमांसक वगैरे परस्परविरोधी तार्किकांच्या शाब्दिक कोट्यांमुळें सर्वच तर्कवितर्क अप्रतिष्ठित व निर्मूल वाटूं लागले होते. केवळ भक्तीनें बुद्धीचें समाधान होईना, व नुसत्या तर्कप्रपंचानें सत्य सांपडेना. अशा भांबावलेल्या चित्ताला "तत्त्वमसि" या महावाक्यानें अंतर्मुख करून "अहं ब्रह्मास्मि" असा आत्मसाक्षात्कार करविला, आणि तर्कवितर्कांच्या लाटांत हेलकावे खाणाऱ्या बुद्धीला श्रुत्युक्त ब्रह्मज्ञानानें स्थैर्य दिलें हेंच शंकराचार्यांचें महत्कार्य होय. शंकराचार्यांनीं जैनबौद्धांचा नाश केला, कर्मकांडी मीमांसकांचा पराजय केला, संन्यासधर्माचा प्रसार केला, वगैरे कल्पना अंधहस्तिन्यायानें एकदेशी व संकुचित आहेत. ज्याप्रमाणें एकादा आंधळा हत्तीला हातांनीं चांचपडून सोंडेला पायाला किंवा शेपटीलाच हत्ती समजतो, त्याचप्रमाणें वरील कल्पना शंकराचार्यांच्या सर्वतोमुखी कार्याच्या अंगभूत आहेत. गीतारहस्यांत शंकराचार्यांच्या संन्यासधर्माला दूषण देतांना लो. टिळकांच्याही लक्षांत ही गोष्ट आली नाहीं.

कर्मयोग कितीही व्यवहारोपयोगी असला तरी समाजांत सांसारिक वासनांना उत्तेजन देऊन बुद्धिभेद व कलह वाढवितो, आणि ज्ञानयोग सर्व वासनांचा लोप करून चित्तस्थैर्य आणतो, हा सिद्धांत अनुभवसिद्ध आहे. कुमारिलभट्टांनीं कर्ममीमांसा पुरी केल्यानंतर त्यांना पश्चात्ताप होऊन अग्निकाष्ठ भक्षण करून त्यांनीं आत्मघात केला. तसेंच टिळकांच्या कर्मयोगानें देशांत अनेक पक्ष, वाद आणि तंटे वाढले. परंतु शंकराचार्यांनीं सर्व श्रुतीस्मृतींचा समन्वय करून उपनिषदांच्या भक्कम पायावर सनातन धर्माची इमारत जी एकदां कायम केली, ती आज बाराशें वर्षांनंतरही अनेक

स्वधर्मी व विधर्मी लोकांच्या हल्ल्यांनीं बिलकूल डळमळीत झाली नाहीं. अर्जुनाप्रमाणें तात्कालिक फल मिळवूं पाहणाराला कर्मयोग ठीक आहे; पण आत्यंतिक मोक्षाला ज्ञानच पाहिजे, हा धर्माचा खरा सिद्धांत शंकराचार्यांनीं सनातनधर्मी लोकांचे अनुभवास आणून दिला. द्वैत, विशिष्टाद्वैत, शुद्धाद्वैत, वगैरे भक्तिप्रधान संप्रदाय व तसेच साधुसंतांचे पंथ मागाहून निघाले; परंतु सर्व धर्मांचें मूळ आत्मज्ञान हा जो शंकराचार्यांनीं एकदां पाया घालून दिला तो सर्वांनीं अंगीकारिला. शंकराचार्यांच्या अद्वैतमतानें पूर्वींचे सर्व वाद गतार्थ व शुष्क होऊन गेले. " अहं ब्रह्मास्मि " हा आत्मसाक्षात्कार झाल्यानंतर बुद्धांचा नास्तिपक्ष किंवा जैनांचा "स्याद्वाद," किंवा मीमांसकांचें " अपूर्व, " या सर्व कल्पना कोत्या व पोरकट वाटूं लागल्या, यांत नवल नाहीं. कारण त्या सर्व कृत्रिम व निराधार होत्या. आठव्या शतकाचे पुष्कळ पूर्वीं श्रीकृष्णांनीं व बादरायणांनीं अद्वैत मताचा पाया रचून ठेवला होता; पण त्यावर इमारत बांधून ती लोकप्रिय करण्याचें महत्कार्य शंकराचार्यांनीं केलें. ज्याप्रमाणें श्रीविष्णूच्या प्रत्येक अवतारानें चराचर सृष्टीची उत्क्रांति एक एक पायरी वर चढविली, त्याप्रमाणें श्रीशंकरांच्या या अवतारानें लोकांच्या बुद्धीचा विकास करून सनातन धर्माला अगदा निराळें वळण लावून दिलें, असें म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं. आचार्यांविषयीं ज्या अनेक दंतकथा व चमत्कार प्रचलित आहेत त्यांपैकीं खऱ्याखोट्यांचा निर्णय जरी आज करतां येत नाहीं, तरी त्यांनीं अनेक भिन्न मतांचा उच्छेद करून अद्वैतमताचें वर्चस्व सर्व भरतखंडात जारी केलें ही गोष्ट निर्विवाद आहे. देशांतील लौकिक राज्यें विलयास गेलीं, पण हें अद्वैताचें साम्राज्य सर्व भरतखंडांत अबाधित टिकलें आहे. " नैनं छिन्दन्ति शस्त्राणि नैनं दहति पावकः " असें हें बाह्योपाधी पासून अलिप्त आणि केवल व्यक्तिबुद्धि-निष्ठ साम्राज्य आहे. पृथ्वीवर लढाया होतील, नवीं साम्राज्यें उद्भवतील व पुनीं लयास जातील. देशाच्या मर्यादा कमी अधिक होतील. किंवा लोकांचे आचारविचारही बदलतील; पण "अहं ब्रह्मास्मि" या तत्त्वाचा अंमल जो एकदां भारतवासीयांच्या मनावर बसला तो हालणें आतां दुरापास्त आहे.

शंकराचार्यांनीं दिग्विजय करून काश्मीरांतील शारदापीठावर अधिरोहण केलें व त्यामुळें त्यांस 'जगद्गुरु' पदवी प्राप्त झाली असा प्रवाद आहे. शंकरविजयग्रंथांत या दिग्विजयाचें रसभरित वर्णन आहे. प्राचीन काळीं राजे लोकांप्रमाणें विद्वान् पंडितही देशोदेशीं हिंडून व प्रतिस्पर्ध्यांना वादांत जिंकून आपल्या मताचें वर्चस्व स्थापन करीत. गांवच्या वेशीजवळ नगारा ठेवलेला असे तो वाजवून त्यानें सर्वांना वादाला आव्हान करावयाचें, व मग राजदरबारांत प्रसिद्धपणें वाद होऊन ज्याचा विजय होई त्याला राजाकडून अजिंक्यपत्र व जहागीर मिळे. शंकराचार्यांचा साहाय्यक सुधन्वा राजा खरा होता कीं नाहीं, व तो केव्हां व कोठें झाला, यायिषयीं अजून पुरावा मिळत नाहीं. तथापि आचार्यांच्या दिग्विजयांत त्यांना ठिकाठिकाणच्या अनेक राजेलोकांची मदत झाली, असे उल्लेख आहेत.

जैन व बौद्ध पंडितांचें त्यावेळीं राजदरबारीं चांगलें वजन होतें. कांचीचे पल्लव व मान्यखेटाचे राष्ट्रकूट राजे बौधांचे चाहाते होते. पण कदंब, चालुक्य, चोल व पांड्य हे वैदिकधर्मानुयायी विद्वानांचे पुरस्कर्ते होते. हळू हळू दक्षिण देशांतील बौद्धजैनांचें वर्चस्व कमी होऊन अद्वैतमताचा फैलाव झाला, आणि त्याच वेळीं वैदिकमार्गी राजांचीं राज्येंही वाढलीं. दक्षिणेंतील जैन—बौद्धधर्म बंगाल बिहार प्रांतांत गेला, व तेथें कांहीं वर्षे राहून शेवटीं हिंदुस्थानाबाहेर तिबेट व चीन देशांत पसरला. आठव्या शतकानंतर नर्मदेच्या दक्षिणेस अद्वैत, विशिष्टाद्वैत, द्वैत आणि भक्तिमार्ग यांचेंच प्राबल्य दिसून येतें.

भरतखंडांत गौतुमबुद्धाचे वेळीं पहिली धर्मक्रांति झाली. त्यावेळीं वैदिक यज्ञयागादिकांचा लोकांना कंटाळा येऊन तर्कशक्तीचें व बौद्धिक विचारांचें प्राबल्य झालें. बाराशें वर्षांच्या अनुभवानंतर केवळ तर्कशक्तीनें धर्मज्ञान होणें अशक्य वाटूं लागलें, व मीमांसकांची पुन्हां शब्दप्रमाणाकडे प्रवृत्ति झाली. पूर्वमीमांसेनें शब्दप्रमाणाचे नियम घालून दिले, व शंकराचार्यांनीं त्या नियमांना अनुसरून वेदान्तशास्त्र तयार केलें. "तत्तु समन्वयात्" आणि "शास्त्र-योनित्वात्" हीं दोन सूत्रें वेदान्तशास्त्राचा पाया आहेत. तर्कशक्ति

अप्रतिष्ठित–म्हणजे अनिश्चित–असल्यामुळें सर्व ब्रह्मज्ञानाचा मुख्य आधार शास्त्र म्हणजे उपनिषदें, आणि त्या उपनिषदांतील वाक्यांचा ‘ समन्वय ’ करणें हाच ब्रह्मज्ञानाचा मार्ग. हा सनातन धर्माचा सिद्धांत स्थापन करून शंकराचार्यांनीं केवळ तार्किक वादविवादांनीं चंचल झालेली लोकांची बुद्धि स्थिर केली. ही दुसरी धर्मक्रांति होय. त्यांचे नंतर पुष्कळ नवीन मतमतांतरें निघालीं, पण तीं सर्व श्रुतिस्मृतींना धरून होतीं. आठव्या शतकानंतर आणखी बाराशें वर्षें गेलीं; व पाश्चात्य ज्ञानाच्या संघर्षणानें आतां तिसरी धर्मक्रांति होण्याचा प्रसंग आला आहे. बुद्धानें व महावीरानें श्रुति अजीबात फेकून देऊन केवळ तर्कशक्तीचा आश्रय केला. उलट, शंकराचार्य श्रुतिवाक्यांचा फक्त समन्वय करून तेथेंच थांबले. आतां अर्वाचीन शोधांमुळें ऐतिहासिक बुद्धि उत्पन्न झाली आहे. तर्कशक्ति किंवा शब्दप्रयोग या दोहोंच्याही पलीकडील मानवी बुद्धीच्या नैसर्गिक प्रवृत्तींत धर्मकल्पनांचा उगम आहे व प्रत्येक राष्ट्राच्या आनुवंशिक बुद्धी-प्रमाणें त्या राष्ट्राचा धर्म बनतो, हें तत्त्व आतां पुढें येत आहे. एका माणसाचा पोषाख दुसऱ्याच्या आंगांत जात नाहीं, तसा एका राष्ट्राचा धर्मही जशाचा तसा दुसऱ्यावर लादला जात नाहीं, व लादला तरी त्याचें रूपांतर होतें. मोझेसच्या व खिस्ताच्या आज्ञा मानणारे यूरोपियन लोक सर्व जगाला गुलाम करीत आहेत, आणि अहिंसावादी बुद्धधर्म घेणारे चिनी सर्वभक्षक झाले आहेत ! तात्पर्य, राष्ट्राच्या प्रगतीबरोबर त्याच्या स्वभावानुरूप धर्माचीही उत्क्रांति होत असते; आणि असा निसर्गसिद्ध धर्मच शाश्वत राष्ट्रीय धर्म होतो.

शंकराचार्यांचा अद्वैतवाद आणि मायावाद सामान्य जनांस नीरस वाटूं लागल्यानें लवकरच त्याला भक्तीची जोड देण्याची कल्पना उत्पन्न झाली; व त्यामुळें रामानुज, माध्व, ज्ञानेश्वर, वल्लभ वगैरे भक्तियुक्त ब्रह्म-ज्ञानाचे पंथ निघाले. डा. सर भांडारकर म्हणतातः—

“This doctrine (मायावाद) left no room for the exercise of love and piety in the world of

reality, though its followers allow it in the ordinary illusive condition of the human souls; and therefore it laid the axe at the root of Vaishnavism. The great wish of the Southern leaders of the latter faith was the overthrow of this doctrine of illusion, or Maya on the same Aupanisada grounds on which it was set up."+

दक्षिण प्रांतांत भक्तिमार्ग शंकराचार्यांचे पूर्वीही होता, व तो दोन प्रकारच्या संघांनीं जिवंत ठेवला होता. ब्राह्मणांतील भक्तिमार्गाचे प्रवर्तक "आचार्य" व ब्राह्मणेतरांतील साधुसंत "अलवार" म्हणून प्रसिद्ध होतें. तसेंच शैवपंथाचे "संबंधार"ही झाले. अलवारांचीं स्तोत्रें, पदें व प्रबंध देशी तामील भाषेंत होते; आणि ते महाराष्ट्र साधुसंतांच्या अभंगांप्रमाणें शुद्ध प्रेमळ भक्तीनें भरलेले असत. शंकराचार्यांनीं आपल्या वेदान्तांत भक्ति व उपासना मान्य केली, पण त्यांना गौण स्थान दिलें आहे. "उत्पत्त्यसंभवात्" (२-२-४२) या बादरायणसूत्रावरील भाष्यांत आचार्यांनीं भागवत धर्माचा उल्लेख करून पांच प्रकारची भक्ति सांगितली आहे. आचार्य म्हणतात,—"तमित्थंभूतं परमेश्वरं भगवंतमभिगमनोपादानेज्यास्वाध्याययोगैर्वर्षशतमिष्ट्वा क्षीणक्लेशो भगवन्तमेव प्रतिपद्यते." देवालयांत जाणें, पूजाद्रव्य आणणें, पूजा, जप, आणि ध्यान, असे भक्तीचे पांच प्रकार आहेत. त्यांचा "श्रुतिस्मृत्योरीश्वर-प्राणिधानस्य प्रसिद्धवात्" असें म्हणून स्वीकार करून उपासना हें एक कर्माप्रमाणेंच चित्तशुद्धीचें साधन आहे, मुख्य ध्येय नव्हे, असा सिद्धांत केला. माया वादाच्या अतिरेकाला आळा घालण्याकरितां वैष्णव आचार्यांनीं कंबर बांधली. वैष्णवांचे आद्य आचार्य **रंगनाथाचार्य** ऊर्फ **नाथमुनि**, चिदंबर तालुक्यांत मुन्नरगुडी येथें जन्मले, व इ. स. ९२० सालीं म्हणजे शंकराचार्यांनंतर शंभर वर्षांनीं समाधिस्थ झाले. त्यांचे नातू **यामुनाचार्य** ऊर्फ **अलवंदार** यांनीं "सिद्धित्रय" ग्रन्थ लिहून विशिष्टाद्वैत मत स्थापिलें; व

+ Bhandarkar's Vaishnavism, Shaivism etc, p.51

त्यांचे मागून गादीवर बसलेले **रामानुजाचार्य** यांनीं "श्रीभाष्य" लिहून या मताचा व वैष्णव भक्तिमार्गाचा प्रसार केला. रामानुजांचा जन्म इ. स. १०१७ सालीं त्रिपति येथें झाला, व समाधि इ. स. ११३७ सालीं म्हणजे १२० व्या वर्षीं श्रीरंगास झाली. त्यानंतर बरोबर शंभर वर्षांनीं इ. स. १२३८ सालीं द्वैतमतवादी **आनंदतीर्थ** ऊर्फ **मध्वस्वामी** यांचा जन्म पश्चिम किनाऱ्यावर उडपी येथें झाला. डा. सर भांडारकरांच्या मतें आनंदतीर्थांचा जन्म इ. स. ११९८ व समाधि १२७६ त मानली पाहिजे. लिंगायत पंथही याच वेळीं निघाला. यानंतर ५० वर्षांनीं माधवाचार्य ऊर्फ विद्यारण्य स्वामी झाले, व त्यांनीं शंकराचार्यांच्या अद्वैत-मताचा पुनरुद्धार केला.

येणेंप्रमाणें आठव्या शतकाचे अखेरीपासून चवदावे शतकापर्यंत पांचशें वर्षें भक्तिसंप्रदायाकडून अनेक बाजूंनीं शांकरमतावर हल्ले होत होते. त्याच-प्रमाणें बौद्ध **धर्मोत्तराचार्य**, जैन **माणिक्यनन्दी** व **प्रभाचन्द्र**, नैय्या-यिक **श्रीधर** आणि **उदयन**, तसेंच पाशुपत आणि निंबार्क, यांच्या टीकास्त्रांचाही भडिमार होतच होता. उलट **सुरेश्वराचार्य**, **चित्सुखा-चार्य**, **आनन्दगिरि*** आणि **वाचस्पतिमिश्र** यांनीं शांकरसिद्धांताचें मंडण केलें. याप्रमाणें दक्षिण प्रांतांत पांचशें वर्षें मत–संप्रदायांचें युद्ध चाललें असतां उत्तर हिंदुस्थानांत विधर्मी मुसलमानांचा अंमल अमावा-स्येच्या भरतीप्रमाणें फैलावून, सनातन धर्माचा समूळ उच्छेदच होण्याचा प्रसंग आला. तरवारींनीं लोकांचा व कुदळींनीं मंदिरांचा संहार होऊं लागल्यावर पंडितांच्या व टीकाकारांच्या कागदीं लढाईला कोण विचा-रतो ! मुसलमान नर्मदेवर पोंचले. अल्लाउद्दीनानें खानदेशांत स्वारी केली व मलीक काफरानें देवगिरि, वारंगळ आणि द्वारसमुद्र जिंकून तुंगभद्रे-पर्यंत दिल्लीच्या बादशहाचा अंमल नेला. मुसलमानी लाट दारापर्यंत येऊन पोंचल्यानंतर स्वराज्य व स्वधर्म यांचे रक्षणाकरितां दक्षिण प्रांतांतील लोक खडबडून जागे झाले. इ. स. १३३६ त तुंगभद्रेच्या कांठीं

* आनन्दगिरीकृत शंकरविजय, Bib. India ed. पृ. २५१

**विजयनगरा**ची स्थापना झाली व १३४७ त हुसेन गंगूनें गुलबुर्ग्यास ब्राह्मणी राज्य स्थापिलें. यानंतर दिल्लीच्या बादशहांनीं नर्मदेच्या दक्षिणेस पुष्कळ स्वाऱ्या केल्या, पण त्यांचा अंमल दक्षिणेस महाराष्ट्राच्या घाटमाथ्यावर केव्हांही स्थिर झाला नाहीं. ही मुसलमानी लाट मागें परताविण्याचा पहिला मान विजयनगराला व तें राज्य स्थापणाऱ्या शंकराचार्यांच्या शृंगेरी गादीवरील **विद्यारण्या**ला दिला पाहिजे. शंकराचार्यांनीं आठव्या शतकांत सनातन धर्माचा उद्धार केला, तशी पुढें त्यांचे शृंगेरी मठानें स्वराज्याची मुहूर्त–मेढ रोवण्यास मदत केली. धर्माचें पुनरुज्जीवन आणि स्वराज्यस्थापना यांचा किती निकट संबंध आहे हें यावरून ध्यानांत येईल.

शंकराचार्यांनीं केलेल्या दिग्विजयाचें सविस्तर वर्णन शंकरविजय ग्रंथांत आढळतें, तसा मठस्थापनेविषयीं प्राचीन ग्रंथांतून उल्लेख सांपडत नाहीं. आनंदगिरीच्या व माधवाच्या शंकरदिग्विजयांत फक्त शृंगेरी मठ स्थापून तेथें आचार्यांनीं बारा वर्षें विश्रांति घेतल्याचा उल्लेख आहे. तसेंच बारा वर्षांनंतर सुरेश्वराचार्यांला शृंगेरीस ठेवून आचार्य दक्षिणदेशीं यात्रा करीत कांचीला आले व तेथें शिवकांची व विष्णुकांची नगरें स्थापून कांहीं कालानें तेथेंच समाधिस्थ झाले, असेंही आनंदगिरीनें लिहिलें आहे. शृंगेरींतील विद्यापीठ, शारदामंदिर व बदरिकाश्रमांतील नारायणाचें मंदिर शंकराचार्यांनीं स्थापिल्याचा उल्लेख आहे. पण यांखेरीज दुसरी मूर्तसंस्था स्थापल्याचा विश्वसनीय इतिहास मिळत नाहीं. आचार्यांनीं चार दिशांना चार मठ स्थापून तेथें आपला एक एक शिष्य पीठाधिपति केल्याची प्रसिद्धी आहे. पण या गोष्टीला आधार मठाम्नाय, गुरुपरंपरा व पुण्यश्लोकमंजरी यांखेरीज दुसरा नाहीं; आणि या कृति तर अर्वाचीनच असाव्यात असें अंतर्बाह्य प्रमाणांवरून दिसतें. नाहीं म्हणावयाला "व्यासाचलीय शंकरविजयांतील" म्हणून पुढील श्लोक देण्यांत येतोः—

**गामाक्रम्य पदेऽधिकांचिर्निबिडस्कन्धैश्चतुर्भिस्तथा**
**व्यावृण्वन् भुवनान्तरं परिहरंस्तापं स मोहज्वरम्**

**यः शाखी द्विजसंस्तुतः फलति तत् खाद्यं रसाख्यं फले**
**तस्मै शंकरपादपाय महते तन्ये त्रिसंध्यं नमः ॥**

वरील श्लोकांत शंकराचार्य–रूपी महावृक्षाचें कांची येथें बुंध असून चार मठरूपी शाखा जगभर पसरल्या असें वर्णन आहे. 'व्यासाचलीय शंकरविजय' कांची पीठावरील ५१ वे स्वामी व विद्यारण्याचे गुरु **श्रीविद्यातीर्थ** यांनीं रचिला. आणि माधवीय शंकरदिग्विजय त्यावरून लिहिला, अशी कांचीमठांतील आख्यायिका आहे. परंतु समग्र ग्रन्थ प्रसिद्ध झाल्यावांचून वरील श्लोकावरून कांहीं अनुमान करतां येत नाहीं. उलट विद्यारण्याचे परमगुरु **विद्यातीर्थ** ऊर्फ **विद्याशंकरभारती** शृंगेरीपीठावर १०वे स्वामी होते अशी परंपरा व इतर ऐतिहासिक पुरावा पुष्कळ मिळाला आहे. कांची मठ चार मठांपैकीं नाहीं. म्हणून त्याला मध्यमाम्नाय असें नांव देण्यांत आलें आहे. त्याच्या प्राचीनत्वाविषयीं शंका असल्यामुळें त्याचें समर्थन करणारे "बृहत्शंकरविजय" व "व्यासाचलीय" सारखे ग्रन्थही विशेष विश्वसनीय मानतां येत नाहींत. आणि कांची मठाचें स्थलांतर तीन चार ठिकाणीं झाल्यामुळें प्राचीन स्थानही दृग्गोचर नाहीं.

कांची व इतर मठांतील शिष्यपरंपरा, त्यांचा काल व अनुक्रम, यांविषयीं तर इतका घोटाळा आहे कीं, या मठपरंपरा खुद्द आचार्यांनीं निश्चित करून दिल्या असें मानणें फार अवघड आहे. आद्य शिष्यांचीं नांवें जमत नाहींत; सुरेश्वराचार्य, पद्मपादाचार्य व विद्यातीर्थ दोन तीन मठाचे गादीवर आढळतात. शंकराचार्य नांवाचे सहा सात आहेत., आणि पृथ्वीधव, विश्वरूप हीं नांवें स्वतंत्र आहेत कीं दुसऱ्या कोणाचीं आहेत, याचा निर्णय होत नाहीं. मठांची व शिष्यपरंपरेची स्थापना खुद्द आचार्यांनीं केली असती तर असा संदेह राहाण्याचें कारण नव्हतें, व शिवाय तत्कालीन ग्रन्थांत आणि शिलालेख, ताम्रपट वगैरे लेखांत त्याविषयीं पुष्कळ माहितीही आढळती. शृंगेरी खेरीज दुसऱ्या कोणत्याही मठासंबंधीं विश्वसनीय लेख अजून बाहेर आले नाहींत. त्यामुळें केवळ दंतकथेच्या आधारावर या मठांची स्थापना कधीं झाली हें निश्चयपूर्वक सांगता येत

नाहीं. श्रृंगेरी, द्वारका, जगन्नाथ व बदरिकाश्रम असे चार दिशांचे चार कांची ऊर्फ कुंभकोण मठ पांचवा, आणि कुडली, करवीर व मूलबागल असे तीन, मिळून आठ मुख्य मठ हल्लीं प्रसिद्ध आहेत. त्यांशिवाय माधवाचार्यांनीं स्थापलेले आठ शाखा मठ; त्यांतच पुष्पगिरी, शिवगंगा, हंपी, वगैरेंचा अंतर्भाव होतो. मिळून आचार्यांचे सोळा मठ झाले, व शिवाय हल्लींच्या वारसांच्या व इतर तंट्यांमुळें नवीन फाटे फुटत आहेत ते निराळेच. कुडलीचे दोन, करवीरचे चार, आणि द्वारकेचे चार, असे दहा स्वामी हक्कासाठीं हल्लीं भांडत आहेत. त्यांपैकीं कित्येकांना तर निर्वाहाचीही भ्रांत आहे, व कित्येकांवर कर्जाच्या डिकऱ्या झाल्या आहेत. मठाचें द्रव्य धार्मिक आहे या गोष्टीचा बहुतेकांस विसर पडला असून, संन्यास घेऊन पीठारूढ होणें हा एक नवा "संन्याशाचा संसार" थाटून पूर्वाश्रमींच्या गणगोतांचा योगक्षेम चालविण्याचा राजमान्य मार्ग आहे, अशीच समजूत झालेली दिसते. देशांतील धर्ममर्यादा कायम राखण्याकरितां स्थापलेल्या मठांनीं स्वतःचीच मर्यादा सोडली, व जगद्गुरू म्हणविणारांना विधर्मी अधिकाऱ्यांपुढें व कोर्टापुढें अर्जदार म्हणून उभें रहाण्याचा प्रसंग आला आहे. जगद्गुरूंची पीठें लहानमोठ्या अपराधाकरितां दंड घेऊन प्रायश्चित्तें देण्याचीं यंत्रें झालीं व त्यांचे कारभारी धंदेवाले एजंट झाले आहेत. देशाच्या अवनति–कालांत चांगल्या संस्थांना देखील कसा विद्रूपपणा येतो त्यांचें हें उत्तम उदाहरण आहे.

आचार्यपीठांच्या इतिहासांत मोठा दोष–पहिला शिष्य कोण होता व त्याची कारकीर्द किती वर्षे होती याविषयींचा वाद होय. श्रृंगेरी, कांची व द्वारका या तिन्ही मठांचे सांप्रदायिक सुरेश्वराचार्याला आपआपल्या मठांचे प्रथम शिष्य मानतात. आचार्यांच्या सर्व शिष्यांत मंडणमिश्र ऊर्फ सुरेश्वराचार्य विद्येनें श्रेष्ठ, गुरूला प्रिय व लोकप्रसिद्ध होते. त्यामुळें प्रत्येक मठाला ते आपल्या पीठावर हवेसे वाटणें स्वाभाविक आहे. त्याचप्रमाणें सर्व सांप्रदायिकांचा रोख आचार्य–काल दोन किंवा अडीच हजार वर्षांपूर्वी, म्हणजे खिस्तीसनापूर्वी ढकलण्याकडे आहे. आणि या दोन्ही गोष्टींचा मेळ घालण्याकरितां सुरेश्वराचार्य योगबलानें आठशें वर्षांवर

जगले असें मानतात. श्रृंगेरीच्या परंपरेंत सुरेश्वराचार्य इ. स. पूर्वी १२ पासून इ. स. ७७३ पर्यंत म्हणजे ७८५ वर्षे गादीवर असल्याचें नमूद आहे. बंगलोरचे सूर्यनारायणराव यांनीं आपल्या विजयनगरच्या इतिहासाचे शेवटीं श्रृंगेरी मठाची गुरुपरंपरा छापली आहे. तींतही सुरेश्वराचार्य विक्रम संवत् ३० पासून शालीवाहन शक ६९५पर्यंत म्हणजे ८०० वर्षे गादीवर होते असें दिलें आहे व ही यादी आपण श्रृंगेरी स्वामीचे पूजेचे यादीवरून उतरून घेतली अशी तिच्या खरेपणाविषयीं सदर सूर्यनारायणराव खात्री देतात. कांची मठवाले आद्य आचार्यांना अडीच हजार वर्षांपूर्वी ढकलून सुरेश्वराचार्यांना ७० वर्षे देतात व त्यांचे मागून विद्यातीर्थापर्यंत पन्नास गुरु म्हणजे श्रृंगेरीपरंपरेपेक्षां अधिक ४० गुरूंचीं नावें देतात. कांची पीठाच्या पुण्यश्लोकमंजरींत "तस्यादेशेन कांच्यामवसदथ समाः सप्ततिं कामपीठे" असा सुरेश्वराचार्यांविषयीं उल्लेख आहे. द्वारकेच्या पीठिकेंत पहिले शिष्य ब्रह्मस्वरूपाचार्य युधिष्ठिर शक २६५३ सालीं आचार्यनिर्याण झालें तेव्हांपासून २६९१ चैत्र वद्य अष्टमीपर्यंत गादीवर होते, तेंच सुरेश्वराचार्य म्हणतात. म्हणजे त्यांना २८ वर्षेच मिळतात. सुरेश्वराचार्यांची परंपरा म्हणून आपला मठ सर्वांत श्रेष्ठ असें शाबीत करण्याकरितांच ही सर्व ओढाताण आहे.

आठव्या शतकापासून चौदाव्या शतकापर्यंत सर्व "गुरुपरंपरां"त असाच घोटाळा आहे. **श्रीविद्यातीर्था**पासून मात्र संगति नीट लागते. म्हणून त्यापूर्वी हे भिन्न मठ अस्तित्वांत नसून फक्त श्रृंगेरी मठ एकच होता, असा कित्येकांचा तर्क आहे. कै. पंडित एन्. भाष्याचार्यांचे मतें हल्लींचे अनेक मठ आद्य शंकराचार्यांनीं स्थापिले नसून मागाहून अस्तित्वांत आले. **विद्यातीर्थ** व **विद्यारण्य** यांचे पूर्वी श्रृंगेरीखेरीज इतर मठांचे अस्तित्वांविषयीं खात्रीलायक ऐतिहासिक पुरावा मिळत नाहीं एवढी गोष्ट खरी. म्हणून श्री विद्यारण्यांनीं चौदाव्या शतकांत विजयानगरचें राज्य स्थापून नंतर शांकर सांप्रदायाचा पुनरुद्धार केला त्यावेळीं ही मठयोजना अमलांत आणली असावी अशी कल्पना केल्यास वावगा होणार नाहीं या मुद्द्यासंबंधानें पुढें जास्त विवेचन करावयाचें आहे.

शंकराचार्यांनंतर पांचशें वर्षें त्यांचा संप्रदाय मलिन होत चालला, व द्वैत, विशिष्टाद्वैत, लिंगाइत वगैरेंच्या हल्ल्यांनीं जर्जरही होत चालला होता. त्याचें **माधवाचार्य** ऊर्फ **श्रीविद्यारण्यांनीं** पुनरुज्जीवन करून विजयनगरच्या राजांच्या साहाय्यानें पुनर्घटना केली. त्यापैकींच चार दिशांस चार मठ स्थापन करण्याची योजना असण्याचा संभव आहे. ज्यांनीं स्वराज्य स्थापण्याकरतां विजयानगरासारखें प्रचंड शहर इ. स. १३३६ सालीं बांधलें, त्यांना भरतखंडाचे चार टोंकांवर चार महाक्षेत्रांत शांकरपीठें स्थापून त्या त्या प्रांताची धर्मव्यवस्था त्यांजकडे देण्याची कल्पना सुचणें साहजिक होतें. कुडली आणि करवीरमठ सोळाव्या शतकांत स्थापन झाल्याचा स्पष्ट ऐतिहासिक पुरावा आहे. त्याचप्रमाणें द्वारका, जगन्नाथ आणि ज्योतिर्मठही विद्यातीर्थांनीं किंवा त्यांचे प्रख्यात शिष्य **श्रीविद्यारण्य** यांनीं निर्माण केले, असें मानण्यास जागा आहे. द्वारकापीठावर सं. १२६५ सालीं एक **विद्याशंकर** होते, व गोवर्धन मठाचे परंपरेंत दोन **विद्यारण्य** होते. परंतु नामसादृश्यावरून कांहीं अनुमान करतां येत नाहीं. आद्य आचार्यांच्या शृंगेरीपीठावर **श्रीविद्यातीर्थ** व **विद्यारण्य** हे दोन मोठे कर्ते पुरुष चौदाव्या शतकांत झाले; व त्यांचे कालापासूनच हल्लींची मठव्यवस्था सुरळीत चालू झाली, ही गोष्ट मात्र निर्विवाद आहे.

---

## अध्याय तिसरा.

# गुरुपरंपरा.

**शिवं ज्ञानोपदेष्टारं विष्णुं धर्मोपदेशकम् ।**
**विधिं वेदप्रवक्तारं गुरुमूर्तित्रयं भजे ॥**

**वसिष्ठं ब्रह्मविच्छ्रेष्ठं शक्तिं योगविदां वरम ।**
**पराशरं पुराणज्ञं प्रणतोऽस्मि मुनित्रयम् ॥**

**व्यासं वेदान्तसूत्राणां वक्तारं बादरायणम् ।**
**श्रीशुकं सूत्रकारं च भजे वेदान्तदेशिकौ ॥**
**श्रीमद्गौडपदाचार्यमद्वैतार्थप्रबोधकम् ।**
**गोविंदभगवत्पादमद्वैताचार्यमाश्रये ॥**
**अद्वैतस्थापनाचार्यं शंकरं लोकसद्गुरुम्**
**प्रस्थानत्रयभाष्यादि ग्रन्थकारं नमाम्यहम् ॥**

गोवर्धनमठ—गुरुपरंपरा.

श्रीशंकराचार्यांच्या उत्तरकालीन परंपरेचा विचार करण्यापूर्वी पूर्वाचार्यांचा उल्लेख करणें अनुचित होणार नाहीं. या पूर्वाचार्यांची नाममाला वरील पांच श्लोकांत दिली आहे. सर्व मठांच्या सांप्रदायिक गुरुपरंपरांत हींच नांवें थोड्याबहुत फरकानें आढळतात. शिव, विष्णु, ब्रह्मा, वसिष्ठ, शक्ति, पराशर, व्यास ऊर्फ बादरायण, शुक, गौडपाद, व गोविंदयति, असे दहा पूर्वाचार्य झाल्यानंतर अकरावे शंकराचार्य झाले, अशी सांप्रदायिक प्रसिद्धी आहे; व त्याचप्रमाणें परंपरास्तोत्र नित्यपठनांत म्हणण्यांत येतें. भरतखंडांत प्राचीनकाळापासून गुरूचें महात्म्य अतिशय मानण्यांत येतें. "गुरुः साक्षात्परब्रह्म" अशी सद्गुरूची महती आहे. "यस्य देवे परा भक्तिर्यथा देवे तथा गुरौ" । म्हणजे देवाच्या व गुरूच्या ठिकाणीं ज्यांची एकसारखी निःसीम भक्ति असेल त्यांनाच तत्त्वाचा बोध होतो. अलीकडे तर गाणगापूरच्या श्रीनृसिंहसरस्वतींचा स्वतंत्र गुरुसंप्रदाय चालु आहे, व तो दत्तसंप्रदायाचा एक भाग समजण्यांत येतो. गुरुमुखाशिवाय ज्ञान प्राप्त होत नाहीं, व आश्रमदीक्षा गुरुप्राप्तच असली पाहिजे, अशी पूर्वीपासून दृढ समजूत आहे. त्यामुळें शंकराचार्यांसारख्या अवतारी पुरुषासही गुरूचे शोधार्थ प्रवास करून, गोविंदयतीची भेट होईपर्यंत आश्रम घेतां आला नाहीं. गुरुशिष्याचें नातें पितापुत्राप्रमाणें मानून शिष्य गुरूचा वारस होतो, असें धर्मशास्त्र आहे. इतर ऐतिहासिक पुरुषांची वंशावळी आपण पहातों, तशी विद्वान् आचार्यांची गुरुपरंपरा माहीत असणें मह-

त्वाचें आहे. पितरांना पिंडोदक देणें हें जसें प्रत्येक धार्मिक हिंदूला कर्तव्य वाटतें, तसें गुरुपरमगुरूचें नित्य स्मरण करणें हें सच्छिष्याचें कर्तव्य आहे. महाराष्ट्रांत तर गुरुसांप्रदायाचें पुष्कळच माहात्म्य आहे. गुरुचरित्राचा नित्यपाठ करणारे व गाणगापूरची किंवा नरसोबाच्या वाडीची यात्रा करणारे हजारो लोक आज महाराष्ट्रांत आहेत. सांप्रत काळींही नवे गुरु आणि त्यांचे नवे सांप्रदाय गांवोंगांव उत्पन्न होत असून चांगले सुशिक्षित विद्वान् व श्रीमान् लोकही कोणा तरी गुरूच्या भजनीं लागलेले आढळतात. अक्कलकोटचे स्वामी, शेरडीचे सांईबाबा, केडगांवचे नारायण महाराज, कोल्हापूरचे चिबुडस्वामी, राजापुरचे काका पुराणीक, इत्यादि अर्वाचीन साधूंवर अढळ निष्ठा ठेवणारे हजारों स्त्रीपुरुष आपणांस हल्लीं दिसतात. हे सर्वच साधु सारख्या योग्यतेचे असतात, किंवा सर्व शिष्यांची भक्ति निष्काम असते असें नाहीं; परंतु गुरुभक्तीचें बीज महाराष्ट्रांत हल्लींच्या नास्तिक व विवेचनप्रधानकाळांतही अजून चांगलें उगवतें ही गोष्ट मात्र खरी. मग बाराशें वर्षांपूर्वी धर्मक्रांतीच्या व श्रद्धायुक्त पिढींत शंकराचार्यांचे वेळीं गुरुभक्ति जोरांत होती, यांत नवल नाहीं. मोठे पराक्रमी राजेही एखाद्या विद्वानाला गुरु मानून त्याचे अंकित होत. यामुनाचार्याला अर्धे राज्य देणारा चौल राजा, दिवाकरमित्राचें साहाय्य मागणारा हर्षवर्धन, व विद्यारण्याच्या आज्ञेनें स्वराज्य स्थापणारा वीरबुक्क, यांचेसारख्या गुरुशिष्यांच्या जोड्या भरतखंडाच्या मध्यकाळांत अजरामर झाल्या. रामदास—शिवाजी हें अलीकडील अगदीं ताजें उदाहरण आहे. अर्थात् गुरुपरंपरा अबाधित राखण्याविषयीं सर्व सांप्रदायिकांचा कटाक्ष असे. शांकर मठांची परंपरा आजतागाईत सुरक्षित ठेवली आहे, इतकेंच नाहीं, तर कल्पनाशक्तीनें ती वेळोवेळीं विस्तृत आणि संगतवारही करण्यांत आली आहे. आद्य शंकराचार्याला प्राचीन बनविण्याकरितां, शृंगेरीनें सुरेश्वराचार्याला आठशें वर्षें आयुष्य देणें, किंवा कांचीमठानें आद्य आचार्यांचे अगोदर दुसरे ३७ आचार्य घुसडणें, नांवाची अदलाबदल करणें, वगैरे कांहीं विचित्र प्रकार वगळले, तर सर्व मठांच्या गुरुपरंपरा सामान्यतः विश्वसनीय मानण्यास हरकत नाहीं. भरतखंडाचा इतिहास अजून फार

अपूर्ण आहे हें खरें; तथापि धार्मिक परंपरेचें इतिवृत्त सांप्रदायिकांनीं चांगलें जतन केलें ही समाधानाची गोष्ट आहे.

शंकराचार्यांचे पूर्वाचार्यांची मालिका वर दिली आहे, ती मात्र लाक्षणिक समजली पाहिजे. शिवापासून गौडपादापर्यंत नऊ नांवें प्रत्यक्ष गुरूंचीं नसून वेदांतमत–प्रतिष्ठापकांचींच समजलीं पाहिजेत. शिवानें ज्ञान, विष्णूनें भक्तिरूप धर्म, आणि ब्रह्मदेवानें चतुर्वेदविद्या देऊन, अद्वैतमताचा ज्ञान–भक्ति–कर्मरूपी तिहेरी पाया या त्रिमूर्तींनीं घातला. नंतर ब्रह्मज्ञान देणारा वसिष्ठ, योग सांगणारा शक्ति, आणि स्मृतिकार पराशर हे तीन ऋषि झाले. ब्रह्मा, विष्णु, महेश ही त्रिमूर्ति सर्वांना पूज्य असून चराचर सृष्टीची अधिष्ठात्री आहे. "धाता यथापूर्वमकल्पयत्" या वचनाप्रमाणें सर्व श्रुतींचा उगम त्रिमूर्तींपैकीं ब्रह्मदेवापासून होतो. दुसरें त्रिकूट स्मृतिकार ऋषींचें. वसिष्ठ, शक्ति, पराशर हे स्मृतिकार प्रसिद्ध आहेत. श्रुतिस्मृतींतील धर्मज्ञान साररूपानें आणि लौकिक वादविवादांनीं अलंकृत करून, सूत्रकारांनीं प्रथम लोकांपुढें मांडलें. श्रौतसूत्रें, गृह्यसूत्रें, अष्टाध्यायीसारखीं व्याकरणसूत्रें, सांख्य, योग न्याय वगैरे तत्त्वज्ञानप्रतिपादक दर्शनसूत्रें, हीं सनातन धर्माच्या इतिहासांतील तिसरी मजल होय. श्रुतिस्मृतींतून पसरलेलीं धर्मतत्त्वें या सूत्रमालिकांत गोंवलीं गेल्यानें साधारण जनसमाजास सुलभ झालीं. जैन–बौद्धांनीं आपल्या नवीन मतांचा लोकांत प्रसार करण्याचा सपाटा लावला, तसें वैदिक आस्तिकही जागे होऊन सूत्ररूपानें आपलें धर्मज्ञान लोकांपुढें मांडूं लागले. जैनबौद्धांचीं 'सुत्तें' आणि आस्तिकांचीं 'सूत्रें' यांची लढाई सुरू झाली. जैमिनींनीं संहिताब्राह्मणांतलि कर्मकांड सूत्रांत गोंवलें; व बादरायणांनीं उपनिषदांतील ब्रह्मज्ञान ब्रह्मसूत्रांत संकलित केलें. तेणेंकरून प्राचीन विस्कळित सनातन धर्माला संघटित शास्त्राचें स्वरूप आलें. बादरायणांची मूळ सूत्रें हल्लीं उपलब्ध नाहींत, पण त्यांची सुधारून वाढविलेली हल्लींची आवृत्ति शुक योगींद्रांनीं केली अशी आख्यायिका 'पतंजलिविजय,' गौडपादोल्लास, हरिमिश्रीय, वगैरे ग्रंथांतून दिली आहे. ब्रह्मसूत्रांत कित्येक ठिकाणीं **बादरायणाचार्यांचा** नामनिर्देश आहे. "तदुपर्यपि बादरायणः संभवात्" (१–३–२६), "भावं तु बादरा-

यणोऽस्ति हि"(१-३-३३), "पूर्वं तु बादरायणो हेतुव्यपदेशात्'(३-२-४१)' आठ सूत्रांत बादरायणाचा उल्लेख आहे; व शंकराचार्यही बादरायणाचा नामनिर्देश करून शिवाय सूत्रकार असा निराळा उल्लेख करतात. त्यावरून हल्लींच्या सूत्रांचा कर्ता बादरायणाहून निराळा त्याचा शिष्य शुकयोगींद्र होता असा प्रवाद सुरू झाला तो अगदींच निर्मूल म्हणतां येत नाहीं. परंपरेच्या श्लोकांत बादरायण व शुक या दोघांचाही सूत्रकार आणि वेदांताचे मार्गदर्शक असा निर्देश आहे. बादरायणाला व्यास हें नांव होतें, व ब्रह्मसूत्रांना व्याससूत्रें व अधिकरणांना वैय्यासिक अधिकरणें म्हणण्याचा प्रघात आहे. पण व्यास हें विशिष्ट व्यक्तीचें नाव नसून ती पुष्कळांची " आचार्य " शब्दाप्रमाणें विद्वत्तादर्शक पदवी होती हें ध्यानांत ठेवलें पाहिजे. वेदव्यवस्थापक व्यास, पराशरपुत्र, कृष्णद्वैपायन, महाभारतकार, पुराणकर्ता, सूत्रावरील भाष्यकार, हे सर्वच व्यास एक व्यक्ति होती हें म्हणणें वेडेपणाचें होईल. विशेषेण आस्ते, व्याकरोति 'स व्यासः', म्हणजे धर्मप्रवर्तक व व्यवस्थापक पुरुष व्यास होय. कृष्णद्वैपायन व्यासाचा पुत्र शुक आजन्म योगी होता; पण तोच हल्लींच्या सूत्रांचा कर्ता होता असें मात्र म्हणतां येणार नाहीं.

शुकापर्यंतचे आठ गुरु देव आणि ऋषि कोटींतील होते व सर्व सांप्रदायिकांना सारखेच पूज्य होते. त्यानंतर चवथी कोटी अचार्य, म्हणजे विद्वान् लोकांची झाली. हे स्वतःधर्मसंस्थापक नसून प्राचीन ग्रंथांचे व्याख्याते होते. शंकराचार्यांच्या परंपरेंत असे दोनच पुरुष होते. ते गौडपादाचार्य व गोविंदभगवत्पाद. येथून ऐतिहासिक पुरुषांना प्रारंभ होतो. गौडपादांच्या मांडुक्यकारिका व नृसिंहतापनीयोपनिषदावरील कारिका विशेष प्रसिद्ध आहेत; व ब्रह्मसूत्रावरही गौडपादाच्या कारिका आहेत म्हणतात; पण त्या अजून उपलब्ध नाहींत. या शिवाय ईश्वरकृष्णाच्या सांख्यकारिकांवर गौडपादाचार्यांचें भाष्य आहे, त्याचें चिनीभाषेंत भाषांतर झालें. छांदोग्योपनिषद्, अनुगीता व उत्तरगीता यांजवरही गौडपादाच्या कारिका आहेत असें म्हणतात. * गौडपादाचार्य मूळ द्राविड असून भाष्यकार

* नारायणशास्त्रिकृत Age of Sankara, पृ. ४६-५२.

पतंजलीचा शिष्य होता, पतंजलीच्या शापानें ब्रह्मराक्षस झाला, आणि उज्जनींच्या चंद्राचार्याला त्यानें महाभाष्य शिकविलें तेव्हां पूर्वरूप प्राप्त होऊन नंतर बदरिकाश्रमांत जाऊन त्यानें शुकयोगींद्राजवळ वेदांताचें अध्ययन केलें, अशी एक दंतकथा आहे; पण तिला ' पतंजलिविजय " व 'गौडपादोल्लास' यांसारख्या पौराणिक ग्रंथांखेरीज दुसरा आधार नाहीं. मात्र गौडपादाचे वेदांताचे गुरु कोणी शुकयोगींद्र होते हें त्यांच्या ' नृसिंहतापनीय ' कारिकांचे शेवटीं ' इति श्रीमत्परमंहसपरिव्राजकाचार्य श्रीमच्छुकमुनींद्र–शिष्य–श्रीमद्गौडपादविरचिते ' असा उल्लेख आहे, त्यावरून दिसतें. हेच शुकमुनींद्र कदाचित् हल्लींचे ब्रह्मसूत्रकार असतील. गौडपादांनीं ज्यांना महाभाष्य शिकविलें ते चंद्राचार्य पुढें संन्यास घेऊन गोविंदयति किंवा भगवत्पाद या नांवानें शंकराचार्यांचे साक्षात गुरु म्हणून प्रसिद्ध झाले, अशीही दंतकथा आहे; पण ती खरी दिसत नाहीं. * गौडपादाच्या सांख्यभाष्याचें चिनीभाषेंत भाषांतर पांचवे शतकापूर्वींच झालें, व शंकराचार्य आठवे शतकाचे अखेरीस झाले. अर्थात् उभयतांमध्यें अंतर तीनशेंपेक्षां जास्त वर्षांचें, म्हणजे कित्येक पिढ्यांचें असलें पाहिजे. नेहमीं " जय गोविंद जय " असें भजन करीत असत म्हणून त्यांना गोविंदमुनि नांव पडलें, असें आनंदगिरि म्हणतो. गोविंद भगवत्पादाचे तीन ग्रंथ प्रसिद्ध आहेतः योगतारावली, अद्वैतानुभूति, व ब्रह्मामृतवर्षिणी.हे ग्रंथ शंकराचार्यांचे नांवावरही मोडतात. गोविंदमुनींच्या पूर्वींची गुरुपरंपरा प्रत्यक्ष गुरूंची नसून केवळ संप्रदायपरंपरा मानली पाहिजे. अवतरणांतर्गत श्लोकांतील गोविंदयतीपर्यंतचीं दहा नांवें सनातन अद्वैत सांप्रदायांतील मुख्य मुख्य टप्प्यांवरील प्रसिद्ध पुरुषांचीं आहेत. प्रथम श्रुति, मग स्मृति, मग सूत्रें, व नंतर विवरणरूपी श्लोकबद्ध कारिका, असे हे चार टप्पे झाले. शंकराचार्यांपासून पुढें भाष्यें आणि टीका यांचा विस्तार वाढतो. पूर्वींचे आचार्य एकएकटे विरक्त संन्यासी किंवा योगी होते. शकराचार्यांनंतर मठसंस्थापक आणि लोकसंग्राहक आचार्य निपजूं लागले. अरण्यांतील

---

* Age of Sankara पृ.५४.

ब्रह्मज्ञान त्यांनीं मंदिरांत आणि लोकांच्या नित्य व्यवहारांत आणलें. पूर्वाचार्यांचे केवळ धर्मप्रवचन मागें पडून पुढें धर्मशासन हें नवें कार्य आचार्यांच्या गळ्यांत पडलें.पूर्वी केवळ विचारांत असलेला अद्वैत सिद्धांत शंकराचार्यांनीं लोकांच्या नित्य आचारांत आणला हीच त्यांनीं मोठी धर्मक्रांति केली. बौद्धांनीं व जैनांनीं हिंदुस्थानांतील अगदीं कनिष्ठ वर्गाच्या दारापर्यंत धर्म नेऊन पोंचविल्यामुळें शंकराचार्यांनाही सनातन वैदिक धर्म सर्वसंग्राहक आणि सार्वलौकिक करणें भाग पडलें.

शंकराचार्यांच्या शिष्यपरंपरेचा विचार करण्यापूर्वी त्यांच्या स्वतःच्या ग्रंथांविषयीं निर्णय करणें वावगें होणार नाहीं. आद्य आचार्यांनीं केलेल्या ग्रंथांसंबंधानें पुष्कळच वाद आहे. शंकराचार्य हें सर्व मठांतील पीठाधिकाऱ्यांचें सामान्य नाम झाल्यामुळें अर्वाचीन स्वामींनीं रचिलेले ग्रंथ, स्तोत्रें व टीका आद्य आचार्यांचे नांवावर दडपलीं गेलीं आहेत; इतकेंच नाहीं, तर त्यांतील मजकुरावरून आद्य आचार्यांविषयीं भलभलतीं अनुमानेंही काढण्यांत आलीं आहेत, उदाहरणार्थ “ देव्यपराध स्तोत्र ” सर्व स्तोत्रसंग्रहांत शंकराचार्यांचें म्हणून छापतात, पण वस्तुतः तें विद्यारण्यस्वामीकृत आहे. त्यांत “ मया पंचाशीतेरधिकमपनीते तु वयसि ” असा उल्लेख आहे, तो विद्यारण्यांना लागू पडतो; कारण हें स्तोत्र इ. स. १३८० त रचिलें, तेव्हां विद्यारण्यांचें वय ८५ वर होतें. पण कोणी या उल्लेखावरून आद्य शंकराचार्य ८५ वर्षांचे होते असें अनुमान काढतात, तो निवळ भ्रम आहे. तात्पर्य, आद्य शंकराचार्यांचे स्वकृत ग्रंथ कोणते हें ठरविणें फार अगत्याचें आहे. ऑफ्रेटच्या क्याटलागांत शंकराचार्यांचे म्हणून लहान मोठे मिळून २७१ ग्रंथ दिले आहेत. त्यांत कित्येक नांवें पुनरुक्त आहेत, व बरींच निव्वळ स्तोत्रें व प्रकीर्ण ग्रंथ आहेत.हालच्या Bibliography मध्यें शंकराचार्यांचे म्हणून फक्त १६ च ग्रंथ आहेत; यांपैकीं पुष्कळ दुसऱ्यांचे व अर्वाचीन पीठस्थांचे असले पाहिजेत हें उघड आहे. ईश, केन, कठ, प्रश्न, मुंडक, मांडुक्य, ऐतरेय, तैत्तिरीय, छांदोग्य, बृहदारण्यक, व श्वेताश्वतर, या अकरा उपनिषदांवर, ब्रह्मसूत्रावर, आणि भगवद्गीतेवर अशीं प्रस्थानत्रयीवर तेरा भाष्यें शंकराचार्यांचीं प्रसिद्ध आहेत, त्यांविषयीं

वाद नाहीं. नृसिंहतापनीय उपनिषदावरील भाष्य, उपदेशसाहस्री वगैरे प्रकीर्ण ग्रंथ व कित्येक किरकोळ स्तोत्रें त्यांचींच आहेत असें म्हणतात. पण इतर ग्रंथांविषयीं मात्र अजून खात्री होत नाहीं. हा संशय कायमचा दूर करण्याकरितां श्रीरंगम् येथील 'वाणीविलास' मुद्रणालयानें शृंगेरीपीठस्थ श्रीसच्चिदानंदशिवाभिनव-नृसिंहभारती स्वामींचे साक्षात् देखरेखीखालीं आद्य शंकराचार्यांचे समग्र ग्रंथ म्हणून २० पुस्तकांचा संच उत्तम रीतीनें छापून प्रसिद्ध केला आहे. या ग्रंथसंग्रहांत पुढील ग्रंथ आहेतः—१ शारीरकभाष्य ( पु. १—३ ), २ उपनिषद्भाष्यें ( पु. ४—१० ), ३ गीताभाष्य ( पु. ११,१२ ), ४ प्रकीर्ण ग्रंथ ( पु. १३—१६ ), ५ स्तोत्रें ( पु. १७ व १८ ) आणि ६ प्रपंचसार ( पु. १९ व २० ). सदर संग्रहांत प्रकीर्ण ग्रथ आहेत तेः—१ विष्णुसहस्रनामभाष्य, २ सनत्सुजातीयभाष्य, ३ विवेकचूडामणि, ४ उपदेशसाहस्री, ५ अपरोक्षानुभूति, ६ वाक्यवृत्ति, ७ स्वात्मनिरूपण, ८ आत्मबोध, ९ शतश्लोकी, १० दशश्लोकी, ११ सर्ववेदान्तसिद्धांतसारसंग्रह, १२ प्रबोधसुधाकर, १३ स्वात्मप्रकाशिका, १४ मनीषापंचक, १५ अद्वैतपंचरत्न, १६ निर्वाणशब्द, १७ अद्वैतानुभूति, १८ ब्रह्मानुचिंतन, १९ प्रश्नोत्तरमालिका, २० सदाचारानुसंधान, २१ योगतारावली, २२ उपदेशपंचक, २३ धन्याष्टक, २४ जीवन्मुक्तानंदलहरी, २५ अनात्मश्रीविगर्हणप्रकरण, २६ स्वरूपानुसंधान, २७ यतिपंचक, २८ हस्तामलकीय भाष्य, २९ पंचीकरण, ३० तत्त्वोपदेश, ३१ एकश्लोकी, ३२ मायापंचक, ३३ प्रौढानुभूति, ३४ ब्रह्मज्ञानावलीमाला, ३५ लघुवाक्यवृत्ति, आणि ३६ निर्वाणमंजरी. याशिवाय पुष्कळ किरकोळ स्तोत्रें व 'प्रपंचसार' नांवाचा ३३ पटलांचा स्वतंत्र ग्रंथ या संग्रहांत आद्य आचार्यांचे ग्रंथ म्हणून छापले आहेत. या सर्व ग्रंथांचे शेवटीं ' श्रीगोविंद भगवत्पूज्यपाद-शिष्य श्रीमच्छंकरभगवतः कृतौ' असा शेरा आहे, व कांहीं ग्रंथांत गोविंद गुरूला नमस्कारही आहे. याखेरीज हालच्या ' सूची 'त तीन वरील यादींतील नांवासारखे, व तीन निराळे ग्रंथ, वाक्यसुधा, आत्मोपदेश व षट्पदी असे आहेत. यांपैकीं कांहीं ग्रंथ व स्तोत्रें, अजूनही दुसऱ्यांचीं म्हणून ठरण्याचा संभव आहे. पण तूर्त ही

यादी खरी धरून चालण्यास हरकत नाहीं. याशिवाय आचार्यांनीं अमरु राजाच्या शरीरांत प्रवेश करून शृंगारविषयक ' अमरुशतक ' रचिलें अशी एक दंतकथा आहे. आचार्यांची विचारसरणी सरळ, भाषा प्रसादयुक्त, आणि शब्दरचना अत्यंत मधुर असते. एकाद्या स्वच्छ जलाशयाप्रमाणें आचार्यांचें गद्य व पद्य अत्यंत सुबोध, अर्थगभीर आणि चित्ताकर्षक असतें. क्लिष्टपणा किंवा संदिग्धता हे दोष आचार्यांच्या ग्रंथांत कोठेंही सांपडावयाचे नाहींत म्हटलें तरी चालेल. शिकणाऊ विद्यार्थ्यांपासून तो महापंडितापर्यंत सर्वांना सारखे : आचार्यांचे ग्रंथ सुबोध होतात. सोळाव्या वर्षीं शारीरभाष्य तयार केल्यानंतर शृंगेरी मठांत बारा वर्षें आचार्यांनीं विश्रांति घेतली, त्या अवधींत हे सर्व ग्रंथ रचले असावेत. कित्येकांची रचना शिष्यांना उपदेश करतांना झाली असेल, व कांहीं नवीन शिष्यांना सुलभज्ञानाकरितांच मुद्दाम केले असावेत. अद्वैतब्रह्मज्ञान आणि नितान्त-भक्ति यांचा बेमालूम संयोग या ग्रंथांत आढळतो. आचार्यांच्या भक्तिपूर्ण स्तोत्रांचें पठण करतांना, रूक्ष मायावाद प्रतिपादन करणारे वेदांती हेच काय, अशी क्षणभर शंका आल्यावांचून राहात नाहीं. भागवतधर्मांतील पंचविधा व नवविधा भक्ति स्वीकारून विशिष्टाद्वैत मत काढणाऱ्या द्राविडाचार्यांना हीं स्तोत्रें खचित माहीत नसावींत. शुद्ध मायावाद आणि सप्रेम भक्ति या दोन्ही मनोवृत्तींचें निर्लेप मिश्रण आचार्यांच्या प्रकीर्ण ग्रंथांत आणि स्तोत्रांत आढळतें. उदाहरणार्थ षट्पदी स्तोत्रांतील पुढील श्लोक प्रत्येकानें पठण करण्यासारखा आहे.—

**'सत्यपि भेदापगमे नाथ तवाहं न मामकीनस्त्वम् ।**
**सामुद्रो हि तरंगः क्वचन समुद्रो हि तारंगः ॥**

कर्मयोगाचा मोह सुटल्यानंतर ज्ञानयोग आणि भक्तियोग यांचा एकत्र आस्वाद घ्यावयाचा असेल, त्यांना शंकराचार्यांचे ग्रंथ उत्तम साधन आहे.

शंकराचार्यांच्या चरित्रांतील ठळक गोष्टी येणेंप्रमाणें आहेतः १ त्यांचा कालटी येथें जन्म झाला; ( २ ) पांचवे वर्षीं उपनयन होऊन वेदाध्ययन संपलें; ( ३ ) आठवे वर्षीं पूर्णा नदींत मगरानें पाय धरल्याचें निमित्त

होऊन आईपासून संन्यासाची परवानगी मिळाली; ( ४ ) दहावे वर्षी शास्त्राध्ययन पुरें झालें; व नर्मदातीरावर ओंकार क्षेत्रांत गोविंदमुनींपासून संन्यासदीक्षा घेतली; ( ५ ) पुढें बदिरिकाश्रमांत तपश्चर्या करून १६ व्या वर्षी काशी क्षेत्रांत भाष्यरचना केली; ( ६ ) नंतर मंडणमिश्राचा पराजय करून त्यास शिष्य केलें; ( ७ ) नंतर आणखी शिष्य करून शृंगेरीस शारदा मठ स्थापला; ( ८ ) नंतर सर्व भरतखंडांत दिग्विजय करून काश्मीरांत सरस्वतीपीठावर आरोहण केलें; ( ९ ) व शेवटीं बदरिकाश्रमांत जाऊन गुहाप्रवेश केला. माधवकृत " शंकरदिग्विजयां" त याप्रमाणें चरित्र आहे.आनंदागिरीच्या "आचार्यजयां"त कित्येक फरक आहेत.आनंदगिरीनें मंडणामिश्राच्या स्त्रीचें नांव **सरसवाणी** दिलें आहे; व आचार्योनीं परकायाप्रवेश केलेल्या राजाचें नांव अमरु नसून **अमृत** व त्याच्या शहराचें नांव अमृतपूर असें दिलें आहे. शृंगेरीआश्रमांत बारा वर्षें राहित्यानंतर तेथें सुरेश्वराचार्याला बसवून आचार्य कांचीला गेले, व तेथें शिवकांची व विष्णुकांची हीं दोन नगरें स्थापलीं, व तेथून शिष्यद्वारा वैष्णव, सौर, शाक्त, गाणपत्य, वगैरे नवे भक्तिमार्गाचे पंथ उत्पन्न केले, आणि तेथेंच देहावसान झालें, असें आनंदगिरी म्हणतो. कांची मठवाले आचार्यांचें निर्याण कांचीला झालें व तेथें त्यांची समाधि आहे, सबब कांची मठ मुख्य असें म्हणतात; पण शृंगेरी, द्वारका वगैरे अन्य मठवाले तें खोटें म्हणून आचार्योनीं अखेरीस हिमालयांत गुहाप्रवेश केला असें मानतात. दोन्ही प्रवादांला निर्विवाद ऐतिहासिक पुरावा अजून मिळाला नाहीं. कापालिकांच्या जादूनें आचार्योना शेवटीं भगंदर रोग झाला व पट्टशिष्य पद्मपादाचार्यानें तो मंत्रशक्तीनें बरा केला अशीहि कथा आहे; ती खरी असेल तर आचार्यांचें शेवटीं हिमालयांत जाणें असंभवनीय दिसतें. आचार्योनीं हिमालयांतून पांच दिव्य लिंगें आणलीं, तीं चिदंबरास **शिवलिंग**, केदारनाथीं **मुक्तिलिंग**, नीलकंठक्षेत्रीं **वरेश्वरलिंग**, शृंगेरीस **भोगलिंग**, आणि कांची येथें कामकोटी–पीठांत **योगलिंग**, स्थापलीं असें मार्कंडेयपुराणांत आहे. श्रीसुरेश्वराचार्याला शृंगेरीहून आणवून कांची कामकोटी–पीठावर बसविलें, पण सुरेश्वराचार्य पूर्वाश्रमीं मण्डनामिश्र गृहस्थ

असलेमुळें **योगलिंगाची** नित्य पूजा करण्याकरितां **सर्वज्ञात्मश्रीचरण** नामक दुसऱ्या ब्रह्मचारी शिष्याची योजना केली, असें कांची–पीठवाल्यांचे म्हणणें आहे.* आचार्यांच्या देहावसानाचें आनंदगिरीनें ७४ व्या प्रकरणांत येणेंप्रमाणें रसभरित वर्णन केलें आहेः––

"ततः परं सर्वज्ञः सकलगुरुराचार्यः स्वशिष्यान् परमतकालानलादीन् यतीन् तदन्यांश्च तत्र तत्र विषयेषु प्रेषयित्वा स्वयं स्वच्छेया स्वलोकं गंतुमिच्छुः कांचीनगरे मुक्तिस्थले कदाचिदुपविश्य स्थूलशरीरं सूक्ष्मेऽन्तर्धाय सद्रूपो भूत्वा सूक्ष्मं कारणे विलीनं कृत्वा चिन्मात्रो भूत्वा अंगुष्ठपुरुषस्तदुपरि पूर्णमखण्डमण्डलाकारमानन्दमीश्वरसन्निधौ प्राप्य सर्वजगव्द्यापकं चैतन्यमभवत् । सर्वव्यापकचैतन्यरूपेणाद्यापि तिष्ठति । तत्रत्या ब्राह्मणाःसर्वे शिष्याः प्रशिष्याश्च उपनिषद्गीताब्रह्मसूत्राणि सम्यक् पठन्तः अत्यन्तशुचिस्थले गर्ते कृत्वा तत्र गन्धाक्षतबिल्वपत्रतुलसीप्रसूनादिभिः सम्पूज्य तच्छरीरं समाधिं चक्रुः । ततः प्रत्यहं क्षीरतर्पणक्षीरान्ननैवेदनाभिः सर्वोपचारैर्विधिवदभ्यर्च्य ततो महापूजादिने बहुयतीनां ब्रह्मविदां ब्राह्मणानां कर्मज्ञाननिष्ठानामुत्तमानां च श्रीमदद्वैतविद्याप्रकाशक––श्रीमत्परमहंसपरिव्राजकाचार्य–श्रीमच्छङ्करगुरुस्वामिनमुद्दिश्य परब्रह्मणो धिया स्वाद्वन्नमूलशाकसूपभक्ष्यघृतदध्यादिसमस्तव्यञ्जनयुक्तमन्नं वस्त्राभरणैः साकमीश्वरपूजामेव चक्रुः। पूजां सर्वत्रैवं चक्रुः ॥

आचार्यांनेर्याणाचें हें समक्ष पाहिल्याप्रमाणें केलेलें वर्णन अगदींच काल्पनिक व खोटें असेल असें म्हणवत नाहीं. आचार्यांचें देहावसान कांचीस झालें, कीं शृंगेरीस झालें, कीं हिमालयांत झालें, हा अजून वादग्रस्त

---

*Prof. N. K. Venkatesan's Shri Shankaracharya and his Kamakoti Peetha, p. 16. यांनीं आनंदगिरीकृत शंकरविजयाच्या एका पांथातून सुरेश्वराचार्यांचा कामकोटी पीठाशीं संबंध जोडणारे दोन उतारे दिले आहेत, पण ते कलकत्यास छापलेल्या प्रतींत नाहींत.

प्रश्न आहे. पण तें वर वर्णन केल्याप्रमाणें सर्व लोकांसमक्ष होऊन प्रसिद्धपणें समाधिविधि झाला असावा हें जास्त संभवनीय दिसतें. शंकराचार्यांसारख्या अलौकिक आणि सर्वपूज्य झालेल्या जगद्गुरूला अंतकाळीं लोक एकटे सोडतील हें शक्य वाटत नाहीं. आचार्यांचा मुख्य मठ आपला असल्याविषयीं कांची, शृंगेरी व द्वारका या पीठांमध्यें अजून वाद चालू आहे, तो बाजुला ठेवला, तरी श्रंगेरी येथील शारदापीठाची कायमची व्यवस्था करून व तेथें सुरेश्वरचार्यांची देखरेख ठेऊन शंकराचार्य आयुष्याचे अखेरचे दिवस कांची येथें ताम्रपर्णीचे कांठीं घालविण्यास गेले असावेत, हें संभवनीय आहे. कांची येथें स्वतंत्र मठ स्थापून **कामाक्षी** देवीची व **श्रीचक्राची** नवीन उपासना चालू केली, ही कथाहि खरी असण्याचा संभव आहे. आचार्यांनीं शारदेच्या रूपानें शृंगेरीला सरस्वतीची पूजा चालू केली, तशी कामाक्षीच्या रूपानें कांचीला शक्तिपूजा सुरू केली असेल. विद्या आणि शक्ति म्हणजे ज्ञान आणि मनुष्यबळ या दोन साधनांनींच धर्माचा व देशाचा उद्धार होतो हें तत्त्व शंकराचार्यांनीं प्रथम लोकांना शिकविलें. शंकरविजयाच्या ६७ व्या प्रकरणांत आनंदगिरी **म्हणतोः—**

"तदनंतरं.........परमगुरुः शुद्धाद्वैतविद्यानिष्ठान्......ब्राह्मणादीन् कृत्वा तदीयविरोधाङ्गीकारसमर्थां निजशिष्यपरंपरामाकल्पं शृंगगिरिस्थानस्थां कृत्वा......कलावस्मिन् युगे नानापापपरिध्वस्तज्ञानाङ्कुरेषु मर्त्येषु शुद्धाद्वैतविद्यायामनधिकारिषु तेषां वृत्तिः पुनरपि यथेप्सिता भवतीति सम्यग्विचार्य लोकरक्षार्थं वर्णाश्रमपरिपालनार्थं परमतकल्पनां जीवेशभेदास्पदां च रचयितुमुपक्रम्य निजशिष्यं परमतकालानलं दृष्ट्वेदमाह।"

या अवतरणावरून आचार्यांनीं अंतरंग व बहिरंग असे दोन भिन्न संप्रदाय चालू केले असें दिसतें. पहिला अधिकारी विद्वान् लोकांकरितां व अद्वैतब्रह्मज्ञानाचा प्रसार करण्यासाठीं; त्याचें मुख्य स्थान शृंगेरी केलें. दुसरा बहिरंग संप्रदाय सामान्य जनसमूहाकरितां आणि वर्णाश्रमधर्माचें रक्षण करण्यासाठीं कांची येथें स्थापिला. पहिल्या संप्रदायाची अधिष्ठात्री

देवता, शारदा ऊर्फ सरस्वती; दुसऱ्याची अधिष्ठात्री कामाक्षी ऊर्फ श्रीशक्ति. पहिल्याचें साधन ज्ञान; दुसऱ्याचें श्रीचक्राची उपासना. पहिल्या सांप्रदायानें शंकराचार्य जगद्गुरु झाले, दुसऱ्यानें ते धर्मसंस्थापक झाले. केवळ ज्ञानप्रसारानें धर्माचे पुनरुज्जीवन होत नाहीं; तर त्या ज्ञानानें जनसमुदायाचे आचारविचार सुधारतील अशी योजना करावी लागते. गौतमबुद्धानेंही "धम्म चर, बुद्ध चर, संघ चर," असा तिहेरी उपदेश केला. म्हणजे धर्मावर श्रद्धा ठेव, गुरुवर निष्ठा ठेव, आणि लोकसंग्रह कर, तरच धर्मोन्नति होईल. आचार्यांनी शृंगेरीच्या शारदा-पीठांत अद्वैत--मतप्रसाराची योजना करून त्या कामीं सुरेश्वराचार्यांची नेमणूक केल्यानंतर, द्रवीड देशाचे त्या वेळचे राजधानीचे शहर कांची येथे सामान्य लोकांना उपयोगी पडेल असा नवा शक्तिसंप्रदाय स्थापिला असला पाहिजे. कांची शहर चौल राजांची राजधानी होतें इतकेंच नाहीं, तर कित्येक शतकें धार्मिक चळवळीचें प्रमुख स्थान होतें. बौद्ध व जैन उभय पथांनीं तेथें आपले ठाणे दिले होते. व पुढे **षठकोप, नाथमुनि** प्रभृति **अलवारांचा** उदय तेथेंच झाला. जैन बौद्धांच्या हल्ल्यांनी ब्राह्मणांचे वर्चस्व नाहींसे झालें, व त्यांतच ब्राह्मणेतर अलवाराच्या भक्तिमार्गाची भर पडली. नाथमुनीचा जन्म गतकाली ३६८४ शोभनकृत संवत्सरीं मानतात, म्हणजे ख्रिस्ती सनाचे सहावे शतकाची अखेर येते. यांत कांहीं चूक असली पाहिजे. कारण नाथमुनीचे प्रशिष्य **यामुनाचार्य** ऊर्फ **अवलंदार** याचा जन्म कलिकाल ४०१७ आषाढ पौर्णिमा रोजीं, म्हणजे ख्रिस्ती शतकाच्या दहाव्या शतकांत शंकराचार्यांचे मागून शंभर वर्षांनी झाला. शंकराचार्यांचे पूर्वीचे नाथमुनि केवळ भक्तिमार्गी संत होते, तेच यामुनाचार्य विशिष्टाद्वैताचे प्रवर्तक व ज्ञानयुक्त भक्ति करणारे झाले. हा परिणाम शंकराचार्यांच्या कांची येथील मठस्थापनेचा झाला असला पाहिजे. केवल भक्तिमार्गाला ज्ञानाची जोड दिल्यामुळेच पुढें तामिल देशांत रामानुजाचा विशिष्टाद्वैत सांप्रदाय फैलावला, आणि महाराष्ट्रांत ज्ञानेश्वरीनें अद्वैतयुक्त भक्तिमार्गाचा पाया घातला. कसेंही असो, शृंगेरी व कांची या दोन्ही ठिकाणीं शंकराचार्यांचा संप्रदाय चालू झाला, असें तूर्त मानण्यास हरकत नाहीं.

आचार्यांचे मुख्य शिष्य चार प्रसिद्ध आहेत, ते सुरेश्वराचार्य, पद्मपादाचार्य, हस्तमलकाचार्य, व तोटकाचार्य. त्यांशिवाय चित्सुख, सर्वज्ञ, श्रीचरण, विश्वरूप वगैरे दुसरे शेंकडों शिष्य आचार्यांभोवतीं असावेत. हस्तामलक आणि तोटक यांचेविषयीं अद्भुत कथा आहेत. दोघेही बालपणीं अगदीं मूढ होते. पण गुरूचें दर्शन झाल्याबरोबर त्यांना एकदम ज्ञान झालें. हस्तामलकाचें पहिलें नांव पृथ्वीधर किंवा पृथ्वीधव. तो प्रख्यात मीमांसक प्रभाकर याचा मुलगा. प्रभाकर प्रयागाजवळ श्रीवल्ली ऊर्फ प्रतिष्ठानपुरी म्हणजे हल्लीं गंगेच्या उत्तरतीरावरील झुशी गांवी रहात असे. आचार्यांचा व प्रभाकराचा वाद झाल्यावर त्यांनीं लहानपणापासून वेडसर दिसणारा आपला पृथ्वीधर मुलगा आचार्यांस अर्पण केला. आचार्यांनीं त्याला "कस्त्वं शिशो कस्य कुतोऽसि गन्ता। किं नाम ते त्वं कुत आगतोऽसि" असा प्रश्न केल्याबरोबर त्याला हातावरील आंवळ्याप्रमाणे सर्व ज्ञान एकदम आले, व त्याने हस्तामलक नामक ग्रंथ रचला; व म्हणून त्याला हस्तामलकाचार्य नांव पडले. त्याचप्रमाणें तोटकाचार्यालाही तोटक वृत्तांत गुरुस्तुति केल्यामुळें तोटकाचार्य हें नांव मिळालें. पद्मपादाचार्यांचे मूळ नांव **सनंदन**. त्याचा बाप **माधव** आई **लक्ष्मी** व जन्मस्थान **अहोबल** गांव. आईबाप लहानपणीं वारल्यामुळें **सनंदनाचें** शिक्षण मामा **दिवाकराध्वरीनें** केले व आपल्या मुलीशीं लग्नही करून दिलें. दिवाकरध्वरी प्रख्यात मीमांसक **प्रभाकर** याचा पट्टशिष्य होता, व **सनंदनही** त्याच्या अध्यापनाने विद्वान् पंडित झाला. पण चित्ताचे असामाधान, मामाशीं मतभेद आणि पूर्ण वैराग्य, यांचा अंमल बसून नवा गुरु शोधण्याकरितां तो बदरिकाश्रमीं गेला. त्या वेळीं शंकराचार्य मातोश्रीला भेटण्याकरितां केरल देशांत गेले होते, तिकडे गोविंदमुनींनीं सनंदनास निरोप सांगण्यास पाठविले कीं, आपण समाधिस्थ होण्याकरितां ओंकार क्षेत्रास जातों, तेथें लवकर येऊन भेटावें. सनंदन आचार्यांस भेटला, व शिष्य होऊन ओंकारास गोविंदयतीकडे घेऊन आला. तेव्हांपासून सनंदन आचार्यांचा पट्टशिष्य झाला. एकदा काशी क्षेत्रांत इतर शिष्यांना सनंदनाचा मत्सर उत्पन्न झाला. तेव्हां आचार्यांनीं गंगेच्या पैल तीरावरून एकदम हांक मारली व तोही योगबलानें पाण्याच्या पृष्ठभागावरून चालत

आला. त्या वेळीं त्याच्या प्रत्येक पावलाखालीं पाण्यांत कमलपत्रें उगवलेलीं दिसलीं; त्यामुळें त्याला पद्मपाद असें नांव मिळालें. आचार्यांच्या सर्व शिष्यांत यौगिक सामर्थ्य पद्मपादाचें अधिक होतें. अमरु राजाच्या शरीरांत प्रवेश केल्यानंतर आचार्यांना पूर्वदेहाचा कांहीं वेळ विसर पडला, तेव्हां पद्मपादानेंच त्यांना स्वस्वरूपाचें स्मरण करून दिलें. तसेंच कापालिकानें मंत्रशक्तीनें आचार्यांचे शरीरांत दुर्धर रोग उत्पन्न केला तेव्हां पद्मपादानें योगबलानेंच त्याचा प्रतिकार केला. अलीकडे समर्थ रामदासांचा कल्याण शिष्य झाला, तसाच शंकराचार्यांचा पद्मपाद निःसीम शिष्य होता, व त्यामुळें त्याला आचार्यशिष्यांत अग्रस्थान मिळालें.

विद्वत्तेनें आणि प्रसिद्धीनें सर्वांत श्रेष्ठ शिष्य सुरेश्वराचार्य. पूर्वाश्रमींचें नांव मंडणामिश्र. मंडणाची स्त्री सरस्वती ऊर्फ सरसवाणी कुमारिलभट्टाची बहीण होती! त्यामुळें मंडण त्याचा मेव्हणा व कट्टा अनुयायी होता. मिश्रपदावरून तो काश्मीरी किंवा पूर्वात्य आसामी ब्राह्मण असावा. रहाण्याचें ठिकाण नर्मदेच्या कांठीं माहिष्मती नगर, म्हणजे हल्लींचें महेश्वर. आचार्यांनीं वादांत पराजय केल्यावर मंडणानें संन्यास घेऊन सुरेश्वराचार्य नांव घेतलें. सुरेश्वर नांवानें भाष्यकाराचे पट्टशिष्य म्हणून प्रसिद्धि पावून कांहीं काल नर्मदेच्या कांठीं मगध देशांतच मंडणमिश्रानें वास केला, असें माधवकृत शंकरदिग्विजांत म्हटलें आहे. पुढें पद्मपाद आणि सुरेश्वर यांच्यामध्यें ईर्ष्या उत्पन्न झाली असावी. विशेषेंकरून सुरेश्वराचे विद्वत्तेपुढें पद्मपादाचें तेज कमी होऊं लागल्यानें वैषम्य उत्पन्न झालें असावें. एकदां आचार्यांनीं सुरेश्वराला आपल्या शारीरभाष्यावर वार्तिकें रचण्यास सांगितलें. तेव्हां पद्मपाद म्हणाला, मलाही वार्तिकें करतां येतात. आचार्यांनीं बरें म्हणून त्याला सांगितलें व त्यावरून पद्मपादानें पंचपादिका म्हणून चतुःसूत्रीवर वार्तिक ग्रंथ केला. सुरेश्वरांनीं नैष्कर्म्यसिद्धि, ब्रह्मसिद्धि, उपनिषद्भाष्यवार्तिकें, व दुसरे पुष्कळ ग्रंथ लिहिले. सुरेश्वराचार्याला विश्वरूपाचार्य असेंही म्हटलेलें आढळतें. पराशरस्मृतिटीकेंत सुरेश्वराच्या 'संबंधवार्तिकां'

तील एक उतारा विश्वरूपाचे नांवानें दिला आहे.* व तसेंच 'विवरण-प्रमेयसंग्रहा'त बृहदारण्यक वार्तिकांतला उतारा आहे. शृंगेरी गुरुपरंपरेंत आद्य आचार्यांनंतर सुरेश्वराचे ऐवजीं विश्वरूप नांव आढळतें, व त्यालाही वार्तिकाचार्य म्हटलें आहे. यासंबंधानें मतभेद आहे. सुरेश्वराची शृंगेरी गादीवर नेमणूक झाली असें कांहीं म्हणतात, व कांहीं त्यास द्वारकामठाकडे ओढतात. तो ब्रह्मचारी नसल्यामुळें त्याला कोठेंच पीठाधिकारी न करितां सर्वांवर निरीक्षक नेमलें असाही एक पक्ष आहे.

निकटवर्ति शिष्यांपैकीं **पद्मपाद, हस्तामलक, तोटक** आणि **चित्सुख** एवढेच पुढें पीठाधिकारी झालेले दिसतात. खुद्द शंकराचार्यांनीं शृंगेरी आणि कांची हे दोनच मठ स्थापल्याचा पुरावा मिळतो. द्वारका, गोवर्धन आणि ज्योतिर्मठ खुद्द आचार्यांनीं स्थापल्याचा प्रत्यक्ष पुरावा अजून मिळत नाहीं. सुधन्वा राजाचा ताम्रपट म्हणून एक लेख माजी द्वारकापीठस्थ राजराजेश्वराचार्यांनीं आपल्या विमर्श ग्रंथांत छापला आहे; पण तो विश्वसनीय दिसत नाहीं. अस्सल ताम्रपट पुढें आलेला नाहीं, कालाचा घोटाळा आहे, व सुधन्वा नांवाचा राजाही त्यावेळच्या वंशावळींत आढळत नाहीं. कुमारिलभट्टाच्या वेळींही एक सुधन्वा राजा होता, तोच हा असणें संभवनीय नाहीं. तात्पर्य, दिग्विजय ग्रन्थांत आचार्यशिष्यांचीं नांवें आढळतात, त्यांवरून मठांच्या पुढील इतिहासावर कांहीं प्रकाश पडत नाहीं, फक्त आचार्यांचा बालमित्र व पुढें शिष्य झालेला चित्सुखाचार्य यानेंच जर खरोखर ' बृहच्छंकरविजय ' ग्रंथ लिहिला असेल तर त्याला महत्त्व आहे. पण तो समग्र ग्रंथ छापून प्रसिद्ध झाल्याशिवाय कांहीं अनुमान करितां येत नाहीं. याखेरीज भारतीवंश, सुबोध, प्रभाकर, उदङ्क, दृढभक्त, मेधातिथि, नित्यानंद, शुद्धकीर्ती, योगानंद, ब्रह्मस्वरूप आणि सुमती असे दुसरे पुष्कळ शिष्य होते.

आद्य शंकराचार्यांनीं धर्मरक्षणार्थ चार दिशांस चार मठ स्थापिले, असा प्रवाद आहे. शिवाय पांचवा कांची येथील **कामकोटी** मठ हाही आपणांस

---

*Jacob's Introduction to the edition of नैष्कर्म्यसिद्धि (Bom, Sans, Series ) p. 6.

आचार्यस्थापित व मुख्य समजतो. चार दिशांना व चार मुख्य धामांचे ठिकाणीं चार मठ स्थापन केले, असें म्हणावें तर आद्य श्रृंगेरी किंवा कांची मठ तसे नाहींत. ते भरतभूमींत मध्यवर्ती आहेत. दक्षिण मठ रामेश्वर किंवा कन्याकुमारी येथें पाहिजे होता; आणि मठाम्नाय सेतूंत "रामेश्वराव्हयं क्षेत्रमादिवाराहदेवतां" अशी शृंगेरी मठाची अधिष्ठात्री देवताही सांगितली आहे. द्वारकामठाला द्वारकाधीश, गोवर्धन मठाला जगन्नाथ आणि ज्योतिर्मठास बदरीनाथ अशीं नजीकचीं धामें आहेत.पण श्रृंगेरीचें रामेश्वर फार लांब आहे. त्यावरून बाकी तीन मठ क्षेत्राचे ठिकाणीं मागाहून स्थापले असावे असें दिसतें. ज्योतिर्मठांत तोटकाचार्यांची स्थापना होणार होती, पण झाली नाहीं. किंबहुना तेथें पीठाधिकारी कधीं बसलाच नाहीं, असें म्हणतात. त्यामुळें तेथील परंपरा उपलब्ध नाहीं. फक्त जोशीमठ म्हणून बदरी नारायणाच्या वाटेवर एक इमारत आहे, तेथें कांहीं संन्याशी रहातात. व त्यांचा योगक्षेम रामपूर टेहरीच्या राजामार्फत चालतो, एवढें खरें. ज्योतिर्मठाला उत्तराम्नाय, आनंदवार संप्रदाय, व अथर्ववेद मानतात. बदरीनारायणची स्थापना शंकराचार्यांनीं केली व अजूनही तेथील पुजारी नंबुद्री ब्राह्मण असून तो त्रावणकोर संस्थानमार्फत नेमला जातो. थंडीचे दिवसांत बदरीनारायणाचें मंदिर बंद होतें;तेव्हां सर्व पुजारी लोक खालीं जोशी मठांत येऊन रहातात, एवढाच या मठाचा उपयोग दिसतो.

जगन्नाथपुरींतील गोवर्धन मठाची परंपरा चालू आहे; पण तींतही अलीकडे खंड पडलेला असावा. हल्लींचे पीठाधिपति श्रीमधुसूदनाचार्य यांचे पूर्वीं बरींच वर्षें पुरीचे मठावर कोणी अधिकारी नसल्यामुळें काठेवाडांतील लिंबडी शहरचा एक ब्राह्मण संन्यासी तेथें जाऊन बसला व आपणास शंकराचार्य म्हणवूं लागला. पुरींतील गोवर्धनमठाला भोगवार संप्रदाय किंवा विमलापीठ असेंही नांव आहे, व ते पद्मपादाचार्यापासून परंपरा मानतात. ऋग्वेद शाखा, आणि अंग, वंग, कलिङ्ग मगध, उत्कल व बर्बर या पूर्वेकडील देशांवर त्याचा अंमल आहे. हल्लींचे स्वामी श्रीमधुसूदनाचार्य १४२ वे असून आजन्म ब्रह्मचारी आहेत. गोवर्धनमठ आद्य

आचार्यांनीं स्थापल्याचा प्रत्यक्ष पुरावा नाहीं; पण पद्मपादाचार्यांनीं तीर्थयात्रा करीत असतां पुरीस वास्तव्य केल्यानें तेथें त्यांची शिष्यपरंपरा वाढली असेल, व पुढें त्याला शांकरमठाचें स्वरूप आलें असेल.

द्वारकामठाला पश्चिमाम्नाय शारदामठ, कीटवारसंप्रदाय, सामवेद, गोमतीतीर्थ, आणि आचार्य विश्वरूप अथवा सुरेश्वराचार्य मानतात. वस्तुतः द्वारकापीठाच्या शिष्यपरंपरेंत पहिलें नांव ब्रह्मस्वरूपाचार्यांचें, व दुसरें चित्सुखाचार्यांचें आहे. परंतु मंडणमिश्राला योगपट्ट देतांना 'तत्त्वमसि' या छांदोग्योपनिषदांतील महावाक्याचा उपदेश केला, आणि पीठाला मंडणाच्या स्त्रीचे नांवावरून शारदापीठ म्हणतात; सबब सुरेश्वर सामवेदी द्वारकापीठावरच होते, असें द्वारकामठवाल्यांचें म्हणणें आहे. पण याला दुसरा आधार कांहीं नाहीं. किंवा द्वारकामठ आद्य आचार्यांनीं स्थापिला यालाही ऐतिहासिक पुरावा नाहीं. द्वारकापीठाची गुरुपरंपरा आणि तिथिवार जंत्री असावी तशी विश्वसनीय नाहीं. काठेवाडप्रांत मुसलमानांचे ताब्यांत गेला, तेव्हां द्वारकेचे स्वामी धर्मछलामुळें दक्षिणेंत शृंगेरीचे आश्रयास गेले, व तेथें जवळच मूलबागल गांवीं स्वतंत्र मठमंदिर स्थापून राहिले, आणि खुद्द द्वारकेस तीन चारशें वर्षें कोणी आचार्यच नव्हते असें म्हणतात. काहीं वर्षांपूर्वीं सुरतेस मूलबागलचे सच्चिदानंदतीर्थ आणि द्वारकेचे राजराजेश्वर यांचे मध्यें वाद होऊन कृष्णानंदस्वामीप्रभृति मध्यस्थांनीं मूलबागलतर्फे निकाल दिला. व त्यांची बिरुदावलीही शारदापीठाची आहे. अलीकडे तीस चाळीस वर्षांपूर्वीं द्वारकेच्या मठांत राहिलेल्या एका केशवाश्रम नांवाच्या स्वामींचें शिष्यत्व पत्करून श्रीराजराजेश्वर आपणांस शारदापीठस्थ शंकराचार्य म्हणवूं लागले, व त्यांनी मागें शिष्य न ठेवल्यानें त्यांचे गादीवर बडोदें सरकारांनीं श्रीमाधवतीर्थ स्वामींची योजना केली. हल्लीं माधवतीर्थांचे पश्चात् बडोदेसरकारानें श्रीशांतानंदस्वामी नियुक्त केले आहेत, व श्री माधवतीर्थांचे एक अंतेवासी ब्रह्मचारी शिष्य श्रीराजराजेश्वराश्रम नांवाचे वारसा सांगत आहेत. हा मुकदमा अमदाबाद कोर्टांत चालू आहे. तिसरे मूलबागल संस्थानचे स्वामीही आपणास शारदापीठस्थ म्हणवितात; पण दक्षिणेंत त्यांना चांगली जहागीर मिळाल्यामुळें द्वारकेचा

हक्क त्यांनीं बहुतेक सोडून दिला आहे. द्वारकेच्या मठांतील सर्व दप्तर हरिपंत फडक्यांच्या काठेवाडच्या स्वारींत नाहींसें झालें म्हणतात. तेव्हां या मठासंबंधाची अधिक विश्वसनीय माहिती मिळण्याचा संभव कमीच आहे.

तात्पर्य, पश्चिम, उत्तर आणि पूर्व या तीन दिशांकडील पीठें खुद्द आचार्यांनीं स्थापिलीं असें मानण्याला खात्रीलायक पुरावा आजमितीस उपलब्ध नाहीं. किंबहुना आचार्यांनंतर चार पांचशें वर्षे म्हणजे चौदावे शतकापर्यंत तीं अस्तित्वांत होतीं कीं नाहीं याविषयींही शंका आहे. हल्लीं प्रचारांत असलेले मठाम्नायसेतु आणि गुरुपरंपरा कधीं तयार झालीं हें माहित नसल्यानें त्यांना विशेष ऐतिहासिक किंमत देतां येत नाहीं. बाकी राहिलीं शृंगेरी, कांची अथवा कुंभकोण, व संकेश्वर हीं दक्षिण देशांतील तीन पीठें. तीं विशेष विचार करण्यासारखीं आहेत. हंपी, शिवगंगा, पुष्पगिरी हीं मुख्य पीठें नसून शाखामठ आहेत. व ते बहुधा श्रीविद्यारण्यांचे वेळीं स्थापन झाले असावेत. तसेंच श्रीकाशी, नाशिक, पंढरपूर वगैरे मुख्य क्षेत्रांत शंकराचार्यांचे मठ आहेत तीं नुसतीं निवासस्थानें आहेत. शंकरपरंपरेचे संन्याशी, शिष्य व यात्रेकरू गृहस्थ यांना तेथें राहतां येतें व त्यांची व्यवस्था स्थायिक शिष्याकडे किंवा कारभाऱ्याकडे असते. हल्लीं दिल्ली, मुंबई, पुणें वगैरे राजधानींचे ठिकाणीं देशी राजे बंगले बांधतात तसें सर्व महाक्षेत्रांत राजे लोकांचे वाडे व धर्मगुरूंचे मठ असत. व अजूनहि त्यांपैकीं कांहीं अस्तित्वांत आहेत.

याखेरीज बुद्धगयेला शंकरसांप्रदायी महंताचें एक मोठें संस्थान आहे, तेंही आद्य शंकराचार्यांचें पीठच समजतात. कांहीं वर्षांपूर्वीं गौतमबुद्धाची मोठी मूर्ति विष्णुपदमंदिरांत एका बाजूचे ओरींत होती. तिची सिंहली, चिनी, जपानी, बुद्ध यात्रेकरू नित्य पूजा करीत; पण पूजाद्रव्य हिंदु महंताला मिळत असे. बुद्धभिक्षु **अनगारिक धर्मपाल** यानें हें प्रकरण कोर्टांत नेलें. पुढें आपसांत समजूत होऊन सदर मूर्ति बुद्धगयेच्या भव्य मंदिरांत नेऊन ठेवली, व तेथें सर्व बुद्ध यात्रेकरू दर्शनाकरितां जातात. अंमल शंकरसांप्रदायी महंताचा आहे, व नित्य पूजाअर्चा त्याचेकडून होते. बुद्ध हा श्रीविष्णूचा नववा अवतार समजून ही पूजा होते, व विष्णुपदही

या बुद्धावताराची पादुका म्हणूनच कलियुगांत सर्ववंद्य झालें आहे. इतकेंच नाहीं, तर ज्या वटवृक्षाखालीं बारा वर्षें कडक तपश्चर्या करून गौतमबुद्ध सिद्धार्थ व बोधिसत्व झाला त्या अक्षय्य वटावर आज मितीला सर्व भाविक हिंदु लोक पितरांचे नांवानें पिण्डदान करतात. गौतमबुद्धानें वैदिक धर्माचा उच्छेद करण्याचा प्रयत्न केला असतांही त्याला दशावतारांत स्थान दिलें व सर्व पितरांच्या मोक्षाचें जामीन केलें, ही सनातन धर्माची केवढी संग्राहकता ! श्रीशंकराचार्यांनीं वैदिकधर्माचें पुनरुज्जीवन केलें, याचें उत्तम प्रमाण गया क्षेत्र आहे. गयासुर, सीतागुंफा, फल्गुनदीश्राद्ध वगैरे पुस्त्या मागाहून पौराणिक काळीं चिकटल्या असाव्यात. पण शाक्यमुनीच्या तपश्चर्येचें हें प्राचीन कामवन पुढें शुद्ध करून जगन्नाथपूरीच्या गोवर्धनपीठस्थांनीं आपले ताब्यांत घेतलें असावें व आपलाच एखादा शिष्य तेथें महंत नेमला असावा.

---

## अध्याय चौथा.

## शिष्यपरंपरा.

**वेदे ब्रह्मसमस्तदङ्गनिचये गार्ग्योपमस्तत्कथा—**
**तात्पर्यार्थविवेचने गुरुसमस्तत्कर्मसंवर्णने ।**
**आसीज्जैमिनिरेव तद्वचनदर्पोद्बोधकन्दे (?) समो**
**व्यासेनैव मदीयसद्गुरुरसौ श्रीशंकराख्यः क्षितौ ॥**

आनन्दगिरी—शंकरविजय.

सर्व पूर्वाचार्यांची विद्वत्ता आद्य शंकराचार्यांत संकलित झाली होती हें आनंदगिरीनें वरील श्लोकांत दर्शविलें आहे. ब्रह्मदेव, गार्ग्य, बृहस्पति, जैमिनी व व्यास हे वेदाच्या एक एक अंगांत निष्णात होते; पण शंकरा-

चार्यांना सर्व अंगें अवगत होतीं. अतिशयोक्तीचा भाग गाळला तरी तत्कालीन सर्व वेदशास्त्रांचें ज्ञान शंकराचार्यांचें ग्रन्थांत संकलित झालें आहे, ही गोष्ट कोणालाहि नाकबूल करतां येणार नाहीं. चार वेदांचें प्रख्यापन करणारे ब्रह्मदेव व ब्रह्मसूत्रकार व्यास शंकराचार्यांचें गुरुपरंपरेंत आहेतच. जैन, बौद्ध प्रभृति नास्तिक पंथांनीं माजविलेला घोंटाळा नाहींसा करून पुन्हां श्रुतिस्मृतिविहित सनातन धर्माचें प्रभुत्व स्थापन करण्याचें महत्कार्य शंकराचार्यांनीं केलें, तें अर्थातच सर्व पूर्वाचार्यांचें सिद्धांतांचा समन्वय करून, श्रुतिस्मृतिविहित धर्मच सत्य आहे व तद्विरोधी तर्क निर्मूल आणि भ्रामक आहेत हें दाखवूनच केलें. सनातन धर्माचे आधारभूत चार सिद्धान्त बादरायणांनीं पहिल्या चतुःसूत्रींत गोवले आहेत, व शंकराचार्यांनीं आपलें वेदान्तशास्त्र या चतुःसूत्रीचे पायावरच रचिलें. केवळ तर्कशक्तीच्या बळानें अनेक मतवाद्यांनीं केलेले आक्षेप त्याच तर्कशक्तीनें खोडून टाकून आणि उपनिषदांतील व स्मृतिपुराणांतील तत्त्वविचारांची उत्तम संगति लावून देऊन लोकांची सनातन धर्मावरील श्रद्धा पुन्हां स्थापित केल्यामुळेंच शंकराचार्यांना धर्मसंस्थापक ही पदवी प्राप्त झाली. काशीक्षेत्रांत चाण्डालरूपानें आचार्यांची प्रथम परीक्षा घेऊन नंतर श्रीविश्वेश्वरांनीं त्यांस पुढीलप्रमाणें आज्ञा केलीः—

**यथा श्रुतीनां सर्वासां परब्रह्मणि निष्ठता ।**
**तथाऽद्वैतपरं भाष्यं कुरुष्वाभिनिवेशतः ॥**
**श्रुतिसूत्रेतिहासानां व्याख्यां निर्माय यत्नत ।**
**सम्प्रदायविदां मार्गः प्रकाश्यस्तेधुना यते ॥**

सर्व श्रुतिवाक्यांचा निष्कर्ष अद्वैतपरब्रह्मपर आहे, असा सिद्धांत स्थापन करून सांप्रदायिकांना खरा मार्ग दाखविण्याचें कार्य करण्याकरितां शंकराचार्यांचा अवतार झाला. त्यांनीं जी धर्मक्रांति, अथवा वस्तुतः सद्धर्माची उत्क्रांति, घडवून आणली तिनें तो अवतार सफल झाला असें म्हणण्यास बिलकूल प्रत्यवाय नाहीं. देहाला शीण देणारें वैदिकांचे कर्मकाण्ड व बुद्धीला शीण देणारा बौद्धांचा शून्यवाद या दोहोंलाही निरुपयोगी

ठरवून अद्वैत ब्रह्मांत बुद्धि स्थिर करणें हा खरा मोक्षाचा उपाय शंकराचार्यांनीं दाखवून दिला. आक्रमिलेला मार्ग अनुसरूनच पुढील मार्ग लोकांना दाखविणें हें खऱ्या महात्म्यांचें लक्षण होय. जैन-बौद्धांनीं एक हजार वर्षे लोकांना उदात्त धर्मशिक्षण देऊन, नीरस कर्मकांडापासून परावृत्त करून अंतर्मुख केलें; पण लोकांच्या जागृत झालेल्या अंतर्मुख बुद्धीला निश्चित ध्येय पाहिजे होतें तें बौद्धांच्या शून्यवादांत मिळेना, किंवा जैनांच्या "स्याद्वा न वा" 'असेल नसेल', असल्या संशयवादांतही नव्हतें. जैन-बौद्धांनीं लोकांना आध्यात्मिक विचारांची संवय लावून दिली; पण त्या विचारांना योग्य विषय जें आत्मज्ञान तें त्यांचेजवळ नव्हतें. कारण त्यांची सर्व भिस्त तर्कावर; आणि आत्मज्ञान तर्कशक्तीच्या आंवाक्याबाहेरचें असतें. "विज्ञातारमरे केन विजानीयात्" या याज्ञवल्क्यांनीं मैत्रेयीला केलेल्या प्रश्नाला जैन-बौद्धांना उत्तर देतां आलें नाहीं. युरोपियन तत्त्वज्ञान्यांची बुद्धिही येथें कुंठित झाली आहे. ज्ञात्याचें ज्ञान कसें व्हावयाचें या शंकेचें कोणालाही अजून समर्पक उत्तर देतां येत नाहीं, क्यांट म्हणतो तें Intuition स्वयंभूज्ञान आहे; स्पेन्सर म्हणतो तें Unknowable अज्ञेय आहे, व जर्मन तत्त्वज्ञानी म्हणतात Unconscious म्हणजे बौद्धांचें आलयविज्ञान होय. पण हे सर्व तर्क आहेत. आत्मज्ञानाचा खरा मार्ग "आत्मावाऽरे द्रष्टव्यः" ही श्रुतिच फक्त सांगते. व त्या दर्शनाचीं म्हणजे प्रत्यक्षाचीं साधनें 'श्रोतव्यो मन्तव्यो निदिध्यासितव्यः', श्रवण, मनन आणि निदिध्यास, हींही श्रुतीनेंच सांगितलीं आहेत. शंकराचार्यांनीं सर्व श्रुतिवाक्यांची संगति लावून हा महासिद्धांत लोकांचे अंतःकरणांत बिंबविला. त्यामुळें धर्मसंस्थापनाचार्य आणि जगद्गुरु या त्यांच्या पदव्या सार्थ झाल्या आहेत. परब्रह्माचे स्वरूपाविषयीं पुढें अनेक मतमतांतरें उत्पन्न झालीं; द्वैत अद्वैत, विशिष्टाद्वैत, शुद्धाद्वैत वगैरे अनेक पंथ निघाले; परंतु "आत्मा द्रष्टव्यः" हा नवीन महासिद्धांत सर्वांना मान्य झाला. तत्कालीन पण्डितांना नवें वाटणारें हें तत्त्व शंकराचार्यांनीं प्रचलित केलें; पण तें स्वकपोलकल्पित नसून श्रुतिशास्त्रादिकांनीं उक्त म्हणून लोकांस सांगितलें. तात्पर्य, आचार्यांनीं नवा धर्म स्थापिला नाहीं, तर परंपरागत सनातन धर्माचें पुनरुज्जीवन केलें.

शंकराचार्यांचे निकटवर्ति शिष्यांचीं पुष्कळ नांवें दिग्विजय ग्रंथांत आढळतात; पण त्यांपैकीं सात आठ खेरीज कोणाचेहि ग्रंथ उपलब्ध नाहींत. मुख्य शिष्य चार; सुरेश्वर, पद्मपाद, हस्तामलक, आणि तोटक. यांशिवाय चित्सुख, ब्रह्मस्वरूप, सर्वज्ञात्म, आनन्दगिरी, वगैरे आणखी दुय्यम प्रतीचे शिष्य होते. कोणी म्हणतात सुरेश्वराचेंच नांव विश्वरूप, आणि श्रृंगेरी मठाच्या गुरुपरंपरेंत " विश्वं मायामयत्वेन रूपितं यत्प्रबोधतः विश्वं च यत्स्वरूपं तं वार्तिकाचार्यमाश्रये " अशी त्या नांवाची उपपत्तीही दिली आहे. पराशरमाधवांत* "इदं च वाक्यं नित्यकर्मविषयत्वेन वार्तिके+ विश्वरूपाचार्य उदाजहार आम्रे फलार्थे इत्यादि ह्यापस्तम्बवचः " असा उल्लेख आहे. त्यावरून सुरेश्वराचार्य तेच विश्वरूपाचार्य अशी माधवाचार्यांचीही समजूत असलेली दिसते. उलट सुरेश्वराचार्य मण्डणमिश्र नव्हेत असेंही कोणी म्हणतात. कारण नैष्कर्म्यसिद्धि ग्रंथांत त्यांनीं मण्डणमिश्राच्या मतांचें खण्डन केलें आहे; पण ही कोटी जोरदार दिसत नाहीं. पद्मपादाची पंचपादिका,हस्तामलकस्तोत्र व चित्सुखाचा बृहत्शंकरविजय, हे ग्रंथ प्रसिद्ध आहेत. चित्सुखी ग्रंथाचा कर्ता चित्सुखाचार्य व टीकाकार आनंदगिरी हे निराळे, व निःसंशय कित्येक शतकें मागाहून झाले. शंकरविजय ग्रंथाचा कर्ता आनंदगिरी कोण, हें खात्रीनें सांगता येत नाहीं; पण तो आपणाला आचार्यांचा शिष्य म्हणवितो. गोवर्धन मठाच्या परंपरेंत " अपीठस्थ " म्हणजे पीठावर न बसलेले असे १२ शिष्य, व सुधन्वा, राजसेन, पूर्णवर्मा आणि वृषदेव असे चार शिष्यभूत झालेले राजे, असे आचार्यांचे सोळा निकटवर्ति शिष्य सांगितले आहेत;पण त्याला विश्वसनीय ऐतिहासिक आधार नाहीं. फक्त "शंकराचार्यबोधेन्दुकलाभूतान् " ही षोडशकलावान् चंद्राची उपमा साधण्याकरितांच सोळा संख्या योजिली असावी.श्रृंगेरीपरंपरेत पहिले सुरेश्वर ऊर्फ विश्वरूप, व दुसरे नित्यबोधघन आहेत.द्वारकेच्या परंपरेंत पहिले ब्रह्मस्वरूप आणि दुसरे चित्सुख आहेत; पण शृंगेरी—मठाम्नाया-

---

* पराशर स्मृति. B. S. S. Vol I, Part I, p.57

+ बृहदारण्यवार्तिक १–१ पृ. ९७.

प्रमाणें द्वारकापीठावर पाहिले पद्मपाद होते. उलट जगन्नाथपरंपरेप्रमाणें गोवर्धनमठाचे आद्य शिष्य पद्मपाद होते. कांची मठवाले म्हणतात, कांचीच्या कामकोटीपीठावर प्रथम सुरेश्वराचार्य ७० वर्षें होते. व नंतर सर्वज्ञात्म श्रीचरण बसले. शृंगेरीपठिावर प्रथम हस्तामलक ऊर्फ पृथ्वीधाराचार्य बसले असावे असाही एक पक्ष आहे. परंतु शृंगेरीमठाच्या परंपरेंत व राईस साहेबांनीं म्हैसूर ग्याझेटियरमध्यें दिलेल्या यादींत पहिलें नांव सुरेश्वराचेंच आहे. द्वारका व जगन्नाथ येथील मठ व परंपरा ऐतिहासिकदृष्ट्या विश्वसनीय मानतां येत नाहींत. द्वारकेस ब्रह्मस्वरूप व चित्सुख, आणि जगन्नाथास पद्मपाद जाऊन राहिले असतील, व त्यांची शिष्यशाखा तेथें वाढली असेल;आणि कांहीं काळानें त्या शिष्यांनीं आपआपल्या मठाला आचार्यपीठांचें स्वरूप दिलें असेल. शृंगेरी आणि कांची हीं दोन प्राचीन पीठें खरीं, व बाकीचीं मागाहून उत्पन्न झालेलीं, अशी कल्पना केल्याखेरीज हा घोंटाळा मोडत नाहीं. चार दिशांचे चार धाम, चार पीठें, त्यांचे चार संप्रदाय, चार मठाम्नाय, व त्यांची प्रांतवार वांटणी ही व्यवस्था पुढें चौदाव्या शतकांत माधवाचार्य ऊर्फ विद्यारण्यांनीं केली असावी, असें मानण्यास आधार आहे. यासंबंधानें अधिक माहिती उपलब्ध होईल तेव्हांच सर्व वाद मिटेल.

आद्य शंकराचार्यांनंतर शृंगेरीच्या गादीवर दोन मोठे कर्ते पुरुष होऊन गेले. त्यांनीं शांकरसंप्रदायाचें फार दृढीकरण केलें. आद्य आचार्यांनीं वेदान्तमताचें बीजारोपण केलें, व तें बीं पांचशें वर्षें भरतखंडांत चांगलें रुजलें; पण त्याला व्यवस्थित संप्रदायाचें रूप देऊन लोकसंग्रहाचें राष्ट्रिय कार्य करण्याला पुढील दोन महात्म्यांनीं समर्थ केलें. हे दोन महात्मे शृंगेरीपीठावरील १०वे गुरु श्रीविद्यातीर्थ ऊर्फ विद्याशंकरभारती आणि १२वे गुरु श्रीविद्यारण्य होत. शांकरसंप्रदायाच्या इतिहासांत आद्य आचार्यांच्या बरोबरीनें या दोघांनाही स्थान दिलें पाहिजे. शांकरसंप्रदायाला राष्ट्रिय धर्माचें स्वरूप देऊन तद्वारा सर्व हिंदुस्थानाच्या इतिहासाला एक विशिष्ट वळण या उभयतांनीं चवदाव्या शतकांत दिलें. मुसलमानांची लाट श्रीविद्यारण्याच्या प्रोत्साहनानें विजयानगरच्या राजांनीं तुंगभद्रेवर प्रथम थांबविली; तीच

पुढें रामदास व शिवाजीमहाराज या जोडीनें १७ व्या शतकांत नर्मदेच्या पलीकडे लोटून दिली, आणि नंतर पेशव्यांनीं दिल्लीपर्यंत हटवीत नेली. सबब भरतखंडांत हिंदुधर्म जिवंत राखण्याचें मुख्य श्रेय श्री विद्यारण्यस्वामींस दिलें पाहिजे. गादीवर बसल्यामुळेंच प्रसिद्ध होणाऱ्या इतर सामान्य लोकांप्रमाणें हे जगद्‌गुरु नसून विद्यातीर्थ व विद्यारण्य हे दोघेही पूर्वाश्रमींच महापंडित आणि कर्तृत्ववान् म्हणून गाजलेले होते; व त्यांचेमुळेंच वस्तुतः श्रृंगेरीपीठाचें महत्त्व वाटलें. गुरु नानकानें स्थापलेल्या शीखपंथाचे हातांत कृपाण देऊन गुरु गोविंदसिंगानें ज्याप्रमाणें शीखांना राष्ट्रकार्याला उद्युक्त केलें, त्याचप्रमाणें श्रीविद्यातीर्थ आणि श्रीविद्यारण्य या जोडीनें श्रृंगेरीपीठाला भावी राष्ट्रिय जागृतीचें अधिष्ठान केलें. आठव्या शतकांत आद्य शंकराचार्यांना फक्त जैन बौद्ध प्रभृति नास्तिक मतवाद्यांचाच प्रतिकार करावयाचा होता; म्हणून त्यांनीं केवळ बुद्धीच्या शस्त्रांनेंच काम केलें. चवदाव्या शतकांत विधर्मी मुसलमानांच्या सैन्याला विरोध करण्याकरितां विद्यारण्यांनीं प्रथम विजयनगरचें स्वतंत्र राज्य स्थापलें; आणि नंतर सनातन धर्माचें वर्चस्व सार्वत्रिक करण्याकरितां भरतखंडाच्या सर्व भागांत शांकरमठांची योजना केली. येशू ख्रिस्तानें पालेस्टाईनच्या एका कोपऱ्यांत सांगितलेला ख्रिस्ती धर्म सेंट पालनें जसा ग्रीस व रोम येथें नेला, व तेथें तीन चारशें वर्षें रुजल्यानंतर तो रोमन बादशहांनीं स्वीकारला, तेव्हांच त्याला राष्ट्रधर्माचें स्वरूप येऊन सर्व यूरोप व अमेरिका खंडांत तो प्रभुत्वशाली झाला; त्याचप्रमाणें शंकराचार्यांनीं मूर्त स्वरूप दिलेलें अद्वैतमत सर्व भरतखंडाचा राष्ट्रधर्म करण्याचें कार्य श्रीविद्यारण्यांनीं केलें.

श्रीविद्यातीर्थ आणि श्रीविद्यारण्य या उभयतांच्या चरित्राची माहिती अजून व्हावी तितकी उपलब्ध झालेली नाहीं. विशेषेंकरून विद्यातीर्थांविषयीं फारच थोडी माहिती मिळते. आद्य आचार्यांनंतर सुरेश्वर, नित्यबोधघन, ज्ञानघन, ज्ञानोत्तमशिव, ज्ञानागिरी, सिंहागिरी, ईश्वरतीर्थ आणि नरसिंहतीर्थ असे आठ स्वामी झाले व नंतर दहावे विद्यातीर्थ ऊर्फ विद्याशंकरभारती झाले. हे सन १२२८ सालीं पीठारूढ होऊन १३३३ सालीं

समाधिस्थ झाले, असें राईस साहेब आणि सूर्यनारायणराव म्हणतात. * म्हणजे ते १०५ वर्षे पीठावर होते. हे पूर्वाश्रमीं सर्वज्ञविष्णु नांवानें प्रख्यात पंडित होते. सबब त्यांचें आयुष्य निदान दीडशें वर्षें मानावें लागेल. पूर्वाश्रमींचे सर्वज्ञविष्णु आणि आश्रमानंतरचे विद्यातीर्थ हे सुप्रसिद्ध माधवाचार्य व सायणाचार्य यांचे गुरु होते असें यांच्या ग्रंथांतील उल्लेखावरून दिसतें. शांकरदर्शनांत सायणांनीं सर्वज्ञविष्णूच्या विवरणविवरण ग्रंथाचा उल्लेख करतांना त्यांना भट्टोपाध्याय अशी पदवी दिली आहे.+ सर्वदर्शनग्रंहाचा कर्ता माधव हा सायणाचार्यांचा मुलगा होता असें म्हैसूरचे नरसिंहाचार्य म्हणतात. त्यानें ग्रंथारंभीं सायणाचे अगोदर सर्वज्ञविष्णूला वंदन केलें आहे. विजयनगरच्या दुसऱ्या हरिहराचे सन १३८० सालच्या एका दानपत्रांत होम्म नांवाच्या गांवाचा सर्वज्ञविष्णुपुर असा उल्लेख आहे. त्यावरून सर्वज्ञविष्णूला विजयनगरचे दरबारांत फार मान होता असें दिसतें व पुढें श्रीविद्यातीर्थांना तर विजयनगरचे राजे गुरुस्थानीं मानीत होते, हें अनेक शिलालेखांवरून आणि दानपत्रांवरून सिद्ध आहे. मात्र राईससाहेबांनीं व शृंगेरीमठाचे गुरुपरंपरेंत दिलेला विद्यातीर्थांचा काळ थोडा चुकला असला पाहिजे. विजयनगरचें राज्य सन १३३६ सालीं स्थापन झालें; व विद्यतीर्थांचे शिष्य माधवाचार्य सन १३७६ सालचे सुमारास संन्यास घेऊन श्रीविद्यारण्य नांवानें प्रसिद्ध झाले, आणि सन १३८० सालीं शृंगेरी पीठावर बसले. अर्थात् विद्यातीर्थ १३३६ व १३८० याचे दरम्यान शृंगेरीगादीवर असले पाहिजेत. माधवाचार्योंनीं सन १३३१ सालीं विद्यातीर्थांपासून संन्यासदीक्षा घेतली व नंतर १३३३ पासून १३८० पर्यंत विद्यारण्यनांवानें ते शृंगेरीचे गादीवर होते अशी दंतकथा आहे; पण ती खरी दिसत नाहीं. कारण विजयनगरचें राज्य १३३६ त स्थापन झाल्या-

---

* Mysore Gaettzeer, Vol, I, p. 473 and Surya Narayan Row's History of Vijayanagar, App. p. XIV.

+ सर्वदर्शनसंग्रह Anandash. ed. पृ १६९.

नंतर कित्येक वर्षें ते बुक्क राजाचे अमात्य होते, व त्या कालांत त्यांनीं कित्येक ग्रंथ रचिले. जैमिनीन्यायमालाविस्तरांत बुक्क राजा विद्यातीर्थमुनीचा शिष्य होता, व जसा इंद्राचा बृहस्पति किंवा रामाचा वसिष्ठ तसा माधवाचार्य बुक्क राजाचा कुलगुरु होता, असें म्हटलें आहे. माधवनांवानें प्रख्यात असलेले ग्रंथ पूर्वाश्रमींचे, व विद्यारण्यनांवानें प्रसिद्ध असलेले संन्यासानंतरचे असेंच मानिलें पाहिजे. पूर्वाश्रमींचे ग्रंथ मीमांसा, धर्मशास्त्र व वेदभाष्य वगैरे व्यावहारिक विषयांवर आहेत, व त्यांत बुक्क राजाचा उल्लेख आहे. संन्यासानंतरचे विद्यारण्याचे सर्व ग्रंथ अद्वैत वेदांतपर आहेत, हाही फरक ध्यानांत ठेवण्यासारखा आहे.

शृंगेरी व कांची या दोन मठांत फार वर्षांपासून स्पर्धा चालू आहे. शंकराचार्यांचा मुख्य मठ कोणता याविषयीं हा वाद आहे. कांचीमठाला शृंगेरीमठ कबूल आहे, पण तो फक्त मतप्रसाराकरितां आहे. व मुख्य स्थान व आद्य आचार्यांची समाधी कांची येथें आहे, असें ते म्हणतात. शृंगेरीला कांची मुळींच कबूल नसून अलीकडील कुंभकोण मठ अगदीं अर्वाचीन आहे, असें त्यांचें म्हणणें आहे. ही स्पर्धा विद्यातीर्थस्वामींपासून सुरू झाली म्हटलें तरी चालेल. श्रीविद्यातीर्थ दोन्ही पीठांवर आचार्य होते, निदान दोन्ही पीठें एके काळीं त्यांचे हुकुमतीखालीं असून दोन्ही ठिकाणीं त्यांचीच शिष्यपरंपरा चालू झाली असावी असें दिसतें. विद्यातीर्थांनीं कांचीस शंकरानंद व शृंगेरीस भारतीतीर्थ असे आपले दोन शिष्य वसवून दोन्ही पीठांची स्थिति सुधारली, इतकेंच नाहीं तर आणखी सहा शाखामठ स्थापून तेथें सहा शिष्यांचीं योजना केली, अशी दंतकथा आहे. तात्पर्य, विद्यातीर्थस्वामी दोन्ही मठांचे उद्धारक आणि प्रमुख होते एवढी गोष्ट खरी दिसते. शृंगेरीचा सर्वांत जुना उपलब्ध झालेला ताम्रपट स. १३४६ सालचा आहे; पण कांचीचा त्याचेही अगोदरचा सन १२९१ जुलै ता. ९ सोमवारचा आहे.* या लेखानें कांची शंकराचार्यांस आंबिकापुरनामक गांव

* T. Gopal Rao's Copper-plate Inscriptions belonging to Sankaracharya of Kamakoti-pitha, p. 5.

रोज १०८ ब्राह्मणांस भोजन देण्याकरितां विजयगंडगोपाळनामक चोल राजानें दिला. पण यांत त्या वेळच्या शंकराचार्यांचें नांव दिलें नाहीं.

शृंगेरी पीठाचा संगतवार इतिहास अजून उपलब्ध नाहीं. पण कांचीच्या कामकोटी पीठासंबंधानें सदाशिवब्रह्मेन्द्र स्वामींनीं " जगद्गुरुरत्नमालास्तव " नांवाचा ग्रन्थ १७ व्या शतकांत लिहिला, व त्यावर आत्मप्रकाशेंद्रसरस्वती स्वामींनीं टीका लिहिली आहे. शिवाय पुण्यश्लोकमंजरी वगैरे ग्रंथांतही या मठासंबंधीं पुष्कळ माहिती आहे. हे ग्रंथ कितपत विश्वसनीय मानावयाचे तें आज सांगतां येत नाहीं; तथापि त्यांजवरून पुष्कळ गोष्टींचा खुलासा होतो. सदर ग्रंथांत विद्यातीर्थांविषयीं ६१ वे गुरु म्हणून खालील श्लोक आहेः*—

**हृदि सायणमाधवोपदेष्टॄन्**
**मदिनां वादविधौ शमप्रदेष्टॄन् ।**
**नमत श्रुतिशीलनायतन्द्रान्**
**यमिविद्याधिकतीर्थदेशिकेन्द्रान् ॥**

सायणमाधवांचे गुरु विद्यातीर्थ होते त्यांची पूर्वपीठिका "पुण्यश्लोकमंजरींत " पुढील श्लोकांत दिली आहे:—

**बिल्वारण्यज—शार्ङ्गपाणितनयः सर्वज्ञविष्णुः श्रयन्**
**संन्यासं गुरुचंद्रशेखरमुनेरास्थाय पीठीं गुरोः ।**
**योगेशस्य च चक्रराजवसतेर्देव्याश्च सक्तोऽर्चने**
**श्रीमन्माधव-बुक्क-भारतियतिप्रष्ठैर्महिष्ठैर्वृतः ॥**

गांव बिल्वारण्य, बाप शार्ङ्गपाणी, पूर्वाश्रमींचें नांव सर्वज्ञविष्णु, चंद्रशेखरमुनि गुरु, आणि बुक्कराय, माधवाचार्य आणि भारतीतीर्थ हे मुख्य शिष्य—असें विद्यातीर्थांचें वर्णन आहे. याशिवाय १ सच्चिदानंद, २ अद्वैतब्रह्मानंद, ३ सुखानन्द ४ अद्वैतानंद, ५ महादेवाशिव, आणि ६ अद्वैतसुखानंद असे दुसरे सहा शिष्य होते. त्यांची सहा पीठावर विद्या-

*वेदान्तपंचप्रकरणी Kumbhakonam ed., p.77

तीर्थांनीं योजना केली. त्यांपैकीं अद्वैतानन्दालाच आनन्दात्म व भारतीतीर्थ अशीं दुसरीं नांवें असून श्रृंगेरीपीठावर बसविलें. हे विद्यातीर्थ ऊर्फ विद्याशंकर कांची पीठावर ७३ वर्षे राहून शेवटीं शंकरानन्द शिष्यासह हिमालयांत गेले व १५ वर्षे तपश्चर्या करून तेथेंच सन१३८४ सालीं समाधिस्थ झाले, असेंही पुण्यश्लोकमंजरींत म्हटलें आहे. हें खरें असेल तर विद्यातीर्थ सन १२९६ सालीं कांची पीठारूढ झाले व त्यांनींच श्रृंगेरीपरंपरेप्रमाणें सन १३३३ सालीं भारतीतीर्थाला श्रृंगेरीपीठावर बसविलें असेल. १३६९ सालीं विद्यातीर्थांचें हिमालयांत गमन झाल्यानंतर माधवाचार्यांनीं संन्यास घेऊन श्रृंगेरीस वास केला, व १३८० सालीं भारतीतीर्थानंतर ते पीठाधिरूढ झाले, हेंही संभवनीय दिसतें. शके १२६८ म्हणजे इ. स. १३४६ सालीं विजयनगरसंस्थापक पहिल्या हरिहररायाचा एक शिलालेख आहे, त्यांत प्रारंभींच "विद्यातीर्थाय गुरवे परस्मै तेजसे नमः । यस्य नांगीकृतस्नेहदशाहानिः कदाचन" अशी गुरूची स्तुति आहे. विजयनगरचें राज्य पूर्वपश्चिम समुद्रापर्यंत वाढल्याच्या आनंदोत्सवप्रसंगीं हा शिलालेख लिहिला गेला, त्यावरून त्या राज्याच्या विस्ताराचें बरेंच श्रेय विद्यातीर्थाला होतें हें उघड आहे. विद्यातीर्थांचे निर्याणानंतर त्यांच्या मूर्तीची स्थापना श्रृंगेरी मठांत विद्यारण्यांनीं केली, मंदिर बांधलें, व पूजेच्या खर्चाकरितां वेळोवेळीं देणग्या देण्यांत आल्या, अशाप्रकारचा एक शिलालेख इ. स. १३९२ सालचा राईस साहेबांनीं छापला आहे. विद्याशंकराचे पश्चात् त्यांना देवतेची उपमा देण्यांत येऊं लागली. शके १५७४ च्या एका ताम्रशासनांत "विद्याशंकरदेवस्य शारदायाश्च पूजने" अशी प्रशस्ती आहे,* व खुद्द विद्यारण्य आपल्या गुरूला वंदन करतांना अनेक ठिकाणीं "विद्यातीर्थमहेश्वरं" म्हणजे महेश्वररूपी असाच उल्लेख करतात. तात्पर्य, विद्यातीर्थांची आद्य शंकराचार्यांप्रमाणें ईश्वरावतार समजून सर्वत्र पूजाअर्चा होऊं लागली. हल्लीं श्रृंगेरी मठांत विद्यारण्यांनीं स्थापिलेली त्यांची मूर्ति आहे, व

* Epigraphia Carnatica, Vol. VI, p. 200

अलीकडे आद्य शंकराचार्यांची म्हणून राजा रविवर्म्यांनीं जी तसबीर काढली व जिच्या अनेक प्रतिकृति छापल्या आहेत; त्या सर्व या मूर्तीवरूनच तयार केलेल्या आहेत. आज घरोघरीं लावलेल्या शंकराचार्यांच्या तसबिरा वस्तुतः विद्यातीर्थांच्या आहेत. इतकें आद्य आचार्यांशीं या पुरुषाचें तादात्म्य होऊन गेलें.

श्रीविद्यातीर्थांना पहिले विद्याशंकर म्हणण्याचा परिपाठ आहे. कारण विद्याशंकर हें नांव पुढें साधारण झालें. शिवगंगा, कुडलगी व करवीर मठ स्थापन करणारे स्वामी दुसरे विद्याशंकर होते, व संकेश्वर मठांत तर विद्याशंकर आणि विद्यानरसिंह हीं नांवें लागोपाठ देण्याची वहिवाटच पडून गेली आहे. मात्र शृंगेरीच्या गुरुपरंपरेंत विद्याशंकर नांवाचे एकच पुरुष आढळतात, ते वरील विद्यातीर्थ होत; व त्यांचा कालही साधारणपणें निश्चित, म्हणजे चवदावे शतकाचें पहिलें अर्ध व विजयनगर राज्याचा स्थापनसमय होय. हे विद्यातीर्थ कांचीच्या कामकोटी पीठावर होते कीं नाहीं हा वादग्रस्त प्रश्न बाजूला ठेवला तरी शृंगेरीपीठाचा जीर्णोद्धार व विजयनगर राज्याची स्थापना या दोन महत्त्वाच्या गोष्टी त्यांच्या प्रेरणेनें झाल्या, हें निर्विवाद आहे. तसेंच विद्यातीर्थांचे मागून भारतीतीर्थ व तदनंतर विद्यारण्य शृंगेरी गादीवर बसले, व विजयनगर साम्राज्याच्या साहाय्यानेंच शृंगेरीचा उत्कर्ष झाला, या गोष्टीही इतिहासप्रसिद्ध आहेत. भारतीतीर्थ विशेष कर्तृत्ववान् नव्हते तरी विद्वान् होते, हें त्यांच्या "वैय्यासिकन्यायमाला' व पंचदशींतील तृप्तिदीपापासून पुढील प्रकरणें यांवरून स्पष्ट दिसतें. वैय्यासिकन्यायमालेच्या आरंभीं "प्रणम्य परमात्मानं श्रीविद्यातीर्थरूपिणं" असा विद्यातीर्थ गुरूला नमस्कार आहे. माधवाचार्यांनीं जैमिनीन्यायमालाविस्तरांत भारतीतीर्थाला ब्रह्मदेवाची उपमा दिली आहे. भारतीतीर्थ शृंगेरीचे गादीवर सन १३७९–८० सालापर्यंत होते व विद्यारण्य इ. स. १३८० पासून १३८६ पर्यंत होते, हेंही आतां निर्विवाद आहे. विद्यारण्य गादीवर बसले तेवेळीं त्यांचें वय ८५ असावें; कारण १३८० सालीं त्यांनीं देव्यपराधक्षमापनस्तोत्र केलें त्यांत "मया पंचाशीतेरधिकमपनीते तु वयसि" असा उल्लेख आहे. माधवाचार्यांनीं

संन्यासदीक्षा कधीं घेतली तें नक्की समजत नाहीं. शृंगेरीपरंपरेप्रमाणें कनिष्ठ बंधु भोगनाथाला संन्यास दिला हें पाहून माधवाचार्यांस वैषम्य वाटलें व म्हणून त्यांनीं इ. स. १३३१ सालीं श्रीविद्यातीर्थांकडून आपण दीक्षा घेतली. पण हें खरें दिसत नाहीं. कारण १३३६ सालीं व तदनंतर माधवाचार्य हक्क ऊर्फ पहिल्या हरिहर राजाचे अमात्य होते, व नव्या विजयनगर राज्याची व्यवस्था चांगली लागल्यानंतर त्यांनीं धाकटे बंधु सायणाचार्य यांजकडे अमात्यपणा देऊन संन्यास घेतला. तसेंच सायणानंतर सर्वांत कनिष्ठ भोगनाथ दुसऱ्या हरिहर राजाचा अमात्य होता. सारांश, या त्रिवर्ग बंधूंनीं हक्क, कंपन, बुक्क आणि दुसरा हरिहर अशा चार राजांची सुमारें ७० वर्षें अमात्यगिरी केली. हे तिघेही विद्वान् पंडित असून ग्रंथकर्ते व राजकारणी होते. यांची बुद्धि आणि हक्क-बुक्कांचें शौर्य यांचा उत्तम संयोग झाल्यामुळेंच विजयनगरचें साम्राज्य सर्व दक्षिण हिंदुस्थानांत पसरलें. वसिष्ठ-रामचंद्र, चाणक्य चंद्रगुप्त, रामदास-शिवाजी, अशा राज्यधुरंधर ब्राह्मणक्षत्रियांच्या जोड्या इतिहासांत बऱ्याच आहेत, पण माधवाचार्य व हरिहर हा योग अवर्णनीय होता. ब्रह्मक्षत्रियतेज एकवटलें तेव्हांच महत्कार्य घडून आलें, व त्यांचा परस्परविरोध झाला तेव्हां उभयतांचाही नाश झाला, असे भरतखंडाच्या इतिहासांत पुष्कळ दाखले आहेत. ब्राह्मण व क्षत्रिय या दोन अग्रेसर जातींची स्पर्धा पुरातन काळापासून चालत आलेली आहे. त्यांत सूर्यवंशी क्षत्रिय ब्राह्मणांना अनुकूल असत, व चंद्रवंशीराजे स्पर्धा करणारे होते असें दिसतें. * ब्राह्मणांचा पाडाव करून मोठे होऊं पाहणाऱ्या आधुनिक क्षत्रियांनीं हा इतिहास मनन करण्यासारखा आहे.

माधवचार्यांनीं पराशरस्मृतिटीकेंत आपलें कुलशील येणेंप्रमाणें दिलें आहेः—

---

*यासंबंधानें कलकत्ता हायकोर्टाचे माजी जज जास्टिस पार्जिटर यांनीं अलीकडे प्रसिद्ध केलेला Indian History from traditions हा ग्रंथ वाचण्यासारखा आहे.

**श्रीमती जननी यस्य सुकीर्तिर्मायणः पिता ।**
**सायणो भोगनाथश्च मनोबुद्धी सहोदरौ ॥**
**यस्य बौद्धायनं सूत्रं शाखा यस्य च याजुषी ।**
**भारद्वाजकुलं यस्य सर्वज्ञः स हि माधवः ॥**

यजुर्वेद, भारद्वाजगोत्र, बौद्धायनसूत्र, पिता मायण, आई श्रीमती, बंधु सायण, आणि भोगनाथ, असा परिवार होता. शिवाय सींगला नांवाची बहिण होती तिचा मुलगा लक्ष्मीधर हाही पुढें विजयनगरच्या देवरायाचा अमात्य झाला. सायणाचार्यांच्या अलंकारसुधानिधि, प्रायश्चित्तसुधानिधि, वगैरे ग्रंथांतही ' माधवभोगनाथसहोदरस्य मायणनंदनस्य सायणाचार्यस्य ' असा उल्लेख आहे. माधवाचार्यांनीं विद्यातीर्थ, भारतीतीर्थ आणि श्रीकण्ठ असे तीन गुरु मानले आहेत. त्यांपैकीं विद्यातीर्थाला " अनुभूतिप्रकाश " ग्रंथांत मुख्य गुरु म्हटलें आहे. याशिवाय शंकरानंदही त्यांचा गुरु होता असें पंचदशींतील " नमः श्रीशंकरानंदगुरुपादांबुजन्मने" या उल्लेखावरून दिसतें. शंकरानंदाचा उल्लेख विद्यारण्यकृत ग्रंथांत आहे, यावरून आश्रम घेतल्यानंतर शंकरानंदाला गुरु केला असेल. आत्मपुराण, गीतातात्पर्यबोधिनी, उपनिषद्दीपिका वगैरे ग्रंथांचा कर्ता आणि कांची पीठावर विद्यातीर्थाचे मागून बसलेला हाच शंकरानंद असावा. सायणानेंही त्याला गुरु मानलें आहे.

माधवाचार्यांचा पूर्वेतिहास एकाद्या कादंबरीसारखा अद्भुत आहे. दारिद्र्यानें गांजल्यामुळें संसारापासून विरक्त झालेला एक ब्राह्मण तुंगभद्रेच्या दक्षिण तीरावर हंपीनजीक विरूपाक्षाच्या मंदिरांत देवाची आराधना करून दोन वर्षें तपश्चर्या करीत होता. त्यावेळीं एक गवळ्याचा पोर देवाच्या अभिषेकाकरितां नित्य दूध आणून देई. पुढें देवाचा साक्षात्कार होऊन, जेथें सुवर्णवृष्टि होईल तेथें नगर स्थापावें, अशी आज्ञा झाली. वृष्टीनें मिळालेल्या द्रव्यानें गवळ्याच्या मुलाला हाताशीं घेऊन माधवाचार्यांनीं सैन्य जमा केलें; विजयनगराची स्थापना केली, व तुंगभद्रेच्या उत्तर तीरावरील अनागोंदी संस्थान मुसलमानांचे हातीं गेलें होतें तें पुन्हां

जिंकलें. गवळ्याचा मुलगा खरोखर क्षत्रिय संगम राजाचा मुलगा **हक्क** होता, व तोच पुढें विजयनगरचा पहिला राजा **हरिहर** झाला. माधवाचार्यांना या आयुष्यांत द्रव्ययोग नसल्यामुळें त्यांनीं पुढें संन्यास घेऊन आश्रमांतर केलें, व सायणाला अमात्य करून फक्त सल्लागाराचें कार्य आपण केलें. यानंतर विजयनगरचा राज्यविस्तार आणि श्रृंगेरी मठाचा धर्मविस्तार या दोहोंची विद्यारण्याच्या प्रेरणेनें जोराची प्रगति झाली, व त्यामुळें तुंगभद्रेच्या दक्षिणेला विधर्मी राज्य आणि परकी धर्म या दोहोंना मज्जाव झाला. सनातन धर्माचें शुद्ध आणि जागृत रूप हल्लीं दक्षिण प्रांतांत आढळतें, याचें मुख्य श्रेय विद्यारण्यस्वामीस दिलें पाहिजे. श्रृंगेरी मठाच्या बिरुदावलींत " कर्नाटकसिंहासनप्रतिष्ठापनाचार्य " अशी पदवी आहे, ती विद्यारण्यांमुळेंच मिळाली. तसेंच श्रृंगेरी मठाला जे अनेक अग्रहार व नेमणुका मिळाल्या त्याही यांचेच वेळीं होत. श्रृंगेरीस विद्यातीर्थांची मूर्ति स्थापून शारदेची व गुरूची पूजाअर्चा यांनीं व्यवस्थित केली. शिवाय आठ शाखामठ स्थापले अशी आख्यायिका आहे. पण विद्यातीर्थांचे वेळेपासून हे उपमठ असावेसें दिसतें. द्वारका व जगन्नाथमठाचीही यांनीं व्यवस्था केली असावी, पण त्याविषयीं ऐतिहासिक पुरावा नाहीं. कांची मठ पुढें अगदीं वेगळा झाला. तेथील बासष्टावे आचार्य चन्द्रशेखरेन्द्रसरस्वती इ. स. १७२९ त गादीवर बसले, त्यांचेवेळीं इंग्रजांच्या व हैदरखानाच्या लढाईत मठाला त्रास होऊं लागल्यामुळें स्वामींनीं देवदेवतार्चनासह त्रिचनापल्लीला स्थलांतर केलें, व तेथून तंजावरचा राजा प्रतापसिंह याच्या आमंत्रणानें तंजावरास व मग कुंभकोणास जाऊन तेथें कायम झाले. तेव्हांपासून त्याला कुंभकोण मठ असें नांव पडलें. कुंभकोण मठ व करवीर हे दोन शंकराचार्यांचे मठ मराठे घराण्यांतील राजांनीं वांचविले, ही गोष्ट महाराष्ट्रास खरोखर भूषणावह आहे. *

---

* १९१६ सालच्या ' इंडियन अंटिक्वरी ' मासिकांत म्हैसूरचे आर्किआलाजिकल सुपरिंटेंडेंट नरसिंहाचार्य यांनीं सायण-माधवासंबंधानें दोन सुंदर लेख लिहिले आहेत, त्यांत पुष्कळ नवी माहिती आहे.

विद्यारण्यानंतर शृंगेरीच्या गादीवर कांहीं विद्वान् पुरुष झाले, पण नांव घेण्यासरखा त्यांत कोणी नाहीं. पंधराव्या शतकाच्या अखेरीपासून देशांत चोहोंकडे अस्वस्थता वाढूं लागल्यामुळे धर्मकार्य नीट चालेनासे झाले. इ. स. १५६५ त तालीकोटच्या लढाईत मुसलमानांनीं विजयनगर राज्याचा नाश केला, व त्याचे लहान लहान तुकडे झाले. तुंगभद्रेच्या उत्तरेकडील प्रांत विजापूरच्या बादशहांनीं घेतला व दक्षिणेकडे छोटे जहागिरदार व पाळेगार स्वतंत्र राजे झाले. त्यांतूनच म्हैसुरचे राज्य उत्पन्न झाले. म्हैसुर राजांच्या आश्रयानें शृंगेरी मठ सुरक्षित राहिला व हैदर व टिपू या मुसलमानांनीही त्यास त्रास न देतां उलट मदतच केली. हिंदुस्थानांतील स्थायिक भिन्नधर्मी लोकही एकमेकांस कशी मदत करतात याचें हे ठळक उदाहरण आहे. शंकराचार्यांचे मठास पुढें त्रास पोंचला तो पेशव्यांचे ब्राह्मण सरदारांकडून, ही गोष्ट तर खरोखर लांछनास्पद आहे. हरिपंत फडक्यांच्या सैन्यानें द्वारकामठ सन १७७५ सालीं लुटला; कोन्हेरराव पटवर्धनाच्या सैन्यानें करवीर मठ १७७६ सालीं जाळला; परशुरामभाऊच्या सैन्यानें कुडली मठाचा १७९१ साली नाश केला; आणि रघुनाथराव कुरुंदवाडकरांच्या पेंढाऱ्यांनीं १७९१ सालीं खुद्द शृंगेरी मठ लुटला. गांवांतले शेटसावकार लुटीच्या भीतीनें मठांत आपली पुंजी नेऊन ठेवीत, म्हणून हे मठ लुटले जात असे म्हणतात. करवीर स्वामींनीं साताऱ्यास व शृंगेरी स्वामींनीं पुण्यास दाद मागितली, व उपवासही केले. सातारकरांनीं थोडीबहुत भरपाई केली, पण बारभाईच्या चक्रांत सांपडलेल्या पुण्यांत स्वामीला कोण विचारतो? नाना फडणीस, कुरुंदवाडकर, शिंदे, होळकर यांच्या परस्पर स्पर्धेनें दूषित झालेल्या वातावरणांत शृंगेरी स्वामींची बिलकूल दाद लागेना. यावेळीं दुसरे सच्चिदानन्दभारती स्वामी शृंगेरीचे गादीवर होते. ते १८१४ सालीं समाधिस्थ झाले. स्वामींच्या शापानें पेशवाई लवकरच नष्ट झाली. धर्म व नीति सोडणारांचे वर्चस्व फार दिवस टिकत नाहीं, हें तत्त्व सर्व राजकारणी पुरुषांनीं ध्यानांत ठेवले पाहिजे.

आद्य आचार्य सोडून शृंगेरीचे गादीवर ३२ पुरुष झाले. त्यांपैकीं पहिले सुरेश्वराचार्य, दुसरे संक्षेपशारीरकाचे कर्ते नित्यबोधघनाचार्य, १० वे

विद्यातीर्थ, ११ वे भारतीतीर्थ, १२ वे विद्यारण्य, व ३२वे नुकतेच १९१२ सालीं ब्रह्मीभूत झालेले श्रीसच्चिदानंद–शिवाभिनव–नृसिंहभारती, असे सहा फार विद्वान् व थोर पुरुष झाले. हल्लींचे पीठाधिकारी तिसरे श्रीचन्द्रशेखरभारती हेही होतकरू आहेत. कांची मठाची परंपरा खरी मानली तर ३८ वे धीरशंकरेन्द्रसरस्वती, ५१ वे विद्यातीर्थेंद्र, आणि ५२ वे शंकरानंद हे तीन सुप्रसिद्ध आहेत. यांपैकीं पहिले आद्य शंकराचार्यांचाच अवतार समजतात; व दुसऱ्या दोघांचा मागें उल्लेख आलाच आहे. द्वारकापरंपरेंत चित्सुखाचार्यांखेरीज कोणी नांव घेण्यासारखे नाहींत, व जगन्नाथपीठावरलि आचार्यांची मुळींच प्रसिद्धि नाहीं. इतर मठांपैकीं शंकेश्वर, कुडली, व शिवगंगा येथें शिष्यपरंपरा चालू आहेत. तेथील बहुतेक स्वामी आचारनिष्ठ व सामान्य विद्वान् झाले; पण नांव घेण्यासारखें कोणी नाहीं. नित्य पूजाअर्चा, मठाचीं सांप्रदायिक कामें, गांवजहागिरीचा कारभार, राजेरजवाड्यांशीं पत्रव्यवहार, व लोकांचे ज्ञातिविषयक व प्रायश्चित्तविषयक तकरारींचे निर्णय, यांतच या पीठाधिकाऱ्यांचा बहुतेक वेळ जातो. विशेषेंकरून शंकेश्वराप्रमाणें जेथें गृहस्थाश्रमी पीठाधिरूढ होतात, तेथें त्यांस पूर्वीचा संसारही चिटकलेला दिसतो. चालू पीठाधिकारी आसन्नमरण झाला, कीं आयत्या वेळीं कोणा वयातीत विधुराला संन्यास देऊन शिष्य करावयाचें, व त्यानें गादीनशीन झाल्याबरोबर आपला पूर्वाश्रमींचा मुलगा, भाऊ, जांवई किंवा सहाध्यायी यासच कारभारी करावयाचे, अशीच पुष्कळदां वहिवाट दिसते. विशेषेंकरून शंकेश्वर मठांत हा रिवाज इतका दृढ झाला आहे कीं, १८६० सालीं गंगाधरभट जोशी भिलवडीकर पीठारूढ झाल्यापासून शंकेश्वराची गादी भिलवडीकरांची जणुं काय हक्काचीच होऊन बसली आहे! अलीकडचे मिरजकर, वांईकर व हल्लींचे शिरोडकर यांचेवेळीं भिलवडीची वहिवाट मोडली आहे खरी; पण यांचा गादीला पाय लागेल तेव्हां खरें!

मुख्य मठाखेरीज शिवगंगा आणि शंकेश्वर हे दोनच मठ नांव घेण्यासारखें आहेत. कुडली नांवाचें तुंगा व भद्रा या नद्यांचे संगमाजवळ क्षेत्र आहे, तेथें एक मठ आहे. तो बहुधा प्रारंभीं शृंगेरी मठाचे ताब्यांत असावा, व शृंगेरीचे स्वामी तुंगभद्रा संगमावर कधींमधीं येऊन राहत

असावेत. पण विद्याशंकर नांवाचें कोणी स्वामी मठांतून हुसकले गेल्यामुळें त्यांनीं कुडलीला कायमचा वास केला व पुढे तेथें स्वतंत्र शिष्यपरंपरा चालू झाली. कांहीं वर्षांपूर्वीं कुडलींच्या शेवटच्या स्वामींनीं दोन शिष्य केले. त्यांचें वारशाविषयीं भांडण लागलें. त्यांपैकीं एकानें मृत्युपत्र करून नवा शिष्य केला. प्रकरण कोर्टांत गेले; व संन्याशाला मृत्युपत्र करतां येतें कीं नाहीं हा प्रश्न निघाला, व अखेरीस परंपरा लुप्त होऊन मठ समाप्त झाला. शिवगंगा मठ श्रृंगेरीची शाखा मानतात, पण बरेच दिवस श्रृंगेरी व शिवगंगा यांजमध्यें अधिकारासंबंधानें वाद चालला होता. शिवगंगा मठाची स्थापना इ. स. १६१५ सालीं झालीं.* श्रृंगेरीचे २४ वे स्वामी अभिनवनृसिंहभारती होते. त्यानीं शंकरभारती शिष्य केले. त्यांना म्हैसूरच्या वाडियार राजांनीं आपल्या कर्नाटक प्रांतांत शिवगगा येथें नवा मठ स्थापण्याची विनंती केली. शिवगंगा हें बंगलोरपासून ईशान्येला ३४ मैलांवर एका गोल टेंकडीवर वसलेलें गांव आहे, व त्या टेकडीवर पुष्कळ तीर्थें आहेत. शंकरभारतींनीं सन १६५६ त गंगावधूतुरु नांवाचे योग्याला म्हैसूर राजाचे विनंतीवरून दीक्षा देऊन शिवगंगा येथें नवा मठ स्थापून तेथें गादीवर बसविलें, व शंकराचार्यांची परंपरा चालू केली. गंगावधूतुरूंचें विद्याशंकर नांव होतें. ते सन १६९२ त समाधिस्थ झाले. त्यानंतर १३ स्वामी झाले. हल्लींचे १५वे स्वामी श्रीसुब्रह्मण्य—अभिनव—सच्चिदानंद भारती सन १८८६ सालापासून गादीवर आहेत. श्रृंगेरी व शिवगंगा यांजमध्यें अधिकारासंबंधानें कांहीं दिवस वाद होता. पण म्हैसूरचे दिवाण व्ही. पी माधवराव यांनीं तो मिटविला, व आतां शिवगंगा मठ शिष्यमठ ठरला. पुष्पगिरी वगैरे दुसरे कांहीं किरकोळ मठ दक्षिण प्रांतीं आहेत, पण तेही श्रृंगेरीच्या किंवा कुंभकोणच्या शाखाच असाव्यात. मलबार प्रांतांत नंबुद्री व नायर लोकांचे चार शांकरसंप्रदायी स्वामी आहेत. त्यांपैकीं त्रिचुर स्वामी मुख्य आहेत. त्यांनींही आतां श्रृंगेरीचें वर्चस्व कबूल

---

* B. Suryanarayan Row's History of Shivaganga Matt, App. p. xii.

केलें आहे; व त्यामुळें शृंगेरी स्वामींनीं नंबुद्री ब्राह्मणांस इतर पंचद्राविड ब्राह्मणांशीं व्यवहार्य ठरविले आहेत.

## अध्याय पांचवा.

## संकेश्वर मठ.

**अनेकशक्तिसंघट्टप्रकाशलहरीघनः ।**
**ध्वांतध्वंसो विजयते विद्याशंकरभारती ॥**

संकेश्वरचा शिक्का.

महाराष्ट्रांतील मुख्य मठ करवीर व संकेश्वर येथील होय. याचें मुख्य स्थान करवीर ऊर्फ दक्षिण काशी असावयास पाहिजे; व कोल्हापूर राजाच्या इच्छेनें तो स्थापन झाल्यामुळें त्याला करवीर नांव पडलें तें ठकिच झालें. पण आद्य स्वामींनीं हरिद्रा नदीचे कांठीं संकेश्वर क्षेत्र राहण्यास पसंत केल्यामुळें तेथेंही एक मठ झाला, व म्हणून या मठाला जोड–नांव मिळालें. इंग्रजी व कोल्हापुरी दोन्ही प्रांतांत या मठाचे जहागीर गांव असल्यामुळें दोन्ही ठिकाणीं देवस्थानें व कारभार आहे. कोल्हापूर संस्थानापेक्षां इंग्रजी मुलखांत अधिक स्वतंत्रता व सुरक्षितपणा वाटत असल्यामुळें अलीकडे संस्थानचें दफ्तर व स्वामींचें निवासस्थान संकेश्वरास आहे, पण पीठाचें मुख्य ठिकाण करवीर होय. "अभिनव–पंचगंगातीर–वास–कमलानिकेतन –करवीरसिंहासनाधीश्वर" या बिरुदावलींतील विशेषणावरून मुख्य सिंहासन करवीरचें हें उघड होतें. तसेंच "ऋष्यशृंगपुरवराधीश–श्रीमद्राजाधिराज–गुरुमण्डलाचार्य––श्रीमच्छंकराचार्यान्वयसंजात" या विशेषणावरून ही शृंगेरीची परंपरा आहे हेंही निर्विवाद आहे. मठाचा पूर्वेतिहासही असाच आहे. इ. स. १७७६ सालीं कुरुंदवाडकरांनीं करवीर मठ जाळला तेव्हां, व बहुधा त्याचे पूर्वीं, या मठाची मुख्य गादी करवीरास होती असें दिसतें. त्या वेळेपासून कोल्हापूरकरांचें व पेशव्यांचें वाढत चाललेलें वैमनस्य पाहून नंतर करवीर स्वामींनीं कर्नाटकांतील संकेश्वर हें अधिक सुरक्षित

निवासस्थान मुकरर केलें असावें. संकेश्वर संस्थान ब्रिटिश हद्दींत असल्यामुळें अलीकडील कोल्हापूरच्या वेदोक्त प्रकरणांतून अर्धेमुर्धे तरी बचावलें गेलें ही गोष्ट सर्वांना विश्रुतच आहे. अनियंत्रित संस्थानिकांच्या लहरीवर धर्मपीठांचें अस्तित्व अवलंबून असणें इष्ट नाहीं. इंग्रजी राज्य विधर्मी असलें तरी निश्चित कायद्यानें चालणारें आहे, व धार्मिक बाबतींत हात न घालण्याची राज्यकर्त्यांची प्रतिज्ञा आहे. संकेश्वर जहागीर इंग्रजी आणि कोल्हापूर अशी दोन प्रांतांत असल्यामुळें, इंग्रजींतील स्वातंत्र्य व संस्थानांतील पारतंत्र्य यांची सांगड फार दिवस कशी टिकावी ? कोल्हापूरच्या गादीवर करारी आणि कर्तृत्वशाली अधिपति आल्याबरोबर त्याचा जीर्ण झालेल्या शंकेश्वर मठाच्या परंपरागत व्यवस्थेस धक्का बसला व वेदोक्ताचे निमित्तानें दोन छकलें झालीं. कोल्हापूर हद्दींतील अर्धी जाहगीर महाराजांनीं आपले ताब्यांत घेतली, व इंग्रजींतील जहागीर बेळगांवच्या कलेक्टरानें जप्तींत ठेवली. मिळून हल्लीं दोन्ही मठांतले चार स्वामी आज निराधार होऊन भिक्षाधीन झाले आहेत. जगद्गुरुपीठ बुडावें अशी कोणाचीच इच्छा नाहीं; पण दुभंगलेलीं छकलें पुन्हा सांधावीं कशीं हें कोणालाही सुचत नाहीं; संकेश्वर पीठावर शेंदीडशें वर्षे नालायक पुरुषांची परंपरा चालत आल्यामुळें आणि महाराष्ट्राच्या राजकीय वावटळींत करवीर संकेश्वर मठालाही अनेक हेलकावे मिळाल्यामुळें शृंगेरीप्रमाणें या पीठाचें तेज कायम राहिलें नाहीं; व धर्मसंरक्षणाचें कार्यही घडपणें झालेलें नाहीं.* कोणाचा तरी अर्ज घेऊन कोणत्याही ज्ञातिविषयक प्रश्नाचा एकतर्फी निर्णय करणें, गुरुदक्षिणा मिळेल तसा शास्त्रार्थ देणें, खासगी वशिल्यानें बहिष्कार घालणें किंवा काढणें, वगैरे व्यावहारिक गोष्टी मठाधिकाऱ्यांकडून होऊं लागल्या. मठाच्या उत्पन्नांतून स्वामींच्या व कारभाऱ्याच्या आप्तेष्टांचा योगक्षेम चालू लागला. सन १८६० सालापासून एका भिलवडी गांवांतीलच स्वामी

---

* राजवाड्यांनीं नुकतेंच प्रसिद्ध केलेल्या “ मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें, भाग २१ वा ” यांत शंकेश्वर मठाचा व कऱ्हाड येथील गिरजे घराण्याचा पत्रव्यवहार छापला आहे तो वाचण्यासारखा आहे.

झाल्यामुळें हजारों रुपयांचें उत्पन्न सदर लहानशा खेड्यांत मुरलें असें म्हणतात. पीठाचें उत्पन्न शिवस्व; तें कोणाचेही पचनीं पडावयाचें नाहीं. पटवर्धनांना नडलें, पेशव्यांना बाधलें, व कै. कोल्हापूर महाराजांनाही त्रासदायक झालें. मग खुद्द पीठस्थ स्वामींना किंवा त्यांचे कारभाऱ्यांना तरी तें कसें पचावें ? जोंपर्यंत अदूरदृष्टि व मतलबी लोकांच्या हातांत कारभार आहे तोंपर्यंत संकेश्वर पीठाची सुव्यवस्था लागणें अशक्य आहे.

संकेश्वर पीठ श्रृंगेरीचीच परंपरा आहे ही गोष्ट सर्वसंमत आहे; पण वाद आहे तो मुख्यः परंपरा कीं शाखा याविषयीं आहे. श्रृंगेरीच्या अनेक शाखा झाल्या तशीच ही आहे असें श्रृंगेरीवाल्यांचें म्हणणें. कोणी विद्याशंकर किंवा शंकरभारती किंवा नरसिंहभारती नांवाचे स्वामी श्रृंगेरीहून निघून करवीर राजांच्या आश्रयानें राहिले, व त्यांनीं निराळा मठ स्थापन केला. ज्याप्रमाणें म्हैसूरच्या राजा वडियारनें आपल्या कर्नाटक प्रांताला निराळा मठ पाहिजे म्हणून सन १६१५ सालीं श्रीशंकरभारतीचा एक शिष्य आणून शिवगंगा मठांत बसविला, त्याचप्रमाणें करवीरच्या राजानेंही दुसरा शिष्य करवीर क्षेत्रांत पंचगंगातीरावर महाराष्ट्राकरितां नवा मठ बांधून तेथें बसविला, असें श्रृंगेरीकरांचें म्हणणें आहे. संकेश्वर पक्ष म्हणतो, अस्सल स्वामींची परंपरा आमचे येथें चालली आहे व श्रृंगेरी पीठावर पुस्तकसंन्यासी बसून मूळ परंपरा विछिन्न झाली. या दोहोंच्यामध्यें कुडली मठ आहे. या तीन मठांचा वाद अनेक वेळां उपस्थित झाला. पण तो फक्त धार्मिक अधिकाराच्या मर्यादेपुरताच होता. ग्रामण्यविषयक निर्णय आणि गुरुदक्षिणा या उत्पन्नाच्या बाबी असल्यामुळें ते अधिकार कोणी कोणत्या प्रांतांत चालवावे, तसेंच मशाली, आडवी पालखी वगैरे शंकराचार्योचे विशिष्ट मानपान कोणीं कोठें वापरावे, याविषयींचे हे तंटे होते;त्यांचा निर्णयही तेवढ्यापुरताच झाला आहे. श्रृंगेरी व कुडली यांचे मधला वाद सन १५७६ सालीं म्हैसूरचे गादीवर चौथा बेट्टद चामराज वडियार राजा होता त्यानें तोडला. व श्रृंगेरी आणि करवीर यांचे दरम्यानचा तंटा पेशव्यांनीं, सातारकरांनीं व शेवटीं कोल्हापूरच्या राजाराममहाराजांनीं तोडला. तुंगभद्रेच्या दक्षिणेस श्रृंगेरीचा अखत्यार, तुंगभद्रा व मलप्रभा या नद्यांमध्यें कुडलगी,

मलप्रभेच्या उत्तरेस करवीर पीठ, अशी अधिकारमर्यादा ठरल्यासारखी झाली आहे. पूर्वेस मोगलाईंत कोणाचा अधिकार, व नर्मदेच्या उत्तरेस कोण अधिकारी,–शृंगेरी, करवीर, कीं द्वारका–असाही अलीकडे वाद उपस्थित झाला आहे. धार्मिक बेबंदशाहीच्या हल्लींच्या काळांत वाटेल त्या स्वामींनीं हत्ती, उंट, घोडे, पालखी घेऊन वाटेल तेथें संचार करावा, व मिळेल तेथें पाद्यपूजा घ्यावी असाच बहुतेक प्रचार चालू आहे. त्यांत मठाचे एकाहून अधिक हक्कदार व कांहीं तोतया शंकराचार्य अलीकडे निर्माण झाल्यानें लोकांची फारच त्रेधा झाली आहे. सोळाव्या सतराव्या शतकांत पाहिजे त्या सरदारानें थोडेंबहुत सैन्य गोळा करून आणि वाटेल त्या प्रांतावर स्वारी करून चौथाई, सरदेशमुखी किंवा खंडणी वसूल करावी, असा प्रकार चालत असे; त्याचप्रमाणें हल्लीं वाटेल त्यानें शंकराचार्य नांव घेऊन करील त्याची पाद्यपूजा घ्यावी असें चाललें आहे. ही बेबंदशाही मोडली पाहिजे हें खरें, पण तें कोणी करावें ? इंग्रज सरकार धार्मिक बाबतींत हात घालूं इच्छित नाहीं, दिवाणी कोर्टास अधिकार नाहीं, देशी राजे पक्षाभिमानी होतात, व लोकांत एकजूट नाहीं. ज्या मठांना जहागीर नाहीं ते आपोआप नष्ट होत आहेत; पण जेथें वंशपरंपरा उत्पन्नाचा ओलावा आहे तेथें स्वार्थी लोकांची धडपड चालू आहे. ही धार्मिक आणि सार्वजनिक महत्त्वाची बाब असल्यानें लोकांनीं याचा अवश्य विचार केला पाहिजे.

पूर्वींचा शृंगेरी-संकेश्वरवाद अधिकारमर्यादेपुरताच होता; कारण ती कमाईकीची बाब होती, व त्या वादाचा निर्णयही त्या वेळच्या परिस्थितीप्रमाणें झाला. आश्रयदात्या राजांच्या हद्दीला अनुसरून बहुधा मठांच्या मर्यादा ठरविल्या असाव्यात. बाकी त्या निर्णयाला ऐतिहासिक आधार दिसत नाहीं. उत्तर हिंदुस्थान आणि महाराष्ट्र यांचे दरम्यान जशी नर्मदा, तशी महाराष्ट्र आणि द्राविड यांचे मध्यें तुंगभद्रा हद्द मानली गेली आहे. पण मलप्रभा ही मर्यादा अगदींच कृत्रिम आहे. वस्तुतः संकेश्वर मठाच्या उत्पत्तीचा ऐतिहासिक प्रश्न अधिक महत्त्वाचा आहे. त्याचा कोणींच विचार केलेला दिसत नाहीं व पुराव्याच्या अभावीं आतां तो दुर्गम झाला आहे. संकेश्वर मठ साक्षात्

पुरुषपरंपरेनें उत्पन्न झाला कीं शिष्यपरंपरेनें झाला, हाच वादाचा प्रश्न आहे. संकेश्वरवाल्यांचें म्हणणें—शृंगेर पीठावरील श्रीविद्यानरसिंहभारती यांचे शिष्य श्रीविद्याशंकरभारती—आद्य आचार्यांपासून ३४वे पुरुष—यात्रानिमित्तानें संकेश्वर येथें आले, व त्या वेळच्या कोल्हापूर राजाच्या आग्रहानें तेथेंच राहिले. शृंगेरीहून प्रथम श्रीविद्यानरसिंहभारती बदरीकेदारच्या यात्रेला गेले. काशी क्षेत्रांत शिष्यांना सहा महिने वाट पाहण्यास सांगून हिमालयांत गेले. गुरु लवकर परत न आल्यामुळें शिष्यमंडळी दक्षिणेंत परत येऊन त्यांनीं शृंगेरीस एक पुस्तकसंन्यासी शिष्य गादीवर बसविला. नरसिंहभारती कांहीं दिवसांनीं कुडलगीस परत आले तेव्हां त्यांस हें वर्तमान कळलें. त्यांनीं शृंगेरीस निरोप पाठविला. तेव्हा तिकडून उत्तर आलें कीं, तुम्हीं आश्रमविरुद्ध वर्तन केलें सबब आम्हीं येथें दुसरा पीठाधिकारी केला, तुम्हीं इकडे येऊं नये. नरसिंहभारती कुडलगीसच राहिले. तेथें त्यांनीं शंकरभारती शिष्य केला. कांहीं दिवसांनीं श्रीशंकरभारती यात्रेस निघून करवीरास आले. तेथील कृष्णराजानें त्यांस तेथेंच मठ बांधून राहाण्यास आग्रह केला. तसेंच स्वामींसही दृष्टांत झाला कीं, करवीर दक्षिणकाशी आहे तेथेंच रहावें. त्यावरून स्वामींनीं करवीरास पंचगंगातीरावर मठ स्थापिला. पण पुढें हरिद्रा नदीचे कांठीं संकेश्वरक्षेत्र जास्त रमणीय वाटल्यामुळें तेथें जाऊन राहिले. अर्थात् नरसिंहभारतीची साक्षात् शिष्यपरंपरा संकेश्वरास चालू आहे व शृंगेरीची विच्छिन्न झाली, असें संकेश्वरपक्षाचें म्हणणें आहे. ही हकीकत कधीं घडली, व यासंबंधी कांहीं ऐतिहासिक पुरावा आहे कीं ही केवळ दंतकथाच आहे, हें समजत नाहीं *राजवाडे·

---

* शशिशेखर दामोदर आठले यांनीं, "श्रीसंस्थान मठ करवीर व संकेश्वरचा इतिहास," नांवाचें शके १८८१ सालीं पुस्तक छापलें, त्यांत कऱ्हाड येथील वळवडेकर व ढवळीकर यांचे संग्रहांत मिळालल्या एका गुरुपरंपरेवरून शंकेश्वर मठाची पूर्वपीठिका त्यांनीं दिली आहे ती पुढें परिशिष्ट ख पृ. १०० येथें दिली आहे. त्यांपैकीं ३६ वे शंकरभारती,

[ पुढील पानावर चालू. ]

प्रकाशित " मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें खंड ६ वा., ( पृ. ५२३) यांत अशीच विस्तीर्ण हकीकत छापली आहे, त्यावरून ही दंतकथा बरीच जुनी असावी. तसेंच सनाचा मेळ घालणेंही बरेंच कठीण आहे. कुडलगी स्वामी व शृंगेरी स्वामी यांचा वाद सन १५७६ सालीं म्हैसूरच्या गादीवर बसलेला चौथा बेट्टद चामराज वडियर यांनीं तोडला हें खरें असेल, तर त्यावेळीं शृंगेरीच्या गादीवर पांचवे नरसिंहभारती होते, त्यांच्याशीं वाद झाला असला पाहिजे. विद्यारण्यानंतर चंद्र-शेखरभारती नरसिंहभारती, पुरुषोत्तमभारती, शंकरानंद, चंद्रशेखरभारती, नरसिंहभारती, पुरुषोत्तमभारती, रामचंद्र, नरसिंहभारती, नृसिंहभारती, नरसिंहभारती, नरसिंहभारती, व सच्चिदानंदभारती, अशी शृंगेरीची परंपरा आहे; व त्यानंतर सच्चिदानंद व नरसिंह हींच दोन नांवें आलटून पालटून चाललेलीं दिसतात. हिमालयांतून परत आल्यावर कुडलगीस राहिलेले स्वामी नरसिंहभारती कोणते, पांचवे कीं सहावे, हें निश्चित होत नाहीं व त्यांचा शिष्य शंकरभारती किंवा विद्याशंकर याचें नांव शृंगेरीपरंपरेंत मुळींच नाहीं. शिवगंगा पीठावर नरसिंहभारतींनीं स्थापलेला शंकरभारती निराळा असला पाहिजे, कारण ती स्थापना सन १६१५ म्हणजे बेट्टद वडियारच्या नंतर ४० वर्षांनीं राजाधिराज वडियारचे कारकीर्दींत झाली. करवीरास स्वामीला ठेवून घेणाऱ्या राजाचें नांव सोमवंशी कृष्णराज असें दिलें आहे, व संकेश्वरदप्तरांत तसा दाखला

---

[ ७३ पृष्ठावरून. ]

संकेश्वर पीठाचे प्रतिष्ठापक होते. शृंगेरीची परंपरा निराळी आहे. त्यांपैकीं कांहीं नांवें शृंगेरी यादींत सांपडतात. पण मागें पुढें झालीं आहेत. सच्चिदानंदास "स्वयजात" ( स्वतःच पीठारूढ झालेले ) असें विशेषण दिलें आहे. शृंगेरीपरंपरेंत ६ व्या नरसिंहभारतींनंतर इ. स. १६६२–३ सालीं सच्चिदानंद भारती आहेत तेच हे असल्यास वरील दंतकथेशीं मेळ बसतो; पण सन जुळत नाहीं.

सांपडतो म्हणतात; पण हा कृष्णराज कोण तें समजत नाहीं. देवगडचें यादव घराणें बुडाल्यापासून शिवाजीचा उदय होईपर्यंत बहुतेक महाराष्ट्र लहान सहान पाळेगारांच्या ताब्यांत होता. बेळगांवचा वीरकर्णराय व विशाळगडचा शंकरराय हे असेच छोटे पण कमी अधिक प्रबळ राजे होते. सन १४६९ त विशाळगडचा शंकरराय व विजापूरचा सरदार महंमद गवान यांची मोठी लढाई होऊन गोव्यापर्यंत सर्व कोकणपट्टी विजापुरचे ताब्यांत गेली. पुढें सन १४९५ चे सुमारास शेवटचा बहामनी सुलतान महमूद शहा यानें बहादुरशहाचें बंड मोडण्याकरितां संकेश्वरास वेढा देऊन तें हस्तगत केलें, त्या वेळीं तेथें मठ नसावा. असता तर तेथें वेढा पडून लढाई झाली नसती. पुढें बहामनी राज्याचे तुकडे पडून त्यांचीं आपसांत भांडणें सुरू झाल्यामुळें बरेच मराठे किल्लेदार व पाळेगार आपल्या मुलुखांत स्वतंत्र झाले. त्यांपैकींच विशाळगडास किंवा करविरास एकादा कृष्णराय असेल; कदाचित् तो सोमवंशी यादवांपैकींही असेल. ऐतिहासिक पुरावा मिळाल्यावांचून कांहीं निश्चय करतां येत नाहीं; परंतु करवीर मठ सोळावे शतकाचे मध्यकाळीं स्थापन झाला, असें तूर्त मानण्यास हरकत नाहीं. नरसिंहभारतीची साक्षात् शिष्यपरंपरा संकेश्वरास चालली, व शृंगेरीस पुस्तकसंन्यासी झाला ही दंतकथा निराधार असावी; कारण नरसिंह- भारतीचे पुष्कळ शिष्य होते, किंवा त्यांना करतां आले असते. त्यांपैकीं एक शृंगेरीस व एक कुडलगीस राहिला असेल. त्यावेळच्या धामधुमीच्या काळीं हिमालयाची कठिण यात्रा करण्यास निघण्याचे अगोदरच बहुधा नरसिंहभारतींनीं शृंगेरीपीठावर शिष्याची योजना केली असली पाहिजे. त्या वेळीं सामान्य लोक सुद्धां घरादाराची व्यवस्था करून नंतर काशी- यात्रेला निघत; मग पीठाधिकारी पुढील शिष्याची तजवीज केल्याखेरीज महायात्रेला जातील हें संभवत नाहीं. शिवाय पीठस्थ स्वामींनीं एकच शिष्य केला पाहिजे दुसरा करूं नये, हा नियमही पूर्वीं अस्तित्वांत अस- ल्याचें दिसत नाहीं. हें मठाधिकाऱ्यांनीं आपलें महत्त्व वाढविण्याकरितां शोधून काढलेलें अलीकडील थोतांड दिसतें. आद्य शंकराचार्यांचे मुख्य चार व दुसरे अनेक शिष्य होते हें प्रसिद्ध आहे. त्याचप्रमाणें विद्यातीर्थांचे

आठ शिष्य होते. जोंपर्यंत गादीवर विद्वान् पुरुष होते तोंपर्यंत ते अनेक शिष्य पढवीत व अनेकांना संन्यासदीक्षाही देत असले पाहिजेत. सिंहिणीला एकच पोर होतें, तसा आश्रमगुरूनें एकच शिष्य केला पाहिजे, दुसरा करूं नये, या नियमाला कोठेंही शास्त्राधार नाहीं. अलीकडे विद्याविहीन पुरुष गादीवर बसल्यानें शिष्य पढविण्याची त्यांच्यांत ताकद नसते, तेव्हां अंतकाळीं कोणीतरी एकादा मुंडून गादीवर बसविण्याची वहिवाट पडल्यापासून बहुधा हा नियम प्रचारांत आला असावा. वस्तुतः पीठस्थ आचार्यांचे अनेक शिष्य व त्यांपैकीं कांहीं संन्यासीही असावयाचे. त्यांपैकीं वयानें, विद्येनें, किंवा गुरुभक्तीनें श्रेष्ठ असेल त्यानेंच पुढें गादीवर बसावयाचें, ही खरी प्राचीन वहिवाट असली पाहिजे. हल्लीं संकेश्वर–करवीर-हक्कदारांमध्यें बेळगांव कोर्टांत जो दावा चालला आहे त्यामध्यें हाच मुख्य प्रश्न आहे. हा दावा म्हणजे आंधळ्या कोशिंबिरीचा खेळ आहे. दोन्ही पक्ष मुख्य प्रश्न विसरून भलत्याच गोष्टीविषयीं भांडत आहेत. कारण दोघांसही स्वतः परंपरा पुढें चालू ठेवण्याकरितां वरील काल्पनिक नियम पाहिजे आहे. माजी गुरुस्वामींनीं ब्रह्मनाळकरबोवांस शिष्य करून सर्वाधिकारी म्हणजे आपला कुलमुखत्यार केलें. पुढें त्यांनीं गुरुद्रोह केला, म्हणून त्यांची मुखत्यारी काढून घेऊन ती दुसरा शिष्य करून त्यास दिली. याप्रमाणें एकामागून एक दहा शिष्य व दहा कुलमुखत्यार करण्यास सामान्य पुरुषाप्रमाणें कोणत्याही स्वामीस अधिकार असला पाहिजे. जोंपर्यंत स्वामी जिवंत व पीठावर आहे तोंपर्यंत वाटेल तितके शिष्य करण्यास त्यांना अधिकार आहे. सर्वाधिकारी करणें म्हणजे आपण पदच्युत होणें अशीही एक कोटी निघाली आहे, पण तो दाव्यांतील एक प्रश्न असल्यानें त्याचा येथें विचार करणें इष्ट नाहीं. शिष्याला योगपट्ट देतांना गुरु त्यास अभिवंदन करतो, या विधीवर सर्व इमारत रचिली आहे. वस्तुतः हा सन्यासदीक्षेचा सामान्य विधि आहे. अंतकाळीं घाईघाईनें कोणी तरी शिष्य करून गादीवर बसविण्याची वहिवाट मोडणें फार इष्ट आहे; कारण तेणेंकरून आयत्या वेळीं धरून आणलेले नालायक पुरुष पीठाधिकारी होतात. रोमच्या पोपाप्रमाणें, अनेक हयात शिष्यांपैकीं सर्वांत श्रेष्ठ व लायक शिष्य निवडण्याची कांहीं

योजना मुक्रर झाल्याशिवाय हल्लींची शंकराचार्यांचे पीठांची अव्यवस्था दूर होणार नाहीं. हल्लीं दोनच प्रकार माहीत आहेत. एक पीठस्थ आचार्यांनीं कोणासतरी संन्यासदीक्षा देऊन शिष्य करावयाचा, किंवा राजानें नेमावयाचा. संकेश्वरचे वादांत पहिला प्रकार आहे. द्वारकामठाचे दाव्यांत दुसरा प्रकार वादविषय झाला आहे. एकादा पीठाधिकारी शिष्य न करतां अवचित गत झाला तर वारस कोण ? खाजगी इस्टेट कुटुंबांतील वारसाकडे जाते; पण स्वामीला कुटुंब नसतें व इस्टेटही नसते. शिवाय मठाची मिळकत स्वामीची खाजगत नसून एकप्रकारचा धर्मादाय ट्रस्ट आहे, व स्वामी केवळ ट्रस्टी मानले पाहिजेत. कोणीही धर्मादाय-ट्रस्टी अधिकारी नालायक किंवा मृत झाल्यास त्याचे जागीं दुसरा ट्रस्टी नेमण्याचा अधिकार हल्लींच्या कायद्यानें राजास व डिस्ट्रिक्ट कोर्टास दिलेला आहे. या दृष्टीनें पाहिलें म्हणजे हल्लींचे मठशिष्यांतील परस्पर हक्काचे दावे पोकळ आहेत असेंच म्हणावें लागेल. सि. प्रो. च्या ९२ कलमाप्रमाणें वाटेल त्या मनुष्यास कलेक्टरचे परवानगीनें डिस्ट्रिक्ट कोर्टांत दावा करून संस्थानमिळकतीचे ट्रस्टी नेमून घेतां येतील. “ वानप्रस्थयतिब्रह्मचारिणां रिक्थभागिनः ” ही याज्ञवल्क्यस्मृति स्वामीच्या दण्डकौपिनादि खाजगी मिळकतीपुरती आहे. कोणत्याही मठाचा अधिकारी हयातीपुरता हक्कदार असतो. पुढील वारस त्याला ठरवितां येत नाहीं, हें तत्त्व आतां हायकोर्टानें मान्य केलें आहे. × मठाचा वारसा प्रत्येक मठाच्या रूढीप्रमाणें चालतो.*

या विषयाचा समारोप करण्यापूर्वी मठाम्नायसेतु म्हणून एक श्लोकबद्ध ग्रंथ प्रसिद्ध आहे, त्याचा येथें थोडा विचार करणें अप्रस्तुत होणार

---

×Basudeo Roy vs. Mahant Jugulkishor 20 Bom. L. Rep. p. 1088.

* Ram Prasad Das vs. Anant Das I. L. R. 43 Cal. 707.

नांहीं. हा सेतु एक ग्रंथ म्हणण्यापेक्षां प्रत्येक मठांत थोड्याबहुत पाठभेदानें निरनिराळे मठाम्नाय चालू आहेत त्यांचें संमेलन म्हटलें तरी चालेल. प्रत्येक मठाची अंतर्बाह्य व्यवस्था मठाम्नायाप्रमाणें चालते अशी सर्वांची समजूत आहे, व मठाची व्यवस्था नियमबद्ध करण्याकारितां आद्य शंकराचार्यांनीं हा कायदा करून ठेवला आहे असें म्हणतात. परंतु खरा मठाम्नाय कोणता, कोणी केव्हां तयार केला, आणि त्याची शुद्ध व विश्वसनीय प्रत कोणती, हें कोणालाहि सांगतां येत नाहीं. कै. भाऊशास्त्री लेले यांनीं 'धर्म' मासिकाच्या चौथ्या पुस्तकांत (पृ. ६२२) द्वारका मठांत मिळालेला एक विस्तृत ६३ श्लोकांचा मठाम्नायसेतु छापला आहे,* शिवाय मठाम्नायस्तोत्र म्हणून एक लहान बावीस श्लोकांचें स्तोत्र ब्रह्मीभूत शृंगेरी स्वामींनीं छापलें, तेंही थोडया फरकानें मठाम्नायच आहे. शंकेश्वर वगैरे इतर मठांत हा मठाम्नाय उपलब्ध आहे कीं नाहीं याचा वानवाच आहे. मठाम्नायाचें स्तोत्र नित्यपाठाकरितां संक्षिप्त केलें असून सेतु त्याचा विस्तार दिसतो. पण दोहोंपैकीं मूळ कोणतें व तें कोणी केलें, हें सांगणें कठीण आहे. सेतूचे शेवटीं "श्रीमत्परमहंसपरिव्राजकाचार्यश्रीमच्छंकरभगवत्कृतौ मठाम्नायाश्चत्वारः समाप्ताः" असा शेष आहे. त्यावरून चार मठाचें चार वेगळे मठाम्नाय व त्यांचें एकत्र संकलन हा सेतु, असा अर्थ निघतो. म्हणजे प्रत्येक मठाचीं वैशिष्ट्यबोधक चिन्हें हा त्याचा आम्नाय; व तो अर्थात् प्रत्येक मठाचा वेगळा. दरएक मठाचे नित्यपाठाचे स्तोत्रांत फक्त त्या मठाच्या आम्नायाचाच अंतर्भाव असल्यामुळें हीं स्तोत्रें अर्थात् लहान व प्रत्येक मठाचीं वेगळीं असलीं पाहिजेत. या स्तोत्रांत आद्य आचार्यांची स्तुति असल्यामुळें तीं मागाहून कोणीं तरी शिष्यानें केलीं असावीं हें उघड आहे. चिद्विलासकृत दिग्विजयांत हीं स्तोत्रें आहेत असें म्हणतात; पण तो ग्रन्थ अजून प्रसिद्ध झाला नाहीं. बहुधा हें मठाम्नाय स्तोत्र व सेतु विद्यारण्याचे वेळीं सर्व मठांची व शाखांची कायमची व्यवस्था झाली त्यावेळीं तयार झाले असावेत; व कदाचित् ते विद्यारण्यांच्या आज्ञेनें

---

* पुढें परिशिष्ट क. पृ. ८३ पहा.

तयार झाले असतील. चार दिशांना चार मठ, त्यांची परंपरा, त्यांचें वैशिष्टय व त्यांची रचना, हीं जर विद्यारण्याचे वेळीं कायम झालीं असतील, तर मठाम्नायासारखी नियमावली जरूरच होती; व तीहि त्याच वेळीं प्रचारांत आली असली पाहिजे. हल्लींचा ग्रंथ अर्वाचीन असला तरी त्यांतील माहिती प्राचीन असण्याचा संभव आहे. पण या बाबतींत निर्विवाद ऐतिहासिक पुरावा मिळाल्याखेरीज कांहींच सांगतां येत नाहीं.

सदर मठाम्नायांत चार मठांचें वैशिष्टयकथन आहे तें येणेंप्रमाणें:—

१ **द्वारका**:—पश्चिम दिशा, शारदामठ, कीटवार संप्रदाय, तीर्थ व आश्रम हीं उपपदें, द्वारका क्षेत्र, देव सिद्धेश्वर, भद्रकाली देवी, विश्वरूप आचार्य, गोमतीतीर्थ, व आचार्य सामवेदी आणि देश सिंधु, सौवीर, सौराष्ट्र, आणि महाराष्ट्र,

२ **जगन्नाथपुरी**:—पूर्व दिशा, गोवर्धन मठ, भोगवार संप्रदाय, वन अरण्य हीं उपपदें, पुरुषोत्तम क्षेत्र, देव जगन्नाथ, विमला देवी, पद्मपाद आचार्य, तीर्थ महासागर, ऋग्वेद, आणि देश अंग, वंग, कालिंग' मगध, उत्कल, बर्बर.

३ **बदरीनारायण**:—उत्तर दिशा, ज्योतिर्मठ, आनन्दवार संप्रदाय, गिरी, पर्वत आणि सागर हीं उपपदें, बदरिकाश्रम क्षेत्र, व तोच देव, पुन्नगिरी देवी, तोटक आचार्य, अलकनन्दातीर्थ, अथर्वणवेद, आणि देश कुरु, काश्मीर, काम्बोज, आणि पांचाल.

४ **शृंगेरी**:—दक्षिण दिशा, शृंगेरीमठ, भूरिवार संप्रदाय, सरस्वती, भारती, व पुरी हीं उपपदें, रामेश्वर क्षेत्र, आदिवाराह देव, कामाक्षी देवी, पृथ्वीधर आचार्य, तुंगभद्रा तीर्थ, यजुर्वेद, आणि देश आन्ध्र, द्रविड, कर्नाटक आणि केरल.*

---

* यासंबंधीं सविस्तर जंत्री परिशिष्ट क. पृ. ९० पहा.

याप्रमाणें चार मठांचीं नांवें, स्वरूप, देवता, वेद आणि अमलांतील प्रांत खुलासेवार देऊन हा ' मठाम्नाय ' म्हणतो " मर्यादैषा सुविज्ञेया चतुर्मठविधायिनी " आणि " परस्परविभागे तु प्रवेशो न कदाचन । परस्परेण कर्तव्य आचार्येण व्यवस्थितः ॥ " अशी सर्व मठवाल्यांस एकमेकांच्या प्रांतांत अतिक्रमण न करण्याची ताकीद दिली आहे. अर्थात् प्रांतांचे अनेक वेळां तंटे झाल्यानंतर ही विभागणी झाली व तेव्हांच हा ग्रन्थ तयार झाला असावा. मरणकालीं एकच शिष्य करण्याच्या अलीकडील वहिवाटीलाही या सेतूंत आधार आहे. ' एक एवाभिषेच्यः स्यादन्ते लक्षणसंमतः । तत्तत्पीठक्रमेणैव न बहुर्युज्यते क्वचित् ॥' हा तो आधार. हा सेतु अंतर्गत मजकुरावरून अर्वाचीन दिसतो. मठाम्नायस्तोत्रांत कांहीं मजकूर व नांवें निराळीं आहेत, व तीं प्राचीन असावींत. विशेषेंकरून प्रत्येक पीठाचें विशिष्ट महावाक्य दिलें आहे. द्वारका– ' स आत्मा तत्त्वमसि श्वेतकेतो ' ( सामवेदी छांदोग्य ८-७ ), गोवर्धन– ' प्रज्ञानं ब्रह्म ' ( ऋग्वेदी ऐतरेय ९-३ ), ज्योति- मठ– ' अयमात्मा ब्रह्म ' ( अथर्ववेदी मांडुक्य २ ), शृंगेरी– ' अहं ब्रह्मास्मि ' ( यजुर्वेदी बृहदारण्यक १-४-१० ). अशीं हीं महावाक्यें म्हणजे दर एक पीठाचे Motto अथवा आदर्शवाक्यें आहेत. वरील वर्णनांतील पुष्कळ शब्द दुर्बोध आहेत, व त्यांचें पूर्ण ज्ञान करून देण्याला एकाद्या मठसांप्रदायिकानें किंवा आचार्योनीं स्वतंत्र निबंधच लिहिला पाहिजे. वरील वर्णनांतील प्रत्येक पद सहेतुक आणि कांहीं ऐतिहासिक गोष्टींचे निदर्शक असलें पाहिजे. व या मठाम्नायांची अधिक चिकित्सा केल्यास पुष्कळ ऐतिहासिक माहिती मिळण्याचा संभव आहे.

श्रीशंकराचार्यांसंबंधानें हें त्रोकट विवेचन केलें, तें वाचकांची जिज्ञासा तृप्त करण्याकरितां नसून अधिक उद्दीप्त करण्याकरितां केलें आहे. पाश्चात्य संशोधक प्राचीन वैदिक वाङ्मयाची चिकित्सा करीत बसतात, व हिंदुस्थानांतील अर्वाचीन विद्वान् पाठशाळांत शिकविल्या जाणाऱ्या काव्यनाटकांत गढून गेलेले दिसतात; जुने शास्त्री न्यायव्याकरणाच्या पलीकडे जात नाहींत,

व हरिदास पुराणिक शाब्दिक वेदांतानेंच श्रोत्यांना रिझवितात. धार्मिक व तत्त्वविषय ग्रन्थांचें मार्मिक व ऐतिहासिक बुद्धीनें अध्ययन करण्याची प्रवृत्ति अजून दिसत नाहीं. भरतखंडांतील प्राचीन वैदिक काल, व सांप्रतचा यांत्रिक काल यांना जोडणारे मध्ययुगीन तत्त्वविचार पूर्णपणें अवगत झाल्यावांचून भारतीय प्रगति कशी झाली हें समजणार नाहीं. जैन बौद्धांचा हल्ला व आचार्यकृत सनातन धर्माचें पुनरुज्जीवन या भारतीय संस्कृतीच्या इतिहासांत दोन मोठ्या क्रान्त्या झाल्या, त्यांचें पूर्ण ज्ञान अलीकडील प्रत्येक सुशिक्षित हिंदी माणसानें करून घेतलें पाहिजे. विशेषेंकरून धर्मपुनरुज्जीवनाचें निशाण पहिल्या प्रथम उभारणाऱ्या शंकराचार्याला आधुनिक नवयुगाचे आद्य आचार्य म्हणून सर्वांनीं मान दिला पाहिजे. आजपर्यंत इंग्रजींत व मराठींत शंकराचार्यांचीं त्रोटक चरित्रें लिहिलीं; तीं बहुतेक माधवकृत व दुसऱ्या शंकरादिग्विजयावरून लिहिण्यांत आलीं. पण हीं भक्तांनीं लिहिलेलीं महात्म्यें आहेत व त्यांतील पुष्कळ दंतकथा आतां निराधार ठरत आहेत. सांप्रदायिक ग्रंथ, विरोधी ग्रंथ, ताम्रपट, शिलालेख, शासनपत्रें, परकीयांचे लेख वगैरे सर्व प्रकारच्या साधनांचा विचार करुन शंकराचार्यासारख्या महात्म्यांचें चरित्र लिहिलें पाहिजे. वस्तुतः आचार्यांच्या नांवावर ऐश्वर्य भोगणाऱ्या मठाधिपतींनीं या कामीं पुढाकार घेतला पाहिजे; किंवा निदान साहाय्य तरी केलें पाहिजे. हत्ती घोडे मिरविण्यांत व शेपन्नास आळशी लोक पोसण्यांत पूजाद्रव्य खर्चण्यापेक्षां तें आद्य जगद्‌गुरूच्या उद्धाराप्रीत्यर्थ खर्च केलें, तर केवढें मोठें कार्य होईल ? पण या गोष्टी समजणारे पीठाधिकारी व त्यांचे कारभारी निपजल्याशिवाय त्यांचेकडून हें कार्य होणें कठीण आहे. लाख रुपये मिळवून नवा मठ बांधण्यापेक्षां एकाद्या धर्मशाळेंत राहून हें कार्य करणें श्रेयस्कर नाहीं काय ? हल्लीं महाराष्ट्रांत नवी संस्था व नवा फंड काढून, त्या निमित्तानें स्वतःस राहण्यासाठीं घर बांधावयाचें ही सार्वत्रिक प्रवृत्ति दिसून येते. पण या संस्था व घरें शेवटीं मागेंच राहातात. "कर्मानुगो गच्छति जीव एकः" असा एकटा जीव नुसतें स्वकृत कर्म बरोबर घेऊन जातो. "करतलभिक्षा तरुतलवासः" हेंच खरोखर संसारविरक्त पुरुषाचें ब्रीद असलें पाहिजे. मग तो संन्यासी असो कीं देश-

कार्याला वाहिलेला पुढारी असो. आद्य शंकराचार्यांनीं स्वतःकरितां घर किंवा मठ बांधल्याचा दाखला नाहीं; पण त्यांच्या नांवाने आज गांवोगांव मठ झाले आहेत. चुन्यामातीचीं घरें पडून जातात, पण लोकांच्या हृदयांत निरंतर वास करणारे महात्मे पुरुष खरोखर चिरंजीव होत. महावीर, बुद्ध शंकराचार्य, रामानुज यांनीं वाडे बांधले नाहीत; पण त्यांचे नांव आज प्रत्येकाचे तोंडांतून निघत आहे. धर्मार्जुनांचे राज्य गेलें, व श्रीकृष्णाची द्वारकाही समुद्रात बुडाली; पण त्यांचीं नावे व गुणवर्णने आज सर्वतोमुखीं आहेत. सर्व देश त्यांचे घर, व राष्ट्र हेच त्यांचे वारस. राष्ट्राशीं इतकें तादात्म्य पावले तेच खरे निःस्वार्थी पुरुष झाले, व तेच महात्मे होत.



# परिशिष्टे

## परिशिष्ट— क

### श्रीमठाम्नायसेतु.

प्रथम· पश्चिमाम्नायः शारदामठ उच्यते ।
कीटवारः संप्रदायस्तस्य तीर्थाश्रमौ शुभौ ॥ १ ॥

द्वारकाख्यं हि क्षेत्रं स्याद्देव· सिद्धेश्वरः स्मृतः ।
भद्रकाली तु देवी स्यादाचार्यो विश्वरूपकः ॥ २ ॥

गोमतीतर्थिममलं ब्रह्मचारिस्वरूपकः ।
सामवेदस्य वक्ता च तत्र धर्मं समाचरेत् ॥ ३ ॥

पूर्वाम्नायो द्वितीयः स्याद्गोवर्धनमठः स्मृतः ।
भोगवारः संप्रदायो वनारण्ये पदे स्मृते ॥ ४ ॥

पुरुषोत्तमं तु क्षेत्रं स्याज्जगन्नाथोऽस्य देवता ।
विमलाख्या हि देवी स्यादाचार्यः पद्मपादकः ॥ ५ ॥

तीर्थं महोदधिःप्रोक्तं ब्रह्मचारी प्रकाशकः ।
ऋगाव्हयस्तस्य वेदस्तत्र धर्मं समाचरेत् ॥ ६ ॥

तृतीयस्तूत्तराम्नायो ज्योतिष्मान्हि मठो भवेत् ।
आनन्दवारो विज्ञेयः संप्रदायोऽस्य सिद्धकृत् ॥ ७ ॥

पदानि तस्य ख्यातानि गिरिपर्वतसागराः ।
बदरीशाश्रमः क्षेत्रं देवता च स एव हि ॥ ८ ॥

देवी पुन्नागिरी ज्ञेया आचार्यस्त्रोटकः स्मृतः ।
तीर्थं त्वलकनन्दाख्यं नन्दाख्यो ब्रह्मचार्यभूत् ॥ ९ ॥

तस्य वेदोह्यथर्वाख्यस्तत्र धर्मं समाचरेत् ।
चतुर्थो दक्षिणाम्नायः श्रृंगेरी तु मठो भवेत् ॥ १० ॥

भूरिवाराव्हयस्तस्य संप्रदायः सुशोभनः ।
पदानि त्रीणि ख्यातानि सरस्वती भारती पुरी ॥ ११ ॥

रामेश्वराव्हयं क्षेत्रमादिवाराहदेवता ।
कामाक्षी तस्य देवी स्यात्सर्वकामफलप्रदा ॥ १२ ॥
पृथ्वीधराव्ह आचार्य स्तुङ्गभद्रेति तीर्थकम् ।
चैतन्याख्यो ब्रह्मचारी यजुर्वेदस्य पाठकः ॥ १३ ॥
उक्ताश्चत्वार आम्नाया यतीनां हि पृथक् पृथक् ।
ते सर्वे चतुराचार्यनियोगेन यथाविधि॥ १४ ॥
प्रयोक्तव्याः स्वधर्मेषु शासनीयास्ततोऽन्यथा ।
कुर्वन्त एव सततमटनं धरणीतले ॥ १५ ॥
विरुद्धाचारसंप्राप्तावाचार्याणां समाज्ञया ।
लोकान्संशीलयत्वेव स्वधर्माप्रतिरोधत ॥ १६ ॥
सिन्धुसौवीरसौराष्ट्रमहाराष्ट्रास्तथान्तराः ।
देशाः पश्चिमदिक्स्था ये शारदापीठसात्कृताः ॥ १७ ॥
अंगवंगकलिंगाश्च मगधोत्कलबर्बरा ।
गोवर्धनमठाधीना देशाः प्राचीव्यवस्थिताः ॥ १८ ॥
आन्ध्रद्रविडकर्णाटकेरलादिप्रभेदतः ।
शृंगेर्यधीना देशास्ते ह्यवाचीदिगवस्थिताः ॥ १९ ॥
कुरुकाश्मीरकाम्बोजपांचालादिविभागतः ।
ज्योतिर्मठवशा देशा उदीचीदिगवस्थिताः ॥ २० ॥
मर्यादैषा सुविज्ञेया चतुर्मठविधायिनी ।
तामेतां समुपाश्रित्य आचार्याः संप्रतिष्ठिताः ॥ २१ ॥
स्वस्य रह्यप्रतिष्ठित्यै संचारः सुविधयिताम् ।
मठे तु नियतं वास आचार्यस्य न युज्यते ॥ २२ ॥
वर्णाश्रमसदाचारा अस्माभिर्ये प्रसाधिताः ।
रक्षणीयास्त एवैते स्वे स्वे भागे यथाविधि ॥ २३ ॥
यतो विनष्टिर्महती धर्मस्यात्र प्रजायते ।
मान्द्यं संत्याज्यमेवात्र दाक्ष्यमेव समाश्रयेत् ॥ २४ ॥

परस्पारविभागे तु प्रवेशो न कदाचन ।
परस्परेण कर्तव्य आचार्येण व्यवस्थितः ॥ २५ ॥
मर्यादाया विनाशेन लुप्येरन्नियमाः शुभाः ।
कलहागार संपत्तिरतस्तां परिवर्जयेत् ॥ २६ ॥
परीब्राडार्यमर्यादो मामकीनां यथाविधि ।
चतुःपीठाधिमां सत्तां प्रयुञ्ज्याच्च पृथक् पृथक् ॥२७॥
शुचिर्जितेन्द्रियो वेदवेदांगादिविशारदः ।
योगज्ञः सर्वतन्त्राणामस्मदास्थानमाप्नुयात् ॥ २८ ॥
उक्तलक्षणसंपन्नः स्याच्चेन्मत्पीठभाग्भवेत् ।
अन्यथाऽऽरूढ पीठोऽपि निग्रहार्हो मनीषिणाम्॥ २९ ॥
एक एवाभिषेच्यः स्यादन्ते लक्षणसंमतः ।
तत्तत्पीठक्रमेणैव न बहुर्युज्यते क्वचित् ॥ ३० ॥
अस्मत्पीठे समारूढः परिव्राडुक्तलक्षणः ।
अहमेवेति विज्ञेयो यस्य देव इति श्रुतेः ॥ ३१ ॥
सुधन्वनः समौत्सुक्यनिर्वृत्त्यै धर्महेतवे ।
देवराजोपचारांश्च यथावदनुपालयेत् ॥ ३२ ॥
केवलं धर्ममुद्दिश्य विभवो बाह्यचेतसाम् ।
विहितश्चोपकाराय पद्मपत्रनयं व्रजेत् ॥ ३३ ॥
सुधन्वा हि महाराजस्तदन्ये च नरेश्वराः ।
धर्मपारम्परीमेतां पालयन्तु निरन्तरम् ॥ ३४ ॥
ब्रह्मक्षत्रकुले भूत्वा भारतीपीठवञ्चकः ।
परार्थाच्चयवते चान्ते पैशाचीं योनिमाप्नुयात् ॥ ३५ ॥
शारदामठ आचार्य आश्रमाख्यो बहूत्तमः ।
गोवर्धनस्य विज्ञेयोऽरण्यनामा विचक्षणः ॥ ३६ ॥
ज्योतिर्मठस्य सततं पर्वताख्यो निगद्यते ।
शृंगवेरमठे नित्यं भारती बहुभावनः ॥ ३७ ॥

निर्णयोऽसौ सुविज्ञेयश्चतुष्पीठाधिकारिणा ।
नात्र व्यत्यय आदेयः कदाचिदपि शीलिना ॥ ३८ ॥
मठाश्चत्वार आचार्याश्चत्वारश्च धुरन्धराः ।
संप्रदायाश्च चत्वार एषा धर्मव्यवस्थितिः ॥ ३९ ॥
चातुर्वर्ण्यं यथायोगं वाङ्मनःकायकर्मभिः ।
गुरोः पीठं समर्चेत विभागानुक्रमेण वै ॥ ४० ॥
धरामालम्ब्य राजानः प्रजाभ्यः करभागिनः ।
कृताधिकारा आचार्या धर्मतस्तद्वदेव हि ॥ ४१ ॥
धर्मो मूलं मनुष्याणां स चाचार्यावलम्बनः ।
तस्मादाचार्यसुमणेः शासनं सर्वतोधिकम् ॥ ४२ ॥
आचार्याक्षिप्तदण्डास्तु कृत्वा पापानि मानवाः ।
निर्मलाः स्वर्गमायान्ति सन्तः सुकृतिनो यथा ॥ ४३ ॥
तानाचार्योपदेशो दण्डश्च पालयतेः... ? ।
तस्माद्राजाचार्यावनिन्द्यावनिन्द्यौ... ? ॥ ४४ ॥
इत्येवं मनुरप्याह गौतमोऽपि विशेषतः ।
विशिष्टाशिष्टाचारोऽपि मूलादेव प्रसिध्यति ॥ ४५ ॥
तस्मात्सर्वप्रयत्नेन शासनं सर्वसंमतम् ।
आचार्यस्य विशेषेण औदार्यभरभागिनः ॥ ४६ ॥
धर्मपद्धतिरेषा हि जगतः स्थितिहेतवे ।
सर्ववर्णाश्रमाणां हि यथाशास्त्रं विधीयते ॥ ४७ ॥
कृते विश्वगुरुर्ब्रह्मा त्रेतायामृषिसत्तमः ।
द्वापरे व्यास एव स्यात्कलावत्र भवाम्यहम् ॥ ४८ ॥

इति श्रीमत्परमहंसपरिव्राजकाचार्य श्रीमच्छंकर
भगवत्कृतौ मठाम्नायाश्चत्वारः समाप्ताः

---

### संप्रदायनिर्वचन

कीटादयो विशेषेण वार्यन्ते जीवजन्तवः।
भूतानुकम्पया नित्यं कीटवारः स उच्यते ॥ १ ॥
भोगो विषय इत्युक्तो वार्यते येन जीविनाम्।
सम्प्रदायो यतीनांच भोगवारः स उच्यते ॥ २ ॥
आनन्देतिविलासश्च वार्यते येन जीविनाम्।
सम्प्रदायो यतीनाश्चानन्दवारः स उच्यते ॥ ३ ॥
भूरिशब्देन सौवर्णं वार्यते येन जीविनाम्।
सम्प्रदायो यतीनाश्च भूरिवारः स उच्यते ॥ ४ ॥

---

### दहा प्रकारचीं उपपदें

तीर्थाश्रमवनारण्यागीरिपर्वतसागराः।
सरस्वती भारती च पुरीनामानि वै दश ॥ १ ॥
त्रिवेणीसंगमे तीर्थे तत्त्वमस्यादिलक्षणे।
स्नायात्तत्त्वार्थभावेन तीर्थनामा स उच्यते ॥ २ ॥
आश्रमग्रहणे प्रौढ आशापाशविवर्जितः।
यातायातविनिर्मुक्त एष आश्रम उच्यते ॥ ३ ॥
सुरम्ये निर्झर स्थाने वने वासं करोति यः।
आशाबन्धविनिर्मुक्तो वननामा स उच्यते ॥ ४ ॥
अरण्ये संस्थितो नित्यमानन्दे नन्दने वने।
त्यक्त्वा सर्वमिदं विश्वमरण्यः परिकीर्त्यते ॥ ५ ॥
वासो गिरिवने नित्यं गीताध्ययनतत्परः।
गम्भीराचलबुद्धिश्च गिरिनामा स उच्यते ॥ ६ ॥
वसन्पर्वतमूलेषु प्रौढं ज्ञानम्बिभर्ति यः।
सारासारं विजानाति पर्वतः परिकीर्त्यते ॥ ७ ॥
तत्त्वसागरगंम्भीरो ज्ञानरत्नपरिग्रहः।
मर्यादां नैव लङ्घेत सागरः परिकीर्त्यते ॥ ८ ॥

स्वरज्ञानरतो नित्यं स्वरवादी कवीश्वरः ।
संसारसागरासारहन्ताऽसौ हि सरस्वती ॥ ९ ॥
विद्याभारेण सम्पूर्णः सर्वभारं परित्यजन् ।
दुःखभारं न जानाति भारती परिकीर्त्यते ॥ १० ॥
ज्ञानतत्त्वेन सम्पूर्णः पूर्णतत्त्वपदे स्थितः ।
परब्रह्मरतो नित्यं पुरीनामा स उच्यते ॥ ११ ॥

### मठाम्नाय स्तोत्र ( शृंगेरी )

चतुर्दिक्षु प्रसिद्धासु प्रसिध्यर्थं स्वनामतः ।
चतुरोऽथ मठान् कृत्वा शिष्यान् संस्थापयद्विभुः ॥ १ ॥
चकार संज्ञामाचार्यश्चतुर्णां नामभेदतः ।
क्षेत्रं च देवतां चैव शक्तिं तीर्थं पृथक्पृथक् ॥ २ ॥
संप्रदायं तथाम्नायभेदं च ब्रह्मचारिणाम् ।
एवं प्रकल्पयामास लोकोपकरणाय वै ॥ ३ ॥
दिग्भागे पश्चिमे क्षेत्रं द्वारका कालिकामठः ।
कीटवालः संप्रदायस्तीर्थाश्रमपदे उभे ॥ ४ ॥
देवः सिद्धेश्वरः शक्तिर्भद्रकालीति विश्रुता ।
स्वरूपब्रह्मचार्याख्य आचार्यः पद्मपादकः ॥ ५ ॥
विख्यातं गोमतीतीर्थं सामवेदश्च तद्गतम् ।
जीवात्मपरमात्मैक्यबोधो यत्र भविष्यति ॥ ६ ॥
विख्यातं तन्महावाक्यं वाक्यं तत्वमसीति च ।
द्वितीयः पूर्वदिग्भागे गोवर्धनमठः स्मृतः ॥ ७ ॥
भोगवालः संप्रदायस्तत्रारण्यवने पदे ।
तस्मिन्देवो जगन्नाथः पुरुषोत्तमसंज्ञितः ॥ ८ ॥
क्षेत्रं च वृषलादेवी सर्वलोकेषु विश्रुता ।
प्रकाशब्रह्मचारीति हस्तामलकसंज्ञितः ॥ ९ ॥

आचार्यः कथितस्तत्र नाम्ना लोकेषु विश्रुतः ।
ख्यातं महोदधिस्तीर्थं ऋग्वेदः समुदाहृत ॥ १० ॥
महावाक्यं च तत्रोक्तं प्रज्ञानं ब्रह्म चोच्यते ।
उत्तरस्यां श्रीमठः स्यात् क्षेत्रं बदरिकाश्रमः ॥ ११ ॥
देवो नारायणो नाम शक्तिः पूर्णगिरीति च ।
संप्रदायो नन्दवालस्तर्थि चालकनन्दिका ॥ १२ ॥
आनन्दब्रह्मचारीति गिरिपर्वतसागराः ।
नामानि तोटकाचार्यौ वेदोऽथर्वणसंज्ञिकः ॥ १३ ॥
महावाक्यं च तत्रायमात्मा ब्रह्मेति कीर्त्यते ।
तुरीयो दक्षिणस्यां च शृंगेर्यां शारदामठः ॥ १४ ॥
मलहानिकरं लिंगं विभाण्डकसुपूजितम् ।
यत्रास्ते ऋष्यशृंगस्य महर्षेराश्रमो महान् ॥ १५ ॥
वराहो देवता तत्र रामक्षेत्रमुदाहृतम् ।
तीर्थं च तुंगभद्राख्यं शक्तिः श्रीशारदेति च ॥ १६ ॥
आचार्यस्तत्र चैतन्यब्रह्मचारीति विश्रुतः ।
वार्तिकादिब्रह्मविद्याकर्ता यो मुनिपूजितः ॥ १७ ॥
सुरेश्वराचार्य इति साक्षाद्ब्रह्मावतारकः ।
सरस्वती पुरी चेति भारत्यारण्यतीर्थकौ ॥ १८ ॥
गिर्याश्रममुखानि स्युः सर्वनामानि सर्वदा ।
संप्रदायो भूरिवालो यजुर्वेद उदाहृतः ॥ १९ ॥
अहंब्रह्मास्मीति तत्र महावाक्यमुदीरितम् ।
चतुर्णां देवताशक्तिक्षेत्रनामान्यनुक्रमात् ॥ २० ॥
महावाक्यानि वेदांश्चसर्वमुक्तं व्यपस्थया ।
इति श्रीमत्परमहंसपरिव्राजकभूपतेः ॥ २१ ॥
आम्नायस्तोत्रपठनादिहामुत्र च सद्गतिम् ।
प्राप्यन्ते मोक्षमाप्नोति देहान्ते नात्र संशयः ॥ २२ ॥

## पीठांची संक्षिप्त जंत्री.

| | आम्नाय | पीठ | मठ | आचार्य | क्षेत्र | तीर्थ | देव | शक्ति | वेद | संप्रदाय | संन्यासनाम | ब्रह्मचर्य | महावाक्य |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ कांची | मौलाम्नाय | कामकोटीपीठ | शारदामठ | श्रीशंकरभगवत्पाद | कांची | कम्पासर | एकाम्रनाथ | कामकोटी | ऋक् | मिथ्यावार | इंद्रसरस्वती | सत्यब्रह्मचारी | ओं तत्सत् |
| २ शृंगगिरि | दक्षिणाम्नाय | शारदापीठ | शृंगगिरीमठ | पृथ्वीधर | रामक्षेत्र | तुंगभद्रा | वराह | शारदा | कृष्णयजुस् | भूरिवार | भारती | चैतन्यब्रह्मचारी | अहं ब्रह्मास्मि |
| ३ बदरी नारायण | उत्तराम्नाय | पूर्णागिरिपीठ | ज्योतिर्मठ | तोटकाचार्य | बदरिकाश्रम | अलकनन्दा | नारायण | पूर्णगिरि | अथर्वण | आनन्दवार | गिरी | आनन्दब्रह्मचारी | अयमात्मा ब्रह्म |
| ४ द्वारका | पश्चिमाम्नाय | कालिकापीठ | शारदामठ | पद्मपाद | द्वारावती | गोमती | सिद्धेश्वर | भद्रकाली | साम | कीटवार | आश्रम | सुरूपब्रह्मचारी | तत्वमसि |
| ५ जगन्नाथ | पूर्वाम्नाय | विमलापीठ | गोवर्धनमठ | हस्तामलक | जगन्नाथ | महोदधी | पुरुषोत्तम | विमलादेवी | शुक्लयजुस् | भोगवार | अरण्य | प्रकाशब्रह्मचारी | प्रज्ञानं ब्रह्म |

## परिशिष्टः—ख.

# आचार्य—गुरुपरंपरा.

### १ शृंगेरी मठः—

शृंगेरीपीठावरील गुरुपरंपरेच्या चार याद्या हल्लीं प्रसिद्ध झाल्या आहेत त्याः—

१ जगद्गुरु आठवे नरसिंह भारती यांच्या आज्ञेनें सन १८७९ सालीं सिद्धांती सुब्रह्मण्यशास्त्री यांनीं तामील भाषेंत प्रसिद्ध केलेली,

२ सूर्यनारायणराव यांनीं आपल्या विजयानगरचे इतिहासाचे शेवटीं पुरवणी म्हणून जोडलेली ही चवथ्या नरसिंहभारतींच्या पूजापोथींतून उतरून घेतलेली

३ श्रीमत् सच्चिदानंदशिवाभिनवस्वामीकृत वाणिविलास प्रेसमध्यें छापलेल्या गुरुपरंपरा स्तोत्रांत गुंफलेली.

४ राईससाहेबांनीं म्हैसूर ग्याझेटीयर ( ed. १९०७ ) व्हा. १ पृ. ४७३ येथें छापलेली. ही नं २ वरून उतरलेली दिसते.

याशिवाय म्हैसूरचे माजी महाराज श्रीकृष्णराज उदयार यांनीं सन १८५४ सालीं रचलेल्या अष्टोत्तरशतनामस्तोत्रांत थोडी निराळी यादी दिली आहे म्हणतात पण तो ग्रंथ अजून प्रसिद्ध झाला नाहीं.

नं १ ची यादी पुढें दिली आहे व इतर यादींतील फरक टीपांत दिले आहेत.

| नांव | अभिषेककाल | ब्रह्मीभाव | वर्षें |
|---|---|---|---|
| १ श्रीशंकराचार्य | १८ (इ.स.पूर्वी ) | १२ (इ.स.पूर्वी) | ६ |

| | | | |
|---|---|---|---|
| २ सुरेश्वराचार्य[१] | १२ (इ.स.पूर्वी) | इ. स. ७७३ | ७८५ |
| ३ नित्यबोधघनें-ऊर्फ सर्वज्ञात्ममुनि[२] | इ. स. | ७७३ ते ८४८, | ७५ |
| ४ ज्ञानघनें[३] | ” | ८४८ ते ९१०, | ६२ |
| ५ ज्ञानोत्तमशिवाचार्य[४] | ” | ९१० ते ९५३, | ४३ |
| ६ ज्ञानगिरि[५] | ” | ९५३ ते १०३८, | ८५ |
| ७ सिंहगिरी[६] | ” | १०३८ ते १०९८, | ६० |
| ८ ईश्वरतीर्थ[७] | ” | १०९८ ते ११४६, | ४८ |
| ९ नरसिंहतीर्थ[८] | ” | ११४६ ते १२२८, | ८२ |

---

१ अलीकडील पुराव्याप्रमाणें पहिल्या दोन आचार्यांचे काल पुढें आणले पाहिजेत. शंकराचार्यांचा काल इ. स. ७८८ ते ८२० व सुरेश्वर ८२० चे पुढें. सुरेश्वराचीं ७८५ वर्षे काल्पनिक असलीं पाहिजेत. नं २ च्या यादींत शंकराचार्य ३६ (बी. सी.) पासून १२ (बी. सी.) पर्यंत व सुरेश्वर २८ (बी. सी.) पासून इ. स. ७७३ पर्यंत दिले आहेत म्हणजे सुरेश्वर ८०० वर्षें पीठावर होते ! नं. ३ मध्यें सुरेश्वराला विश्वरूप म्हटलें आहे. नं ४ मध्यें आद्यशंकराचार्यांचा जन्मकाळ इ. स. ७३७ दिला असून पीठस्थकाळ इ. स. ७४५ ते ७६९ व सुरेश्वर इ. स. ७५३.

२ संक्षेपशारीरकाचे कर्ते. नं २-४ याद्या यांचा जन्मकाळ इ. स. ७५८ व आयुष्य ९० वर्षांचें देतात. नं. ३ नुसते बोधघन असें नांव देते.

३ नं. २ व ४ यांचा काल इ. स. ८४६ ते ९१० पर्यंत देतात.

४ नं. २ व ४ यांचा काल इ. स. ९०५ ते ९५३ देतात.

५ नं. २ व ४ यांचा काल इ. स. ९४९ ते १०३८ देतात.

६ नं. २ व ४ यांचा काल इ. स. १०३६ ते १०९८ देतात.

७ नं. २ व ४ यांचा काल इ. स. १०९७ ते ११४६ देतात.

८ नं. २ व ४ यांचा काल इ. स. ११४५ ते १२२८ देतात.

| | | |
|---|---|---|
| १० विद्यातीर्थ ऊर्फ विद्याशंकर[९] | ” १२२८ ते१३३३, | १०५ |
| ११ भारतीकृष्णतीर्थ | ” १३३३ ते१३८०, | ४७ |
| १२ विद्यारण्य[१०] | ” १३८० ते१३८६, | ६ |
| १३ चंद्रशेखरभारती १ ले[११] | ” १३८६ ते१३८९, | ३ |
| १४ नरसिंहभारती १ ले | ” १३८९ ते१४०८, | १९ |
| १५ पुरुषोत्तमभारती १ ले | ” १४०८ ते १४४८, | ४० |
| १६ शंकरानन्द | ” १४४८ ते १४५४, | ६ |
| १७ चंद्रशेखरभारती २ रे | ” १४५४ ते १४६४, | १० |
| १८ नरसिंहभारती २ रे | ” १४६४ ते १४७९, | १५ |
| १९ पुरुषोत्तमभारती २ रे | ” १४७९ ते १५१७, | ३८ |
| २० रामचंद्रभारती | ” १५१७ ते १५६०, | ४३ |
| २१ नरसिंहभारती ३ रे[१२] | १५६० ते १५७३, | १३ |
| २२ नरसिंहभारती ४ थे ऊर्फ नृसिंहभारती १ ले | ” १५७३ ते १५७६, | ३ |
| २३ नरसिंहभारती ५ वे[१३] | ” १५७६ ते १५९९, | २३ |

---

९ यांचे पूर्वाश्रमींचें नांव सर्वज्ञविष्णु. हे सायणमाधवांचे गुरु. कांची-पीठाच्या परंपरेंतही नांव आहे.

१० सुप्रसिद्ध माधवाचार्य, विजयनगर राजांचे दिवाण. नं. २ व ४, याद्या भारतीकृष्णाचा काल इ. स. १३२८ ते १३८० व विद्यारण्याचा काल १३३१ ते १३८६ देतात. येथें कांहीं घोंटाळा असला पाहिजे.

११ नं. २ व ४ याद्या पुढील आठ स्वामींचा आरंभकाल अनुक्रमें इ. स. १३६८, १३८७, १४०६, १४२८, १४४९, १४६४, १४७२ व १५०८ देतात.

१२ नं. २ व ४ याद्या पुढील २ स्वामींचे आरंभकाल अनुक्रमें इ. स. १५५७, व १५६३, देतात.

१३ नं. २३ चे मागें इम्मदीव नं. २४ व २५ चे मागें अभिनव अशीं विशेषणें नं. २ चे यादींत आहेत.

| | | |
|---|---|---|
| २४ नरसिंहभारती ६ वे | ” १५९९ ते १६२२, | २३ |
| २५ सच्चिदानंदभारती १ ले | ” १६२२ ते १६६३, | ४१ |
| २६ नरसिंहभारती ७ वे | ” १६६३ ते १७०५, | ४२ |
| २७ सच्चिदानंदभारती २ रे | ” १७०५ ते १७४१, | ३६ |
| २८ अभिनवसच्चिदानंदभारती १ ले | ” १७४१ ते १७६७, | २६ |
| २९ अभिनवनरसिंहभारती १ ले | ” १७६७ ते १७७० | ३ |
| ३० सच्चिदानंदभारती ३रे | ” १७७० ते १८१४ | ४४ |
| ३१ अभिनवसच्चिदानंदभारती २ रे | ” १८१४ ते १८१७ | ३ |
| ३२ नरसिंहभारती ८ वे | ” १८१७ ते १८७८ | ६१ |
| ३३ सच्चिदानंदशिवाभिनव-नृसिंहभारती[१४] | ” १८७८ ते १९१२ | ३४ |
| ३४ चंद्रशेखरभारती ३ रे | ” १९१२—हल्लीं गादीवर आहेत. | |

---

## २ कांची मठः—

कांची मठाचे गुरुपरंपरेला मुख्य आधार पुण्यश्लोकमंजरी व सदाशिव-ब्रम्हेन्द्रसरस्वतीकृत गुरुरत्नमालिका हे दोन ग्रंथ आहेत. या पीठावर आजतागाईत ६८ स्वामी झाले. यांचे मतें आदिशंकराचार्य गतकली २५९३ नंदन संवत्सरीं म्हणजे खिस्तीशकापूर्वी ५०९ वर्षीं अवतीर्ण झाले, सांप्रतचे पीठाधिकारी चंद्रशेखरेन्द्रसरस्वती ६८ वे आहेत.

( पुढील यादींत प्रत्येक नांवापुढें सांप्रदायिक मताप्रमाणें पीठारोहणाचा सन मिळाला तेथें दिला आहे. )

---

१४ नं. २ व ४ मध्यें यांचा आरंभकाल इ. स. १८६७—६८ दिला आहे.

| क्रमांक. | नांव. | |
|---|---|---|
| १ | श्रीशंकराचार्य | |
| २ | सुरेश्वराचार्य | |
| ३ | सर्वज्ञात्मश्रीचरण | |
| ४ | सत्यबोध | |
| ५ | ज्ञानोत्तम | |
| ६ | शुद्धानंद | |
| ७ | आनन्दज्ञान | |
| ८ | कैवल्ययोगी | |
| ९ | कृपाशंकर | |
| १० | विश्वरूप | |
| ११ | चिद्घन | |
| १२ | चन्द्रशेखर | |
| १३ | सच्चिद्घन | |
| १४ | विद्याघन | |
| १५ | गंगाधरगीष्पति | |
| १३ | उज्ज्वलशंकर | ( ३२९ ) |
| १७ | गौडसदाशिवेन्द्र | ( ३६७ ) |
| १८ | सुरेन्द्रयोगी | ( ३७५ ) |
| १९ | अभिनवविद्याघन | |
| २० | मूकशंकरेन्द्र | |
| २१ | चन्द्रचूडेन्द्र | ( ४३७) |
| २२ | परिपूर्णबोध | ( ४४७ ) |
| २३ | सच्चित्सुख | ( ४७१ ) |
| २४ | चित्सुख | ( ५१२ ) |
| २५ | चिदानन्दघन | |
| २६ | प्रज्ञाघन | |
| २७ | चिद्विलास | |

| क्रमांक. | नांव. | |
|---|---|---|
| २८ | महादेव | |
| २९ | पूर्णबोधेन्द्र | |
| ३० | बोधेन्द्र | |
| ३१ | ब्रह्मानंदघनेन्द्र | ( ६५५ ) |
| ३२ | चिदानन्दघनेन्द्र | ( ६६८ ) |
| ३३ | रुचिरानन्द | ( ६७२ ) |
| ३४ | चन्द्रशेखरेन्द्र | |
| ३५ | चित्सुखेन्द्र | |
| ३६ | चित्सुखानन्देन्द्र | |
| ३७ | विद्याघनमौनि | |
| ३८ | धीरशंकरेन्द्र | ( ७८८ ) |
| ३९ | चिद्विलास | ( ८४० ) |
| ४० | महादेव | ( ८४३ ) |
| ४१ | गंगाधर | ( ९१६ ) |
| ४२ | ब्रह्मानन्द | ( ९५१ ) |
| ४३ | घनानन्द | |
| ४४ | घनपूर्णबोध | |
| ४५ | परमशिवेन्द्र | ( १०६१ ) |
| ४६ | बोधेन्द्र | ( १०८८ ) |
| ४७ | चन्द्रचूड योगी | ( १०९७ ) |
| ४८ | अद्वैतानन्दबोधेन्द्र | |
| ४९ | सुमहादेव | ( १२०० ) |
| ५० | सुखचन्द्रशेखर | |
| ५१ | विद्यातीर्थ | (१२९६) |
| ५२ | शंकरानन्द | (१३८४) |
| ५३ | सदाशिवेन्द्र | |
| ५४ | महादेवेन्द्र | |

| क्रमांक. | नांव. | | क्रमांक. | नांव. | |
|---|---|---|---|---|---|
| ५५ | चन्द्रचूडमौनि | | ६२ | चन्द्रशेखरेन्द्र | ( १७२९ ) |
| ५६ | सदाशिवेन्द्र | | ६३ | महादेवेंद्र | ( १७८९ ) |
| ५७ | परमशिवेन्द्र | | ६४ | चंद्रशेखरेंद्र | ( १८१२ ) |
| ५८ | आत्मबोधेन्द्र | ( १५८४ ) | ६५ | महादेवेंद्र | ( १८४९ ) |
| ५९ | सदाशिवब्रह्मेन्द्र | ( १६०० ) | ६६ | चंद्रशेखरेंद्र | ( १८८९ ) |
| ६० | बोधेन्द्र | | ६७ | महादेवेंद्र | ( १९०० ) |
| ६१ | आत्मप्रकाशेंद्र | | ६८ | चंद्रशेखरेंद्र | ( १९०७ ) |

---

### ३ गोवर्धनमठ—

कै. नारायण शास्त्री, मद्रासहायकोर्ट वकील, यांनीं रचलेल्या गुरुपरंपरा-नाममाला पद्यावलीवरून तयार केलेली जगन्नाथ पीठावरील १४२ आचार्यांची यादी खाली दिली आहे. यांचे मतानेंही आदिशंकराचार्यांचा काल खि. श. पूर्वी ५०९ होता.

| क्रमांक. | नांव. | क्रमांक. | नांव. | क्रमांक. | नांव. |
|---|---|---|---|---|---|
| १ | पद्मपाद | १३ | रामानन्द | २५ | बोधानन्द |
| २ | शूलपाणि | १४ | वागीश्वर | २६ | रामकृष्णतीर्थ |
| ३ | नारायण | १५ | परमेश्वर | २७ | चिब्दाधात्म |
| ४ | विद्यारण्य | १६ | गोपाल | २८ | तत्त्वाक्षरमुनि |
| ५ | वामदेव | १७ | जनार्दन | २९ | शंकर |
| ६ | पद्मनाभ | १८ | ज्ञानानन्द | ३० | वासुदेवतीर्थ |
| ७ | जगन्नाथ | १९ | बृहदारण्यतीर्थ | ३१ | हयग्रीव |
| ८ | मधुरेश्वर | २० | महादेव | ३२ | श्रुतीश्वर |
| ९ | गोविंद | २१ | परमब्रह्मानन्द | ३३ | विद्यानन्द |
| १० | श्रीधर | २२ | रामानन्द | ३४ | मुकुन्दानन्द |
| ११ | माधवानन्द | २३ | सदाशिव | ३५ | हिरण्यगर्भतीर्थ |
| १२ | कृष्णब्रह्मानन्द | २४ | हरीश्वरानन्दतीर्थ | ३६ | नित्यानन्द |

| क्रमांक. | नांव. |
|---|---|
| ३७ | शिवानन्द |
| ३८ | योगीश्वर |
| ३९ | सुदर्शन |
| ४० | व्योमकेश |
| ४१ | दामोदर |
| ४२ | योगानन्द |
| ४३ | गोलोकेश |
| ४४ | श्रीकृष्णानन्दतीर्थ |
| ४५ | देवानन्द |
| ४६ | चंद्रचूड |
| ४७ | हलायुध |
| ४८ | सिद्धसेव्य |
| ४९ | तारकात्मा |
| ५० | बोधायन |
| ४१ | श्रीधर |
| ५२ | नारायण |
| ५३ | सदाशिव |
| ५४ | जयकृष्ण |
| ५५ | विरूपाक्ष |
| ५६ | विद्यारण्य |
| ५७ | विश्वेश्वर |
| ५८ | विबुधेश्वर |
| ५९ | महेश्वर |
| ६० | मधुसूदन |
| ६१ | रघूत्तम |
| ६२ | रामचंद्र |

| क्रमांक. | नांव. |
|---|---|
| ६३ | योगीन्द्र |
| ६४ | महेश्वर |
| ६५ | ओंकार |
| ६६ | नारायण |
| ६७ | जगन्नाथ |
| ६८ | श्रीधर |
| ६९ | रामचन्द्र |
| ७० | ताम्रकतीर्थ |
| ७१ | उग्रेश्वर |
| ७२ | उद्दण्डतीर्थ |
| ७३ | संकर्षण |
| ७४ | जनार्दन |
| ७५ | अखण्डात्म |
| ७६ | दामोदर |
| ७७ | शिवानन्द |
| ७८ | गदाधर |
| ७९ | विद्याधर |
| ८० | वामन |
| ८१ | शंकर |
| ८२ | नीलकण्ठ |
| ८३ | रामकृष्ण |
| ८४ | रघूत्तम |
| ८५ | दामोदर |
| ८६ | गोपाल |
| ८७ | मृत्युंजय |
| ८८ | गोविन्द |
| ८९ | वासुदेव |

| क्रमांक. | नांव. |
|---|---|
| ९० | गंगाधर |
| ९१ | सदाशिव |
| ९२ | वामदेव |
| ९३ | उपमन्यु |
| ९४ | हयग्रीव |
| ९५ | हरि |
| ९६ | रघूत्तम |
| ९७ | पुण्डरीकाक्ष |
| ९८ | परशंकर |
| ९९ | वेदगर्भ |
| १०० | वेदान्तभास्कर |
| १०१ | विज्ञानात्म |
| १०२ | शिवानन्द |
| १०३ | महेश्वर |
| १०४ | रामकृष्ण |
| १०५ | वृषध्वज |
| १०६ | शुद्धबोध |
| १०७ | सोमेश्वर |
| १०८ | बोपदेव |
| १०९ | शंभुतीर्थ |
| ११० | भृगु |
| १११ | केशवानन्द |
| ११२ | विद्यानन्द |
| ११३ | वेदानन्द |
| ११४ | बोधानन्द |
| ११५ | सुतपानन्द |
| ११६ | श्रीधरतीर्थ |

| क्रमांक. | नांव. | मांक. | नांव. | क्रमांक. | नांव. |
|---|---|---|---|---|---|
| ११७ | जनार्दन | १२६ | वामदेव | १३५ | रामकृष्ण |
| ११८ | कामनाशानंद | १२७ | हृषीकेश | १३६ | मधुसूदनतीर्थ |
| ११८ | हरिहरानन्द | १२८ | दामोदर | १३७ | दामोदर |
| १२० | गोपाल | १२९ | गोपालानन्दतीर्थ | १३८ | रघूत्तम |
| १२१ | कृष्णानन्द | १३० | गोविंद | १३९ | शिव |
| १२२ | माधवानन्द | १३१ | रघूत्तम | १४० | लोकनाथ |
| १२३ | मधुसूदनतीर्थ | १३२ | रामचन्द्र | १४१ | दामोदर |
| १२४ | गोविंद | १३३ | गोविंद | १४२ | मधुसूदनतीर्थ |
| १२५ | रघूत्तम | १३४ | रघुनाथ | | |

---

**४ द्वारकामठ—**

द्वारकापीठावरील स्वामी श्रीमाधवतीर्थ यांचे दप्तरांत मिळालेल्या व ंशमात्रिकेवरून खालील यादी तयार केली आहे.

**श्रीशंकराचार्य—** (५०९ इ. स. पूर्वी ) जन्म युधि. शक २६३१, वै. शु. ५, संन्यास युधि. शक २६३९ का. शु. ११; निर्याण युधि. श. २६६३ का. शु. १५.

१ ब्रह्मस्वरुपाचार्य ...चैत्र व. ८, (इ. स.पूर्वी) ४४०
२ चित्सुखाचार्य ... पौष शु. ३ " ४१६
३ सर्वज्ञानाचार्य ... श्रावण शु. ११ " ३५७
४ ब्रह्मानंदतीर्थ ... श्रावण शु. १ " ३०८
५ स्वरूपाभिज्ञानाचार्य ... जेष्ठ व. ३० " २४५
६ मंगलमूर्त्याचार्य ... पौष शु. १४ " १९३
७ भास्कराचार्य ... पौष शु. १२ " १४०
८ प्रज्ञानाचार्य ... आषाढ शु. ७ " १२७

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ९ | ब्रह्मज्योत्स्नाचार्य | ... | चैत्र व. ५ (इ.स.पूर्वी) | ९५ |
| १० | आनंदाविर्भावाचार्य | | फाल्गुन शु. ९ संवत् | २५ |
| ११ | कलानिधितीर्थ | ... | पौष शु. ६ " | ८३ |
| १२ | चिद्विलासाचार्य | ... | मार्गशीर्ष शु. १३ " | ११९ |
| १३ | विभूत्यानंदाचार्य | ... | श्रावण व. ११ " | १५४ |
| १४ | स्फुर्तिनिलयपाद | ... | आषाढ शु. ६ " | २०३ |
| १५ | वरतंतुपाद | ... | आषाढ व. ३ ,, | २४९ |
| १६ | योगारूढाचार्य | ... | मार्गशीर्ष व. ११ " | ३५० |
| १७ | विजयडिंडिमाचार्य | ... | पौष व. ८ " | ३९४ |
| १८ | विद्यातीर्थ | ... | चैत्र शु. १ " | ४३७ |
| १९ | चिच्छक्तिदेशिक | ... | आषाढ शु. १२ " | ४८३ |
| २० | विज्ञानेश्वरतीर्थ | ... | आश्विन शु. १५ " | ५११ |
| २१ | ऋतंभराचार्य | ... | माघ शु. १० " | ५७२ |
| २२ | अमरेश्वरगुरव | ... | भाद्रपद व. ६ " | ६०८ |
| २३ | सर्वतोमुखतीर्थ | ... | पौष शु. ४ " | ६६९ |
| २४ | स्वानंददेशिक | ... | वैशाख व. ५ " | ७२१ |
| २५ | समाधीरसिक | ... | फाल्गुन शु. १२ " | ७९९ |
| २६ | नारायणाश्रम | ... | चैत्र शु. १४ " | ८३६ |
| २७ | वैकुंठाश्रम | ... | आषाढ व. ६ " | ८८५ |
| २८ | त्रिविक्रमाश्रम | ... | आषाढ शु. ३ " | ९११ |
| २९ | नृसिंहाश्रम | ... | जेष्ठ व. ४ " | ९६० |
| ३० | त्र्यंबकाश्रम | ... | वैशाख व. ३० " | ९६५ |
| ३१ | विश्रवाश्रम | ... | जेष्ठ शु. १ " | १००१ |
| ३२ | केशवाश्रम | ... | माघ व. ५ " | १०६० |
| ३३ | चिदाम्बराश्रम | ... | मार्गशीर्ष व ९ " | १०८३ |
| ३४ | पद्मनाभाश्रम | ... | जेष्ठ शु. १५ " | ११०९ |
| ३५ | महादेवाश्रम | ... | श्रावण व. " | ११८४ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३६ | साच्चिदानंदाश्रम ... | अश्विन व. ५ | संवत् | १२०७ |
| ३७ | विद्याशंकराश्रम ... | आश्विन व. १४ | " | १२६५ |
| ३८ | अभिनवसाच्चिदानंदाश्रम | वैशाख शु. ६ | " | १२९३ |
| ३९ | शाशिशेखराश्रम ... | वैशाख शु. १ | " | १३२६ |
| ४० | वासुदेवाश्रम ... | फाल्गुन व. १० | " | १३६१ |
| ४१ | पुरुषोत्तमाश्रम ... | माघ व ५ | " | १३९४ |
| ४२ | जनार्दनाश्रम ... | भाद्रपद शु. १५ | " | १४०८ |
| ४३ | हरिहराश्रम ... | श्रावण शु. ११ | " | १४११ |
| ४४ | भवाश्रम ... | वैशाख व. ५ | " | १४२१ |
| ४५ | ब्रह्माश्रम ... | आषाढ शु. ९ | " | १४३६ |
| ४६ | वामनाश्रम ... | चैत्र व. १२ | " | १४५३ |
| ४७ | सर्वज्ञाश्रम ... | चैत्र व. ८ | " | १४८९ |
| ४८ | प्रद्युम्नाश्रम ... | चैत्र शु. ७ | " | १४९५ |
| ५९ | गोविंदाश्रम ... | जेष्ठ व. ४ | " | १५२३ |
| ५० | चिदाश्रम ... | फाल्गुन शु. २ | " | १५७६ |
| ५१ | विश्वेश्वराश्रम ... | माघ शु. ५ | " | १६०८ |
| ५२ | दामोदराश्रम ... | चैत्र व. ५ | " | १६१५ |
| ५३ | महादेवाश्रम ... | चैत्र शु. १ | " | १६१६ |
| ५४ | अनिरुद्धाश्रम ... | माघ व. ४ | " | १६२५ |
| ५५ | अच्युताश्रम ... | श्रावण व. ६ | " | १६२९ |
| ५६ | माधवाश्रम ... | आषाढ शु. ६ | " | १६८५ |
| ५७ | अनंताश्रम ... | चैत्र शु. १२ | " | १७१६ |
| ५८ | विश्वरुपाश्रम ... | श्रावण व. २ | " | १७२१ |
| ५९ | चिद्घनाश्रम ... | माघ शु. ६ | " | १७२६ |
| ६० | नृसिंहाश्रम ... | वैशाख शु. ४ | " | १७३५ |
| ६१ | मनोहराश्रम ... | भाद्रपद शु. ९ | " | १७६१ |
| ६२ | प्रकाशानंदसरस्वतीस्वामी | आश्विन व. ६ | " | १७९५ |

| | | | |
|---|---|---|---|
| ६३ | विशुद्धानंदाश्रम | ... वैशाख व. ३० संवत | १७९९ |
| ६४ | वामनेश | ... श्रावण शु. ८ " | १८३१ |
| ६५ | केशवाश्रम | ... कार्तिक व. ९ " | १८३८ |
| ६६ | मधुसूदनाश्रम | ... माघ शु. ५ " | १८४८ |
| ६७ | हयग्रीवाश्रमस्वामी | ... संवत | १८६२ |
| ६८ | प्रकाशाश्रमस्वामी | ... " | १८६३ |
| ६९ | हयग्रिवानंदसरस्वतस्वामी | " | १८७४ |
| ७० | श्रीधराश्रमस्वामी | ... " | १९१४ |
| ७१ | श्रीदामोदराश्रमस्वामी | ... " | १९२८ |
| ७२ | श्रीकेशवाश्रमस्वामी | ... आ. व ७ " | १९३४ |
| ७३ | श्रीमद्राजराजेश्वर | ... आषा. शु. ५ " | १९५६ |
| ७४ | श्रीमन्माधवतीर्थ | ... संवत | १९७० |
| ७५ | श्रीशांतानंद | ... " | १९७६ |

---

**५ संकेश्वरमठ**

करवीरमठांत व कऱ्हाडास सांपडलेल्या जुन्या प्रतींत करवीरमठ स्थापन होण्याच्या पूर्वींची गुरुपरंपरा दिली आहे तींतील नावें येणेंप्रमाणें:—

१ शिव, २ विष्णु, ३ ब्रह्मा, ४ वसिष्ठ, ५ शक्ति, ६ पराशर ७ व्यास, ८ शुक, ९ गौडपाद, १० गोविंदयति, **११ श्रीशंकराचार्य** १२ विश्वरूप, १३ पृथ्वीधर, १४ गंगाधर, १५ चिद्धनभारती, १६ बोधघन, १७ ज्ञानोत्तम, १८ नृसिंहयति, १९ ईश्वरभारती, २० विद्याशंकर, २१ कृष्णयति. २२ शंकरयोगी २३ मधुसूदनभारती, २४ स्वयंजात सच्चिदानंद, २५ पुरुषोत्तम, २६ मधुसूदन २७ जगन्नाथ, २८ विश्वानन्द, २९ विद्यारण्यभारती, ३० ज्ञानोत्तमयति ३१ ईश्वरभारती, ३२ ईश्वरतीर्थ, ३३ विद्यातीर्थ, ३४ विद्यारण्य, ३५ नृसिंह, ३६ चंद्रशेखरभारती, ३७ रामचंद्र, ३८ नृसिंह, ३९ विद्यातीर्थ, ४० शंकरानन्द, ४१ नृसिंहशंकरानन्द, ४२ नृसिंहभारती, ४३ शंकरभारती.

आद्यशंकराचार्यांपासून ४४ वे स्वामी **श्रीविद्याशंकरभारती** प्रथम संकेश्वरास आले. तेथून पुढें अनुक्रमें विद्यानरसिंहभारती व विद्याशंकर भारती हीं दोनच नांवें चालू आहेत त्यांची यादी येणें प्रमाणें:—

१ विद्याशंकरभारती ऊर्फ देव गोसावी
२ विद्यानरसिंहभारती ऊर्फ तैलंगस्वामी
३ विद्याशंकरभारती ऊर्फ लाटकर
४ विद्यानरसिंहभारती उर्फ काशीकर
५ विद्याशंकरभारती ऊर्फ अष्टकर
६ विद्यानरसिंहभारती (वे.रामशास्त्री नूलकर) फा. शु. १ शके १६७९
७ * शंकरभारती ( यज्ञेश्वरभट्ट मुतनाळकर) माघ व.३० श. १६७९
८ नरसिंहभारती ( हरिशास्त्री नांदेडकर) ज्ये. व २ शके १६९५
९ शंकरभारती ( बाबदेवभट लाटकर ) चै. व. ७ श. १६९८
१० नरसिंह भारती ( यज्ञेश्वरशास्त्री पुणेकर चै. व. १३ शके १७१६
११ शंकर भारती ( सरस्वतीभट्टजी लाटकर ) चै.शु.११ शके १७३०
१२ नरसिंहभारती ऊर्फ तैलंगस्वामी द्रविडस्वामी,
किंवा कंर्की स्वामी(रामशास्त्री वाडीकर )भाद्र. व. ३० शके १७३३
१३+ शंकरभारती ( भैरवदीक्षीत कऱ्हाडकर ) चै. शु. ८ शके १७५९
१४ नरसिंहभारती (अप्पादीक्षित कऱ्हाडकर) वै. व. १३ शके १७६८
१५ शंकरभारती ( गंगाधरभट जोशी भिलवडीकर ) भाद्र. शु. ७ शके १७८२ इ. स. १८६०

---

* शके १६९५ सालीं कोन्हेरराव पटवर्धनांनीं करवीरमठ जाळला व लुटला म्हणून या स्वामींनीं वाळव्याजवळ सिद्धेश्वरासमोर जिव्हा हासडून प्राण दिला. तेथें दरसाल यात्रा जमते व उत्सव होतो.

\+ यांचे कारकीर्दींत संकेश्वर व शृंगेरी उभयतां स्वामींचा वाद होऊन तो कोल्हापूरकरांनीं तोडला.

१६ * नरसिंहभारती ( रघुनाथभट्ट जोशी भिलवडीकर ) ज्ये. व. ११ शके १७८९ इ. स. १८६७

१७ शंकरभारती ( हनुमंतभट जोशी ) का. व. २ शके १७९५

१८ नरसिंहभारती ( व्यंकटशास्त्री रामदासी ) भा. व. १ शके १७९९

१९ शंकरभारती ऊर्फ गुरुस्वामी ( वासुदेवशास्त्री भिलवडीकर) चै. शु. २ शके १८०७ इ. स. १८८५

यांचे कारकीर्दीत इ. स. १९०० कोल्हापूरचें वेदोक्त प्रकरण उत्पन्न होऊन तंटा सुरू झाला, व दोन शिष्यशाखा झाल्या. पहिले शिष्य काशीनाथबुवा ब्रह्मनाळकर., त्यांचे शिष्य आत्मारामशास्त्री जोशी त्यांचे शिष्य आत्मारामशास्त्री पित्रे, व त्यांचे शिष्य डॉ. कुर्तकोटी हे करवीर पीठावर बसले. गुरुस्वामींचे दुसरे शिष्य अथणीकर, त्यांचे शिष्य वाईकर व त्यांचे शिष्य शिरोळकर वाईकर हल्लीं संकेश्वर पीठावर आहेत. शेवटच्या दोन जोड्यांत हल्लीं बेळगांव फ. क्ला. कोर्टांत दावा चालू आहे.

## परिशिष्ट ग.

## बिरुदावली. [शृंगेरी.]

श्रीमत्परमहंसपरिव्राजकाचार्यवर्य पदवाक्यप्रमाणपारावारपारीण—यम—नियमासनप्राणायामप्रत्याहारध्यानधारणसमाध्यष्टांगयोगानुष्ठाननिष्ठ—तपश्च——क्रवर्त्यनाद्यवच्छिन्नगुरुपरंपराप्राप्तषड्दर्शनस्थापनाचार्य—व्याख्यानसिंहासनाधीश्वर—सकलनिगमागमसारहृदयसांख्यत्रयप्रतिपादक—वैदिकमार्गप्रवर्तक-·सर्वतन्त्रस्वतन्त्रआदिराजधानीविद्यानगरमहाराजधानीकर्णाटकसिंहासनप्रतिष्ठापनाचार्यश्रीमद्राजाधिराज· गुरुभूमंडलाचार्यऋष्यशृंगपुरवाधीश्वरतुंगभद्रातीरवासिश्रीमद्विद्याशंकरपादपद्मारधिकश्रीजगद्गुरु(साक्षात् गुरूचेंनांव)स्वामिगुरुकमलसंजात-श्रीजगद्गुरु-शृंगेरी(विद्यमानस्वामीचेंनांव)स्वामीभिःनारायणस्मरणानि-

---

*यांचे समोर पुणें मुकामीं पुनर्विवाहाच्या सशास्त्रते संबंधीं मोठा कडाक्याचा वाद होऊन श. १७९२ चैत्र वद्य २ इ.स. १८७० रोजीं निर्णयपत्र प्रसिद्ध झालें. तसेंच गणेशशास्त्री गोळवलकराला विलायतेस जाऊन आल्यावर श्रा. शु. ११ शके १७९४ रोजीं प्रायश्चित्तार्ह ठरवून शुद्ध केलें.

## करवीर-संकेश्वर मठ

करवीर मठाची बिरुदावली बहुतेक सदरप्रमाणेंच आहे. फक्त आंकडे दिले आहेत तेथें तीन ठिकाणीं फरक आहे.

१ प्रारंभीं " स्वस्तिश्रीमत्समस्तसुरवृंदपूजितपादारविन्दाशिवप्रतिबिंबवर्म" हे शब्द जास्त आहेत.

२ येथें " सकलनास्तिकमतोच्छेदपूर्वकसकलधर्मसंस्थापनैकधुरीण " हे जास्त शब्द आहेत.

३ येथें करवरिमठाचे वैशिष्ट्यबोधक पुढील शब्द आहेत " श्रीमच्छंकराचार्यान्वयसंजाताभिनवपंचगंगातीरवासकमलानिकेतनकरवीरसिंहासनाधीश्वर. "

---

## द्वारकामठ

द्वारकामठाची बिरुदावलीही बहुतेक शृंगेरीप्रमाणेंच आहे फक्त मठाची वैशिष्ट्यबोधक पुढील दोन विशेषणे जास्त आहेतः—

१ हृदय शब्दापुढे " श्रीमत्सुधन्वसाम्राज्यप्रतिष्ठापनाचार्य " हे शब्द आहेत.

२ मण्डलाचार्य शब्दापुढें " चातुर्वर्ण्याशिक्षकगोमतीतीरवासश्रीद्वारकापुरवराधीश्वरपश्चिमाम्नायश्रीमच्छारदापीठाधीश्वर " हे शब्द आहेत.

---

इतर मठांच्या बिरुदावल्या मिळाल्या नाहींत.

---

# उत्तरार्ध

# अद्वैतमीमांसा.*

## अध्याय पहिला.

### प्रो. डयूसनचें व्याख्यान.

**सर्वे वेदा यत्पदमामनन्ति तपांसि सर्वाणि च यद्वदन्ति।**
**यदिच्छन्तो ब्रह्मचर्यं चरन्ति तत्ते पदं संग्रहेण ब्रवीमि॥**

कांहीं दिवसांपूर्वी एका यूरोपस्थ पंडिताच्या सहवासाचा अलभ्य लाभ पुण्यपत्तनस्थ जनांस मिळाला. प्रोफेसर पॉल डयूसन ह्यांचा जरी दोन चार

---

* हे लेख प्रथम केसरीपत्रांत सन १८९३ साली अग्रलेख म्हणून प्रसिद्ध झाले. जर्मनीचे विद्वान् पंडित प्रो. पॉल डयूसेन ते वेळीं पुण्यास येऊन आनंदाश्रमांत व्याख्यानें देत होते. प्रस्तुत लेखक ते वेळीं "केसरी"चा संपादक असल्यानें एका पाश्चात्य साहेबानें येथें येऊन आम्हांस आमचा वेदांत शिकवावा ही गोष्ट चमत्कारिक वाटल्यामुळे हे लेख लिहिण्यांत आले. पुष्कळांचे आग्रहावरून कुळकर्णी, गोखले आणि मंडळी यांनीं हे लेख तेच वेळीं पुस्तकरूपानें निराळे छापले होते; परंतु प्रथमावृत्ति दुर्मिळ झाल्यानें ते पुन्हां जसेचे तसेच छापले आहेत. पहिला लेख ता. ७ मार्च १८९३ चे केसरींत प्रसिद्ध झाला. शेवटच्या लेखासंबधानें लो. टिळकांचा व प्रस्तुत लेखकाचा मतभेद झाल्यानें त्यानें केसरीचें संपादकत्व सोडून दिलें; टिळकांचा कर्मयोगाकडील ओढा व शंकराचार्यांशीं विरोध तेव्हांपासून उघड होऊं लागला.

दिवसच येथें मुक्काम होता तरी तेवढ्या अवकाशांत त्यांनीं येथें बऱ्याच ओळखी केल्या, व त्यामुळें त्यांची विद्वत्ता, सौजन्य व शोधकबुद्धि चांगली प्रत्ययास आली. डा. डयूसन हे जर्मनींतील कील युनिव्हर्सिटींत तत्त्वज्ञानाचे आचार्य आहेत; व त्यांनीं अलीकडेच संस्कृत विद्येचा अभ्यास सुरू केला असल्यामुळें, इकडील लोकांस जरी त्यांचें नांव आजपर्यंत फारसें ऐकून माहीत नव्हतें, तरी यूरोपखंडांत डयूसनसाहेबांच्या विद्वत्तेची पुष्कळ ख्याति आहे. त्यांचें पूर्ववृत्त फार मनोरंजक व बोधप्रद आहे. तरुणपणापासून ज्ञानार्जनाविषयीं त्यांना इतका कांहीं हव्यास असे कीं, केवळ इंग्रजी भाषा शिकण्याकरितां म्हणून त्यांनीं मुद्दाम एका इंग्रजी बाईशीं लग्न लावलें; व त्यांच्या सुदैवानें ती बाईही हल्लीं त्यांच्याच तोडीची विदुषी झाली आहे.

डयूसनसाहेबांना स्वभाषेखेरीज इंग्लिश, फ्रेंच, स्पॅनिश, इटालियन, संस्कृत वगैरे इतर भाषाही चांगल्या अवगत आहेत. संस्कृत भाषेचा अभ्यास करण्याकडे त्यांची प्रवृत्ति होण्यास फार चमत्कारिक कारण झालें, तें इकडील सुशिक्षित म्हणविणाऱ्या तरुण मंडळीनें ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. पूर्वींपासून तत्त्वज्ञानाकडे त्यांचा फार कल असल्यामुळें अतिप्राचीन ग्रीक तत्त्ववेत्त्यांपासून तों अर्वाचीन क्यान्ट हेगेल प्रभृति युरोपियन मतवाद्यांपर्यंत बहुतेकांचे ग्रंथ त्यांनीं वाचले; पण चित्ताचें समाधान होईना. जो तो आपलें म्हणणें तेवढें खरें व बाकी सर्व मतें खोटीं, असें प्रतिपादन करी; परंतु प्रतिपक्षाच्या सर्व शंकांचें निवारण एकाच्यानेंही चांगलें होत नाहीं, अशी डयूसनसाहेबांची खात्री झाली. ईश्वराचें स्वरूप, जगाची उत्पत्ति, आत्म्याचें अमरत्व वगैरे गहन मुद्यांसंबंधानें अनेक परस्परविरुद्ध सिद्धांत सदर्हू ग्रंथकारांनीं ठोकून दिलेले आढळतात; व जरी त्यांपैकीं कित्येकांत थोडाबहुत सत्याचा अंश सांपडतो तरी त्यापासून खऱ्या जिज्ञासूचें समाधान होण्याचा मुळींच संभव नाहीं, असें त्यांच्या लक्षांत आलें; व त्यामुळें त्यांच्या चित्तास फार उद्वेग झाला. एकादी यःकश्चित् वस्तु मिळविण्याकरितांही मनुष्य किती खटपट करितो, आणि दीर्घ प्रयत्न करूनही ती न मिळा-

त्यास त्याची केवढी निराशा होते, हें नित्य व्यवहारांत क्षणोक्षणीं दिसून येतें. मग ज्याच्यावर आपलें चिरकालिक सुख व आत्मिक शांति अवलंबून राहाणार अशा अत्यंत दुर्लभ तत्त्वज्ञानाची इच्छा करणाऱ्या जिज्ञासूला तें न मिळाल्यास अतिशय उद्वेग होईल हें सांगावयास नकोच. मृगजलाच्या पाठीमागें शेंकडों कोस धावत जाणाऱ्या हरिणाप्रमाणेंच डा० ड्यूसन यांची थोडीबहुत अवस्था झाली होती. त्यामुळें ह्या परस्परविरोधी मतवाद्यांच्या वादकलहापासून त्रिकालाबाधित सत्स्वरूपाचें कधींही ज्ञान होणार नाहीं, असा त्यांचा ग्रह झाला. इतक्यांत सुदैवानें शोपेनहोर नामक जार्मण्य अद्वैतवाद्याचा ग्रंथ त्यांच्या सहज अवलोकनांत आला, व त्यावरून त्यांच्या बुद्धींत एकदम प्रकाश पडला. शोपेनहोरचे सिद्धान्त संस्कृत उपनिषदांवरून घेतले असल्यामुळें ड्यूसनसाहेबांना तीं उपनिषदें वाचण्याचीही उत्कट इच्छा झाली. व त्याकरितां त्यांनीं ताबडतोब संस्कृत भाषेचा अभ्यास सुरू केला. हल्लीं त्यांना बहुतेक मुख्य उपनिषदें मुखोद्गत आहेत; इतकेंच नाहीं, तर वेदान्तग्रंथाचें खरें रहस्य त्यांच्याइतकें युरोपिअन विद्वानांपैकीं फारच थोड्यांस समजत असेल. शंकराचार्यांच्या शारीरकभाष्याचें त्यांनीं जर्मन भाषेंत समग्र भाषांतर केलें असून वेदान्त सिद्धान्तांचें निरूपण करण्याकरितां दोन स्वतंत्र ग्रंथही लिहिले आहेत. हल्लीं पाश्चात्त्य तत्त्वज्ञानाचा संकलित इतिहास लिहिण्याचें त्यांच्या मनांत आल्यावरून जेथें जेथे आजपर्यंत निरनिराळ्या तत्त्वसांप्रदायांचा उगम झाला, असे सर्व देश प्रत्यक्ष पाहण्याचा त्यांनीं संकल्प केला. चार महिने हिंदुस्थानांतील सर्व ठिकाणें फिरल्यानंतर स्वदेशीं जाण्यापूर्वीं ह्या इतिहासप्रसिद्ध पुण्यपत्तनाचेंही एकवार दर्शन घ्यावें असें त्यांच्या मनांत आलें; व म्हणूनच येथील लोकांस त्यांच्या भेटीचा लाभ झाला. यांचें व्याख्यान ऐकण्याची येथें पुष्कळांची इच्छा होती परंतु तो योग आला नाहीं. तथापि मुंबईच्या रॉयल एशिआटिक सोसायटीपुढें ता० २ फेब्रुवारि रोजीं वेदान्तावर त्यांनीं एक सुरेख निबंध वाचला. त्यावरून त्यांचीं कोणत्या प्रकारचीं मतें आहेत, व परजातीय असूनही हिंदुतत्त्वज्ञानाविषयीं त्यांना किती आभमान वाटतो हें चांगलें ध्यानांत येईल. सबब प्रत्येक इंग्रजी जाणणाऱ्या इसमानें तो वाचावा अशी आम्ही शिफा-

रस करून मराठी वाचकांकरितां त्यांतील ठळक ठळक मुद्दे मात्र येथें देतों.

संस्कृत विद्येच्या अभिवृद्ध्यर्थ मुंबईच्या एशिआटिक सोसायटीनें केलेल्या प्रयत्नाबद्दल तिचे आभार मानल्यानंतर प्रोफेसर डयूसन म्हणाले:— हिंदुस्थानांतील लोकांनीं अद्वैतमताचें आजपर्यंत रक्षण केल्यामुळें पृथ्वीवर उत्तरोत्तर वाढत जाणाऱ्या नास्तिकपणाचा प्रतिकार करण्याचें चांगलें साधन उरलें आहे, याबद्दल आपण सर्वांनीं आनंद मानला पाहिजे. हिंदुस्थानांत आजपर्यंत पुष्कळ दर्शनें व मतें होऊन गेलीं पण त्यांपैकीं बहुतेक नामशेष झालीं, व हल्लीं आहेत त्यांमध्येंही शांकरमताइतका कोणाचाही प्रचार नाहीं ही गोष्ट त्या मताच्या सत्यत्वाविषयीं चांगली साक्ष देते. विशिष्टाद्वैत, द्वैत, शुद्धाद्वैत अशीं वेदान्ताचीं अनेक रूपांतरें झालीं आहेत; परंतु त्या सर्वांपेक्षां मूळ शांकरमताचाच विशेष प्रसार आहे. हल्लीं शंभर वेदांती घेतले तर त्यांत फक्त पंधरा रामानुज, पांच माध्व व पांच वाल्लभ सांपडतील, बाकीचे पंचाहत्तर शांकरमतानुयायी आहेत, ही गोष्ट मला एका विद्वान् रामानुज पंडिताकडून कळली आहे; तेव्हां ती खरी मानण्यास हरकत नाहीं. माझ्या मतें उपनिषदें व त्यांवरील शंकराचार्यांचीं भाष्यें, प्लेटो क्यांट वगैरे पाश्चात्य तत्त्वज्ञान्यांच्या ग्रंथांची सहज बरोबरी करतील. उपनिषदांतील प्रत्येक वाक्य प्रमाणभूत मानलें गेल्यामुळें त्यांत जागोजाग आढळून येणाऱ्या परस्परविसंगत विधानांची एकवाक्यता करणें फार कठीण होतें; तथापि भाष्यकारांनीं फार खुबीदार रीतीनें ती एकवाक्यता केली आहे. ह्या बाबतींत खिस्ती मतवाद्यांनीं शंकराचार्यांचा अवश्य कित्ता घ्यावा. ही खुबी इतकीच कीं, उपनिषदभागाचे त्यांनीं निर्गुण किंवा पारमार्थिक विद्या व सगुण अथवा व्यावहारिकी विद्या असे दोन विभाग करून, पहिली पंडितांकरितां व दुसरी साधारण लोकांकरितां अशी व्यवस्था केली; आणि अशा रीतीनें विसंगत भासणाऱ्या वचनांतील विरोध काढून टाकला आहे.

एकंदर उपनिषदांतील सिद्धांतांचे व्याख्यात्यांनीं विषयभेदानें चार वर्ग केले. १. ब्रह्म २. जगदुत्पत्ति, ३ आत्मा, आणि ४. मुक्ति. ब्रह्मासंबंधानें अनेक तऱ्हेचीं काल्पनिक वर्णनें आढळतात. आकाश, आदित्यवासी

पुरुष, अक्षिनिवासी पुरुष, विश्वरूप, जगदात्मा, ईश्वर, सुखदुःख, विभक्ता, वगैरे अनेक नांवें ब्रह्माला दिलेलीं आढळतात. त्या सवाचा शंकराचार्यांनीं सगुणविद्येंत अंतर्भाव केला आहे. पण तिच्याहून श्रेष्ठ अशा निर्गुणविद्येंत परब्रह्माचें शुद्ध. बुद्ध, मुक्त, अनंत, अपार असेंच वर्णन केलेलें आढळतें. " यतो वाचो निवर्तन्ते अप्राप्य मनसा सह । अविज्ञातं विजानतां विज्ञातमविजानतां ॥ " " नेति नेति " इत्यादि परविषयक वाक्यांनीं चिदात्म्याचें दुर्बोधत्व प्रतिपादिलेलें आहे. **बाष्कलीनें** ब्रह्मस्वरूपाविषयीं प्रश्न केला तेव्हां **बव्हानें** मौन स्वीकारलें यांतील भावार्थ हाच. **क्यांट** नामक जर्मन तत्त्वज्ञान्याचेंही असेंच मत होतें. तथापि हें ब्रह्म आपल्यापासून दूर नाहीं, तर प्रत्येकाच्या हृदयांतच आहे. 'अहं ब्रह्मास्मि', मी ब्रह्म आहें, असा अनुभव मात्र झाला पाहिजे. हा ब्रह्मसाक्षात्कार केवळ समाधीनेंच होणारा आहे.

जगदुत्पत्तिसंबंधानेंही पर व अपर विद्या असे शंकराचार्यांनीं दोन विभाग केले आहेत. अविद्यामूलक संसार अपरविद्येचा विषय होय. सर्व बाह्य सृष्टीच्या ठिकाणीं केवळ व्यावहारिक सत्यत्व असुन ती मायेच्या योगानें ब्रह्मावर आभासरूपानें भासते; तथापि संसाराला बीजांकुरन्यायानें अनादिच मानलें पाहिजे. एरव्हीं ईश्वरानें सृष्टि निर्माण कां केली ह्या प्रश्नाला समर्पक उत्तर कधींही देतां येणार नाहीं. जगत् उत्पन्न करण्यांत कर्त्याचा कांहीं तरी हेतु असला पाहिजे; पण तसा हेतु शुद्धब्रह्माच्या ठिकाणीं मुळींच संभवत नाहीं. झाड वाळून गेलें तरी बीज राहतेंच, व त्यापासून दुसरा वृक्ष उत्पन्न होतो. त्याचप्रमाणें मनुष्य मेला तरी त्याचें कर्मबीज पुनर्जन्मास कारण होतें. येणेंप्रमाणें ही उत्पत्तिनाशाची अनादि परंपरा सतत चालत राहणार अशी हिंदुस्थानांतील व्यक्तिमात्राची दृढ समजूत झाली असल्यामुळें, ती आपत्काळीं मनाचें शांतवन करण्यास किती उपयोगीं पडते हें मी तुम्हास सांगावयास नको. परविद्येचा केवळ सच्चिदानंदस्वरूपी शुद्ध ब्रह्मच विषय आहे; आणि भासमान सृष्टि मृगतृष्णिकेप्रमाणें केवळ मायारूप आहे. या मायेचें नानाप्रकारच्या दृष्टान्तांनीं वर्णन केलें आहे. त्या सर्व दृष्टांतांत शंकराचार्यांनीं दिलेला स्वप्नाचा दृष्टान्त माझ्या

मतें फारच समर्पक आहे. संसार स्वप्नवत् आहे ही कल्पना **पिंडार, सोफोक्लीज, शेक्सपीअर** प्रभृति अनेक पाश्चात्य कवींच्या काव्यांतून आढळते; पण तिचें खरें तात्पर्य शंकराचार्यांप्रमाणें कोणींही दाखविलें नाहीं. ह्या मायेचें सत्स्वरूपी ब्रह्मावर दाट आवरण पडलें असल्यामुळें आपणास त्याचा विसर पडतो. हें अज्ञान दूर होण्यास निदिध्यासपूर्वक आत्मानुभवच साधन होय; केवळ तर्क अकिंचित्कर आहे. **पार्मीनाइडीस** आणि **प्लेटो** या ग्रीक तत्त्वज्ञान्यांचें असेंच मत झालें होतें. ह्या बाबतींत प्लेटोचे सिद्धान्त आणि वेदान्त ह्यांचें निकट साम्य आहे; तथापि प्लेटो व शंकराचार्य या दोघांनाही आपल्या मतांची तर्कद्वारा उपपत्ति करतां आली नाहीं. तें काम अर्वाचीन जर्मन ग्रंथकार **क्यांट** याणें केलें. दिशा, काल व कार्यकारणभावसंबंध या वस्तु बुद्धीचे विकार आहेत, त्यांना बाह्यास्तित्व मुळींच नाहीं, ही गोष्ट **क्यांट** आणि त्याचा अनुयायी **शोपेनहोर** या दोघांनीं निर्विवाद सिद्ध केली आहे. येणेंप्रमाणें जगताच्या मिथ्यात्वाविषयीं हिंदुस्थानांतील **शंकराचार्य** ग्रीसदेशांतील **प्लेटो** व जर्मनींतील **क्यांट** या तिघां महात्म्यांचें पूर्ण ऐक्य असलेलें पाहून कोणास आश्चर्य वाटणार नाहीं !

आत्मस्वरूपासंबंधानेंही वरच्यासारखाच द्विधा विभाग केला आहे; जीवात्मा आणि परमात्मा. माझा आत्मा मला प्रत्यक्ष भासत असल्यामुळें तो मिथ्या नाहीं, व अद्वितीय ब्रह्माहून भिन्न असल्यामुळें त्याला सत्यही ह्मणतां येणार नाहीं, असा उभयतः विरोध येतो. त्याचा परिहार करण्याकरितां व्यवहारदशेंत जीवात्मा परमात्म्याहून भिन्न; पण परमार्थतः ते दोन्ही एकच, अशी शंकराचार्यांनीं सुरेख व्ययस्था केली आहे. जीवाला ब्रह्माचा अंश, किंवा विकार, किंवा ब्रह्माहून भिन्न मानणारे वाल्लभ, रामानुज, माध्व, वगैरे वेदांताचे मागून पोटभेद उत्पन्न झाले; परंतु त्या सर्वांच्या सिद्धांतांचें शंकराचार्यांनीं अगोदरच अनुवाद करून खण्डन केलें आहे. तात्पर्य, जीव परमात्मस्वरूपच आहे, हाच सिद्धांत खरा होय. व तोच शंकरचार्य, प्लेटो, प्लोटिनास, क्यांट, शोपेनहोर या सर्वांस संमत झाला आहे. " अहं ब्रह्मास्मि " हें महातत्त्व सर्वांना कबूल आहे. पण शंकराचार्य बाकीच्यांपेक्षां आणखी पुढें गेले आहेत. ते म्हणतात, जीवब्रह्माचा

जर पूर्ण अभेद आहे, तर ब्रह्माप्रमाणे जीवही वस्तुतः निर्गुण निरहंकार असला पाहिजे. अर्थात् जरी संसारदशेत जिवाच्याठायीं उपाधीमुळें अहंकारादि भासले तरी ते मिथ्या असल्यामुळे कधीं तरी नाहींसे होतील, आणि जीवाचा परब्रह्मांत पूर्ण लय होईल. ही मुक्तीची कल्पना मात्र वरील पाश्चात्य तत्त्वज्ञान्यांच्या डोक्यांत आली नव्हती. आतां ह्या उपाधि कोणत्या असा एक प्रश्न उद्भवतो. एकादश इंद्रियें, पंचप्राण व अहंकार अशा सतरा वस्तु मिळून बनलेल्या सूक्ष्म शरीराला उपाधि म्हटले आहे. व जन्मजन्मांतरींच्या कर्मांच्या बळाने ही उपाधि आत्म्याला चिकटली असल्यामुळें जीवाला जन्ममरणादि परंपरा भोगावी लागते. ह्या उपाधीचें मूलकारण अविद्या होय. पण ती अविद्या कोठून आली हा प्रश्न राहतोच. येथें सर्व ग्रीक व हिंदु तत्त्वज्ञानी निरुत्तर होतात; परंतु **क्यांटने** मात्र त्याला समर्पक उत्तर दिले आहे. तो म्हणतो, हा प्रश्नच उद्भवत नाहीं, कारण कार्यकारणभावसंबंध ही वस्तुच अविद्येनंतर उत्पन्न झाली असल्यामुळें अविद्येच्या अगोदर ती शोधू जाणे मूर्खपणा होय.

आतां मरणानंतर काय स्थिती होते याविषयीं दोन शब्द सांगून हा विषय पुरा करितो. ऋग्वेदांत स्वर्गनरकाची कल्पना आहे; पण अनादि संसाराची कल्पना मागून उत्पन्न झाली. ह्या दुसऱ्या कल्पनेप्रमाणे एका जन्मांतील पापपुण्याचे बक्षीस स्वर्गनरकासारख्या भिन्न लोकांत न मिळतां पृथ्वीवरच पुढच्या जन्मांत मिळते. वेदान्त ग्रंथांतून ह्या दोन्ही कल्पनांची एकवाक्यता केली आहे. यज्ञयागादि पुण्यकर्मे करणारांना पितृयान, सगुण ब्रह्मोपासकांना देवयान, आणि पापी लोकांना एक मोघम 'तृतीय स्थान' असे तीन मार्ग सांगितलें आहेत. पितृयानमार्ग चंद्रलोकाप्रत जातो, व तेथें कर्मफलभोग संपल्यानंतर तो जीव पुनः खालीं येतो. देवयानमार्गानें जाणारे सगुण ब्रह्मापर्यंत पोंचतात, पण तेथून पुनः परत येत नाहींत. आणि ज्यांना निर्गुण ब्रह्माचा साक्षात्कार झाला असेल ते येथल्या येथेंच मुक्त होतात. बाकी राहिलेल्या तृतीय स्थानालाच पुढे पुराणादिकांतून रौरव नरकादि नांवें प्राप्त झालीं. ह्या सर्व गोष्टी अर्थात् संसाराप्रमाणें व्यवहारदशेत मात्र खऱ्या आहेत, परमार्थतः त्याही खोट्याच. शुद्ध ब्रह्मा-

च्या दृष्टीने विचार केला म्हणजे जन्ममरणादि ज्याप्रमाणें मिथ्या आहेत. तसाच मोक्षही मिथ्याच. " भिद्यते हृदयग्रंथिश्छिद्यन्ते सर्व सशयाः। क्षीयन्ते चास्य कर्माणि तस्मिन्दृष्टे परावरे ॥ " येणेंप्रमाणे एकदां परब्रह्मसाक्षात्कार झाला, म्हणजे, जन्म नाहीं, मृत्यु नाहीं, संसार नाहीं व मोक्षही नाहीं. चांगलीं व वाईट दोन्ही प्रकारचीं कर्मे जीवाला बंधनकारक असल्यामुळें टाकून दिलीं पाहिजेत, असे वेदान्ताचे मत आहे. येणेप्रमाणें सदाचरणाचाही निषेध केल्याबद्दल कित्येक लोक वेदान्ताला दोष देतात परंतु ही त्यांची चूक आहे, वेदान्तग्रंथांतून अतिश्रेष्ठ नीति सांगितली आहे. ख्रिस्ती लोकांचे पवित्र शास्त्र स्वतःप्रमाणेच शेजाऱ्यांवर प्रीति करा असे सर्व लोकांस सांगतें मात्र; परंतु सुखदुःखे केवळ मलाच भोगावीं लागत असतां मीं दुसऱ्यावर कां प्रीति करावी, असा प्रश्न केला असतां बायबलांत उत्तर मिळत नाहीं. तें अद्वैतवादी देऊ शकतो. कारण "तत्त्वमसि,, ह्या महावाक्यानुसारें माझा आणि दुसऱ्याचा आत्मा वस्तुतः एकच आहे, भेद वाटतो तो मायामूलक आहे; तो नाहींसा करून दुसऱ्याला आपणासारखेच मानणे हें प्रत्येकाचें कर्तव्य होय. आपपरभाव नष्ट झाल्यावर "न हिनस्त्यात्मनात्मानं" या भगवद्गीतावचनाप्रमाणे दुसऱ्यावर प्रीति कर असें निराळें सांगण्याची जरूरच नाहीं. अशी तादात्म्यबुद्धि ज्याची झाली तोच खरा जीवन्मुक्त होय. मग तो जगांत राहिला तरी त्याला संसारबाधा होत नाहीं. त्याचे शरीर जरी येथें असलें तरी तो ब्रह्मात मिळून जातो. ज्याप्रमाणें नद्या अनेक दिशांनीं वाहात येऊन समुद्रांत मिळाल्यावर स्वतःचे नामरूप टाकून देतात, त्याचप्रमाणे विद्वान पुरुषहि जीवभाव टाकून ब्रह्मरूप होतो. ह्या अत्यंत उदात्त व शुद्ध मतापासून इहलोकींच्या कष्टमय संसारयात्रेंतून समाधानवृत्तीनें पार पडून जाण्यास किती साहाय्य होते ह्याची सहज कल्पना होण्यासारखी आहे. सुदैवाने हिंदुलोकांना हे अमोल तत्त्वज्ञान प्राप्त झालें आहे त्याचा तुम्ही अव्हेर करू नका, असा डयूसनसाहेबांनीं शेवटीं सर्व लोकांस आग्रहाचा उपदेश केला. तो सर्वांनीं व विशेषकरून आमच्या पुरातन धर्माचा उपहास करणाऱ्या अर्वाचीन पंडितमंन्यांनीं ध्यानांत ठेवण्यासारखा आहे. डा. डयूसनसारखा युरोपियन गृहस्थ अतिप्रयासाने वेदान्त

ग्रंथांचें अध्ययन करून त्यांतील तत्त्वज्ञानानें आपल्या चित्ताची शांति करून घेतो; इतकेंच नाहीं, तर शेंकडों कोसांवरून हिंदुस्थानांत येऊन आम्हांलाही तसाच उपदेश करितो, हें त्याला जितकें भूषणावह आहे तितकेंच आम्हांला लाजिरवाणें आहे. परकीयांनीं आमचीं पोथ्यापुस्तकें घेऊन जावीं वेदादिकांचें पठण करावें, त्यांतील रहस्य समजून घेऊन आमच्या पूर्वजांचे गुणानुवाद गावे, व आह्मी मात्र त्याच पूर्वजांचा उपहास करावा, त्यांचे ग्रंथ वाण्याकडे पाठवावे व परकीयांच्या दिखाऊ आचारविचारांस भुलून स्वेच्छाचारी बनावे हें पाहून कोणालाही खेद वाटल्यावांचून राहाणार नाहीं.

डा० डयूसनसाहेबांनीं आह्मांस काहीं नवीन गोष्टी सांगितल्या असें नाहीं; तथापि आमचा आम्हांसच विसर पडल्यामुळें त्या आता नवीन भासूं लागल्या आहेत. स्वतःचें तोंड दिसत नसल्यामुळें जशी आरशाची जरूर लागते त्याचप्रमाणें आमचींच शास्त्रें युरोपियन लोकांपासून शिकण्याची आह्मांस आतां पाळी आली आहे ! एका अर्थीं हेंही इष्टच मानलें पाहिजे. जे सिद्धांत मुळ संस्कृत ग्रंथांत असतांना कवडीमोल वाटतात तेच एकाद्या गौरकायाच्या तोंडून व इंग्रजीसारख्या पवित्र भाषेंत ऐकले ह्मणजे आमच्या सुशिक्षित लोकांस ग्राह्य वाटतात ! अशी चमत्कारिक स्थिति झाली असल्यामुळें डयूसनसारख्यांनीं येथें येऊन आह्मांस आमच्याच अद्वैतमताचा उपदेश केल्याबद्दल त्यांचे आभार मानणें जरूर आहे. असो. ह्या अत्यंत महत्त्वाच्या विषयाकडे आजपर्यंत फार दुर्लक्ष झालें; सबब तो हातीं घेण्याचें आह्मीं योजिलें आहे. प्राचीन वेदांतसिद्धांतांची आधुनिक विचारांशीं एकवाक्यता करण्याचा आमचा मुख्य उद्देश आहे. पुढील विवेचनांत कोठें अभिनवत्व असल्यास त्याची जबाबदारी आमच्यावरच आहे हें येथें सांगावयास पाहिजे असें नाही.

---

## अध्याय दुसरा.

# धर्मसुधारणेचा समेट.*

**वेदान्तविज्ञानसुनिश्चितार्था संन्यासयोगाद्यतयः शुद्धसत्वाः ॥**
**ते ब्रह्मलोकेषु परान्तकाले परामृताः परिमुच्यन्ति सर्वे ॥**

मुंडकोपनिषत्.

पंचदशीकारांनीं सांगितलेल्या 'दशमस्त्वमसि' दृष्टांतांतील आपणास विसरणाऱ्या दीड शहाण्या गृहस्थाप्रमाणें सध्यां आमची स्थिति झाली आहे. दहा असामी नदींतून पोहून गेल्यावर सर्व सुरक्षित आले कीं नाहीं हें पाहण्याकरितां त्यांपैकीं प्रत्येकजण स्वतःला सोडून नऊ जणांनाच मोजी. येणेप्रमाणें नऊ असामीच जिवंत आहेत, व कोणीतरी एक नदींत बुडाला असें पाहून सर्वजण दुःख करूं लागले; पण कोण हरवला हें एकालाही उमगेना. अशी हल्लीं धर्माच्या बाबतींत आम्हा हिंदुलोकांची अवस्था झाली आहे. खांद्यावर मुलगा असून गांवभर धुंडणाऱ्या बापाप्रमाणें, अत्यंत शुद्ध, उदात्त व सत्य अशीं धर्मतत्त्वें आमच्या हस्तगत असतां आम्हीं परकी धर्मांत व विदेशी तत्त्वज्ञान्यांच्या ग्रंथांत त्यांचा शोध करूं लागलों आहों. हंसक्षीरन्यायानें हरएक धर्मांतील चांगला तेवढा अंश ग्रहण करण्याचा आव घालणारे समाजिष्ट पितृपितामहागत हिंदुधर्माला मात्र वगळतात ! त्याचप्रमाणें धर्ममाताचा उपहास करणारी आमच्यापैकीं होतकरू नास्तिक मंडळी मिल्ल स्पेन्सरादिकांचें कोरडें गौरव करण्यांत गुंग होऊन, त्याच विषयासंबधानें आमच्या प्राचीन ऋषिवर्यांनीं काय सिद्धांत काढले आहेत ते पाहाण्यास मुदलींच विसरते. तत्त्वशोधनाची इच्छा करून सर्व जगावरील धर्मपुस्तकें पुष्कळजण पालथीं घालीत आहेत; पण आमच्या प्राचीन श्रुतिस्मृत्यादिकांच्या पोथ्याही कसरीच्या तोंडून सोड-

---

* केसरी ता. १४ मार्च १८९३.

विण्याकडे कोणाचें लक्ष जात नाहीं ! व ही स्थिति आधुनिक आंग्लविद्याविभूषित लोकांतच आढळते असें नाहीं, तर जुन्या हिंदुधर्माभिमानी म्हणविणाऱ्या पुराणप्रिय गृहस्थभिक्षुकमंडळींत देखील तितकीच किंबहुना त्याहूनही अधिक अनास्था दृग्गोचर होते. ह्या दुसऱ्या प्रकारच्या लोकांत तोंडीं धर्माभिमानाचीं रेलचेल असते; पण हिंदुधर्मांतील रहस्य स्वतः समजून घेण्याविषयीं किंवा इतरांना समजून देण्याविषयीं प्रयत्न करण्याच्या नांवानें मात्र पूज्य ! एका वर्गाला हिंदुधर्म म्हणजे पुराणांतल्या भाकडकथा व हरएक सामाजिक व्यंगांचें माहेरघर वाटतें; तर दुसरा वर्ग आमचा सर्व धर्म खाण्यांपिण्यांत व निजण्याउठण्यांतच येऊन बसला आहे असा आग्रह धरणार. खंडोबापुढें नारळ ठेवण्यास सांगतो म्हणून एकाच्या दृष्टीनें तो कुचकामाचा ठरतो , व चहाच्या पेल्यांत धर्म बुडाल्याबद्दल दुसरा आक्रोश करतो.* एकूण विचाऱ्या हिंदुधर्माची दोन्ही घरच्या पाहुण्याप्रमाणें मधल्यामध्यें हेळसांड होत आहे ! हिंदुधर्मांतील बीज काय, त्यांतील प्रधानभूत सिद्धांत कोणते, व आनुषंगिक कोणते, आमच्या श्रुतिस्मृत्यादि आर्ष ग्रंथांचें तात्पर्य काय खऱ्या हिंदूंचीं कर्तव्यें काय, चालू प्रचारांपैकीं शास्त्रीयविहित कोणते, व गर्हित कोणते, तसेंच आवश्यक कोणते व वैकल्पिक कोणते, वगैरे गोष्टींचा विचार करून वेळोवेळीं धर्माला चालन द्यावें लागतें ही गोष्ट एकाही पक्षाच्या अजून ध्यानांत येत नाहींसें दिसतें. मळीण झालेल्या सुवर्णपात्राला मृद्भाण्ड समजून एकजण तें फेंकून देतो, व दुसरा त्याचा भलत्याच कामीं उपयोग करतो- इतकाच काय तो दोन्ही पक्षांत भेद आहे. बाकी खऱ्या सुवर्णाची परीक्षा एकालाही नाहीं. ज्या भरतखंडांत याज्ञवल्क्य जनकादिकांसारखे महायोगी आत्मानात्माविचार करण्यांत आयुष्यें घालवीत असत, तेथेंच आतां खाद्यपेयासारख्या क्षुल्लक बाबतींकरितां तुंबळ रणें पडूं लागलीं आहेत, हें पाहून कोणास वाईट वाटल्यावांचून राहाणार नाहीं? रिकामटेंकडया येशुपुत्रांनीं आपल्या तुटपुंज्या धर्मज्ञानाची शिदोरी सात समुद्रांपलीकडून येऊन आह्मापुढें मांडावी, व

---

* त्यावेळीं पुण्यास माजलेल्या चहाग्रामण्याला हा उल्लेख आहे.

आह्मीं आपलें स्वतःचें सर्व भांडार कडीकुलुपांत अडकवून ठेवून हताश होत्साते विधर्मीयांच्या निंदा व उपहास निमूटपणें सोशीत बसावें ह्यापेक्षां आमच्या अजागळपणाचें दुसरें चिन्ह तें कोणतें ? वस्तुतःआह्मींच आपल्य स्वताःची ओळख विसरलों तर दुसऱ्यांनीं तरी कां ठेवावी ? ख्रिस्ति मुसलमान, बौद्ध, वगैरे सर्व धर्मांचे लोक स्वमतप्रसारार्थ उद्योग करीत असतां आह्मी हिंदुधर्माचा प्रसार तर राहिलाच, पण बचाव करण्यापुरतेंही त्याचें ज्ञान संपादन करीत नाहीं ! विधर्मीयांनीं हिंदुधर्मावर आणलेल्या आक्षेपांना समर्पक उत्तर देणें तर एकीकडेच; उलट शुष्क ग्रामण्यांनीं आपआपसांत कलह माजवून जगापुढें आपल्या मूर्खपणाचें 'बडें प्रदर्शन मात्र आम्ही मांडतों; आणि तेणेंकरून आपणच आपला उपहास करून घेतों. इतरांबरोबर शर्यती पळावयाचें सोडून उलट आपले हातपाय तोडून टाकण्यासारखेंच हें कृत्य नव्हे काय ? मोक्षमुल्लर भट्टानीं आमच्या वेदाचा अर्थ आम्हांस शिकवावा, व आल्काट ड्यूसन प्रभृति गौरकायांनीं हजारों कोसांवरून येथें येऊन हिंदुधर्मांची प्रशंसा करावी; आणि आम्ही मात्र आम्हांला शास्त्र कळत नाहीं असें मोठ्या डौलानें भर सभेंत सांगावें किंवा इतरांनीं केलेल्या प्रशंसेस आमचा धर्म अगदीं अपात्र आहे असें आपल्याच वाणीनें नाहीं तर आचरणानें जगांस विदित करावें, हा सृष्टि-विरुद्ध क्रम आमच्या मतें फक्त हिंदुस्थानांतच सांपडेल. इतर सर्व लोकांस आपापल्या बऱ्या वाईट धर्माचा अभिमान असतो; पण अम्हांला फाल्गुन वद्य प्रतिपदेप्रमाणें आपलें नैसर्गिक सुंदर शरीर मुद्दाम चिखलानें माखण्यांतच हौस वाटते. तात्पर्य 'आपलें आपणाचि ओळखावें.' ह्या साधुवचनाचा उपदेश आमच्यांतील जुन्या नव्या सर्व लोकांच्या मनावर ठसेल असा कांहीं तरी उपाय योजणें अत्यंत अवश्यक झालें आहे. " आत्मज्ञानविहीना मूढास्ते पच्यन्ते नरकनिगूढाः " ही आचार्योक्ति प्रत्येकाच्या अंतःकरणावर बिंबल्याशिवाय परवशतेपेक्षाही अधिक दुःसह अशा स्वतिरस्कारपूर्वक परानुकरणप्रवृत्तिरूप नरकापासून आमची कधीं ही सुटका व्हावयाची नाहीं. ह्याच उद्देशानें प्रो. डयूसनसाहेबाच्या सुंदर व्याख्यानाचा सारांश आम्ही मागील भागांत दिला होता. परंतु तें व्याख्यान केवळ तत्त्वप्रतिपादक

असल्यामुळें तेवढ्यानें सर्व प्रकारच्या लोकांचें व विशेषेंकरून आधुनिक सुशिक्षित म्हणविणाऱ्या वर्गाचें समाधान होण्याचा संभव नाहीं सबब हिंदुधर्माचा शिरोभूत जो वेदांत त्याचें उत्तमत्व दाखविण्याकरितां कांहीं लेख लिहिण्याचें आह्मीं योजलें आहे.

प्रथमतः कोणी अशी शंका काढील कीं आजपर्यंत हजारों संस्कृत प्राकृत ग्रंथांतून ह्या विषयाचा काथ्याकूट झाला असतां पुनः हा विषय हातीं घेण्याचें प्रयोजन काय ? छांदोग्यादि उपनिषदांच्या काळापासून तो अलीकडील बायाबापड्यांस उपदेश देणाऱ्या हरदास पुराणिकापर्यंत कोट्यावधि लोक वेदांत विषयाचें पिष्टपेषण करीत आले आहेत; शेंकडों मतांतरें उपस्थित होऊन त्यांच्या वितंडाकलहानें ग्रंथचे ग्रंथ भरले आहेत; व हल्लीं कलियुगांत तर फाल्गुनोत्सवांतलि बालकांप्रमाणें जिकडे तिकडे वेदांत्यांचा सुळसुळाट झाला आहे. तेव्हां ह्या कंटाळवाण्या झालेल्या विषयासंबंधानें तुम्ही आणखी नवें तें काय सांगणार ? असा कोणी प्रश्न केल्यास तो अगदींच गैर होईल असें नाहीं. त्याला आमचीं अनेक उत्तरें आहेत. एक तर वेदांतग्रंथांतून जरी ह्या विषयाचें पुष्कळ विवेचन असलें तरी ते ग्रंथ समजून वाचणारे हल्लीं क्वचित्च आढळतात. प्रत्येक ख्रिस्तधर्मानुयायी मनुष्य दर रविवारी बायबलाची आवृत्ति करतो; पण जन्मांतून एकदां तरी भगवद्गीता मुळांतून नाहीं तर भाषांतरद्वारा वाचलेले आमच्यांत किती आढळतील ?* हरदासाचा वेदांत तर आख्यानांत व पेटीच्या सुरांत अलीकडे लुप्तप्रायच झाला आहे, आणि पुराणिकबुवांनींहि तांदुळ सुपारी देखील मिळेनाशी झाल्यामुळें हलुहलु पोथी गुंडाळण्याचाच मार्ग स्वीकारला आहे दुसरें, वरील ग्रंथांतील विचारप्राचुर्यच कांहीं अंशीं त्याच्या मुख्य उद्देशाला विघातक झालें आहे. कारण तेणेंकरून पूर्वपक्षोत्तरपक्षरूपी तर्कजालां-

---

* गेल्या ३० वर्षांत या संबंधानें पुष्कळ अभिनंदनीय प्रगति झाली आहे. गोडसे, कान्हेरे रहाळकर यांच्या पुराणांनीं भगवद्गीता सर्वतोमुखी केली, व लो. टिळकांच्या 'गीतारहस्या' नें तर फारच मोठें कार्य केलें आहे.

ऱ्या भाराखालीं मुख्य सिद्धांत अजिबात लोपून जाऊन अवांतर मुद्यालाच फाजील महत्व आलें आहे. शांकरभाष्यासारख्या ग्रंथांतही महावाक्यचतुष्कापेक्षां पंचाहुती प्रतिपादक वाक्यांचा अधिक विचार आढळतो, व सगुणोपासनेचें फाजील बंड वाढविलें असल्यामुळें निर्गुणब्रह्मापर्यंत जाऊन पोंचणें बिचाऱ्या मुमुक्षूस फार अवघड जातें. तेव्हां हें मागून वाढलेलें कोटिक्रमाचें जंगल तोडून टाकून आद्यसिद्धांत लोकांच्या मनावर बिंबविणें प्रस्तुतकाळीं फार अगत्याचें झालें आहे. पंचख्यातिवाद' अजातवाद, पट्प्रमाणवाद इत्यादि दर्शनकारांमधील वादविषयक अवांतर मुद्यांचा जो सविस्तर ऊहापोह प्राचीन ग्रंथांत केलेला आढळतो, त्यांतील बराच भाग अलीकडील शास्त्रीय शोधांनीं गतार्थ झालेला आढळेल. सबब त्याला फांटा देऊन नवीन उद्भवणाऱ्या शंकांना नवीन समाधानें तयार केलीं पाहिजेत. पण आज हा विषय हातीं घेण्याचें मुख्य कारण हल्लींच्या काळीं त्याचें ज्या तऱ्हेचें विवेचन जरूर आहे तसें तें वरील ग्रंथांतून मुळींच केलेलें नाहीं, व केलें जाण्याचा संभवही नव्हता. ज्या वेळेस हरएक बाबतींत वेदवाक्य प्रमाण मानलें जात होतें तेव्हां प्रत्येक उपनिषद्वाक्याचा अद्वैतांत समन्वय करणें ठीक होतें; व एकादशसुत्रीनें पूर्ण ब्रम्हज्ञान होईल हें म्हणणेंही अंशतः बरोबर होतें. पण अर्वाचीन तार्किकापुढें तें सर्व पांडित्य निरुपयोगी होय. तसेंच प्रस्तुतकाळीं अद्वैतमताची सत्यता व उत्तमत्व दाखविण्याकरितां त्याची इतर धर्मांशीं व तत्त्वज्ञानांशीं तुलना केली पाहिजे इतकेंच नाहीं; तर त्याचा ऐतिहासिकदृष्ट्या, व नैतिकदृष्टयाही विचार केला पाहिजे. पण हें प्राचीन ग्रंथात मुळींच नाहीं. त्याबद्दल त्या ग्रंथकारांना दोप देतां येणार नाहीं हें खरें, कारण त्याची त्यानां जरूरच भासली नव्हती. पण हल्लीं असल्याच विवेचनाला विशेष मान आहे तेव्हां जर अद्वैतमताचें महत्व आधुनिक लोकांच्या मनांत बिंबाविणें इष्ट असेल, तर ह्या नवीन बाजूनें त्याचा विचार करणें अत्यंत आवश्यक आहे, असें कोणीही कबूल करील. हें काम सविस्तर रीतीनें व यथायोग्यपणें बजावण्यास कोणी महान् तत्त्ववेत्ता आमच्यांत उत्पन्न झाला पाहिजे, किंवा निदान अनेक विद्वानांचा त्या कामीं सहोद्यम तरी पाहिजे वर्तमानपत्रकारासारख्यांना तितका अवकाश नाहीं

व योग्यताहि नाहीं. तथापि ह्या अत्यंत महत्वाच्या विषयाकडे लोकांचें लक्ष लागण्यास कोणी तरी पुढाकार घेतलाच पाहिजे सबब त्याचें यथामति दिग्दर्शन मात्र करण्याचा आम्ही पत्कर घेतला आहे.

आमचा पहिला सिद्धांत हा कीं, औपनिषददर्शन हेंच हिंदुधर्माचें यथार्थ व शुद्ध स्वरूप होय. व तें श्रीशंकराचार्यप्राणित ग्रंथांत दाखविलें आहे तसेंच घेतलें पाहिजे. कर्मकाण्ड, भक्ति, ह्यांसारखे ईश्वरोपासनेचे स्वतंत्र मार्ग, सांख्य, तार्किक, माध्व वगैरे द्वैतप्रयुक्त दर्शनें, व रामानुज, वाल्लभ वगैरे अद्वैतमताचीं रूपांतरें, इत्यादि हिंदुधर्माखालीं मोडणारे अनेक पंथ पूर्वी होते, व अजूनही शेंकडों आहेत. पण एक तर प्रस्तुत प्रसंगीं धर्माच्या आद्यसिद्धांतासंबंधानेंच आम्हांला विचार कर्तव्य असल्यामुळें अवांतर मुद्यां-वरील मतभेदामुळेंच उत्पन्न झालेल्या ह्या इतर पंथांचा उल्लेख करण्याची जरूर नाहीं; व दुसरें त्या सर्वांपेक्षां शांकरमतच श्रेष्ठ व म्हणून हिंदुधर्माचें शुद्ध स्वरूप मानलें जाण्यास कां पात्र आहे याला पुष्कळ कारणें देतां येतील. उदाहरणार्थः—

१ शांकरमताइतकें दुसरें कोणतेंही दर्शन किंवा पंथ सर्व हिंदुंनीं पूज्य मानलेल्या श्रुतिस्मृत्यादि ग्रंथांशीं संगत नाहीं; व शंकराचार्यांप्रमाणें दुसऱ्या कोणत्याही आचार्यांनीं एकंदर श्रुतिवाक्यांची समाधानकारक एकवाक्यता केलेली नाहीं.

२ माध्वादि इतर आचार्यांना पुष्कळदां स्वमतपुष्ट्यर्थ श्रुतिवाक्यांचा आधार न मिळाल्यामुळें पुराणादि पौरुषेय ग्रंथांतून वचनें द्यावीं लागतात तसा शंकराचार्यांना कधींही प्रसंग येत नाहीं. त्यांच्या प्रत्येक विधानाला आधारभूत श्रुतिवाक्य आढळतें.

३ शांकरसांप्रदायांत जितके भामती पंचदशीसारखे सर्वमान्य ग्रंथ, व सुरेश्वर, हस्तामलक, विद्यारण्य प्रभृति विद्वान् ग्रंथकार होऊन गेले तितके दुसऱ्या पंथांत झालेले नाहींत.

४ इतर सर्व पंथांपेक्षां शांकरमत अधिक प्राचीन व व्यापक आहे, इत-केंच नाहीं तर हल्लींही डयूसनसाहेबांनीं म्हटल्याप्रमाणें एकंदर हिंदूपैकीं शेंकडा पाऊणशें किंबहुना अधिक लोक शांकरमतानुयायी सांपडतील.

५ धर्मसंबंधानें उद्भवणाऱ्या प्रश्नांचा शंकराचार्यांनीं जितका पूर्ण व्यापक व समाधानकारक विचार केला आहे तितका इतर संप्रदायग्रंथांत तर नाहींच पण ख्रिस्ती, बौद्ध वगैरे परकी धर्मांतही क्वचितच केलेला सांपडेल. त्यामुळें बाकीचे संप्रदाय शांकरमताचीं केवळ अर्धवट व अपूर्ण रूपें असल्यासारखीं दिसतात.

६ अधिकारी भेदानें सर्वांचा अंतर्भाव करण्याची व कालस्थलानुरूप संकोच विकास पावण्याची शांकरसिद्धांताप्रमाणें इतर पंथांत किंबहुना पृथ्वीवरील दुसऱ्या कोणत्याही धर्मांत शक्ति नाहीं.

तात्पर्य, धर्माच्या चिरस्थायित्वाला आवश्यक असलेला जो लवचीकपणा तो अद्वैत मतांत पूर्णपणें भरला असल्याकारणानें इतर संप्रदाय नष्ट झाले किंवा होण्याच्या मार्गास लागले तरी अद्वैत मत येथें अजून जिवंत आहे; इतकेंच नाहीं तर अन्य देशांतूनही पसरत आहे. म्हणूनच आम्हीं त्याला आद्यस्थान दिलें, व इतर धर्मांशीं तुलना केली असतां हिंदुधर्माकडे जें श्रेष्ठत्व येतें तें त्याच्या योगानेंच. इतर सुधारलेल्या देशांत धर्म आणि तत्त्वज्ञान ह्यांमध्यें नेहमीं लढाई चालू असते, व जसजसा विद्याप्रसार वाढत जातो तसतसें तत्त्वज्ञानाचें पाऊल पुढें पडून धर्माचा पाडाव होतो; परंतु आमच्या दूरदृष्टि ऋषींनीं अद्वैतरूपी उदात्त तत्त्वज्ञानाच्या पायावर हिंदुधर्माची सर्व इमारत उठविल्यामुळें सदहू विरोध नाहींसा होऊन लढाईचें मूळच अजीबात खुंटलें. व तेणेंकरून विद्याप्रसाराबरोबर तत्त्वज्ञानाचा व धर्माचाही सारखाच उत्कर्ष होत गेला. हिंदुस्थानच्या व इतर देशांच्या सुधारणेतिहासांत मोठा फरक दिसून येतो तो येथेंच. ख्रिस्ती, मुसलमानी देशांतून धर्म व सुधारणा ह्यांचें व्यस्त परिमाण आढळतें, पण हिंदुस्थानांत त्या दोघांचें परस्परांस आजपर्यंत साहाय्यच होत आलें आहे, व पुढेंही होईल. हिंदुलोक सर्वांच्या अगोदर सुधारणेच्या शिखरास जाऊन पोंचले ह्याला जसा त्यांचा श्रेष्ठ धर्म कारण झाला, तसेंच अजूनही इतर राष्ट्रांपेक्षां ते अधिक धार्मिक आहेत ह्याला त्यांचा धर्मभोळेपणा किंवा मूर्खपणा निमित्त नसून प्राचीन सुधारणाच कारण झाली असें सूक्ष्म विचारांतीं दिसून येईल.

सारांश धर्म आणि सुधारणा ह्यांच्यामध्यें इतर देशांत जसा विरोध आढळून येतो तसा येथें नाहीं, हा महासिद्धांत आमच्यांतील प्रत्येकानें ध्यानांत ठेवला पाहिजे. तो न उमगल्यामुळेंच धर्माभिमानी व सुधारक असा हल्लीं मिथ्या भेद उत्पन्न झाला आहे. सुधारणा झाली असतां धर्म बुडेल अशी जुन्या लोकांची समजूत झाली आहे, व हिंदुधर्म आपल्या सुधारणेला आड येतो असें सुधारकांना वाटतें. पण हे दोन्ही ग्रह वस्तुतः चुकीचे आहेत. कारण अद्वैतवाद्यांच्या मताप्रमाणें सर्व द्वैत मिथ्या असल्यामुळें हिंदुधर्म आणि सुधारणा ह्यांचेंही पूर्ण तादात्म्य मानलें पाहिजे. " यत्र हि द्वैतामव भवति तदितर इतरं पश्यति " ( जेथें द्वैतभाव भासतो तेथें एक दुसऱ्याला निराळा पहातो ) हें तत्त्व प्रस्तुत विषयांतही लागू पडेल. तात्पर्य आमच्यांतील जुन्या नव्यांचा कलह मोडून टाकून अद्वैतप्राप्ति करून घ्यावयाची असेल तर हा धर्मसुधारणेचा विरोध मिथ्या आहे, व वस्तुतः दोघांची एकमेकांला अतिशय जरूर आहे अशी जुन्या नव्या प्रत्येक मनुष्यानें आपली खात्री करून घेतली पाहिजे.

---

## अध्याय तिसरा.

## अद्वैत मताचा इतिहास.*

**को अद्धा वेद क इह प्रवोचत्कुत आजाता कुत इयं विसृष्टिः ॥**

**अर्वाग्देवा अस्य विसर्जनेनाथा को वेद यत आबभूव ॥ १ ॥**

ऋग्वेद मं. १० सू. १२९ ऋ. ६.

मागिल भागांत अद्वैतमत हेंच हिंदुधर्माचें खरें स्वरूप आहे असा सिद्धांत स्थापन केला. व माध्वरामानुजादि इतर संप्रदायांपेक्षां शांकरमता-

---

* केसरी ता. २१ मार्च १८९३

लाच हा मान कां दिला पाहिजे ह्याचीं कारणेंही सांगितलीं. प्राचीन सांख्य-योगापासून तों अर्वाचीन वारकरी मंडळीच्या भक्तिमार्गापर्यंत किंवा त्याहूनही अलीकडील अर्धवट ख्रिस्ती समाजिष्टांच्या साप्ताहिक प्रार्थनेपर्यंत लाखों मतें, प्रक्रिया, व संप्रदाय ह्या भरतखंडांत आजतक प्रादुर्भूत झाले. त्यांपैकीं कित्येक उत्पन्न—विनष्ट झाले, व कित्येक संस्कृत तत्त्वग्रंथांतून नामशेष मात्र राहिले आहेत. कित्येकांचें पहिलें उदात्त स्वरूप जाऊन त्यांस अडाणी धर्मभोळ्या किंवा लबाड लोकांच्या हातीं सांपडल्यामुळे अति निकृष्टावस्था प्राप्त झाली आहे, व कित्येक तुरळक ठिकाणीं लहानमोठ्या जनसमूहांत जेमतेम जीव धरून राहिले आहेत इतकेंच. परतु अद्वैतमत मात्र पहिल्यापासून आहे तसेंच अजून जागृत आहे. किंबहुना अगदीं आरंभापासून हिंदुधर्माचा इतिहास पाहिला तर आजपर्यंत उद्भवलेले बहुतेक पंथ व संप्रदाय बाह्यतः विरोधी वाटले, तरी वस्तुतः अद्वैतसिद्धांताच्याच पायावर उभारले आहेत असेंही सिद्ध करतां येईल. डयूसनसाहेबांनीं शेंकडा पाऊणशें लोक शांकरमताचे आहेत असें म्हटलें; पण एका दृष्टीनें हिंदुमात्र अद्वैतानुयायी आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. ज्याप्रमाणें ख्रिस्तीधर्मांत अवांतर मतभेदानें निरनिराळे शेंकडों पंथ झाले असले तरी त्या सर्वांना साधारण अशीं कांहीं मतें आहेत, व म्हणूनच ख्रिस्ती असें साधारण नांव सर्वांना देण्यांत येतें; त्याचप्रमाणें हिंदुधर्मांतही अनेक पंथ असले तरी जगदुत्पत्ति, कर्तृस्वरूप, आत्मा, मुक्ति इत्यादिकांसंबंधाचे धर्मबीजरूपी सिद्धांत सर्व पंथांमध्यें तुल्यरूप आढळतात. ह्या निरनिराळ्या पंथांनीं पूज्य मानलेल्या ग्रंथांची एकवाक्यता सहज होऊं शकते, व ती केली असतां त्या सर्व ग्रंथांचें शेवटीं अद्वैतांत पर्यवसान होतें, असेंही सिद्ध करतां येईल. बौद्धधर्माच्या काळापर्यंत हिंदुस्थानांत वेद, ब्राह्मणें, उपनिषदें, स्मृती, पुराणें वगैरे जे धर्मग्रंथ झाले, त्यांची एकवाक्यता शंकराचार्यांनीं केली व त्यामुळेंच त्यापूर्वींच्या मतांतरांचा उच्छेद होऊन जिकडे तिकडे अद्वैतमताचा प्रसार झाला. पण आचार्यांच्या मागून गेल्या हजार वर्षांत जे अनेक पंथ व संप्रदाय उद्भवले, त्यांसंबंधानें असा प्रयत्न झालेला नाहीं. हल्लीं धर्मसंबंधानें घोंटाळा व बेबंदशाही इतकी माजण्याचें बहुशः हेंच कारण

असावें. आद्य शंकराचार्यांनीं दिग्विजय करून चार दिशांस चार जगद्-गुरुमठांची स्थापना केली; पण हल्लीं प्रत्येक गांवांत नाहीं, तरी प्रत्येक जातींत निराळा शंकराचार्य झाला आहे. तेणेंकरून पूर्वींचें धर्मैक्य नष्ट होऊन सर्व धार्मिक व नैतिक बंधनें शिथिल झाल्यामुळें घराचे वांसेच एकमेकांशीं भांडतात अशी हिंदुसमाजाची स्थिति झाली आहे. अलीकडील ग्रंथकारांचा व मतवाद्यांचा कल बहुधा परस्परविरोध दाखवून कलह वाढविण्याकडे विशेष दिसून येतो. पण सर्व मतांतील असत्य व त्याज्य भाग टाकून देऊन त्यांची एकवाक्यता करण्याचा कोणीं प्रयत्न केलेला दिसत नाहीं. वस्तुतः अशी एकवाक्यता करणें हाच जीर्णप्राय झालेल्या धर्माला पुनः चालन देण्याचा खरा मार्ग होय. प्राचीन काळीं जे जे धर्म-संस्थापक आचार्य झाले, त्यांनीं हाच मार्ग पत्करला व म्हणूनच त्यांचे हेतु तडीस गेले. ब्रह्मसूत्रकारांनीं सर्व श्रुतींचा समन्वय व स्मृतींचा अविरोध दाखविण्याकरितां जो इतका खटाटोप केला आहे तो केवळ निरर्थक नव्हता. तेणेंकरून धर्मसंबंधीं विचार करण्याची खरी दिशा त्यांनीं पुढील पिढीस दाखवून दिली असें म्हटलें तरी चालेल. भगवद्गीतेंत श्रीकृष्णांनीं देखील तशाच प्रकारचा सांख्ययोगादि प्रधानमताचें ऐक्य करण्याचा प्रयत्न केला आहे, व पुढें शंकराचार्यांनींही त्याच रीतीचें अवलंबन केलें. " येन त्वंशेन न विरुध्यते तेनेष्टमेव सांख्ययोगस्मृत्योः सावकाशत्वम् " ( ज्या बाबतींत सांख्य व योगदर्शनें आमच्या विरुद्ध नाहींत तेवढ्या अं-शानें आम्हाला तीं मान्य आहेत) असें "एतेन योगः प्रत्युक्तः' ( ब्रह्मसू० २-१-४ ) ह्या सूत्राच्या भाष्यांत सांख्ययोगमतासंबंधानें आचार्यांनीं म्हटलें आहे, व त्यालाच अनुसरून सर्व ठिकाणीं त्यांचें प्रतिपादन असतें. भागवतदर्शनाचें खंडन करतांनाही अधिगमनादिपूर्वक ईश्वराराधना, भक्ति, इत्यादि यांच्या मतांचा व्यावहारिक उपयोग आचार्यांनीं प्रांजलपणें कबूल केला आहे. इतकेंच नाहीं, तर जैनबौद्धप्रभृति वेदबाह्य मतांतीलही चांगला अंश ग्रहण करण्यास त्यांनीं मागेंपुढें पाहिलें नाहीं, ह्याची ' प्रच्छन्नबौद्ध ' असें शंकराचार्यांना त्यांच्या शत्रूंनीं दिलेलें उपपदच चांगली साक्ष देतें. मात्र अशा रीतीनें हंसवृत्तीचें अवलंबन करतांना,

अनेक धर्मांतील तुकडे तुकडे वेंचून बनविलेल्या गोधडीवजा अर्वाचीन केशवचंद्री नवसंहितेप्रमाणें, किंवा आमच्या इकडील समाजिष्टांच्या अष्टादशधान्यात्मक प्रार्थनासंगीताप्रमाणें, त्यांनीं एकादा नवा धर्मग्रंथ रचला नाहीं, किंवा अपूर्व धर्मही उत्पन्न केला नाहीं. तर इतर धर्मांतून, पंथांतून, किंवा संप्रदायांतून जीं चांगलीं, शुद्ध व उदात्त मतें आढळतात, तीं सर्व वैदिकधर्मांतही आहेत; व शिवाय इतरांना माहीत नाहींत असेही पुष्कळ सिद्धांत त्यांत आहेत; आणि म्हणूनच इतर धर्मांपेक्षां वैदिकधर्माचें महत्त्व अधिक, हें दाखविण्याचा आचार्यांचा नेहमीं प्रयत्न असतो. इतकेंच नाहीं, तर हीं सर्वसाधारण मतें मानावयाचीं तीं दुसऱ्यांचीं उष्टीं म्हणून घ्यावयाचीं नाहींत; तर तीं श्रुतिपरिगृहीत आहेत म्हणून त्यांजवर विश्वास ठेवावयाचा असा सर्वत्र त्यांचा जबर कटाक्ष दिसून येतो व एवढ्याचकरितां जेथें जेथें परपरिगृहीत सन्मतांचा उल्लेख करण्याचा प्रसंग येतो, त्या त्या ठिकाणीं लगेच श्रुतींतील आधार दाखविण्याचाही आचार्यांनीं परिपाठ ठेवला आहे. ह्या समन्वय प्रकाराचें अवलंबन केल्यामुळेंच हिंदुधर्माला इतकें व्यापक व चिरस्थायी स्वरूप आलें, ही गोष्ट आमच्या आधुनिक धर्मसंस्थापनाचार्य बनूं पाहणाऱ्यांनीं ध्यानांत ठेवली असती तर त्यांची हल्लींप्रमाणें विटंबना होण्याचा खचित प्रसंग आला नसता. हिंदुधर्माच्या नांवाखालीं गेल्या पांच सहाशें वर्षांत उत्पन्न झालेल्या शेंकडों पंथांत आणखी एक नवीन पंथाची भर घालण्याऐवजीं, पूर्वीच्यांतील मतभेद काढून टाकून सर्व हिंदूंचें धर्मसंबंधीं ऐक्य करण्याची खटपट करणें त्यांचें अगोदर कर्तव्य होतें. हिंदुधर्माची सुधारणा व्हावयाची असेल तर ती ह्याच रीतीनें होईल. खिस्ती पाद्यांप्रमाणें रविवारीं निराकार परमेश्वराची प्रार्थना केल्यानें किंवा बूट इस्टाकिण्या घालून आंग्लो-व्हर्न्याक्यूलर कीर्तन केल्यानें खचित होणार नाहीं.

तात्पर्य, अद्वैतवाद्यांचे विशिष्ट सिद्धांत तर सत्य व उत्तम आहेतच; पण त्यांची पूर्वपरंपरा न सोडितां इष्ट सुधारणा घडवून आणण्याची शैलीही आमच्या सुधारकांनींच काय पण परधर्मीयांनीं देखील अनुकरण करण्यासारखी आहे. युरोपांत अनेक धर्मक्रांत्या, व तत्प्रीत्यर्थ शेंकडों लढाया व

रक्तपात झाले; पण हिंदुस्थानांत तसा प्रकार कधींही घडला नाहीं, ह्याचें मुख्य कारण ही एकप्रकारची तडजोडीची रीतीच असली पाहिजे. आपल्या पूर्वजांना सरसकट मूर्ख ठरवून स्वतःच्या शहाणपणाचा टेंभा मिरविण्यापेक्षां चांगल्या पण नवीन भासणाऱ्या गोष्टी त्यांना माहीत होत्या कीं नाहीं हें पाहणें अधिक श्रेयस्कर होय. “ न हि पूर्वजो मूढ आसीदित्यात्मनाऽऽपि मूढेन भवितव्यमित्यत्र किंचिदस्ति प्रमाणम्” ( बाप आजे मूर्ख होते म्हणून आपणही मूर्ख रहावें ह्याला कांहीं प्रमाण नाहीं ) हें आचार्यांचें वाक्य यथार्थ आहे; पण त्यावरून आपला शहाणपणा स्थापित करावयाला पूर्वजांना शिव्याच देत सुटलें पाहिजे असें मात्र निघत नाहीं. इंग्रजी विद्येच्या प्रखर तेजानें डोळे दिपून गेल्यामुळें क्षणभर आपल्या पूर्वाचार्यांनीं लिहून ठेवलेल्या धर्मग्रंथांकडे कांहीं दिवस दुर्लक्ष झालें असेल; पण हिंदुधर्माचा मागील इतिहास पाहिला असतां कालांतरानें ही स्थिति जाऊन पुन्हां अद्वैत मताचा चोहोंकडे म्हणजे केवळ हिंदुस्थानांतच नव्हे तर सर्व जगभर प्रसार होईल, अशी आम्हांस पूर्ण उमेद आहे.

हिंदुधर्माचा आजपर्यंतचा इतिहास पाहिला तर ह्या अद्वैतमताचींच स्थल काल व्यक्तिभेदानें निरनिराळ्या प्रसंगीं झालेलीं रूपांतरें एकामागून एक आपणांस दृग्गोचर होतात. “ धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे ” हें भगवद्वचन अद्वैतसिद्धांतालाच अनुलक्षून आहे ह्यांत संदेह नाहीं; कारण गेल्या चार पांच हजार वर्षांत जेवढे मुख्य पंथ किंवा संप्रदाय धर्माचें पुनरुज्जीवन करण्याकरितां म्हणून निरानिराळ्या वेळीं उत्पन्न झाले त्या सर्वांचे परम सिद्धांत एकसारखे म्हणजे अद्वैतपर्यवसायी आहेत असेंच आढळून येतें. वैदिक ऋषींच्या काळापासून तों ज्ञानदेव, तुकाराम, रामदास चैतन्यप्रभृति अर्वाचीन साधुपुरुषांपर्यंत सर्वांना एका अर्थानें ब्रह्मवादी म्हणण्यास हरकत नाहीं. कारण सच्चिदानंदस्वरूपी ब्रह्माशीं जीवाचें ऐक्य स्थापन करणें हाच सर्वांच्या ग्रंथांचा निष्कर्ष निघतो. चार्वाकासारखे नास्तिक व तार्किकासारखे पुरुषरूप जगत्कर्ता ईश्वर प्रतिपादणारे कांहीं पक्ष होऊन गेले, नाहीं असें नाहीं; पण त्यांच्या मतांचें साधारण जनसमूहावर फारसें तेज पडलेलें दिसत नाहीं. ही गोष्ट सप्रमाण सिद्ध करण्याला येथें

अवकाश नाहीं, कारण हिंदुधर्माच्या इतिहासाचा अंगभूत असा तो स्वतंत्रच विषय आहे. प्रसंगानुसार त्याचें थोडें दिग्दर्शन मात्र येथें करतों. ऋग्वेदांतील ‘ नासदीय ’ सूक्त सुप्रसिद्ध आहे. आजच्या लेखावरील अवतरणांतर्गत वाक्य त्याच सूक्ताची सहावी ऋचा आहे. तिचें तात्पर्य, हें सर्व जगत् ज्या परब्रह्मापासून निर्माण झालें, त्याचें यथार्थ ज्ञान कोणालाही होऊं शकत नाहीं असें आहे. ह्या व अशाच दुसऱ्या कित्येक ऋग्वेदस्थ सूक्तांवरून जगत्कर्त्याविषयीं वैदिक ऋषींची कल्पना किती उदात्त होती हें चांगलें दिसतें. यहुदी लोकांचा कोपिष्ट जोहोवा, ग्रीकांचा विलासी ज्यूपिटर, किंवा ख्रिती लोकांचा विकारवश ‘ आकाशवासी पिता ’ इत्यादि इतर धर्मांतील ईश्वराविषयक कोत्या कल्पना कोणीकडे, व ‘ अधःस्विदासीदुपरि स्विदासीत् ’ असें अखिल चराचर विश्वव्यापी परब्रह्माचें वर्णन कोणीकडे ! आज शेंकडों वर्षें युरोपांत झपाट्यानें ज्ञानवृद्धि होत असतांही जी गोष्ट तेथील मोठमोठ्या तत्त्ववेत्त्यांच्या लक्षांत अजून चांगली आली नाहीं, ती आमच्या प्राचीन ऋषींना कळून चुकली होती. आणि पुढील आचार्यांनाही तिचा कधीं विसर पडला नाहीं. सर्व उपनिषद्ग्रंथांचें तर अद्वैतब्रह्मांतच तात्पर्य आहे, व तदनंतर झालेल्या इतिहासपुराणादिकांतूनही जेथें जेथें प्रसंग येतो तेथें अद्वैत सिद्धांताचेंच प्रतिपादन करण्यांत येतें. भारतांतील भीष्म, विदुर, श्रीकृष्ण इत्यादि महात्मे विशिष्टदेवतोपासक नसून ब्रह्मज्ञानीच म्हणविले जात. पुढें वैदिक कर्मकांडाचा लोकांना कंटाळा येऊन जैन, बौद्ध मतांचा प्रादुर्भाव झाला; पण त्यांतही पूर्वीचा जीवब्रह्मैक्य सिद्धांत किंचित् निराळ्या रूपानें कायम राहिला. बौद्धांचें निर्वाण व उपनिषदांतलि सत्संपत्ति किंवा मोक्ष ह्यांत फारसें अंतर नाहीं, व असलेंच तर दुसऱ्यापासून एका प्रकरचा स्पष्ट अर्थबोध होतो, तो पहिल्यापासून होत नाहीं इतकेंच आहे. बौद्धांचा उच्छेद झाल्यावर शांकरमताची स्थापना झाली ती तर बोलून चालून उपनिषदांच्या पायावर. पुढें रामानुज, वाल्लभ वगैरे अद्वैताचे दुसरे प्रकार उद्भवले, पण त्यांत व मुख्य शांकरमतांत फारसा विरोध नाहीं. जीवब्रह्माचा संबंध अंगांगिभावानें असो, कीं वृक्षशाखान्यायानें असो, किंवा आभासात्मक असो, मुख्य मुद्दा

जो त्याचें तादात्म्य, तो सर्वांना कबूल आहे. येऊन जाऊन राहिलें द्वैतसांप्रदाय, व विशेषेंकरून अलीकडेच अतोनात फैलावलेला भक्तिमार्ग; पण त्यांमधील जीवेश्वरसंबंधाच्या कल्पना देखील बारीक दृष्टीनें अवलोकन केलें असतां खिस्तीसारख्या केवळ भक्तीवर भिस्त ठेवणाऱ्या धर्मापेक्षां फार श्रेष्ठ आहेत. हिंदु भक्तिमार्गांत देवभक्तांचा संबंध धनिचाकरासारखा किंवा शास्यशासित्यासारखा नसून पितापुत्रासारखा आढळतो. म्हणजे ज्याप्रमाणें पितापुत्रांचें एक प्रकारें तादात्म्य असतें, व पुत्र हा गौणात्मा म्हणविला जातो, तसेंच देवाचें भक्ताशीं ऐक्य आहे. "ये भजंति तु मां भक्त्या मयि ते तेषु चाप्यहम्" असें भगवंतांनीं स्पष्ट सांगितलें आहे. तुकाराम द्वैती होता कीं अद्वैती होता असा एक वाद कित्येक दिवसांपासून चाललेला आहे. कारण त्याचे दोन्ही प्रकारचे अगंभ आढळतात; पण त्यांतील खरें बीज कोणाच्या लक्षांत येत नाहीं. वस्तुतः हिंदु धर्मांत द्वैत नाहींच, व जें थोडेंसें भासतें त्याला इतर धर्माच्या मानानें अद्वैतच म्हटलें पाहिजे. अलीकडे ब्राह्मो प्रार्थनासमाचिष्टांनीं मात्र खिस्ती पाद्र्यांचें अनुकरण करून हें अभूतपूर्व द्वैत हिंदुस्थानांत घुसडून देण्याचा प्रयत्न चालविला आहे, पण चमत्कार असा कीं, त्याचे आद्यगुरु जे राजाराममोहनराय त्यांची उपनिषदावर पूर्ण श्रद्धा होती. असो, तात्पर्य हें कीं, अद्वैत मत हिंदुलोकांच्या अंतःकरणांत इतकें बिंबून गेलें आहे कीं, कशाहि धर्मक्रांती व उलाढाली झाल्या तरी त्याचा जोर कमी व्हावयाचा नाहीं.

येणेंप्रमाणें ऐतिहासिक दृष्ट्या अद्वैतमताचें व्यापकत्व सिद्ध केलें. आतां मुख्य विषयाला हात घालण्यापूर्वीं, आमच्यावर एक जबरदस्त आक्षेप येण्यासारखा आहे त्याचा थोडासा विचार केला पाहिजे. हा आक्षेप जो कोणी हिंदुधर्माचें खंडण किंवा स्तुति करील त्याजवर खिस्ती पाद्र्यांकडून व त्यांचेंच शिष्यत्व पत्करलेल्या आमच्यांतील सुधारकांकडून वारंवार करण्यांत येतो; व त्यास समाधानकारक उत्तरही आजपर्यंत कोणाकडून मिळालेलें नाहीं. शिवाय तो कायम राहील तोंपर्यंत अद्वैतमताची महती व तद्द्वारा हिंदुधर्माचें श्रेष्ठत्व स्थापन करणें हा जो आमचा मुख्य उद्देश तो कधींही साधणार नाहीं. सबब त्याचा येथें विचार करणें जरूर आहे. तो

आक्षेप हा कीं, हिंदुलोकांच्या तत्त्वज्ञानाचें व हिंदुधर्माचें जें तुम्ही तादात्म्य कल्पिलें आहे तेंच मुळीं खोटें आहे. हिंदुधर्म म्हणजे हिंदु म्हणविणाऱ्या लोकांत हल्लीं प्रचलित असलेल्या आचारविचारांचा समूह; तेव्हां हिंदुतत्त्वग्रंथांत कितीही खोल ज्ञान भरलें असलें तरी ह्या लौकिक आचारविचारांचा मूर्खपणा यत्किंचित्ही कमी होत नाहीं. जीवब्रम्हैक्याविषयीं संस्कृतांत ग्रंथचे ग्रंथ लिहिले गेले असले तरी तेणेंकरून दगडाधोंड्याच्या मूर्ति पुजणें चांगलें ठरत नाहीं; किंवा संसार मिथ्या आहे म्हणून त्या ग्रंथकारांनीं कितीही बडबड केली असली तरी कोंवळ्या पोरींचीं लग्नें करून त्यांना वैधव्यपंकांत लोटून दिल्याबद्दल ते कमी दोषास पात्र होतात असें नाहीं. तेव्हां असले वेडगळ आचार ज्या हिंदुधर्मांत सांगितले आहेत त्याचा जितका लवकर नाश होईल तितकें चांगलेंच. सकृद्दर्शनीं हा आक्षेप खरा वाटतो, पण आमच्यामतें तो पुढें आणणारे लोकांची कृति आपल्याच सावलीला झोडपणाऱ्या वेडगळासारखी असमंजसपणाची आहे. कारण वर सांगितलेले आचार हाच हिंदुधर्म असें मानण्यास सदहू आक्षेपकांच्या डोक्यांतील कल्पनातरंगाखेरीज कांहीं आधार नाहीं. ते आचार चांगले किंवा वाईट आहेत हें पाहाण्याचें हें स्थळ नव्हे, पण अगदीं वाईट व तुच्छ मानले तरी देखील त्याच्या योगानें हिंदुधर्माच्या उत्तमत्वाला मुळींच बाध येत नाहीं. कारण त्या किंवा तसल्याच प्रकारच्या ज्या दुसऱ्या अनेक रूढी हिंदुस्थानच्या निरनिराळ्या भागांत चालू आहेत, त्या हिंदुधर्माचें प्रधानांग नाहींत. किंबहुना त्यांपैकीं पुष्कळांचा धर्माशीं बिलकुल संबंध नाहीं. उलट कित्येक प्रसंगीं अत्यंत विरोधही आढळतो. ह्याला प्रमाण इतकेंच कीं त्या रूढी सार्वत्रिक नाहींत. सोंवळेंओवळें, विवाहकाल, खाणेपिणें इत्यादिकांसंबंधानें हिंदुस्थानांत प्रांतभेदानें इतकें रूढिवैचित्र्य आढळतें कीं, त्यांपैकीं एकाच प्रकारची रूढि अवश्य मानणें म्हणजे बाकीच्या प्रांतांतील सर्व लोकांचें हिंदुत्व काढुन घेण्यासारखें आहे. अर्थात् ह्या सर्व सामाजिक व इतर प्रकारचा ऐच्छिक रूढि देशाचार व कुलाचार म्हणून गौण मानल्या पाहिजेत. म्हणजे त्या एकदम टाकून द्याव्या असा अर्थ नाहीं, तर धर्मासारखें त्यांना अबाधितत्व व अचलत्व नाहीं इतकेंच.

असल्या प्रकारच्या बऱ्यावाईट लोकरूढी प्रचलित नाहींत असा पृथ्वीवर एकही देश किंवा धर्म सांपडणें मुष्कील आहे. सुधारलेल्या ख्रिस्ती लोकांतही वेडगळ आचार कमी आहेत असें नाहीं. बायकांनीं कंबरा बारीक करणें, स्त्रीपुरुषांनीं ' बालच्या ' मिषानें रात्रभर धांगडधिंगा घालणें, किंवा देवळांत प्रार्थनेचें ढोंग करून बायबलाच्या आडून एकमेकांकडे टेहाळणें, वगैरे उपहासास्पद प्रकार साहेबलोकांत नित्यशः दृष्टीस पडतात; म्हणून ख्रिस्तीधर्मास उणेपणा येत नाहीं. मग आमच्या ज्ञातिदेशकुलभेदानें बदलणाऱ्या रूढींचाही हिंदुधर्माशीं काय संबंध येऊन पोंचतो ? मुख्य हिंदुधर्म प्राचीन काळापासून अविकृत चालत आला आहे, व पुढेंही तसाच कायम राहील; पण सदहू रूढि पन्नास वर्षेंही सारख्या टिकत नाहींत असें आजपर्यंतच्या इतिहासावरून अनुभवास आलें आहे. तात्पर्य त्रिकालाबाधित कूटस्थ नित्यब्रह्माला ज्याप्रमाणें क्षणिक उपाधींचा संपर्क होत नाहीं, त्याचप्रमाणें आमच्या पुरातन ऋषिप्रणित धर्मालाही देशकालपरत्वें फिरणाऱ्या अनित्य, ऐच्छिक व म्हणून गौण आचारविचारांचा विटाळ होत नाहीं. अर्थात् असल्या रूढींच्या वाईटपणाबद्दल खुद्द हिंदुधर्माला शिव्या देण जितकें मूर्खपणाचें आहे, तितकेंच सद्धेतूनें त्यांत फेरफार करण्याचा कोणा प्रयत्न करूं लागल्यास धर्म बुडाला म्हणून आक्रोश करणेंही अविचाराचें होय. रूढीसारख्या भुसभुशीत पायावर हिंदुधर्माची इमारत उभारलेली असती तर ती कधींच ढासळून गेली असती. ती सर्वदां सत्य, अविनाशी व शुद्ध अशा ब्रह्मतत्वावर बांधली असल्यामुळेंच इतकें दिवस टिकली आहे ही गोष्ट हिंदुधर्माच्या निंदकांनीं व अभिमान्यांनीं दोघांनीं सदोदित लक्षांत बाळगली पाहिजे.

प्रत्येक धर्माचीं तीन अंगें असतात. तशीं हिंदुधर्मांतही आहेत. तीं तीन अंगें तत्त्वज्ञान, कर्मकांड व पुराणें, हीं होत. यूरोपियन पंडितांनीं या तीन विभागांना Philosophy, Ritual आणि Theogony अशीं नांवें दिलीं आहेत. ह्यांना अनुक्रमे धर्माचें मस्तक, शरीर व पाय अथवा अन्य तऱ्हेनें आत्मा, इंद्रियें व वस्त्राभरणादि बाह्योपचार, असें म्हणतां येईल. दोहोंतूत कोणतेंही रूपक घेतलें

तरी तत्त्वज्ञानाला प्राधान्य द्यावें लागतें. मनुष्याचे सर्व व्यापार चालावयास इंद्रियें पाहिजेत, व सौंदर्यादि अवांतर गुणांकरितां वस्त्रालंकारादि बाह्योपकरणांचीही थोडीबहुत जरूर असते; तसें प्रत्येक धर्मांत प्रबुद्ध, अप्रबुद्ध असे अनेक प्रकारचे लोक असतात त्या सर्वांच्या समाधानाकरितां कर्मकांड, पुराणें वगैरे गौण साधनांचीही अपेक्षा असते. पण मस्तक किंवा आत्मा नसल्यास जसें जीवित अशक्य होईल, तसेंच तत्त्वज्ञानावाचून धर्माचें अस्तित्वच संभवणार नाहीं. पुराणांतील कथांनीं अज्ञजनांची श्रद्धा वाढते, व कर्मकांडानें चित्ताची शुद्धि व एकाग्रता होते,पण खरी धर्मफलप्राप्ति तत्त्वज्ञानानेंच शक्य आहे. उषस्तिचाक्रायणानें देवताज्ञानविरहित केवळ कर्में करणाऱ्या उद्गातृप्रभृति ऋत्विजांना 'मूर्धा ते विपतिष्यति' असा जो शाप दिला त्यांतील तात्पर्य हेंच आहे. रोमन, यहुदी, ख्रिस्ती, मुसलमानी वगैरे हिंदुधर्मव्यतिरिक्त धर्मांतही ही अंगत्रयी आढळते; देशकालभेदानें तिचें प्रमाण व स्वरूप बदलतें इतकेंच काय तें. तेव्हां हिंदुधर्माची इतर धर्मांशीं तुलना करणें असेल तर ह्या त्रयींपैकीं प्रत्येक अंगाची परस्पर तुलना केली पाहिजे. ख्रिस्ती पाद्र्यांची व आमच्यांतील अर्वाचीन सुधारक पंडितांची चूक होते ती येथेंच. ते हिंदुलोकांच्या कर्मकांडाची ख्रिस्ती तत्त्वज्ञानाशीं किंवा अर्वाचीन पाश्चात्य शास्त्रसिद्धांतांशीं तुलना करावयाला जातात; व त्यामुळें अर्थातच त्यांना पाहिलें तुच्छ वाटूं लागतें. वस्तुतः आमचें कर्मकांड इतर धर्मांतील कर्मकांडाशीं ताडून पाहिलें पाहिजे. असें केल्यास एकंदर हिंदुधर्माचेंच नाहीं, तर त्याच्या प्रत्येक अंगाचेंही श्रेष्ठत्व ध्यानांत येईल अशी आमची समजूत आहे. दररोज देवपूजा करणें किंवा सायंप्रातः संध्या करणें कदाचित् वेडेपणा असेल; पण तो आठवडाभर ईश्वराला विसरून सातव्या दिवशीं चर्चांच्या छताकडे डोळे लावून बसण्याइतका घुष्कळ खचित नाहीं. तसेंच श्रीकृष्णाच्या बाललीला कदाचित् अनीतिप्रचुर असतील, पण ख्रिस्तमाता मेरीचें चार पोरें झालीं तरी कौमार्य राहणें, किंवा निराकार देवाकडून तिला संतति होणें, किंवा आब्राहामचा पुतण्या लोट ह्याच्या दोघी मुलींनीं आपल्या बापाशीं तो निजला असतां व्यभिचार करणें असला बाष्कळपणा हिंदुपुराणांत कोठेंही आढळावयाचा नाहीं एवढें

खचित. आतां तत्त्वज्ञानासंबंधानें पाहूं गेलें तर आमच्या अद्वैतमताशीं तुलना करण्यासारखें ख्रिस्तीधर्मांत कांहीं एक नाहीं. कारण त्याची सर्व इमारत बायबलांतल्या व मध्ययुगांतील पाद्री भटांच्या डोक्यांतून निघालेल्या भाकडकथांवर बहुतेक रचलेली आहे. अर्थात् हिंदु अद्वैताची जर कोणाशीं तुलना करावयाची असेल तर ती ख्रिस्तीधर्माहून स्वतंत्रपणें वाढलेल्या प्राचीन व अर्वाचीन युरोपियन तत्त्वज्ञानाशींच केली पाहिजे, व ती योग्य रीतीनें केली असतां ह्या बाबतींत देखील अद्वैतमताचे श्रेष्ठत्व दिसून येईल. युरोपखडांत धर्म आणि तत्त्वज्ञान ह्यांची तोडातोड झाल्यामुळें एक पोकळ व दुसरें अकिंचित्कर झाले आहे, तसा प्रकार हिंदुधर्मासंबंधानें नाहीं असे मागील लेखांत सांगितलेच आहे. ही एकच सामान्य गोष्ट आमच्या धर्माचें उत्तमत्त्व स्थापन करण्याला पुरे आहे, पण ती सध्यां बाजूला ठेवून विशिष्ट सिद्धांतांची तुलना केली तरी देखील अद्वैतमताचें श्रेष्ठत्व सिद्ध होतें असें आम्ही दाखविणार आहों.

---

## अध्याय चवथा.

## स्वप्नदृष्टांत.*

The cloud-capp'd towers, the gorgeous palaces, ‡
The solemn temples, the great globe itself

---

* केसरी ता. २८ मार्च १८९३

‡ "उंच उंच गगनचुंबित सौधशिखरें, रमणीय राजवाडे, पवित्र देवालयें, अथवा हें सर्व भूमंडळ, किंबहुना त्रैलोक्यांतील सर्व वस्तुसमुदाय विलयास जाईल, व ह्या पुढें दिसणाऱ्या देखाव्याप्रमाणें ( प्रास्पेरोनें निर्माण केलेल्या भूतसृष्टीप्रमाणें ) नष्ट होऊन यत्किंचित्‌ही अवशेष मागें राहणार नाहीं. आम्ही सर्व प्राणी स्वप्नांतल्या वस्तूप्रमाणें आहोंत, आमचें हें क्षणभंगुर आयुष्य केवळ निद्रेप्रमाणें होणार आहे."

Yea all which it inherit, shall disslove
And, like this unsubstantial pageant faded,
Leave not a rack behind. We are such stuff
As dreams are made on and our little life
Is rounded with a sleep

Shakespeare, *Tempest IV*, I

पाश्चात्य कविकुलगुरु शेक्सपियरच्या वरील उक्तीचें व " स्वप्नमायास्वरूपेति सृष्टिरन्यैर्विकल्पिता " ह्या गौडपादाचार्यांच्या वचनाचें, किंवा " ध्यायतीव लेलायतीव सा हि स्वप्नो भूत्वेमं लोकमतिक्रामति " ह्या याज्ञवल्क्यांनीं जनकाला सांगितलेल्या मायास्वरूपवर्णनाचें किती विलक्षण साम्य आहे बरें ! जी गोष्ट तत्त्वजिज्ञासूला केवळ तर्कशक्तीच्या साहाय्यानें कळून येण्यास पुष्कळ कालावधि लागतो, तीच अनेक वेळां शेक्सपीयरसारख्या महाकवींच्या ब्रह्मांडावगाही प्रतिभाशक्तीस ताबडतोब अवगत होते असें एका विद्वान् ग्रंथकाराचें मत आहे, त्याची वरील अवतरणांतर्गत वाक्य चांगली साक्ष देतें. बाह्यसृष्टीचें जें स्वप्नसदृशत्व दोनशें वर्षांपूर्वीं एका इंग्रजी नाटक्याचे डोक्यांत प्रतिबिंबित झालें, त्याची नुकती कोठें शोपेनहोरप्रभृति जर्मन तत्त्वज्ञान्यांस थोडीबहुत कल्पना होऊं लागली आहे, व तीही अजून पूर्ण नाहीं. **पार्मिनाईडीस**सारखे ग्रीक व **स्पिनोझा फिक्टी**सारखे जगाला मिथ्या समजणारे अर्वाचीन तत्त्ववेत्ते १९ व्या शतकापूर्वीं कांहीं होऊन गेले खरे; पण त्या सर्वांची स्थिति काळोखांत रस्ता शोधणाऱ्या वाटसराप्रमाणें होती. दिव्याशिवाय आंधेरांत किंवा मार्गदर्शकावांचून दाट जंगलांत मार्ग सांपडणें जसें दुर्घट आहे, तद्वत्च धर्मश्रद्धेची मदत असल्याखेरीज केवळ तर्कशक्ति तत्त्वशोधनाच्या कामीं पंगु होते ही गोष्ट बिचाऱ्यांच्या लक्षांत आली नाहीं. " अचिन्त्याः खलु ये भावा न तांस्तर्केण योजयेत् " ह्या पौराणिक वचनांतील खरें तात्पर्य तरी हेंच असलें पाहिजे. दुर्दैवानें ख्रिस्ती धर्मासारख्या द्वैतमूलक धर्माचें युरोपांत फार दिवसांपासून प्राबल्य माजल्यामुळें शुद्ध धर्माच्या योगानें तत्त्वविचारांना जें उत्तम प्रकारचें वळण लागतें तें तर ख्रिस्ती धर्मानें लागलें नाहींच; पण उलट पुष्कळ

वेळां ह्या तत्त्वविचाराचा भलत्याच दिशेकडे ओघ वाहवण्यास तो धर्म कारण झाला. खिस्ती धर्मापासून अर्वाचीन युरोपियन सुधारणेला अन्य तऱ्हेनें पुष्कळ मदत झाली खरी; परंतु तत्त्वशोधनाच्या कामीं त्यापासून प्रतिबंधच होत गेला. मालिब्रांची, पास्कल, क्यांटसारखे जे धार्मिक होते त्यांना खिस्ती धर्माचीं विशिष्ट मतें संभाळण्याकरितां आपली विचारशक्ति पुष्कळदां आंखडून धरावी लागली, व स्पिनोझा, मिल्ल, हक्सलेसारखे नास्तिक होते त्यांचें मुख्य लक्ष तीं मतें खोडून काढण्याकडे वेधल्यामुळें तेही भलत्याच दिशेला गेले, व तत्त्वशोधनाचें प्रधान कार्य मागें पडलें. स्पिनोझा व मालिब्रांची दोघेही डेकार्टचे अनुयायी; पण दोघेही उलट दिशेला गेले, व शेवटीं सत्य एकालाही सांपडलें नाहीं,.ही गोष्ट ध्यानांत ठेवण्यासारखी आहे. तसेंच आपल्या तत्त्वविचारांची व विशिष्ट खिस्ती मतांची एकवाक्यता करण्याकरितां हेगेलची जी तारांबळ उडून गेली आहे ती पाहून तर फारच मौज वाटेल. तात्पर्य दोन्ही प्रकारच्या जिज्ञासूंना खिस्तीधर्म मार्गदर्शक न होतां उलटा विप्रलंभक झाला असें अर्वाचीन युरोपियन तत्त्वज्ञानाचा इतिहास अवलोकन केला असतां दिसून येईल.

आमच्या सुदैवानें भरतखंडांत अशी स्थिति नव्हती ही गोष्ट जें तत्त्व शेक्सपीअरच्या कल्पनाशक्तीस मात्र गम्य झालें व जें अलीकडील युरोपियन पंडितांना नुकतेंच कोठें उमजूं लागलें आहे, तें शेंकडों वर्षांपूर्वी गौडपादाचार्यादिकांनीं सप्रमाण सिद्ध केलें ह्यावरून चांगली प्रत्ययास येते. युरोपियनांपासून आम्हांला पुष्कळ गोष्टी शिकण्यासारख्या आहेत हें कित्येक आधुनिक त्रिखंडकीर्ति पंडितांचें म्हणणें अंशतः खरें असेल; पण कांहीं गोष्टी त्यांना शिकविण्यासारख्याही आमच्याजवळ आहेत हें आपण विसरतां कामा नये. व्यापाराप्रमाणें विद्येच्या कामींही अदलाबदल पाहिजे. तेव्हां इंग्रजलोकांच्या राजकीय संस्था आपण घेत आहों, त्यांच्या मोबदला आपलीं उदात्त धर्ममतें त्यांना देणें आमचें कर्तव्य आहे. शोपेनहोरचे मायाविषयक सिद्धांत बनण्यास पुष्कळ अंशीं फ्रेंच भाषेंत झालेलीं उपनिषदांचीं अर्धवट भाषांतरेंच कारण झालीं असें मोक्षमुल्लरभट्टांनीं एके ठिकाणीं म्हटलें आहे. मग त्याच उपनिषदांचें समग्र व यथार्थ ज्ञान

झाल्यास आमच्यांतील प्राचीन याज्ञवल्क्यजनकादि महात्म्यांप्रमाणें अर्वाचीन युरोपस्थ पंडितांचीही " भिद्यते हृदयग्रंथिश्छिद्यन्ते सर्वसंशयाः " अशी स्थिति होईल असें मानण्यास काय प्रत्यवाय आहे ? प्रो० डयूसनसारखे विद्वान ही गोष्ट कबूल करूं लागले आहेत, व थिऑसोफिकल मंडळीनें ती थोडीबहुत प्रत्ययासही आणून दाखविली आहे. पण हें काम आमच्या हातून होण्यास आमची आम्हांलाच ओळख पाहिजे, ती कोठें आहे ? आम्हीं हातचें सोनें टाकून दुसऱ्याचें खापर घेण्यास धांवणार !

असो; ही अनास्था दूर होऊन अद्वैतमताचा जगभर प्रसार होण्यास मुख्यत्वें दोन पक्षांकडून अडथळा येण्याचा संभव आहे. हे दोन्ही पक्ष एकमेकांचे अत्यंत विरोधी असून अंशतः खरे व अंशतः खोटे आहेत; तरी पण प्रत्येक आपणच सर्व शहाणपणा बळकावून दुसऱ्याला अगदीं तुच्छ मानीत असतो. एक पक्ष ख्रिस्तानुयायांप्रमाणें पुरुषरूप ईश्वराची भक्ति करणारा, व दुसरा भौतिकशास्त्रांतच मानवी ज्ञानाची परमावधि मानणाऱ्या हक्सले स्पेन्सरप्रभृति नास्तिकांचा होय. ह्या दोन पक्षांच्या लठ्ठालठ्ठींत गुंग झाल्यामुळेंच युरोपांत खऱ्या ब्रह्मज्ञानाचा आजपर्यंत प्रवेश झाला नाहीं. इंग्रजी विद्येच्या संसर्गानें आमच्याकडेही तसले पक्ष उत्पन्न होऊन तसेंच द्वंद्व सुरू होतें कीं काय अशीही भीति वाटूं लागली आहे. ती दूर करण्याला एकच मार्ग आहे. तो हा कीं, दोन्ही पक्षांतील व्यंगें लोकांना वेळींच दाखवून दोहों पक्षांतील उत्तम अंश ग्रहण करणाऱ्या व त्याज्य अंश टाकून देणाऱ्या अद्वैतमतावरील हिंदुलोकांची श्रद्धा पुनः पूर्ववत् कायम करणें हा होय. आपआपल्या मर्यादेच्या आंत ह्या दोन्ही मतवाद्यांचें म्हणणें बरोबर असतें, पण त्या मर्यादेचें अतिक्रमण करून सर्वज्ञतेचा डौल घालण्याकडे ह्या दोन्ही पक्षांतील पुढाऱ्यांची वारंवार प्रवृत्ति होत असल्यामुळें त्यांच्या तत्त्वशोधनाचें नेहमीं अहमहमिकेंत पर्यवसान होतें. सबब ह्या दोन्ही पक्षांच्या चुका दाखवून चांगल्या अंशापुरती त्यांची एकवाक्यता करणें वेदांत्याचें काम आहे, व तें त्यानें अधिकारभेदानें सगुणविद्या आणि निर्गुणविद्या असे दोन मार्ग कल्पून उत्तम प्रकारें केलें आहे. ज्यांना निर्गुण ब्रह्माचें आकलन करण्याची योग्यता आली असेल त्यांनीच निर्गुणा-

कडे वळावें, इतरांकरितां सगुणोपासनेचा सोपा राजरोस मार्ग आहेच; असा विभाग केल्यानें धर्म आणि भौतिकशास्त्रें, भक्ति आणि ज्ञान ह्यांजमधील विरोधाचा युरोपखंडांत हल्लीं जो इतका बाऊ झाला आहे तो अजिबात नाहींसा होतो. पुन्हां ह्या सगुण व निर्गुण विद्या भिन्न आहेत तरी परस्पर विरुद्ध नाहींत; तर पहिली दुसरीला साधनभूत आहे. भक्तिमार्गाची थोरवी गाणाऱ्या धार्मिकांचें म्हणणें तरी इतकेंच कीं, साधारण जनसमूहाची आत्मिक उन्नति व नीतिमत्ता वाढण्यास सगुण ईश्वराची उपासना जरूर आहे. वेदान्ति म्हणतो कबूल; पण येणेंप्रमाणें आत्मिक-उन्नति अथवा चित्तशुद्धि झाल्यानंतर ह्या उपासनेचा काय उपयोग ? अज्ञानी लोकांकरितां भक्तिमार्ग पाहिजे असेल, पण त्यावरून त्या लोकांना सदोदित अज्ञानी ठेवावें आणि मग त्यांच्या मागें भक्तिचें शुक्लकाष्ठही लावून ठेवावें असें निघत नाहीं, उलट होईल तितकें लवकर त्यांचें अज्ञान दूर करणें व त्याबरोबर सगुणोपासनारूप कर्मकांडाचीही कटकट चुकविणें हा अधिक श्रेयस्कर मार्ग नाहीं काय ? ईश्वराच्या पुत्रावर विश्वास ठेवा म्हणजे कधीं तरी तुमचे तारण होईल असें खिस्तीधर्म सांगतो; व 'आत्मा-वाऽऽरे द्रष्टव्यः ' म्हणजे आत्मस्वरूपाची ओळख करून घ्या असें हिंदुधर्म सांगतो. एकजण आंधरांत वाट चुकलेल्या आंधळ्यास बैलाचें शेंपूट धरून गांवांत जाण्यास सांगतो, व त्यामुळें तो खड्ड्यांत पडतो; दुसरा म्हणतो बाबारे तूं आंधळा आहेस असा तुला भ्रम मात्र झाला आहे; तर डोळे उघड आणि आपल्या पायानें गावांत जा. ह्यांपैकीं हितकर उपदेश कोणता हें निराळें सांगावयास नको.

सगुणोपासक धार्मिक इतक्यावरच थांबतील तर एक वेळ चालेल, पण असल्या काल्पित पौरुष ईश्वराचें पारमार्थिक अस्तित्व व जगत्कर्तृत्व प्रतिपादण्यापर्यंतही बहुधा त्यांची मजल येते; तेणेंकरून तर त्यांची मतें चुकलेलींच केवळ नव्हे, तर धडधडीत अनीतिकारक होतात. आकाशांत एक बाप कल्पिला कीं मग त्याचा एक मुलगा मानावा लागतो. नंतर रोमच्या पोप महाराजांसारखा किंवा सर्व खिस्ती देवळांत रविवारीं व्यासपीठावर उभा राहून पाठ केलेलें पुराण सांगणाऱ्या उपदेशकासारखा त्या ईश्वरा-

पाशीं रदबदली करण्याला एक गुमास्ताही नेमावा लागतो. मग तो करील ती पूर्व दिशा आणि तो म्हणेल तें वेदवाक्य. जान स्टुअर्ट मिल्लनें आत्मचरित्रांत ह्मटल्याप्रमाणें ही शुद्ध गुलामगिरी नव्हे काय ? मनुष्याचें गुलाम होणें एक वेळीं पत्करेल; पण आपल्याच कल्पनाशक्तीनें उत्पन्न केलेल्या आपल्या काल्पनिक आकाशस्थ पित्याची किंवा त्याच्या मुलाची गुलामगिरी अधिक वाईट. ज्या ख्रिस्तोधर्मांत असल्या मेषपात्र वृत्तीचा उपदेश केला आहे, त्यांतील लोकांना मेंढराची उपमा देण्यांत येते ती अगदीं सार्थ आहे असें कोण म्हणणार नाहीं ? ह्याशिवाय निराकार देवाची प्रार्थना करण्याचा अलीकडे नवीनच एक गंगाजम्नी प्रकार निघाला आहे. पण निवळ परानुकरणापलीकडे ह्या समाजिष्ट पंथांत कांहीं नसल्यामुळें त्याला विशेष महत्व देण्याचें प्रयोजन दिसत नाहीं वस्तुतः निराकाराची भक्तीच संभवत नाहीं. कारण निर्गुण निराकार ईश्वराची मनाला कल्पनाच होण्याचा संभव नाहीं. तेव्हां उपास्याचें अंतःकरणांत कोणत्या तरी प्रकारचें प्रतिबिंब उतरल्याशिवाय उपासना कोणाची करावयाची ? समाज मंदिरांतील छताला लटकलेल्या पंख्याची किंवा झुंबराची असल्यास न कळे; पण मग त्यापेक्षां आमचा पुरातन मातीचा गणपति बरा.

उलटपक्षीं भौतिकशास्त्रावर भिस्त ठेवून सर्व धर्माला थोतांड मानणाऱ्या नास्तिकाला वेदांती म्हणतो, बाबारे, तूं कितीही आपल्या ज्ञानाची घमेंडी मारलीस, तरी त्याला मर्यादा आहे. सरड्याची धांव कुंपणापर्यंत; तशी बाह्येंद्रियांच्या व परिच्छिन्न बुद्धीच्या साधनानें निर्माण केलेल्या भौतिकशास्त्रांची मजल परिच्छिन्न वस्तूपर्यंतच. अपरिच्छिन्न व निर्गुण जगत्कारणाचें ज्ञान त्यांना अगम्य आहे. एकंदर भौतिकशास्त्रांची इमारत कांहीं सिद्धवत् मानलेल्या मूलतत्वांवर रचलेली आहे. त्या मूलतत्वांपाशीं त्यांची गति कुंठित होते. पदार्थविज्ञानांतील गुरुत्वाकर्षण घ्या, रसायनशास्त्रांतील परमाणूचें व शक्तीचें अविनाशित्व घ्या, किंवा प्राणिशास्त्रांतील उत्क्रांतिमत घ्या, त्याची त्या त्या शास्त्रानें उपपत्ति होत नाहीं; व म्हणून तें गृहीतच घ्यावें लागतें. ह्या नास्तिकमतवाद्यांची प्रत्यक्षानुभवावर मोठी भिस्त असते, व अनुभवानें सिद्ध न होणारी वस्तु खोटी मानण्याकडे त्यांचा फार

कल दिसून येतो; पण शक्तीचें अविनाशित्व त्यांना कोणत्या प्रकारच्या अनुभवानें दृग्गोचर झालें होतें, व नाहीं म्हणून तेंही खोटें मानल्यास एकंदर रसायन, उष्णता, विद्युत् वगैरे भौतिकशास्त्रांची काय वाट होणार. हक्सले' नें 'प्रोटोप्लॅझम' ऊर्फ आद्य जीवपरिमाणु कल्पिला, पण तो कधीं कोणीं पाहिला आहे काय ? तात्पर्य, अनुभवानें सिद्ध होणाऱ्या वस्तूपर्यंतच भौतिकशास्त्रांची मर्यादा आहे. ह्या रेषेपलीकडील प्रांत तत्त्वज्ञानाचा आहे. भौतिकशास्त्राच्या दृष्टीनें त्याला **हर्बर्ट स्पेन्सर**च्या मताप्रमाणें Unknown म्हणजे 'अज्ञात' म्हणण्यास हरकत नाहीं; परंतु त्यालाच Unknowable म्हणजे 'अज्ञेय' असेंही जें **स्पेन्सरनें** म्हटलें आहे, तें मात्र अतिप्रसंगी व असंबद्ध आहे. कारण आद्यपरमाणूपलीकडील वस्तूविषयीं आम्हांला कांहीं माहीत नाहीं हें स्पेन्सरप्रभृतींचें म्हणणें जर खरें असेल, तर त्या 'अज्ञेय' आहेत हें तरी कसें कळलें ? वस्तुत; भौतिकशास्त्रांचा तो विषयच नसल्यामुळें त्यांनीं मौनच धरलें पाहिजे. बेळगांवाहून मुंबईस जाणाराला सदर्न मराठा रेल्वेची छोटी गाडी पुण्यापर्यंत आणून सोडते, व पुढें जी. आय्. पी. च्या मोठ्या गाडीनें गेलें पाहिजे. तद्वत्च Force म्हणजे 'शक्ति' व Matter म्हणजे परमाणु, ह्या द्वयीपर्यंत भौतिकशास्त्रें आपणांस पोंचवितात. त्यापलीकडे जाऊन त्या दोहोंचेंही अभिन्नत्व स्थापन करणें हें अद्वैतमतासारख्या तत्त्वज्ञानाचेंच काम आहे. प्रख्यात फ्रेंच तत्त्ववेत्ता **डेकार्ट** ह्यानें म्हटलें आहे कीं, ज्ञानरूपी वृक्षाचें तत्त्वज्ञान हें मुळ, पदार्थविज्ञानशास्त्र खोड व इतर भौतिकशास्त्रें शाखा होत. अर्थात् वृक्षाचें मुळ, दिसत नाहीं, म्हणून तें मुदलींच नाहीं म्हणणें जितकें वेडेपणाचें होईल तितकेंच तत्त्वज्ञानानें सिद्ध होणाऱ्या गोष्टींचें अस्तित्व नाकारणें मूर्खपणाचें आहे. तात्पर्य, अर्वाचीन भौतिकशास्त्रें व वेदान्त ह्यांत बिलकुल विरोध नाहीं. प्रत्येक राजा आपल्या राज्यांत मुख्य असतो, त्याप्रमाणें वेदांत व भौतिकशास्त्रें आपआपल्या विषयांत प्रधान आहेत. अनुभवगोचर सृष्टीसंबधानें अर्वाचीन भौतिकशास्त्रांशीं विसंगत दिसणाऱ्या गोष्टी वेदांतग्रंथांत सांगितल्या असल्यास जशा त्या टाकून देण्यास हरकत नाहीं, त्याचप्रमाणें इंद्रियातीत वस्तूंसंबंधानें

त्याच वेदांतग्रंथांनीं सिद्ध केलेलें अद्वितीय ब्रह्म खरें मानलें पाहिजे. पहिल्या गोष्टी गौण आहेत, दुसरी प्रधान आहे; व जोंपर्यंत प्रधान शाबूत आहे तोंपर्यंत गौणांचा त्याग करावयास आमच्या आचार्यांची बिलकुल मनाई नाहीं. उलट असें करण्यास ते स्पष्ट उपदेश करतात, हें दृश्य अनुभवाचा व इंद्रियागोचर अद्वैताचा विरोध काढून टाकण्याकरितां त्यांनीं जी चमत्कारिक क्लृप्ति काढली आहे तिजवरून चांगलें ध्यानांत येतें.

ही क्लृप्ति वरील सगुण व निर्गुण उपासनांच्या भेदासारखीच आहे. त्यांनीं सत्व दोन प्रकारचें मानलें; पारमार्थिक व प्रातिभासिक. त्रिकालाबाधित व म्हणून कधीं ही नाश न पावणारें.पारमार्थिक सत्त्व निर्गुण ब्रह्मचेच ठायीं आहे; कारण ब्रह्मव्यतिरिक्त वस्तु जगांत मुळींच नाहीं. ह्मणून इतर वस्तु अगदीं मिथ्या किंवा अभावरूप आहेत असें समजावयाचें नाहीं. एक प्रकारचें व्यावहारिक सत्व त्यांचेही ठिकाणीं आहेच. वेदान्तमतांत सर्व जगत् मायामूलक ह्मणजे मिथ्या सांगितलें आहे हें एका अर्थीं खरें आहे; परंतु साधारण लोकांची त्यासंबंधानें जी समजूत झाली आहे ती मात्र खरी नाहीं. 'माया' व 'मिथ्या' शब्दांचा अर्थ अभावात्मक किंवा खोटें असा करावयाचा नाहीं, तर परब्रह्माच्या त्रिकालाबाधित पारमार्थिकत्वाच्या तुलनेनें न्यूनकालीन ह्मणजे विनाशी अस्तित्व इतकाच करावयाचा. "गजोऽपि मिथ्या पलायनमपि मिथ्या" ही कोटी लोकांत वेदांताची थट्टा करावयाला ठीक आहे. पण वेदांत्यांचें खरें मत ती दाखवीत नाहीं. चित्सुखाचार्यांनीं आपल्या तत्त्वप्रदीपिका नामक ग्रंथांत मायेचें 'भावलक्षणा' असें स्पष्ट लक्षण केलें आहे. मिथ्या शब्दाचेंही 'अपन्हव वचन' व ' अनिर्वचनयिता वचन' असे दोन अर्थ करून, संसारासंबंधानें त्यांतील दुसरा अर्थच घ्यावयाचा असा ग्रंथकारांनीं नियम केला आहे. मायास्वरूपासंबंधानें मुख्य पांच मतें प्राचीनकाळीं प्रचलित होतीं, व त्यांना 'ख्याति' अशी संज्ञा आहे. आत्मख्याति, असत्ख्याति, अख्याति, अन्यथाख्याति, आणि अनिर्वचनख्याति; ह्या पंचख्यातींपैकीं बाह्यवस्तूंचें अभावत्व प्रतिपादणारी आत्मख्याति बौद्धपरिगृहीत होती; वेदान्त्यांना अनिर्वचनख्याति हेंच मत पसंत होतें. म्हणजे जगत् शुक्तिरजत इत्यादि

आभास कसे उद्भवतात हें सांगतां यावयाचें नाहीं असा त्यांचा सिद्धांत होता. तात्पर्य, संसार मायामूलक किंवा मिथ्या म्हइतात त्याचा अर्थ तो विनाशी आहे, अत्यंताभावरूप नाहीं इतकाच घ्यावयाचा. त्याचें उत्तम प्रमाण वस्तुमात्राचें अभावरूपत्व मानणाऱ्या विज्ञानवादी बौद्धांचें 'अनुस्मृतेश्च ' ( ब्रह्म० २. २. २५ ) ह्या सूत्रावरील भाष्यांत खंडण करून अंतर्बाह्यसृष्टीचें सत्यत्व शंकराचार्यांनीं स्थापित केलें आहे तेथें सांपडेल. विषयसृष्टीला शून्य मानणाऱ्या ' स्पिनोझा ' 'फिक्टी' प्रभृति युरोपियन तत्त्वज्ञान्यांप्रमाणें भरतखंडांतही केवल अभाववादी बौद्ध होऊन गेले. पण वेदांती त्यांच्याहून अगदीं भिन्न होते. ह्या बाबतींत शंकराचार्यांचें 'स्पिनोझा' पेक्षां प्लेटो व क्यांट ह्यांच्याशीं अधिक साम्य आहे. प्लेटोची Idea (कल्पना) व शंकराचार्यांची माया ह्या जवळ जवळ सारख्याच आहेत. बाह्यसृष्टीला प्लेटो कल्पनामूलक मानतो त्याचा अर्थ इतकाच कीं, दृश्यवस्तूंचे जे धर्म आपणाला दिसतात ते सर्व आपल्या कल्पनांनीं अध्यारोपित केलेले आहेत. बसलेला देवदत्त व उभा राहिलेला देवदत्त वस्तुतः पुरुष एकच; पण त्याच्या हातापायांची रचना निराळी दिसल्यानें आपण भिन्न मानतों. वस्तुतः ही रचना देवदत्ताच्या अवयवांहून निराळा पदार्थ नाहीं. त्याचप्रमाणें श्वेतघटाचा श्वेतगुण कल्पित. अम्मळ पुढें गेलें म्हणजे घटत्वही कल्पितच. घट म्हणजे काय? असंख्य मृत्परमाणूंची एका विशिष्ट प्रकारची रचना. ही रचना परमाणूंहून वेगळी करतां यावयाची नाहीं. अर्थात् त्या परमाणुसमूहावर आपल्या कल्पनेनेंच ती आरोपित केलेली असली पाहिजे. वेदांत्यांचें म्हणणें अक्षरशः हेंच आहे. ' वाचारंभणं विकारो नामधेयं मृत्तिकेत्येव सत्यम् ' ( छांदो. ६, १, ४ ) ह्या वाक्यांत घटासारख्या सर्व विकारभूत वस्तु केवळ नाममात्र आहेत, उपादानकारणमृत्तिका हाच खरा पदार्थ आहे असें म्हटलें आहे; त्याचा अर्थ हाच होय. वरील वाक्यांत विकारमात्राला लावलेलें ' वाचारंभण ' पद व प्लेटोचें Ideal ह्या दोहोंचा अर्थ अक्षरशः एकच आहे.

तात्पर्य, सर्व जगताला मिथ्या म्हणजे खोटें मानण्याबद्दल शंकराचार्यांवर जे अनेक पक्षांकडून आरोप केले गेले आहेत, व अजूनही क्वचि-

केले जातात, ते निव्वळ अज्ञानमूलक आहेत. बाह्यसृष्टीला शशशृंगाची किंवा दुसऱ्या एखाद्या मुळींच नसणाऱ्या पदार्थाची उपमा न देतां स्वप्नाची उपमा देण्यांत येते ती तर फारच खुबीदार आहे स्वप्नालाही जागृदवस्था येईपर्यंत एक प्रकारचें सत्यत्व असतेंच, पण तें क्षणभंगुर असतें. तसाच संसार होय. जागृदवस्थेनें स्वप्नाचा नाश होतो तसाच मोक्षानें संसाराचाही होतो. पण जोंपर्यंत तो नाश झाला नाहीं. तोंपर्यंत त्याचें सत्यत्व कदापि नाकबूल करतां यावयाचें नाहीं. म्हणजे जोंपर्यंत मनुष्य संसारांत आहे तोंपर्यंत त्याला सर्व भेदमूलक लोकव्यवहार खरा धरूनच चाललें पाहिजे. अर्थात् लौकिकसत्व कायम आहे तोंपर्यंत आपल्या बाह्येंद्रियांना व परिच्छिन्न बुद्धीला विषयभूत होणारे भौतिकशास्त्रांचें सिद्धांत खरेच आहेत. Matter आणि Force ह्यांजमध्यें भेदबुद्धि आहे तोंपर्यंतच ह्या भौतिकशास्त्रांची स्वारस्यता. पलीकडे तो भेद मिथ्या, तशीं तीं शास्त्रेंही गतार्थच समजलीं पाहिजेत. सारांश, अद्वैतसिद्धांताचा व भौतिकशास्त्रांचा विरोध तर नाहींच; पण उलट अत्यंत उपकार्योपकारक भाव आहे. जों जों त्यांची वृद्धि होईल तों तों अद्वैताला बळकटीच येईल. पूर्वी असंख्य पदार्थ मानीत त्या ऐवजीं रसायनवेत्त्यांनीं ६३ च मूलतत्वें निश्चित केलीं, व त्यांतील एक एक गळत आहे. पदार्थविज्ञानशास्त्र घर्षण उष्णता विद्युत् इत्यादि भिन्न भासणाऱ्या शक्तींचें एकीकरण करण्याच्या खटपटींत आहे. शेवटीं सर्व वैचित्र्य जाऊन Matter (परमाणु) आणि Force (शक्ति) हे दोनच पदार्थ उरतात. येणेंप्रमाणें अनेकत्वाची द्वैतापर्यंत मजल सध्या येऊन पोंचली आहे. तेव्हां जसजसा मानवीबुद्धीचा विकास होत जाईल, तसें हें द्वैतही नष्ट होऊन पूर्ण अद्वैत स्थापन होईल असें मानण्यास काय प्रत्यवाय आहे? तत्त्वज्ञानानें तें आतांच सिद्ध केलें आहे; कांहीं दिवसांनीं भौतिकशास्त्रवादीही तें कबूल करतील.

असो; अद्वैमताचीं प्रचंड भासणारीं विरोधी जीं भौतिकशास्त्रें त्यांचा परिहार आज केला; पुढील खेपेस युरोपियन तत्त्वज्ञानाशीं त्याची तुलना करूं.

---

## अध्याय पांचवा.

# प्राच्य व पाश्चात्य तत्त्वज्ञानांची तुलना.*

Who dares to name Him?
Who to say of Him, I believe?
Who is there ever
With soul to dare,
To utter, I believe Him not?
The All-encompasser, the All-upholder,
Enfolds, sustains He not
Thee,, me, Himself?†

गेटी—फास्ट.

ज्याचें स्वरूप वर्णन करतांना महाकवि गेटीच्या तोंडून वरील प्रकारचे उद्गार निघाले व ज्याचें वर्षानुवर्ष चिंतन करूनही याज्ञवल्क्यासारख्या महर्षींना अखेरीस ' अथात आदेशो नेति नेति ' ' स एष नेति नेत्यात्मा ' इत्यादि स्वाज्ञानबोधक उद्गार काढावे लागले, त्या सकल चराचरव्यापि अद्वितिय परब्रह्माची आमच्यासारख्या क्षुद्र जंतूंनीं वर्तमानपत्राच्या तुटपुंज्या जागेंत मीमांसा करूं पहाणें म्हणजे टिटवीनें आकाश तोलून धरण्यासारखेंच आहे. तेव्हां असलें धाडसाचें काम पत्करण्याऐवजीं प्रस्तुत मीमां-

---

* केसरी ता. ४ एप्रिल १८९३

† त्या सृष्टिकर्त्या ईश्वराचें नामरूप वर्णन करण्यास कोण समर्थ आहे ? तसेंच त्याजवर माझी पूर्ण श्रद्धा आहे असें कोण म्हणूं शकेल ? अथवा त्याच्यावर माझा मुळींच विश्वास नाहीं असें म्हणण्यास धाडस करणारा तरी कोण प्राणी पृथ्वीवर सांपडेल ? तो विश्वव्यापी व विश्वाधार परमेश्वर तुला, मला, आणि आपणा स्वतःलाही व्यापून सर्वांचें नियमन करीत नाहीं काय ?

सेला उपक्रम करण्यांत आमचा मुख्य हेतु संकुचित व स्वल्प होता, हें वाचकांस कळविलें पाहिजे. आमचें काम फक्त मार्गदर्शकाचें आहे; परंतु त्या मार्गांत क्षणोक्षणीं येणाऱ्या अडचणी दूर करून 'तद्विष्णोः परमं पदं' ह्या काठक श्रुतीनें बोधित केलेल्या परमपदाप्रत पोंचविणारा अपरोक्षज्ञानी वाटाड्याच पाहिला पाहिजे. अर्थात् वेदांतमतांचें सविस्तर ज्ञान करून घेण्याची ज्याला इच्छा असेल, त्याला सध्यां तरी उपनिषदें, ब्रह्मसूत्रें व त्यांवरील शंकराचार्यांचे व तच्छिष्यांचे ग्रंथ वाचण्याखेरीज गत्यंतर नाहीं. परंतु त्या मूलग्रंथांचें अध्ययन तर एकीचकडे; पण मुकुंदराज, ज्ञानेश्वर, वामन, रामदास वगैरे अलीकडील साधु कवींनीं प्राकृत ग्रंथांत वेदांताचें सार आणून ठेवलें आहे तिकडेही लोकांचें लक्ष जात नाहीं, ही मोठ्या खेदाची गोष्ट आहे. वस्तुतः हे प्राकृत ग्रंथ बहुतेक सिद्धांतरूपी असल्यामुळें हल्लींच्या तर्कशास्त्रप्रवीण व नास्तिकपक्षाभिनिविष्ट पिढीचें त्यांजपासून फारसें समाधान होण्याचा संभव नाहीं. तेव्हां एक तर मूळ आचार्यांच्या ग्रंथांचेंच अध्ययन सर्वत्र सुरू झालें पाहिजे, किंवा त्या नमुन्यावर व प्रस्तुत कालाला अनुरूप असे अद्वैतप्रतिपादक ग्रंथ प्राकृतांत झाले पाहिजेत. एरव्हीं परकी विद्येच्या संसर्गानें वाढत जाणारी अश्रद्धा कमी करण्याला दुसरी तोड नाहीं. पुरातन हिंदुधर्माचा उद्धार करावयाचा असेल तर तो ग्रामण्यांनीं किंवा प्रायश्चित्तांनीं होणार नाहीं. ज्या अज्ञानामुळें किंवा अल्पज्ञानामुळें आधुनिक लोकांकडून ( व त्यांत जुन्या, नव्या, सुधारक व दुर्धारक सर्वां-समावेश होतो ) हिंदुधर्माची पायमल्ली होत आहे तें अज्ञान दूर करण्याला ज्ञानार्जनच पाहिजे. तें कसें प्राप्त करून घ्यावें व हल्लींच्या सुधारणावादींची दिशा चुकत आहे ती कशी नीट करतां येईल, हें दाखविण्याकरितांच आम्हीं हा विषय हातीं घेतला. विक्लिफ, लूथर, नॉक्स, वेस्ले इत्यादिकांनीं युरोपांत जी धर्मसुधारणा केली ती परकी धर्माचें अनुकरण करून किंवा दुसऱ्याचे उष्टे आचारविचार स्वदेशबांधवांच्या डोक्यावर लादून केली नाहीं; तर हजार बाराशें वर्षांपासून जें खिस्ती पवित्र शास्त्र जनसमूहाला अज्ञात-प्राय झालें होतें त्याची सर्वांना ओळख करून देऊनच केली. त्याचप्रमाणें श्रीशंकराचार्यांनीं बौद्धमतांचा उच्छेद केला तो श्रुतिस्मृतींचा जीर्णोद्धार

करूनच; केशवमहर्षींच्या नवसंहितेप्रमाणें अपूर्व धर्मग्रंथ रचून नव्हे. वस्तुतः आमची आम्हांला ओळख विसरली आहे ती करून देणें हीच प्रस्तुत काळीं खरी सुधारणा आहे. ह्या दिशेकडे लोकांचें लक्ष लागावें असा आमचा मुख्य उद्देश असल्यामुळें आम्ही वेदांतमतांचें सविस्तर निरूपण करण्याच्या भानगडींत न पडतां त्यांजविषयीं लोकांची जिज्ञासा प्रज्वालित करणें, व त्यांच्याविरुद्ध निरनिराळ्या पक्षांकडून येणाऱ्या आक्षेपांचें निराकरण करणें येवढींच कामें पत्करलीं आहेत. त्यांपैकीं मुख्य मुख्य आक्षेपांचा गेल्या एक दोन लेखांत विचार केला, व प्रसंगोपात् कित्येक वेदांत सिद्धांतांचाही उल्लेख करण्यांत आला आहे. शिवाय हें आमचें सामान्य विवेचन चांगलें समजावें म्हणून अगोदर प्रो० डयूसनसाहेबांच्या उत्कृष्ट व्याख्यानाचा सारांश दिला होता, त्यावरून एकंदर अद्वैतमताची साधारण कल्पना वाचकांस आली असेलच. तेव्हां त्याच गोष्टींची येथें द्विरुक्ति न करितां, त्यांपैकीं प्रधान म्हणजे मूलभूत सिद्धांत कोणते व गौण म्हणजे कालांतरानें व अधिकारीभेदानें फिरूं शकणारे कोणते ह्याचें थोडेंसें दिग्दर्शन करून आजचा मुख्य विषय जो अद्वैताची व युरोपियन तत्त्वज्ञानाची तुलना तिकडे वळूं.

हा गौणप्रधानांचा भेद करण्याची एक रीति मागील खेपेस सांगितलीच आहे. निर्गुण ब्रह्मासंबंधाचे सिद्धांत तद्विषयीभूत निर्गुण ब्रह्माप्रमाणेंच सर्वदां प्रधान व सत्य असले पाहिजेत; पण सगुण ब्रह्मासंबंधानें तशी स्थिती नाहीं. सगुण ईश्वराच्या कल्पना निरनिराळ्या देशांत, काळांत व लोकांत निरनिराळ्या प्रकारच्या आढळतात. इतकेंच नाहीं, तर एकाच देशांत व एकाच काळींही ह्या ईश्वररूपासंबंधानें पुष्कळ मतवैचित्र्य दिसून येतें. आतां ह्या सगुण कल्पनांचेंही निर्गुणाशीं त्यांची तुलना करून तारतम्य ठरवितां येईल. जितकें सगुण कल्पनेचें निर्गुण ब्रह्माशीं अधिक साम्य असेल तितका तो धर्म चांगला व वरच्या पायरीचा समजला पाहिजे. उदाहरणार्थ, आफ्रिकन रानटी लोकांतील झाडपाल्याचा मंबोजंबो, रोमन लोकांचा जुपिटर, खिस्ती लोकांचा कामक्रोधाविष्ट पिता, व हिंदुधर्मांतलि विराटस्वरूप हिरण्यगर्भ, ह्यांपैकीं पुढची पुढची कल्पना

मागच्यापेक्षां अधिक उदात्त आहे हें कोणीही कबूल करील. अर्थात् ह्या दृष्टीनेंही हिंदुधर्म सर्वांत श्रेष्ठ ठरतो. पण तो स्वतंत्र विषय असल्यामुळें आम्हांला सध्यां त्याच्याशीं कर्तव्य नाहीं. कोणत्याही ईश्वरस्वरूपाची भक्ति करा, त्या स्वरूपाप्रमाणें त्या भक्तीची योग्यता व फळ मिळतें हें हिंदुधर्माचें मुख्य तत्त्व आहे, व तें "ये यथा मां प्रपद्यन्ते तांस्तथैव भजाम्यहम्" ह्या भगवद्वचनांत व्यक्त करून दाखविलें आहे. आपल्याला अद्वैताशीं काम आहे तेव्हां हा द्वैताचा किंबहुना नानाविधत्वाचा प्रांत अजीबात खालीं टाकून वर उच्च प्रदेशांत जावें, व मुख्य परब्रह्मविषयक सिद्धांतांचाच विचार करावा हें उत्तम.

हे मुख्य सिद्धांत पांच सांगतां येतील. ( १ ) ब्रह्म अद्वितीय असून सृष्टीचें उपादान व निमित्त कारण आहे. ( २ ) ही जगदुत्पत्ति मायामूलक व मिथ्या आहे. ( ३ ) जीवब्रह्माचें पूर्ण तादात्म्य आहे, व भेद अविद्यामूलक आहे. ( ४ ) हा भेद उपस्थित करणारा जन्ममरणपरंपरारूप संसार प्राणिकर्मानें उत्पन्न झाला आहे व त्या कर्माचे नाशानेंच फक्त नष्ट होईल. ( ५ ) सदरहू कर्मनाश होऊन मोक्षप्राप्ति होणें फक्त ज्ञानानेंच साध्य आहे. ह्या पांच सिद्धांतांपैकीं बहुतेकांसंबंधानें लोकांत पुष्कळ अज्ञान व गैरसमज आहे हें मागील अध्यायांत माया व मिथ्या शब्दांविषयीं विवेचन केलें त्यावरून लक्षांत येईलच; तथापि ह्या सर्व गैरसमजांचें सविस्तर विवरण किंवा साधकबाधक विचार करण्यास येथें सवड नाहीं. वरील सिद्धांतांपैकीं पहिले दोन बाह्यसृष्टिविषयक आहेत, व दुसरे दोन आत्म्यासंबंधाचे आहेत, आणि पांचवा आत्मब्रह्माचें तादात्म्य घडवून आणणारा आहे. म्हणजे पहिली जोडी विषयप्रतिपादक, दुसरी विषयिप्रतिपादक व शेवटचा विषयविषयींचा अभेददर्शक होय. आतां अद्वैताची पाश्चात्य तत्त्वज्ञानाशीं तुलना करावयाची म्हणजे हे सर्व प्रकार दुसऱ्यांत कसे निर्दिष्ट केले आहेत हें पाहाणें होय. पूर्णपणें ही तुलना करणें बरेंच कठीण व अवकाशाचें काम आहे. तसें करण्याला भरतखंडांत उत्पन्न झालेल्या वेदांतादि विविधमतांचें स्पष्ट विवरण केलें पाहिजे इतकेंच नाहीं, तर युरोपांतील प्राचीन, अर्वाचीन एकंदर तत्त्वज्ञानांचा इतिहासही दिला

पाहिजे; थेलसपासून हार्टमनस्पेन्सरपर्यंत मुख्य मुख्य तत्त्वविवेचकांचे सिद्धांत सांगितले पाहिजेत; व जागजागीं त्यांचा परस्परकार्यकारणभाव, साधर्म्य-विरोध, व सत्यासत्यत्व दाखविलीं पाहिजेत. पण इतकें करण्याची आम्हांस सवड नाहीं, व जरूरही नाहीं. कारण अद्वैतमताचें श्रेष्ठत्व स्थापन करणें हा जो आमचा मुख्य उद्देश तो एकंदर पाश्चात्य तत्त्वज्ञानाचें विहंगम-रीतीनें अवलोकन केल्यानें किंवा स्थालिपुलाकन्यायानें त्यांतील वेंचक सिद्धांत सांगितल्यानेंही साधणार आहे.

प्रथमतः हिंदुधर्माचें व युरोपियन तत्त्वज्ञानाचें एक फार महत्त्वाचें सादृश्य आहे त्याचा उल्लेख केला पाहिजे. अति प्राचीन वैदिककालापासून तों अलीकडील देशी भगवद्भक्तांपर्यंत तमाम हिंदुधर्मपंथांचें व मत-सांप्रदायांचें पर्यवसान अद्वैतांत होतें, असें आम्हीं पूर्वी दाखविलेंच आहे. तसेंच पाश्चात्य भौतिकशास्त्रांचा कल देखील उत्तरोत्तर अद्वैतस्थापनेकडेच आहे, हेंही गेल्या खेपेस सांगितलें. युरोपियन तत्त्वज्ञानाचा इतिहास पाहिला तर त्याला हें विधान अधिक अक्षरशः लागू पडतें. द्वैताद्वैताच्या तंट्याचा मूळ प्रारंभ प्लेटो अरिस्टाटल ह्या गुरुशिष्यांच्या जोडीपासून झाला. अरिस्टाटल द्वैती, जगत्सत्यवादी, व तर्काचें अवडंबर माजविणारा व प्लेटो त्याच्या उलट सृष्टीचें काल्पनिकत्व, जन्मांतर, कर्म वगैरेवर विश्वास ठेवणारा होता. आमच्या इकडील मीमांसक कुमारिलप्रभाकरा-प्रमाणें वरील गुरुशिष्यांतही व त्यांच्या अनुयायांत विरोध उत्पन्न होऊन कडाक्याचा वाद चालू होता. प्रथम बरेच दिवस प्लेटोच्या मताची सरशी होती, व ‘ निओप्लेटोनिस्ट ’ सारखे पूर्ण अद्वैतीपंथ प्रादुर्भूत झाले. पण पुढें ख्रिस्तीधर्माचा जसजसा प्रसार होत चालला तसें द्वैतही माजत चाललें. अरिस्टाटलचे ग्रंथ वेदवाक्य होऊन बसले. ‘ नामिनालिस्ट ’ ‘ रिआलिस्ट ’ ‘ कन्सेप्शनिस्ट ’ वगैरे मतांचा झगडा सुरू झाला. शेवटीं ह्या शुष्क वाग्जालाचा लोकांना वीट येऊन एकंदर तत्त्वज्ञानाचा उपहास होऊं लागला. अशा वेळीं इंग्लंड व फ्रान्स येथें दोन पुरुष उत्पन्न होऊन त्यांनीं अनुक्रमें अर्वाचीन भौतिकशास्त्रांचा व तत्त्वज्ञानाचा पाया घातला. फ्रान्सिस बेकनला जसें भौतिकशास्त्राचा जनक म्हणतात, तसेंच डेकार्टला

अर्वाचीन युरोपियन तत्त्वज्ञानाचा आद्य गुरु मानलें पाहिजे. पुढील हरएक ग्रंथकारांनीं डेकार्टचें शिष्यत्व कबूल केलें आहे,व त्यांच्या सर्व तत्त्वविचारांना डेकार्टच्या चमत्कारिक सिद्धांतांनीं वळण लावलेलें दिसतें. अरिस्टाटल-प्रमाणें डेकार्टही द्वैतीच होता. तथापि प्लेटोचें Innate Ideas म्हणजे ‘ स्वयंभू कल्पना ’ चें मत त्यानें घेतलें, आणि त्यामुळें हें मत पुढें प्रत्यक्ष प्रमाणाप्रमाणें निर्विवाद होऊन बसलें. पण प्लेटोचें एवढें एक मत कबूल केल्यानें पुढें इतर अद्वैतप्रतिपादक सिद्धांतांचा प्रवेश होण्यास फारच सुलभ होईल, हें डेकार्टच्या लक्षांत आलें नाहीं. जगत्कर्त्या ईश्वराचें अस्तित्व डेकार्टनें ईश्वरविषयक उपजत ज्ञान मानूनच सिद्ध केलें. तसेंच प्रत्येक जीवात्म्याचें सत्यत्व स्थापन करणारा Cogito, ergo, sum म्हणजे ‘ मी विचार करतों सबब मी आहें ’ हा त्याचा सुप्रसिद्ध परिष्कार स्वयंभू कल्पनांच्याच आधारावर रचला होता. वरील परिष्कारानें विचार करणारा मी आत्मा ह्याचें अस्तित्व सिद्ध होईल खरें; पण तो आत्मा आणि तत्कार्यविचार हीं दोन्ही एकच कीं भिन्न आहेत हा प्रश्न पुनः उद्भवतोच. वस्तुतः तें अनुमानच बरोबर नाहीं, कारण त्याला दृष्टांत नसल्यामुळें तें हेत्वाभास कोटींत घालावें लागेल. डेकार्टचेंही म्हणणें तें अनुमान नाहीं, तर भूमितीच्या प्रत्यक्षप्रमाणासारखी ती एक स्वयंभू कल्पना आहे. अर्थात् आत्म्याचें विचार करणें व विद्यमान असणें ह्या दोन्ही क्रिया एकच, व ज्यावेळीं पहिली क्रिया थांबेल त्यावेळीं दुसरीही थांबलीच पाहिजे; सबब जितक्या विचारक्रिया भिन्न तितके आत्मेही भिन्न असें जीवात्म्याचें नानात्व स्थापन होतें. पण ह्या तर्कप्रपंचांत एक ढोबळ चूक झाली. कारण डेकार्टच्या ह्या मताप्रमाणें झोंपेंत ज्या वेळेस सर्व विचारक्रिया थांबतात त्या वेळेस आत्माही नष्ट होतो असें मानावें लागेल. हा आक्षेप टाळण्याकरितां आत्मा आणि तत्कार्यविचार हीं भिन्न आहेत असें पुढील तत्त्वज्ञान्यांना कबूल करावें लागलें. येणेंप्रमाणें बुद्धीचें व जीवात्म्याचें एकदां पृथक्करण झाल्यावर त्याचें व्यापकत्व किंवा एखाद्या सर्वव्यापि आत्मतत्त्वाचें अंशित्व स्थापन करण्याचा रस्ता खुला झाला. एवढ्यानेंच द्वैताचा पुरा

मोड झाला नाहीं हें खरें; तथापि डेकार्टच्या मागून झालेले स्पिनोझा, मालिब्रांची, ह्यूम, बर्कले, सर विल्यम हामिल्टन, क्यांट, फिक्टी, शेलिंग, हेगेल, शोपेनहोर, हार्टमन, स्पेन्सर ह्या सर्व तत्त्वज्ञान्यांचें मुख्य लक्ष द्वैताकडून निघून, सदहू जगदाधारभूत व्यापक अद्वितीय आत्मतत्त्वाचें स्वरूप कायम करण्याकडेच लागलें हा लहानसहान परिणाम नाहीं. त्यावरून ह्या अद्वैताच्या सत्यत्वाविषयीं तरी इतःपर कोणाला शंका उरली नाहीं असें स्पष्ट दिसून येतें. त्याच्या विशिष्ट स्वरूपाविषयीं मात्र कायतो मतभेद राहिला. निरनिराळ्या ग्रंथकारांनीं ह्या अद्वैततत्त्वाला निरनिराळीं नांवें दिलीं. स्पिनोझा त्याला universal Substance (सर्वव्यापक द्रव्य) म्हणतो. क्यांट Unconditioned ( अपरिच्छिन्न ) म्हणतो; शेलिंग व फिक्टी Absolute Being किंवा Idea ( अविकृत आत्मा अथवा कल्पना ) म्हणतात; हेगेल Universal and Pure Being( नित्य व शुद्ध आत्मा) म्हणतो; शोपेनहोर Universal Will (व्यापक इच्छा) म्हणतो; आणि हार्टमन Unconscious ( अव्याकृत ) असें नांव देतो. अखेरीस हर्बर्ट स्पेन्सर त्या ब्रह्मतत्त्वाला Unknown and Unknowable (अज्ञात व अज्ञेय] ठरवून निराश होतो. तसेंच नामभेदाप्रमाणें आत्म्याचा गुणकर्मभेद व इतर आनुषंगिक मतभेदही कमीजास्ती अंशानें ह्या निरनिराळ्या ग्रंथकारांमध्यें आढळतो. पण त्याशीं आपणाला सध्यां कर्तव्य नाहीं. ते सर्व ग्रंथकार कमीअधिक अंशानें अद्वैतमतवादी आहेत, व ह्या सर्व तत्त्वविचारांचा प्रवाह उत्तरोत्तर शांकरअद्वैताकडेच झुकत आहे, ह्या दोन मुख्य मुद्याच्या गोष्टी आहेत; व त्या अलीकडील पाश्चात्य तत्त्वविचारांचें सूक्ष्म अवलोकन केलें असतां निर्विवाद सिद्ध होतात. हेगेलनें लिहिलेल्या तत्त्वज्ञानाच्या इतिहासांत त्या उत्तम रीतीनें सिद्ध करून दाखविल्या आहेत. तेव्हां त्यासंबंधानें येथें पाल्हाळ करण्याऐवजीं प्रत्येक आंग्लभाषाकोविदानें तो ग्रंथ अवश्य वाचावा अशी आम्ही शिफारस करतों. अगदीं अलीकडील हार्टमनच्या अव्यक्त मताचें तर वेदांतसिद्धांतांशीं अतिशयच साम्य दिसून येतें. आणखी एक प्रमाण आहे. ह्या निरनिराळ्या तत्त्वज्ञान्यांच्या मनांत फारसा नवीनपणा नसून त्यांच्यासारखींच मतें आमचे-

कडेही एके वेळीं प्रचलित होतीं. डेकार्टचें व सांख्याचार्य कपिलाचें अनेक बाबतींत निकट साम्य आहे. डेकार्टची matter आणि mind व सांख्यांची प्रकृति पुरुष हीं एकच. डेकार्टचा Cogito ergo sum हा परिष्कार व सांख्यांचा ' घटज्ञानवान् अहम् ' हा अध्यवसायरूपी अहंकार समानच मानले पाहिजेत. डेकार्टच्या सिद्धांतांनीं पुढें शोपेनहोरच्या अद्वैताला जसा रस्ता सुगम केला; तशीच इकडे सांख्यप्रक्रियेवर वेदांताची इमारत रचली गेली. डेकार्ट जसा सांख्य, त्याचप्रमाणें स्पिनोझाला सर्वास्तित्ववादी व फिक्टीला विज्ञानवादी बौद्ध म्हणण्यास हरकत नाहीं. वैशेषिकमताचा प्रतिष्ठापक कणाद आणि Transcendental Reason शोधून काढणारा क्यांट ह्यांचेंही बरेंच साम्य आहे. 'सप्तभंगीनया'च्या साहाय्यानें अनुभवमात्राची अनिश्चितता सिद्ध करणाऱ्या जैनांना Relativity of Knowledge म्हणजे ज्ञानाचें परिच्छिन्नत्व व सापेक्षत्व प्रतिपादणारे ह्यामिल्टनप्रभृति पाश्चात्य तत्त्वज्ञानी बरेच जवळ जवळ आहेत. तेव्हां हिंदुस्थानांत जर पूर्वीं अनेक वेळां सांख्य बौद्ध व वैशेषिक मतें खंडित होऊन पूर्ण अद्वैत स्थापन झालें, तर युरोपांतही तत्स्थानापन्न झालेलें हार्टमनचें तत्त्वज्ञान कांहीं काळानें तरी सर्वसंमत होईल असें मानण्यास काय प्रत्यवाय आहे ?

तात्पर्य, इतिहासाची केव्हां केव्हां पुनरावृत्ति होते अशी एक म्हण आहे, तिचा ह्या बाबतींत चांगला अनुभव येतो. हिंदुस्थानांत ज्याप्रमाणें अनेक मतें विमतें कांहीं दिवस झगडा करून हतवीर्य झाल्यावर, शेवटीं लोकांच्या संशयग्रस्त चित्तवृत्तींना अद्वैतानन्दांत शांति व स्थैर्य प्राप्त झालें, त्याचप्रमाणें युरोपांतही कांहीं काळानें चोहोंकडे अद्वैतसाम्राज्य सुरू होईल असें मानण्यास बिलकुल हरकत नाहीं. पण हें घडून येण्यापूर्वीं युरोपिअन तत्त्वविचारांतील व्यंगें काढून टाकून त्यांना चांगलें वळण लाविलें पाहिजे. पाश्चात्यलोकांना हीं आपलीं व्यंगें दिसूं लागण्यास वेदांतग्रंथांची त्यांना चांगली ओळख झाली पाहिजे. ज्याप्रमाणें संस्कृत भाषेची माहिती झाल्यामुळें भाषोत्पत्तीसंबंधानें युरोपियन लोकांच्या समजुती पुष्कळ बदलल्या व बेबेलच्या मनोऱ्यासारख्या वेडगळ कल्पना पार नाहींशा झाल्या;

त्याचप्रमाणें हिंदु अद्वैतमताच्या ज्ञानानें त्यांच्या धर्मसमजुतीही हटकून सुधारतील. तेव्हां त्यांपैकीं मुख्य दोन तीन व्यंगांचें येथें दिग्दर्शन करणें अप्रासंगिक होणार नाहीं.

---

## अध्याय साहावा.

## अद्वैतमतांचें वैशिष्ट्य.*

The soul that rises with us, our life's star,
Hath had elsewhere its setting,
And cometh from afar,
Not in entire forgetfulness,
Not in utter nakedness,
But trailing clouds of glory do we come,
From God who is our home §
Wordsworth: Ode to Immortality.

मागील अध्यायांत हिंदु व युरोपियन तत्त्वज्ञानांचे कित्येक बाबतींत कसे विलक्षण साम्य आढळते त्याचे दिग्दर्शन केलें, त्यावरून अद्वैतसिद्धां-

---

* केसरी ११ एप्रिल १८९३

§ आपल्या जन्माबरोबर उदय पावणारा व एकंदर जीवयात्रेला प्रकाशित करणारा आत्मरूपी तेजोराशि पूर्वीं दुसरीकडे अस्तगत होऊन या देहांत आला आहे. तथापि पूर्वस्थितीचा त्याला पूर्ण विसर पडला किंवा पूर्वींचे सर्व वासनासंस्कार धुवून गेले असे मुळींच होत नाहीं; तर जन्मांतर्गत वासनापटलासहवर्तमान आपण परमेश्वरापासून निघून नवीन देहांत जन्म घेतों.

तांच्या सत्यत्वाबद्दल कोणाचीही खात्री होणार आहे. तथापि ते सिद्धांत युरोपियन तत्त्वविचाराशीं जुळतात म्हणून खरे, असें म्हणण्याचा मात्र आमचा भावार्थ नाहीं. परस्परांविषयीं माहिती नसतां एकाच प्रकारच्या कल्पना भिन्न देशांतल्या व भिन्न काळच्या विद्वान् पंडितांच्या डोक्यांत आल्या तर त्या खऱ्या असण्याचा पुष्कळ संभव असतो हें एक, व युरोपियन तत्त्वविचारांचा उत्तरोत्तर अद्वैतसिद्धांतांकडेच कल दिसतो. हें दुसरें; ह्या दोन कारणांवरून असाच क्रम पुढें चालल्यास थोड्याच दिवसांनीं अद्वैतमत युरोपांत सर्वसंमत होणार हें दाखविण्याचा आमचा उद्देश होता. शिवाय खिस्तीधर्मासारख्या मनुष्यबुद्धीला मोह पाडणाऱ्या अनेक गोष्टींचें युरोपखंडांत प्राबल्य असतांही त्रिकालबाधित ब्रह्मसत्वाचा थोडथोडा तरी प्रकाश त्यांच्या अंतःकरणांत पडूं लागला आहे हें विशेष ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. परंतु मागें सांगितलेल्या सादृश्यापेक्षांही वैधर्म्यानें युरोपियन विचारांचा कोतेपणा अधिक स्पष्ट होतो, सबब त्या बाजूकडे आतां वळूं.

हिंदु व युरोपियन तत्त्वज्ञानांच्या प्रगमनेतिहासांत जरी पुष्कळ साम्य आढळतें तरी वेदांतमतांत जे कित्येक महत्वाचे विशेष आहेत, त्यांमुळें दोहोंच्या तुलनेंत अद्वैतसिद्धांतालाच वर्चस्व द्यावें लागतें. युरोपियन तत्त्वज्ञानाचें लक्षपूर्वक अवलोकन करणारांना पहिल्या प्रथम एक मोठा भेद ताबडतोब दिसून येतो. तो हा कीं, **पायथागोरास**पासून आजपर्यंत जेवढे म्हणून तत्त्वज्ञानी युरोपखंडांत होऊन गेले किंवा हल्लीं हयात आहेत, त्यांच्या ग्रंथांत मोक्षाची कल्पना बिलकूल सांपडत नाहीं; अथवा असलीच तर फार अपूर्ण, कोती व वेडगळ अशी आढळते. मोक्षप्राप्ति करून देणें हें वस्तुतः धर्माचें काम; पण युरोपांत धर्माची व तत्त्वज्ञानाची ताडातोड झाल्यामुळें, अर्थातच ते तत्त्वग्रंथकार मोक्षस्वरूप निश्चित करण्यांविषयीं खिस्तीधर्मावर हवाला देऊन आपण स्वतः त्यासंबंधानें अगदीं उदासीन राहिले. त्यामुळें एकीकडे खिस्तीधर्मांतल्यासारख्या वेडगळ कल्पना, विचाराची कसोटी न लागल्यांमुळें जशाच्या तशाच लोकांच्या मनांत खिळून राहिल्या; व दुसरीकडे तत्त्वविचारांपासून अंतीं कांहीं

फलप्राप्ति सांगितली नसल्यामुळें त्यांचीही लोकांना फारशी जरूर वाटत नाहींशी झाली. युरोपखंडांतील जनसमूहामध्यें तात्विक विचारांविषयीं जी अतिशय अनास्था किंबहुना तिरस्कार दिसून येतो त्याला कारण तसल्या विचारांपासून फलनिष्पत्ति कांहीं एक नसल्यामुळें त्यांत वेळ घालविणें म्हणजे आयुष्य फुकट दवडण्यासारखें आहे, अशी सार्वत्रिक झालेली समजूतच असली पाहिजे. तत्त्वज्ञानाचा काथ्याकूट म्हणजे शिळोप्याच्या वेळचे कल्पनातरंग किंवा रिकामपणची करमणूक असें लोकांना दिसून आल्यामुळेंच वरील समजूत उत्पन्न झाली असावी ह्यांत संदेह नाहीं. समजा डेकार्ट क्यांट प्रभृतींचे सर्व ग्रंथ पालथे घातले, हेगेलचें 'लॉजिक' करतलामलवत् झालें, व स्पेन्सरच्या 'सिन्थेटिक फिलॉसफी' चीं पारायणें केलीं; तरी त्यापासून फायदा काय, असा कोणीं प्रश्न केल्यास काय उत्तर देतां येईल? थोडीबहुत कुशाग्र बुद्धि होईल, व एकादा तात्त्विक ग्रंथ लिहिण्याचें सामर्थ्य येईल इतकेंच; पण एवढ्यानें जीविताचें सार्थक्य झालें काय? आपली गति पुढें काय होईल हा जो प्रत्येकाच्या हृदयांत सदा जागरूक प्रश्न असतो त्याला युरोपियन तत्त्वज्ञान बिलकुल उत्तर देऊं शकत नाहीं. तेव्हां न्यूमन म्यानिंगप्रभृति परिणतबुद्धि पण श्रद्धालु व्यक्तींसही ह्या घटपटादि खटपटींचा अखेरीस पुरा वीट येऊन पोपमहाराजांच्या कळपांतच पुनः आश्रय करणें बरें वाटावें ह्यांत नवल तें काय? पण आमच्या वेदांताची रीति वरच्याहून अगदीं भिन्न आहे. त्या शास्त्राला आरंभ करण्यापूर्वीं 'मोक्षार्थमिदं शास्त्रम्' 'निःश्रेयसप्रयोजना वेदांतवाक्यमीमांसा' इत्यादि प्रतिज्ञा केलेल्या असतात; इतकेंच नाहीं, तर वेदांताचें अध्ययन करण्याचा अधिकार येण्यास ज्या साधनचतुष्टयाची अवश्यकता मानली आहे त्यांत मुमुक्षत्व म्हणजे मोक्षाची इच्छा असणें हें प्रधान मानलें आहे. अर्थात् ज्याला सद्गतीची इच्छा होईल त्याला ब्रह्मज्ञान प्राप्त करून घेण्याची उत्कट इच्छा होणारच. युरोपांत तत्त्वज्ञानाचा लोकांना कंटाळा येतो, कारण तें निष्प्रयोजन आहे. उलट हिंदुस्थानांत आबालपंडितांचा तिकडे ओढा दिसून येतो, कारण ह्या मानवदेहाचें खरें सार्थक्य त्याजपासूनच व्हावयाचें, असें त्यांना पक्कें

माहीत असतें. मारूनमुटकून रविवारीं ख्रिस्ती चर्चांत जमविलेले लोक तेथें झोंप घेतात, नाहीं तर एकमेकांची कुचेष्टा करतात; पण आमचे इकडे लोकांच्या झुंडीच्या झुंडी वेदांतश्रवणांत तल्लीन झालेल्या आढळतात, ह्यांतलें खरें इंगित काय असेल बरें ? उद्दिष्ट स्थलाची योजना न करतां बाहेर निघणारा वाटसरू जसा रस्ता फुटेल तिकडे भटकतो, त्याचप्रमाणें युरोपियन तत्त्वविचारांची प्रयोजनाकडे दुर्लक्ष केल्यानें ताळ ना तंत्र अशी स्थिती झाली आहे. पाहिजे त्यानें वाटेल तीं मतें प्रतिपादावींत, व सर्व जगाला मूर्ख म्हणावें; परंतु हरएक तत्त्वविचारांची कसोटी जी त्याचें मोक्षप्रापकत्व त्याची एकालाही कल्पना नाहीं. ही झोटिंगपादशाही नाहींशी करण्याला एकच उपाय आहे. तो धर्म आणि तत्त्वज्ञान ह्यांची सांगड घालून देणें हा होय. श्रद्धा आणि विचार ह्यांच्या संगमापासून प्रादुर्भूत होणारी जी मोक्षरूपी दिव्यसंपत्ति तिची कोणाच्यानेंही बरोबरी करवणार नाही.

पण हिंदुअद्वैताकडे श्रेष्ठत्व येण्यास ह्यापेक्षांही अधिक सबळ कारणें आहेत. कोणातरी जगत्कर्त्या ईश्वराचें अस्तित्व आपल्याला स्वयंभू कल्पनेनेंच कळतें. हा वर सांगितलेला डेकार्टचा सिद्धांत आतां युरोपांत बहुतेकांस पसंत झाल्यासारखा झाला आहे. वेदांत्यांच्या आत्मसाक्षात्काराचेंच हें एक रूपांतर आहे म्हटलें तरी चालेल. परंतु ह्या स्वयंभू कल्पना [ Innate Ideas ] सर्वांच्याच अंतःकरणांत एकसारख्या उद्भवत नाहींत; त्यामुळें पुरुषमतिवैरूप्य जसें जगांत अनंत आहे, तशा ईश्वरस्वरूपाविषयक कल्पनाही निरनिराळ्या आढळतात. श्रद्धाळूंचा भक्तीकडे ओढा असल्यानें त्यांना ईश्वर सगुणरूपानें भासतो; तत्त्वज्ञान्यांना तो निराकार अद्वैतरूपानें भासतो; व भौतिकशास्त्रवाद्यांना तो त्रिकालाबाध्य सृष्टिनियमांच्या रूपानें दृश्य होतो. वस्तुतः ह्या सर्व कल्पना एकाच ईश्वरस्वरूपाच्या तीन निरनिराळ्या बाजू आहेत. पण ही गोष्ट आमच्या अद्वैतवाद्यांना जशी कळून चुकली आहे तशी युरोपियन तत्त्वज्ञान्यांच्या अजून ध्यानांत येत नाहीं. वरील प्रकारच्या सर्व कल्पनांचे मुख्य तीन वर्ग करतां येतील व त्यांना श्रद्धामूलक किंवा विकारमय[Emotional],

बौद्ध [ Intellectual ], आणि नैतिक [ Moral ], अशीं नांवें देतां येतील. पहिल्या प्रकारची कल्पना बहुधा प्रेमळ, धार्मिक व कोमल अंतःकरणाच्या लोकांत आढळते. दया, शांति, क्षमाशीलत्व इत्यादि गुण ईश्वराच्याठायीं आरोपित करून त्याची सप्रेम भक्ति करणें, व अनन्यभावानें करुणा भाकणें, हीं ह्या कल्पनेचीं बाह्य कार्यें होत. खिस्त्यांचा ईश्वरपुत्र व आमचा कृष्णावतार हीं ह्या कल्पनेचीं चांगलीं उदाहरणें आहेत. दया, माया, सौहार्द इत्यादि मनुष्याच्या नैसर्गिक उदात्त मनोवृत्तींना संतोषकारक अशी ही सगुणकल्पना असल्यामुळें साधारण जनसमूहाचा तिकडेच विशेष ओढा असतो. दुसरा प्रकार बौद्धकल्पनांचा, व केवळ बुद्धीपासूनच त्यांचा उगम होतो. तर्कबलानें जें ईश्वरस्वरूप कायम ठरेल तेंच खरें, मग तें मनोवृत्तींना इष्ट वाटो वा न वाटो, अशी ह्या दुसऱ्या लोकांची समजूत असते. जगत्कर्ता ईश्वर निर्गुण, निराकार, अपरिच्छिन्न असल्यामुळें दयालुत्वादि गुण कितीही चांगले असले तरी ते त्याच्या ठिकाणीं मानतां येत नाहींत. सर्व प्रकारच्या युरोपियन तत्त्वविचारांचा व शास्त्रांचा ह्या दुसऱ्या वर्गांत अंतर्भाव होतो. तिसरा वर्ग नैतिक कल्पनांचा, म्हणजे सर्व जगत् ज्या नैतिक व सृष्टिविषयक नियमांनीं बांधलें गेलें आहे, व सर्व सृष्टिव्यवहार ज्या नियमांना अनुसरून चालतात, त्या त्रिकालाबाधित नियमांहून जगत्कर्ता ईश्वर निराळा नाहीं असें मानणारांचा. कायदा ऊर्फ नियम ही अनुल्लंघनीय वस्तु आहे, व तिचें अतिक्रमण झालें कीं हटकून शासन व्हावयाचें, ही समजूत या कल्पनेचें फळ होय. बेंथमचा Moral Law ( नीतिनियम ) व काव्यप्रकाशकारांनीं ब्रह्मसृष्टीला कारण मानलेले 'नियतिकृत नियम' हे दोन्ही ह्याच वर्गांतील होत. स्वातंत्र्यदेवता, न्यायदेवता, मनोदेवता इत्यादि सर्व अर्वाचीन लक्षाणिक देवता ह्या जगदाधारभूत अनुल्लंघ्य नियमविषयक कल्पनेचेच पर्याय आहेत. ह्या तिन्ही प्रकारच्या कल्पना एकाच ईश्वरस्वरूपाच्या तीन निरनिराळ्या बाजू असल्यामुळें त्या सर्व अंशतः खऱ्या आहेत. व म्हणून त्यांचें सम्मेलन हेंच ईश्वराचें पूर्ण स्वरूप होय. तेव्हां त्यांपैकीं अमुकच एक खरी व बाकीच्या खोट्या असा दुराग्रह

धरणें म्हणजे आपला एकतर्फीपणा व कोति बुद्धि व्यक्त करणें होय. युरोपांत हीच चूक आज शेंकडों वर्षांपासून चालत आली आहे, व त्याला कारण ख्रिस्तीसारख्या अपरिपक्व धर्माचा तेथें प्रसार होय. धार्मिक लोकांना पहिली कल्पना उत्तम वाटते तर तत्त्वज्ञानी दुसरीला चिटकून बसणार, आणि भौतिक व नैतिकशास्त्रांचे अभिमानी तिसरीवर जोर देणार; व तिघेही एकमेकांला शिव्या देणार, अशी पाश्चात्य देशांत स्थिति झाली आहे. ह्या तिन्ही कल्पनांचा भिन्न भिन्न काळीं व स्थळीं युरोपांत प्रादुर्भाव झाला, हें एक त्या आजपर्यंत पृथक् राहाण्याचें कारण असेल. दुसऱ्या बौद्ध कल्पनेचा उगम ग्रीकतत्त्वज्ञानापासून झाला, तिसरी रोमन कायद्यानें प्रचारांत आणली, व पहिलीचें ख्रिस्ती धर्मानें स्तोम माजविलें; तथापि ह्या तीन प्रवाहांच्या मेलनानें प्रादुर्भूत झालेल्या अर्वाचीन युरोपियन सुधारणारूपी त्रिवेणी-संगमांत ह्या ईश्वरविषयक कल्पनात्रयाचेंही मेलन झालें नाहीं हा मोठा चमत्कार आहे. ह्यावरूनच धर्मसंबंधानें युरोपखंड अजून पुष्कळ मागें आहे असें ठरतें; व तितक्याच अंशानें ह्या तिन्ही कल्पनांचें एकीकरण करणाऱ्या आमच्या अद्वैतमताचें श्रेष्ठत्वही सिद्ध होतें. भरत खंडांतही एका काळीं ह्या तिन्ही कल्पना स्वतंत्र रीतीनें व निरनिराळया उत्पन्न झाल्या होत्या. "त्रयो धर्मस्कन्धा यज्ञोऽध्ययनं दानमिति प्रथमस्तप एव द्वितीयो ब्रह्मचर्याचार्यकुलवासी तृतीयः" ( छांदो. २, २३, १ ) ह्या छांदोग्य वाक्यांत सांगितलेले तीन धर्माचे स्कंध ऊर्फ विभाग वरील तीन कल्पनांशीं अक्षरशः नाहीं तरी पुष्कळ जुळतात असें सिद्ध करतां येईल. 'धर्म' शब्दाचा वर सांगितलेल्या तिन्ही अर्थांनीं उपनिषदांत निरनिराळया ठिकाणीं उपयोग केलेला आढळतो. यज्ञाध्ययनदानांत श्रद्धापूर्वक केलेल्या उपासनादि कर्मांचा अंतर्भाव होतो, तपशब्दानें परब्रह्माचें मनन व निदिध्यास येतात व ब्रह्मचार्याश्रमांत नैतिक नियमांचा समावेश केलेला आहे. म्हणजे ह्या स्कंधत्रयात्मक धर्म शब्दानें वर सांगितलेल्या त्रिविध ईश्वरस्वरूपाचा बोध होतो. प्रस्तुत गोष्टीचें उत्तम प्रमाण म्हटलें म्हणजे सर्व औपनिषद सिद्धांतांचें सारभूत असलेलें "सत्यं विज्ञानमानन्दं ब्रह्म" ( बृह. ३-९-२८ ) हें महावाक्य होय. ह्यांतील 'आनन्द' 'विज्ञानं' आणि' सत्यं, हीं तिन्ही उपपदें

वरील तीन कल्पनांची अनुक्रमानें द्योतक आहेत "आत्मनस्तुकामाय सर्वं प्रियं भवति", "ये शतं मनुष्याणामानन्दः", इत्यादि वाक्यांवरून आनन्द पदानें मनुष्याच्या मनोवृत्तींना संतोषकारक अशा सगुण ईश्वरकल्पनेचा ब्रह्मांत अंतर्भाव केला आहे हें उघड होतें. स्पिनोझा, सेंट आगस्टाईन आन्सेल्म इत्यादि पाश्चात्य तत्त्वज्ञान्यांनीं ज्याला God is Knowledge असें ह्मटलें आहे त्या ज्ञानरूपी चिन्मय अव्यक्त स्वरूपाचा 'विज्ञान' पदानें बोध होतो. व "एष सेतुर्विधरणः" "सत्यकामः सत्यसंकल्पः" इ० वाक्यांवरून 'सत्य' शब्दानें अव्याहत क्रमानें सर्व सृष्टिव्यवहार चालविणाऱ्या जगदाधारभूत तत्त्वांचा बोध होतो. तात्पर्य, ज्या जगत्कारणब्रह्मस्वरूपाची पाश्चात्य देशांतील एकाही धार्मिकाला किंवा तत्त्वविवेचकाला किंवा नास्तिकाला पूर्ण ओळख झाली नाहीं, त्याचें एका 'सच्चिदानन्द' एवढ्या पदसमूच्चयानें वेदान्त्यांनीं बोधन केलें एवढीच गोष्ट त्यांचें श्रेष्ठत्व सिद्ध करण्यास पुरे आहे.

भरतखंडांतही एका काळीं ह्या तिन्ही कल्पना उत्पन्न झाल्या होत्या. प्रारंभीं केवळ बुद्धीच्या साहाय्यानेंच ह्या चराचर ब्रह्मांडाचें अवगाहन करण्याचा सांख्य, बौद्ध, वैशेषिकांनीं प्रयत्न केला; पण त्यांच्या पंचवीस तत्त्वांनीं किंवा सप्त पदार्थांनीं लोकांचें मुळींच समाधान झालें नाहीं. पुढें रोमनलोकांप्रमाणें त्रिकालाबाधित नियमविधीचें महात्म्य सांगणारे कर्मकांडी पूर्वमीमांसक झाले. त्यांनीं चोदनारूप विधीमध्यें सर्व धर्माचें सार आणून ठेवलें. बेंथमचा Moral Law व मीमांसकांचे चोदनाविधि ह्यांचा बाह्यस्वरूपांत मात्र भेद; बाकी दोहोंचे मूलतत्त्व एकच, व विचारसरणीही सारखीच. नित्यनैमित्तिक कर्में करणें हेंच आयुष्यांतील कर्तव्य; व यज्ञपुरुष हीच उपास्य देवता, निराळा ईश्वर असा मुळींच नाहीं हा मीमांसकांचा सिद्धांत. असल्या निरीश्वरवादी मीमांसकांच्या मतांचें कांहीं दिवस फार प्राबल्य होतें; पण पुढें त्यांचाही लोकांना वीट आला. अर्थज्ञानविरहित वेदांचें पठन करणारांना यास्कासारखे ऋषि भारवाहक गर्दभाची उपमा देऊं लागले; व उषस्ति चाक्रायणासारखे वेदार्थज्ञानी 'मूर्धा ते विपतिष्यति' असा शाप देऊं लागले. पुढें कर्मकांडाला कंटाळून शांडिल्यांनीं भक्तिमीमांसा केली.

पण हा भक्तिमार्गही एकतर्फी वाटूं लागला. तेव्हां तिघांनाही एकवट करणारें औपनिषददर्शन प्रादुर्भूत होऊन पूर्वींची बेबंदशाही मोडली. कांहीं काळानें पुन्हा तसेंच मतवैचित्र्य उत्पन्न झालें; व बौद्ध, कुमारिलप्रभृति ममिांसक, व पौराणिक, अशी त्रयी उत्पन्न झाली. पण पुन्हां शंकराचार्यांनीं औपनिषद सिद्धांतांचा जीर्णोद्धार करून धर्मसंस्थापना केली. अर्थात् हिंदुस्थानांत जो प्रकार दोनदां घडून आला तोच युरोपांतही कधीं काळीं होईल असें मानण्यास काय हरकत आहे? सर्व देशांत व सर्वकाळीं मानवी बुद्धीचा साधारणपणें एकसारखाच विकास होत जातो. सारांश हिंदुस्थानाच्या प्राचीन इतिहासावरून युरोपाच्या भावी प्रगतीचें अनुमान करणें अगदींच वावगें होणार नाहीं.

मोक्षासंबधानें युरोपियन तत्त्वज्ञानी जसे अजून अज्ञानी राहिले आहेत, तशीच जन्ममरणादिकांची उपपत्तिही त्यांना बरोबर कळली नाहीं. बायबल म्हणतें, ईश्वरानें सहाव्या दिवशीं मातीचा पुतळा करून त्याच्या नकांत श्वासोच्छास सोडला तसा तो आदम झाला, व त्याच्या उदरास्थीपासून ईव्ह उत्पन्न झाली. ही रानटी कल्पना क्षणभर खरी मानली, तथापि हल्लीं दर मिनिटास जन्मणारे प्राणी कसे उद्भवतात, व प्रारंभीं तरी एवढा खटाटोप करण्यावांचून आकाशांतील बापाचें काय अडलें होतें, ह्याला जुन्या करारांतील उत्पत्त्यध्याय कांहीं उत्तर देऊं शकत नाहीं. तीच स्थिति युरोपियन तत्त्वज्ञान्यांची व भौतिकशास्त्रवेत्त्यांची आहे. ईश्वराचे घरीं सर्व प्राणी सारखे असतां एक राजा होऊन चैन भोगतो व दुसरा त्याची गुलामगिरी करतो, असा भेद कां व्हावा, ह्याला कोणाच्यानेंही समर्पक उत्तर देववत नाहीं. तसेंच परम कारुणिक ईश्वरानें जगांत मुद्दाम दुःखें उत्पन्न केल्याबद्दल निर्दयणपणा व पक्षपातीपणा त्याच्या गळीं येतो त्याचें कोणाच्यानें निराकारण करवत नाहीं. बिशप बटलर म्हणतो, ही कष्टमय ऐहिक जीवयात्रा केवळ पारलौकिक सुखाची पात्रता जीवांच्या अंगीं येण्याकरितांच ईश्वरानें केली आहे. पण असल्या उत्तरानें एकाद्या पोराचेंही समाधान होणार नाहीं. सर्व शक्तिमान् ईश्वराला आरंभींच अखिलगुणसंपन्न जीव उत्पन्न करणें अशक्य नव्हतें.

बरें हे अपूर्ण जीव त्यानें उत्पन्न केले नाहींत असें म्हटलें तर ते आले कोठून असा प्रश्न येतोच. तात्पर्य, युरोपस्थ विद्वानांना दुरवगम्य झालेल्या असल्या प्रश्नांना वेदांती मात्र समर्पक उत्तर देऊं शकतो. व तें " वैषम्यनैर्घृण्ये न सापेक्षत्वात्तथा हि दर्शयाति " ( ब्रह्मसू. ५- १- ३४ ) ह्या सूत्रांत बादरायणाचार्यांनीं दिलें आहे. "एषह्येव साधु कर्म कारयति," " पुण्यो वै पुण्येन कर्मणा भवति " इत्यादि वचनांत सांगितल्याप्रमाणें हा सुखदुःखमय संसार शुभाशुभ कर्मनिमित्तच आहे असें मानल्याखेरीज वरच्यासारख्या अनेक शंकांचें कधींही निराकरण होणार नाहीं. परंतु ही कल्पना युरोपियन तत्त्वज्ञांच्या डोक्यांत अजून शिरत नाहीं. स्पिनोझा म्हणतो एका 'व्यापक द्रव्याचे सर्व चराचर वस्तु विकार आहेत,' फिक्टी म्हणतो ' त्या छाया आहेत, ' व शोपेनहोर म्हणतो ' एका व्यापक इच्छेचीं तीं कार्यें आहेत. ' पण हे विकार, छाया, किंवा कार्यें मूळ उद्भवलीं कशीं ह्याचें कोणीही उत्तर देत नाहीं. हार्टमननें मात्र एक चमत्कारिक कोटी लढविली आहे कीं, ' ही सर्व सृष्टि ' अव्याकृत ' ( ब्रह्म.) तत्त्वानें आपलें व्याकरण करण्याकरितांच उत्पन्न केली. " ही कल्पना " लोकवत्तु लीलाकैवल्यम् " ( ब्रह्मसू. २–१–३३ ) ह्या सूत्रांतील समाधानासारखी थोडीशी आहे खरी; पण तेणेंकरूनही पूर्ण समाधान होत नाहीं. आम्हीं मागील अध्यायांत सांगितलेल्या वेदांत्यांच्या पंचमहासिद्धांतांपैकीं चवथा जन्ममरणपरंपरेचें कर्मनिमित्तत्व प्रतिपादन करणारा सिद्धांत युरोपियन तत्त्वविवेचकांच्या स्वप्नांतही आला नाहीं. नाहीं म्हणावयाला प्लेटोला मात्र त्याचें थोडेंबहुत ज्ञान झालें होतें, हें या लेखावरील अवतरणांत वर्डस्वर्थ कवीनें केलेल्या प्लेटोच्या मताच्या अनुवादावरून चांगलें ध्यानांत येईल. ह्या जन्मांत होणारें ज्ञान केवळ स्मृतिरूप असून मागच्या जन्मांत झालेल्या संस्कारांचेंच फळ आहे असें प्लेटोचें मत होतें, व तें त्यानें अनेक दृष्टांतांनीं सिद्ध केलें आहे. वरतीं सांगितलेल्या ' स्वयंभू कल्पना ' असल्या पूर्वजन्मकृत संस्कारांपासूनच उत्पन्न होतात असें तो म्हणत असे. ह्या प्लेटोच्या मताची पुढें पुष्कळ थट्टा झाली; व त्याचप्रमाणें त्याहून अधिक व्यापक व परिणत अशा वेदांत्यांच्या कर्मसिद्धांतांवरही अज्ञानी आणि

परकी लोकांकडून पुष्कळ आक्षेप येतात. परंतु ते सर्व निर्मूल आहेत, व अर्वाचीन शास्त्रशोधावरूनही शेवटीं वेदांत्यांचें म्हणणेंच खरें ठरूं पहात आहे असें थोडक्यांत आम्हीं दाखविणार आहों.

---

## अध्याय सातवा.

—:०*०:—

## प्रारब्धसिद्धांत.*

**कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन।**
**मा कर्मफलहेतुर्भूर्मा ते संगोऽस्त्वकर्मणि ॥**

भगवद्गीता २-४७.

मागील अध्यायांत कर्मसिद्धांतासंबंधानें प्लेटोचें व शंकराचार्यांचें साम्य दाखवून दिलें; व तें साम्य जरी पुष्कळ असलें तरी पूर्ण नाहीं असेंही ध्वनित केलें. कर्मसिद्धांतांत दोन पोटसिद्धांत आहेत; अनेकजन्मपरंपरा व तिचें कर्मकार्यत्व. ह्यांपैकीं पहिला प्लेटोच्या लक्षांत आला होता, पण दुसऱ्याची त्याला बरोबर कल्पना झाली नव्हती. व दोहोंसंबंधानेंही आमच्या वेदांत्याप्रमाणें त्यानें पूर्ण विचार केला नव्हता असें म्हणण्यास हरकत नाहीं. शिवाय प्लेटोला ही कल्पना पायथागोरासपासून मिळाली, व पायथागोरासनें ती इजिप्त, अफगाणिस्थान, पंजाब येथें प्रवास करतांना हिंदुलोकांपासून घेतली असें कित्येक म्हणतात. तेव्हां डेकार्टच्या 'स्वयंभू कल्पनां' ना कारण झालेलें जें प्लेटोचें मत तें प्रारंभीं हिंदुधर्मांतूनच तिकडे गेलें असें मानण्यास पुष्कळ आधार आहे. कसेंही असो, एवढा लांबीचा प्रवास करतांना त्यांत पुष्कळ छाटाछाट झाली असावीसें दिसतें. कारण अद्वैतांतील कर्मसिद्धांताइतकें तें परिणत नव्हतें; व पुढें त्याला परिपक्वता यावयाची तीही खिस्तीधर्मामुळें अशक्य झाली. जन्मांतर्गत कर्माचें प्रति-

---

* केसरी ता. १८ एप्रिल १८९३

पादन करणें म्हणजे अनीतिमत्तेला उत्तेजन देणें होय, असें खिस्ती पाद्र्यांस वाटून त्यांनीं असल्या सर्व नास्तिकमतवाद्यांना ' अग्नये स्वाहा ' करण्याचा क्रम आरंभिला; पण बिचाऱ्यांना हें ठाऊक नव्हतें कीं, एकुणिसाव्या शतकांतील सुधारणेच्या अत्युच्च शिखरावर आरोहण केलेल्या खिस्ती पाश्चात्य राष्ट्रांपेक्षांहीं नीतिमत्तेत ज्यांचा वरती नंबर लागतो अशा हिंदुलोकांचे अंतःकरणांत सदर्हू कर्मसिद्धांत फार दिवसांपासून पूर्णपणें बिंबून गेले आहेत ! पण तो जुलमानें धर्मशील बनविण्याचा काळ आतां गेला, व विचारयुगास प्रारंभ झाला आहे; व त्याबरोबर नामरूपांनीं निराळीं पण तत्त्वतः वेदांत्यांच्या कर्मसिद्धांतांसारखींच मतें युरोपखंडांत जारीनें पसरूं लागलीं आहेत. पाश्चात्य तत्त्वविचारांचा उत्तरोत्तर अद्वैताकडेच कल दिसतो, म्हणून कांहीं दिवसांनीं युरोपांत सर्वत्र अद्वैतमताची स्थापना होईल असें आम्हीं मागें अनुमान काढलें होतें. कर्मप्रतिपादक सिद्धांताचा जो फैलाव होत आहे त्यावरून तर त्याला अधिकच बळकटी येते.

ह्या कर्मप्रतिपादक मताचें अर्वाचीन भौतिकशास्त्रसिद्धांतांशीं सादृश्य दाखविण्यापूर्वीं त्यासंबंधानें लोकांत असलेली कल्पना फार चुकलेली आहे हें येथें सांगितलें पाहिजे. ' माया ' व ' मिथ्या ' शब्दांच्या अर्थासंबंधानें लोकांत कसा गैरसमज पसरला आहे, हें मागील एका अध्यायांत दाखविलें. तोच प्रकार थोड्याबहुत अंशानें प्रस्तुत कर्मसिद्धांतासंबंधानेंही झाला आहे. त्याचें मुख्य कारण, ह्या सिद्धांतांच्या तात्विक आणि नैतिक बाजूंचा पृथक् विचार न करतां बहुशः दोहोंचा गोंधळ करण्यांत येतो. हें कर्ममत नीतीला उत्तेजक असो कीं अनीतिप्रवर्तक असो, व्यावहारिकदृष्ट्या त्याचा उपयोग असो वा दुरुपयोग असो; तात्विकदृष्ट्या तें खरें आहे कीं नाहीं एवढेंच प्रथम पाहिलें पाहिजे. त्याचा नीतिवर काय परिणाम होतो तें नंतर पहाणें ठीक होईल. आपल्याला अप्रिय पण सत्य अशा पुष्कळ गोष्टी आपणाला स्वीकाराव्या लागतात, त्यांपैकींच ही एक नसेल कशावरून! कर्ममत अनीतिप्रवर्तक असलें तरी तें खरें ठरलें तर अंगिकारलेंच पाहिजे. सत्य हें त्रिकालाबाधित आहे; तेव्हां देशकालभेदानें वारंवार बदलणाऱ्या नीतिकल्पनांसाठीं तें कधींही त्याज्य होणार नाहीं. गुरुत्वाकर्षणाचा नियम

खोटा मानून कोणी कड्यावरून उडी टाकील तरी त्याचें डोकें फुटावयाचें तें फुटेलच. त्याचप्रमाणें खिस्ती असो वा हिंदु असो, नास्तिक असो वा धार्मिक असो, प्रारब्धकर्माप्रमाणें प्राणिमात्राला फळ मिळावयाचें हा सृष्टि नियमच असला तर तो कधींही भंग होणार नाहीं. तेव्हां ज्यांना कर्ममत अनीतिप्रवर्तक वाटत असेल त्यांनीं त्या मुद्यावर त्याची अवहेलना न करतां आपल्या नीतिकल्पना सुधारण्याच्या उद्योगास लवकर लागावें हें बरें. परंतु हा कर्मसिद्धांत अनीतिप्रवर्तक नाहीं, इतकेंच नाहीं, तर त्याच्या इतकें अत्यंत उदात्त व नीतीला अनुकूल दुसरें मतच नाहीं असेंही दाखवितां येईल. मात्र हे दोन्ही विचार वर सांगितल्याप्रमाणें पृथक् ठेवले पाहिजेत.

कार्यमात्राला कारण असलेंच पाहिजे ह्या सामान्य नियमाला अनुसरून जन्ममरणालाही कोणतें तरी कारण पाहिजे, ही गोष्ट बहुतेकांना संमत आहे. बहुतेकांना म्हणण्याचें कारण इतकेंच कीं नदीप्रवाहामध्यें दोन्हीकडून येऊन मिळणाऱ्या व पुन्हा वियुक्त होणाऱ्या काष्ठांप्रमाणें जीवपरामणू केवळ यदृच्छेनें संयोगवियोग पावतात असलें यदृच्छात्मक मत प्रतिपादणारेही कित्येक नास्तिक झाले आहेत. पण ही चित्रविचित्र सृष्टि केवळ काकतालीयन्यायानें उत्पन्न झाली असें म्हणणारांचें तात्पर्य वस्तुतः त्यासंबधानें आपणाला कांहीं कळत नाहीं', असें सांगण्यांतच असतें. 'अनुत्पत्तिप्रसंगः सर्वदा मोक्षप्रसंगो वा', ही जी उभयतः-पाशा-रज्जु आचार्यांनीं वरचेवर दाखविली आहे, तेवढें उत्तर त्यानां बस्स आहे. आतां हें जन्मकारण कोणतें याविषयीं मात्र पुष्कळ मतभेद आहे. खिस्ती पाद्र्यांसारख्या सगुणेश्वर प्रतिपादकांचें म्हणणें, ईश्वरानें एकंदर चराचरसृष्टि निर्माण केली. परंतु हें मत किती पोकळ आहे तें बादरायणाचार्यांनीं 'पत्युरसामञ्जस्यात्', 'सम्बन्धानुपपत्तेश्च' 'अधिष्ठानानुपपत्तेश्च,' 'करणवच्चेन्न भोगादिभ्यः', आणि 'अन्तवत्त्वमसर्वज्ञता वा'. [ ब्रह्मसूत्र २–२–३७–४१ ] ह्या पाशुपतसिद्धांतखंडनपर पांच सूत्रांत स्पष्ट केलें आहे. उच्चनीच जीव उत्पन्न करणाऱ्या ईश्वरावर रागद्वेषादि दोषांची प्राप्ति येते; कुम्भाराचा घटाशीं असतो तसा ईश्वराचा सृष्टीशीं कर्तृसंबंध संभवत नाहीं; कारण रूपादि-

विहीन प्रकृतिपरमाणूपासून ईश्वराला जगत् निर्माण करता याव-याचें नाहीं. ईश्वराला शरीर इंद्रियें भोग हीं संभवत नाहींत, व त्याच्याशिवाय कार्यनिष्पति व्हावयाची नाहीं. व कर्त्याहून कार्य भिन्न मानलें तर परिच्छिन्नत्व असर्वज्ञत्व वगैरे दोष ईश्वरावर येतात. या आक्षेपांचें प्राचीन अर्वाचीन कोणत्याही तार्किकाकडून निराकरण झालेलें नाहीं. शेवटीं जन्ममरणादि सृष्टीला जिवाचे अदृष्ट कर्मच कारण होते असे मानावें लागते. "यथाकारी यथाचारी भवति", [ जशीं कर्में करतो व आचरण ठेवतो तसा होतो ] "तद्य इह रमणीयचरणा अभ्याशो ह यत्ते रमणीयां योनिमापद्येरन्" "अथ य इह कपूयचरणा अभ्याशो ह यत्ते कपूयां योनिमाप-द्येरन्" [ रमणीय आचरण करणारे चांगल्या जन्माला जातात, व वाईट आचरण करणारे वाईट योनींत जन्म घेतात ] इत्यादि अनेक श्रुतिवाक्यांत सांगितल्याप्रमाणे पूर्वार्जित कर्मानुरूपच प्राणिमात्राला जन्मां-तरप्राप्ति होते, असें मानल्यावांचून निर्वाह लागत नाहीं. मनुष्य प्रतिक्षणीं ज्या क्रिया करतो त्याचे तत्क्षणीं नाहीं तरी केव्हां तरी कार्य झालेच पाहिजे. हातांतून दगड सुटला की तो खाली पडलाच पाहिजे. त्याचप्रमाणे एकदा क्रिया घडली की तिचे परिणामहि झालेच पाहिजे. मग तें फळ ह्या जन्मात मिळो कीं जन्मांतरीं मिळो. सबब सध्यां जीं आपण फले भोगतो तीं पूर्वकर्मांचे परिणाम आहेत, व हल्लीं कर्में करतों त्यांचीं फले पुढे मिळतील हे निर्विवाद सिद्ध होते. आता पूर्वकर्मांचें भावी फल होतें ते त्या कर्माचा चित्तावर संस्कार झाला असतो म्हणून होते ही गोष्ट ध्यानांत ठेवली, म्हणजे प्रस्तुत कर्ममतावर येणाऱ्या बहुतेक आक्षेपांचे निरसन होईल. युरोपांत मध्ययुगामध्ये नियति [ Necessity ] आणि इच्छास्वातंत्र्य [ Free Will ] ह्या दोन पक्षाचा जो मोठा कडाक्याचा वाद चालला होता, व अजूनही बराच चालु आहे, त्यांत पहिल्या म्हणजे नियति ऊर्फ प्रारब्धवादी पक्षावर दुसऱ्याचा मोठा आक्षेप हा होता कीं, सर्व कर्में प्रारब्धानुसार होतात ब मनुष्याला इच्छास्वातंत्र मुळींच नाहीं असे मानलें, तर मनुष्यावरील सदाचरणाची जबाबदारी उडून जाईल. चोरी, खून वगैरे दुष्कृत्यें करणारे लोक प्रारब्धाने तीं करण्यास बुद्धि झाली अशा सबबीवर

सुटून जाऊं पाहतील; व तेणेंकरून पाप पुण्य, सद्गुण, दुर्गुण, नीति, अनीति, ह्यांतील भेदच नाहींसा होईल. हा आक्षेप आह्मीं वर सांगितल्याप्रमाणें प्रारब्धमताचें तात्त्विक सत्यत्व व व्यावहारिक उपयुक्तता ह्यांचा गोंधळ केल्यामुळेंच उत्पन्न होतो; व म्हणून क्षणभर तो खरा मानला, तरी तेणें-करून प्रारब्धमताच्या सत्यत्वाला बिलकुल बाध येत नाहीं हें उघड आहे. पण हल्लीं भौतिक व नैतिक शास्त्रांसंबंधीं जे सिद्धांत लोकांत पसरत आहेत त्यांवरूनही अनुभवदृष्ट्या तो निर्मूल आहे असें स्पष्ट होतें. दुराचरणी लोक स्वेच्छेनें तसे न होतां पूर्वसंस्कारामुळेंच तसे होतात; व त्यामुळें असले लोक शिक्षेपेक्षां दयेसच विशेष पात्र आहेत, हें मत आतां सर्वत्र ग्राह्य होत आहे. लहानपणीं शिक्षण व संगति असेल त्याप्रमाणें मनुष्य पुढें सुगुणी किंवा दुर्गुणी निपजतो, ह्या हल्लीं सर्वसाधारण झालेल्या समजुतीच्या मुळाशीं तरी पूर्वार्जित संस्कारानुसार मनुष्याच्या हातून बरेंवाईट आचरण घडतें हेंच तत्त्व आहे. पण इतक्यावरच अर्वाचीन शास्त्रवेत्ते थांबले नाहींत. त्यांनीं असेंही सप्रमाण सिद्ध केलें आहे कीं आईबापांच्या सुकृतदुष्कृतां-चाही परिणाम त्यांच्या पुत्रपौत्रांवर होतो. बाप मद्यपी किंवा अनेक शारीर-मानासिक व्यथांनीं ग्रस्त झाल्यास पुष्कळदां बापाच्या पापांचें मुलांना प्रायश्चित्त भोगावें लागतें. वस्तुतः मुलांचा येथें काय अपराध असतो ? व बाप तरी आपल्या दुराचरणाबद्दलच्या शिक्षेंतून कां सुटावा ? पण सृष्टिनियम अबाधित चालावयाचे. क्वचित् प्रसंगीं त्याजपासून अन्याय होत असला तरी अमुक कारणांचा अमुक परिणाम झालाच पाहिजे, ह्या नियमाला अपवाद होऊं शकत नाहीं. मुद्दाम कड्यावरून उडी टाकणारा व चुकीनें पाय घसरून पडणारा ह्या दोघांनाही दुखापत सारखीच होते; दुसऱ्याचा अपराध कमी म्हणून गुरुत्वाकर्षणाचा नियम त्याच्याकरितां भंग होत नाहीं. हाच न्याय नीतिसंबंधानेंही लावला पाहिजे. बाप दुर्गुणी असला किंवा लहानपणीं कुशिक्षण मिळालें तर मुलगा पुढें चोऱ्या करणार हा नियम अबाधित आहे; मग त्यामुळें त्याच्या इच्छा-स्वातंत्र्यास बाध येवो न येवो ! वेदांतांतील प्रारब्धसिद्धांताचें तरी तात्पर्य हेंच आहे. वस्तुतः इच्छास्वातंत्र्य किंवा क्रियास्वातंत्र्य ह्याचा संकुचित अर्थ केला

पाहिजे. जगांतील प्रत्येक वस्तु दुसऱ्यावर अवलंबून असल्यामुळें पूर्ण स्वातंत्र्य कोठेंच नाहीं. सबब स्वातंत्र्य म्हणजे बाह्य प्रयोजक किंवा प्रतिबंधक शक्तीचा अभाव इतकाच अर्थ घ्यावयाचा. दुसऱ्याच्या हुकुमानें खून करणारा व रागाच्या आवेशांत खून करणारा हे दोघेही एका अर्थानें सारखेच परतंत्र आहेत; कारण एक परकी पुरुषाच्या व दुसरा मनोविकाराच्या स्वाधीन असतो. तथापि दुसऱ्याचें क्रियास्वातंत्र्य गेलें असें कोणी समजत नाहीं, कारण मनोविकार पुरुषाहून निराळे मानीत नाहींत. तत्त्वदृष्ट्या सर्व क्रिया मानसिक संस्कारांचेच परिणाम होत. ते संस्कार पूर्वशिक्षणापासून किंवा पूर्वजांच्या आचरणापासून उत्पन्न होतात. असें हल्लींचे आनुवंशिक मतवादी (Heredity) म्हणतात. अद्वैती आणखी थोडे पुढें जातात, आणि ह्या क्रियाप्रवर्तक संस्कारांत पूर्वजन्मार्जित संस्कारांचाही अंतर्भाव करितात. आईबापासारख्या परकी जीवांचे संस्कार जर मुलामध्यें येऊं शकतात, तर त्याच जीवाचे पूर्वजन्मांतील संस्कार पुनः उद्भवण्यास वस्तुतः मुळींच हरकत नसावी. खरें म्हटलें तर जन्ममृत्यु हीं केवळ एका स्थितींतून दुसऱ्या स्थितींत जाण्याचीं द्वारें आहेत. "वासांसि जीर्णानि यथा विहाय नवानि गृण्हाति नरोऽपराणि । तथा शरीराणि विहाय जीर्णान्यन्यानि संयाति नवानि देही ॥" (भग० २-२२) ह्या भगवद्वचनाप्रमाणें, किंवा "Our birth is but a sleep and a forgetting" ह्या वर्डस्वर्थ कवीच्या उक्तीप्रमाणें जन्ममरणपरंपरा हीं फक्त जिवाचीं अनेक स्थित्यंतरें आहेत. तेव्हां कालचें संस्कार जसे मधल्या निद्रेमुळें आज नाहींसे होत नाहींत, तसेंच पूर्वजन्मींचे संस्कारही ह्या जन्मीं टिकतात, व फलप्रद होतात असें मानण्यास काय हरकत आहे? पण आमचा प्रारब्धसिद्धांत अर्वाचीन भौतिकशास्त्रवेत्त्यांच्या आनुवंशिक मताशीं ( Doctrine of Heredity ) समान आहे; इतकेंच नाहीं, तर तो अधिक व्यापक आहे. म्हणजे हल्लीं लोकमान्य झालेल्या डार्विनस्पेन्सरच्या उत्क्रांतिमताशींही ( Doctrine of Evolution ) त्याचें निकट साधर्म्य आहे. उत्क्रांतिमताचें तरी तात्पर्य हेंच कीं, अनेक वेळां एकच कृत्य केलें म्हणजे त्या प्रकारचा मनावर संस्कार होऊन तशी संवय बनते, व तेणेंकरून प्राण्याच्या

अंतर्बाह्य शारीरिक व मानसिक रचनेंतही फरक पडतो. उंच झाडांचीं फळें पानें खाणें भाग पडल्यामुळे उंटाची मान लांब होते, आणि जमिनीवर आसन घालून बसल्यानें वानराची शेपटी झिजून जाऊन मनुष्य बनतो. येणेंप्रमाणें किड्यांचे मासे, माशांचे पक्षी, पक्ष्यांचे चतुष्पाद, व चतुष्पादांचे द्विपाद, अशी प्राण्यांची उत्तरोत्तर उत्क्रांति होत जाते, असें डार्विनने मत प्रतिपादलें; व स्पेन्सरने त्याचाच विस्तार केला आहे. ह्यांत आणि "रमणीयचरणा ब्राह्मणादि योनिमापद्यन्ते, कपूयचरणाः शूकरयोनिमापद्यन्ते" ह्या वेदांमततांत फारसा फरक आहे असे आम्हांला वाटत नाहीं. प्रथमदर्शनीं दोन महत्त्वाचे फरक दिसून येतात खरे. एक डार्विनची उत्क्रांति फार सावकाश व क्रमानें होणारी आहे, आणि दुसरे वेदांतमतांत उत्क्रान्तीशिवाय अवक्रान्तीचीही म्हणजे मनुष्यापासून शूकयरोनीप्रत जाण्याची कल्पना जास्ती आहे ती डार्विनच्या मतांत नाही. ह्यांपैकीं दुसऱ्यासंबधानें असे म्हणतां येईल कीं, डार्विनला समजली नाहीं अशी अवक्रान्तीची कल्पना वेदांतांत आहे हा दोष नाहीं, तर त्याच्या अधिक पूर्णत्वाचे लक्षण आहे. कारण अनेक प्रमाणांवरून उत्क्रांति ( Evolution ) प्रमाणे प्राण्याची अवक्रांतिही ( Degeneration ) होऊ शकते असे सिद्ध करतां येईल. पहिल्या मुद्यासंबंधानें असें उत्तर दतां येईल कीं, डार्विनप्रमाणें वेदांत्यांनींही क्रमिक उत्क्रान्तीची कल्पना मानली होती. 'तस्माद्वा एतस्मादात्मन आकाशः संभूतः' [ तैत्ति० २, १, १, ] इत्यादि वाक्यांत वर्णिलेली बाह्यसृष्ट्युत्पत्ति, किंवा सुप्रसिद्ध पचाहुतिप्रकरणांत सांगितलेली जीवोत्पत्ति ह्या दोन्ही क्रमिक असून व्याकरणरूपच आहेत. वेदांतग्रंथांतील अव्याकृतांचें व्याकरण व हर्बर्ट स्पेन्सरने सांगितलेली सामान्या ( General ) पासून विशेषाची ( Particular ) अथवा शुद्धा ( Simple ) पासून मिश्राची ( Complex ) उत्पत्ति हीं दोन्ही एकच आहेत. व्याकरण आणि Evolution ह्या शब्दांचा धात्वर्थ समान, तसें तात्पर्यही एकच आहे; व बीजवृक्षांचा दृष्टांत दोघांनाही लागतो. उपादानकारणांत बीजरूपानें असलेल्या गुणांचें बाहेर प्रकट होणें ह्यालाच व्याकरण [ वि+आ+करण ] किंवा Evolution ( e, ex, and volvo, I roll ) म्हणतात. " यं वै सौम्यैतम-

णिमानं न निभालयसे एतस्य वै सोम्यैषोऽणिम्न एवं महान्यग्रोधस्तिष्ठति" [ छांदो. ६, १२, २ ] [ हे सौम्य, ह्या बीजांत तुला अदृश्य असा जो अतिसूक्ष्म परमाणु आहे त्यापासूनच एवढा मोठा न्यग्रोध वृक्ष उद्भवतो ] ह्या उद्दालकानें स्वपुत्राला केलेल्या उपदेशाचें व एका सूक्ष्म जीवपरमाणू ( Protoplasm ) पासून सजीव शरीर उत्पन्न होतें, ह्या अर्वाचीन भौतिकशास्त्रासिद्धांताचें स्वरूप एकच आहे. तात्पर्य, डार्विनचें उत्क्रांतिमत व त्याच्या पोटांतील आनुवंशिक मत, आणि वेदांत्यांचा प्रारब्धसिद्धांत ह्यांमध्यें तात्विकदृष्ट्या फारसा भेद नाहीं. आतां हल्लींच्या भौतिकशास्त्र-वेत्त्यांइतका त्यांनीं उत्क्रांतिमताचा पूर्ण विचार केला नव्हता, व तसेंच दृग्गोचर प्रमाणें देऊन, व प्रयोग करून आपलें मत सिद्ध करण्याची रीतीही त्यांना माहीत नव्हती हें खरें. प्राचीनकाळीं रसायन पदार्थविज्ञान इत्यादि शास्त्रें किती बाल्यावस्थेंत होतीं हें लक्षांत आणलें म्हणजे त्याचें आश्चर्य वाटणार नाहीं. पण तेणेंकरून वेदांत्यांच्या मताचें सत्यत्व कबूल करण्यास अडचण येत नाहीं. उलट असल्या बाह्य साधनांचें आनुकूल्य नसतां केवळ एक प्रकारच्या अंतर्ज्ञानानेंच वरील महासिद्धांत आमच्या प्राचीन ऋषींना कळून चुकले, ही गोष्ट त्यांचें विशेष गौरव करते. आतां तत्त्वशोधनांत उत्तम विचारसरणीचाही स्वतंत्र उपयोग असतो हें अंशतः खरें आहे, व म्हणून अर्वाचीन भौतिक-शास्त्रांपासून ती विचारसरणी घेणें आपलें कर्तव्य आहे. उकिड्यावर पडलेला हिरा जसा कोणी टाकीत नाहीं त्याचप्रमाणें चांगली गोष्ट कोठेंही सांपडली तरी घेण्यास हरकत नाहीं. तेव्हां आमचे वेदान्तसिद्धांत जर खरे आहेत तर अलीकडील पिढीला ते स्पष्ट समजण्याकरितां अर्वाचीन तर्कपद्धतीचा उपयोग करणें मुळींच वावगें होणार नाहीं. सूर्याला जशी दिवटी नको तशी प्राचीन अपरोक्षज्ञानी वेदांताचार्यांना अनुमानासारख्या अकिंचित्कर साधनांची जरूर नव्हती, व म्हणून त्यांनीं तिकडे दुर्लक्ष केलें. हल्लींच्या अप्रबुद्ध लोकसमाजाला ती जरूर भासूं लागली असल्यास दुसऱ्या अनेक पाश्चात्य संस्थांप्रमाणें युरोपियन विचारसरणीही घेण्यास आमचे शास्त्रकार बिलकुल आड येणार नाहींत.

वरील विवेचनावरून अर्वाचीन शास्त्रशोधांनीं कर्मसिद्धांताचें सत्यत्व कसें उत्तरोत्तर स्थापित होत आहे हें ध्यानांत येईल. तसेंच अनीति-प्रवर्तकत्वाच्या आक्षेपांचेंही निराकरण करण्यास फारसें कठीण जाणार नाहीं. वस्तुतः माझ्या प्रत्येक कर्माचें फल मला कधीं तरी भोगावें लागेल ह्यासारखी नीतीला उत्तेजक दुसरी कोणतीच कल्पना नाहीं. लहान मुलाप्रमाणें आकाशांतील बापाचा बागुलबोवा दाखवून लोकांना सन्मार्गांत ठेवण्यापेक्षां जसें करावें तसें भोगावें ही समजूत पापभीरुता व स्वावलंबन वाढविण्याला अधिक कारण होईल ह्यांत संदेह नाहीं.

अद्वैतमतावर दुसरा एक आक्षेप असा आहे कीं, त्यांत नैष्कर्म्याचें प्रतिपादन केलें आहे. कर्में तेवढीं बंधनकारक असें मत बनल्यामुळें सर्व-संगपरित्याग करून अरण्यांत जाऊन रहाणें, हेंच लोकांना आयुष्यांतील कर्तव्य वाटूं लागलें, व त्यामुळें हिंदु लोक इतके आळशी व अजागळ झाले आहेत. हा आक्षेप आणणारांच्या दोन चुका होतात. एक वेदांतांत पूर्ण नैष्कर्म्य प्रतिपादिलें आहे हें खोटें, व दुसरी त्यापासून आम्ही आळशी झालों हेंही खोटें. वेदांतग्रंथांत कर्मनिषेध केला आहे तो व्याव-हारिक कर्तव्यांचा नव्हे, तर ज्योतिष्टोमादि स्वर्गफलोद्देशानें केलेल्या काम्य कर्मांचा निषेध होय. तसेंच, प्राकृत कर्मांचीही जी निंदा केलेली आढळते ती त्यांच्या फलांच्या दृष्टीनें केली आहे. संसारबंधनाला कारण नुसतीं कर्में नव्हेत, तर त्यांच्या फलांची इच्छा होते, सबब निष्कामबुद्धीनें पाहिजे तीं कर्में करण्यास हरकत नाहीं, हा वेदांताचा खरा सिद्धांत होय. व तोच प्रस्तुत लेखावरील अवतरणांतर्गत श्लोकांत भगवंतांनीं अर्जुनास सांगितला आहे. कर्में करूं नये ह्याचा अर्थ फलाची इच्छा धरूं नको एवढाच, रिकामा बैस असा अर्थ करावयाचा नाहीं, असें श्रीकृष्णांनीं स्पष्ट म्हटलें आहे. "काम्यानां कर्मणां न्यासं संन्यासं कवयो विदुः" "कृपणाः फलहेतवः" वगैरे अनेक स्थळीं कर्मफलत्यागाचा उपदेश करून श्रीकृष्णांनीं अर्जुनास युद्धाला उद्युक्त केलें. नैष्कर्म्यप्रतिपादक वेदांताच्या उपदेशानें धनंजय शत्रुहननासारख्या निर्घृण कृत्यास प्रवृत्त कसा झाला ह्याचें पुष्कळांना गूढ वाटतें. पण वस्तुतः त्यांत आश्चर्यकारक

कांहींच नाहीं. " मा ते संगोऽस्त्वकर्मणि " म्हणजे कर्तव्यपराङ्मुख होऊं नको, हाच भगवंताचा खरा उपदेश होय. मात्र तीं कर्में स्वार्थदृष्टीनें करूं नको तर परोपकारार्थ कर इतकेंच त्यांचें सांगणें होतें. जें काय करावयाचें ते मनोविकारशांत्यर्थ किंवा वासनातृप्त्यर्थ नाहीं, तर कर्तव्य म्हणून करावयाचें हा वेदांताचा मुख्य उपदेश होय; व त्याहून उदात्त सिद्धांत दुसऱ्या कोणत्याही राष्ट्रांत किंवा धर्मांत आढळावयाचा नाहीं. इतरांपेक्षां हिंदुलोकांत अधिक परार्थबुद्धि व कर्तव्यतत्परता आढळून येते ती वरील उपदेशाचाच परिणाम नाहीं काय ?

दुसरा आक्षेप तर अगदींच पोरकट आहे. वेदांतांतील नैष्कर्म्यप्रतिपादनानें हिंदुलोक आळशी झाले म्हणणें म्हणजे एका थोडांत मारली तर दुसरा गाल पुढें करावा, असें बायबलांत सांगितल्यावरून खिस्तपुत्र अतिशय सहनशील बनले आहेत असें म्हणण्यासारखेंच आहे. दुसरें विधान जसें अनुभवविरुद्ध आहे तसेंच पहिलें खोटें आहे. एवढें मात्र खरें कीं, बायबलांतील प्रत्येक आज्ञा तोंडानें वंद्य म्हणणारे खिस्ती लोक परस्व परजीवित अपहरण करण्यांत नेहमीं गुंतलेले असतात, ह्यावरून जसें त्या बायबलाचें व्यर्थत्व सिद्ध होतें. परंतु वेदांतांत उपदेशिलेली परार्थपरता हिंदुलोकांच्या अंगीं भिनून गेली आहे ही गोष्ट आमची धर्मशीलता व्यक्त करते.

## अध्याय आठवा.

## ज्ञानमाहात्म्य. *

**श्रेयान् द्रव्यमयाद्यज्ञाज्ज्ञानयज्ञः परंतप ।**
**सर्वं कर्माखिलं पार्थ ज्ञाने परिसमाप्यते ॥**

भगवद्गीता ४–३३.

मागील अध्यायसप्तकांत वेदांतांतील मुख्य मुख्य सिद्धांतांची वाचकांस ओळख करून दिली. प्रो. डयूसनसाहेबांचें व्याख्यानाचे द्वारा एकंदर अद्वैतमताचें सामान्यस्वरूप त्यांजपुढें मांडलें. आजपर्यंत भरतखंडांत उत्पन्न झालेल्या अनेक मतसंप्रदायांपेक्षां त्याचें उत्तमत्व सुचाविलें. सूर्य-खद्योताप्रमाणें अद्वैताशीं तुलना केली असतां खिस्तीसारखे सगुणेश्वर-प्रतिपादक धर्म किती तुच्छ भासतात हेंही दाखविलें. व शेवटीं अर्वाचीन युरोपियन तत्त्वज्ञानाच्या व भौतिकशास्त्रांच्या सिद्धांतांशीं त्याचें साधर्म्य वैधर्म्य दाखवून अद्वैतमताचें श्रेष्ठत्व स्थापन केलें. परंतु एवढा वेळ केलेलें विवेचन सुंदर मूर्ति घडवून नाक बाकी ठेवण्यासारखें किंवा शिखराविरहित देऊळ बांधण्यासारखें झालें आहे. कारण, एकंदर अद्वैतप्रक्रियेचा ललाम-भूत किंबहुना पृथ्वीवरील सर्व धर्मसंप्रदायांहून वेदांताचें वैशिष्टय दाखविणारा असा मुख्य सिद्धांत अजून सांगावयाचा राहिलाच आहे. प्रसंगोपात् पूर्वी एकदोन वेळां त्याचा उल्लेख करण्यांत आला आहे खरा; परंतु त्याच्या महत्त्वाला अनुरूप स्वतंत्रपणें दोन शब्द लिहिल्याशिवाय ही मीमांसा कदापि पुरी केल्यासारखी होणार नाहीं.

कोणत्याही मतसंप्रदायाचा बरेवाईटपणा पहाणें झाल्यास त्याच्या तीन अंगांचा विचार केला पाहिजे. प्रतिपाद्य विषय, प्राप्य फल, व तत्प्रापक

---

* केसरी ता. २२ एप्रिल १८९३.

साधन, ह्या तिन्ही गोष्टी ज्या धर्मांत उत्तम रीतीनें विचाराच्या कसोटीस उतरतील तो धर्म उत्तम; व जर ह्या तिहींपैकीं एक अंग हीन ठरेल तर तेवढ्या अंशानें तो धर्मही अपूर्ण मानला पाहिजे. वेदांतप्रतिपाद्य निर्गुण-ब्रह्म व मोक्षफल ह्या दोहोंचें श्रेष्ठत्व मागें दाखाविलें;पण प्राकृतजनांस त्याज-पेक्षां साधनविचारच एका अर्थानें अधिक महत्त्वाचा आहे. ब्रह्मतत्त्वाच्या स्वरूपासंबंधानें अतिशय मतभेद असूं शकेल " श्रुतिर्विभिन्ना स्मृतयश्च भिन्ना नैकोमुनिर्यस्य मतं प्रमाणम् " अशी सर्वत्र स्थिति असल्यामुळें सिद्ध वस्तूसंबंधानें अमुक एक सिद्धांतच खरा व बाकी सर्व खोटे. असें म्हणणें मनुष्याच्या अल्पबुद्धीस धाडसाचें होणार आहे. पुरुषमतिवैरूप्यामुळें अद्वितीय ब्रह्मतत्त्वासंबंधानें नानाविध कल्पना संभवनीय आहेत, व जरी त्यांपैकीं कांहीं चुकलेल्या असल्या तरी असल्या संशयाकुल विषयांत पक्षा-भिनिवेष दाखाविणें किंवा वितंडा वाढाविणें कदापि रास्त होणार नाहीं. निदान लोकव्यवहाराला तरी तेणेंकरून पुष्कळ अडथळा येईल. तसेंच फलाविषयींही कल्पना चुकलेली एक वेळ पुरवेल. कारण असल्या मोक्ष-विषयक कल्पनांत कितीही हीनोत्तमभाव असला तरी प्रत्येकींत थोडाबहुत चांगलेपणा असतोच, व तेवढ्याचीच कोणी इच्छा करूं लागल्यास त्यास प्रतिबंध करणें उचित होणार नाहीं. " ये यथा मां प्रपद्यन्ते तांस्तथैव भजाम्यहम् " असें सर्व प्रकारच्या मुमुक्षूंस त्यांच्या त्यांच्या योग्यतेप्रमाणें मोक्षप्राप्ति करून देण्याचें वचन भगवंतांनीं दिलें आहे. शिवाय ज्याप्रमाणें लोकव्यवहारांत व्यवसायवैचित्र्य आढळतें त्याचप्रमाणें मोक्षव्यवहारांतही किंचित् उद्दिष्टवैचित्र्य असलेलें वाईट नाहीं. दुसरें, जर मनुष्य सन्मा-र्गांत आहे तर उद्दिष्ट फलाविषयीं त्याला बरोबर ज्ञान नसलें तरी एक वेळ अडणार नाहीं. एखाद्या अदृष्टपूर्वस्थळीं जाऊं इच्छिणारा वाटसरू जसा एकदां सरळ रस्त्याला लागला म्हणजे थेट आपल्या गांवीं जाऊन पोंचतो, त्याचप्रमाणें फलाविषयीं अज्ञान असलें तरी सत्साधनाचा अंगि-कार केल्यास मुमुक्षूला कधींना कधीं तें फल मिळेलच. मुंबईहून पुण्यास येणारा मनुष्य बी. बी. सी. आय. गाडींत बसला तर भलत्याच दिशेस जाईल. तसें उद्दिष्ट फलाची कल्पना बरोबर असली तरी भलत्याच मार्गो-

पदेशानें तें कधींही मिळावयाचें नाहीं. सबब मोक्षस्वरूपापेक्षांही मोक्षसाधन समजणें प्राकृतजनांस अधिक महत्त्वाचें आहे. तात्पर्य वेदांतानें उपदेशि, लेल्या ज्ञानरूप साधनाचें श्रेष्ठत्व दाखविणें अत्यंत आवश्यक आहे.

आतांपर्यंत जें अद्वैतसिद्धांतांचें विवेचन केलें तें क्षणभर एकीकडे ठेवूं. प्रत्येक धर्मांचे लोक आपआपलीं मतेंच खरीं असा आग्रह धरतात. खिस्ती पाद्री सांगणार आकाशांतील बापच खरा; महंमदी म्हणणार पैगंबर कायतो श्रेष्ठ; जोहोवाखेरीज अन्य देव सैतानाचे दूत असें यहुदी म्हणतो; व अद्वैतब्रह्माव्यतिरिक्त सर्व जग मिथ्या असें हिंदु वेदांती प्रतिपादतो. तर ह्यांपैकीं खरा कोण ? प्रत्येकजण सारखाच आग्रही व पांडितंमन्य दिसतो; तेव्हां शेवटच्याचेंच म्हणणें खरें व बाकींचे खोटें, असें मानण्याला तरी खात्रीलायक पुरावा काय आहे ? मोठ्यानें ओरडेल किंवा लोकांना खूप शिव्या देईल तो खरा असें धरून चाललें तर खिस्ती मिशनऱ्यांचा कदाचित् सर्वांपेक्षां वरती नंबर लागेल. पण निष्पक्षपाती शोधकास ही सत्याची कसोटी संमत होणार नाहीं. वेदान्तसिद्धांतांचें सत्यत्व व श्रेष्ठत्व आम्हीं इतका वेळ सिद्ध केलें खरें, पण आमचीही दृष्टि स्वधर्माभिमानानें मंद झाली नसेल कशावरून ? आपलें शेंबडें पोर असलें तरी तें मदनमूर्ति वाटतें; त्याचप्रमाणें वाडवडिलांपासून आमच्या अंतःकरणांत खिळून गेलेलीं मतें आम्हांस उत्तम वाटणें स्वाभाविक आहे. विचारदृष्टीनें खरें ठरेल तें चांगलें हें म्हणणें सोपें आहे; परंतु मोठमोठ्या लोकांच्या विचारशक्तीवरही मनोविकारांचा केवढा दाब पडतो ह्याचीं वारंवार उदाहरणें नजरेस येतात. तेव्हां आमच्या तुटपुंज्या तर्कशक्तीनें अद्वैतसिद्धांत खरे ठरले म्हणजे ते निर्दोष होतात असें नाहीं हा आक्षेप आम्हांला सर्वथैव कबूल आहे, व म्हणूनच जरी आम्हीं आतांपर्यंत होईल तितक्या समदृष्टीनें निरनिराळ्या मतांचें परीक्षण करून अद्वैताचें श्रेष्ठत्व स्थापन करण्याचा प्रयत्न केला तरी तो बाजूला ठेवतों. ईश्वरस्वरूपासारख्या इंद्रियागोचर व कल्पनातीत वस्तूसंबंधानें शुष्क वितंडा वादाविण्थापेक्षां तो वादग्रस्त विषय समजून अजीबात एकीकडे ठेवतों; इतकेंच नाहीं तर क्षणभर वेदांतसिद्धांत खोटे व तद्विरुद्ध मतेंच खरीं अशीही कल्पना करतों. तरी देखील जीविषयीं हल्लीं मतभेद

होण्याचा संभव नाहीं, किंवा झाला तरी प्रत्यक्ष अनुभवाने तो सहज दूर करतां येईल, अशा एका गोष्टीवरूनच अद्वैताचे श्रेष्ठत्व सिद्ध होते. ती गोष्ट ज्ञानाचें माहात्म्य होय.

पूर्वी सांगितलेल्या वेदांतपंचसिद्धांतांपैकीं पांचवा सिद्धांत ज्ञानाचें मोक्षप्रापकत्व असा होता, त्याचें स्मरण केल्यास आमच्या म्हणण्याचें तात्पर्य लक्षांत येईल. पाहिले चार सिद्धांत पाश्चात्य धर्मांत किंवा तत्त्वज्ञानांत थोड्याबहुत अंशानें तरी सांपडतात; पण ह्या शेवटच्याचा मागमूसही त्यांत नाहीं म्हटलें तरी चालेल. ह्याचे मुख्य कारण यूरोपखंडांत धर्माची व तत्त्वज्ञानाची झालेली तोडातोड होय असें मागें ध्वनित केलेंच आहे. धर्मापासून अलग राहिल्यामुळे तत्त्वज्ञानाला मुक्तीची कल्पना सुचली नाहीं, व तत्त्वज्ञानाशीं विरोध केल्यानें खिस्तीधर्माला ज्ञानाचें पाठबळ नाहींसें झालें. तणेंकरून एक निष्फळ व दुसरा अंध होऊन गेला. पण वेदांतानें ह्या दोहोंचा समेट करून मुक्ति व ज्ञान ह्यांचा त्रिकालाबाधित कार्यकारणभाव संबंध घालून दिला ह्याचा असा परिणाम झाला की, ज्ञानप्रसार व धर्मश्रद्धा संबंध ह्यांचें युरोपात नेहमीं व्यस्त प्रमाण आढळतें; पण हिंदुस्थानांत तें नेहमीं समच राहिलें आहे.

खिस्तीधर्माची मुख्य मदार भक्तीवर; व ही भक्ति आंधळी असल्यामुळे जसजशी ज्ञानवृद्धि होते, तसतसा तिचा लोप होऊन धर्मही ऱ्हास पावतो. आकाशांतील बापावर किंवा त्याच्या पृथ्वीवरील मुलावर विश्वास ठेवा म्हणजे तुमचें तारण होईल हें सांगणें, जोंपर्यंत शेकडा नव्याण्णव लोक अडाणी होते व सर्व विद्या कला ल्याटिन भाषेंत अडकल्या होत्या तोंपर्यंत ठीक होतें. पण एकोणिसाव्या शतकासारख्या ज्ञानयुगांत तें लोकांना कसें खरें वाटावें ? ज्या खिस्ताला पायलेटपासून स्वतःचेंच रक्षण करतां येईना, तो लोकांचें तारण कसें करणार ? अथवा ज्या पवित्रशास्त्रांत पदोपदीं चुका, असंबद्ध प्रलाप, व भाकडकथा भरल्या आहेत, तें पुस्तक सर्वज्ञ ईश्वर करील कसा, असें अलीकडील चाणाक्ष लोकांस वाटूं लागलें तर तो दोष कोणाचा ? त्यांच्या समंजसतेचा किंवा खिस्तीधर्मा-

च्या वेडगळपणाचा ? भौतिकशास्त्रांची झपाट्यानें वृद्धि होत आहे, लोकांची विचारशक्ति प्रगल्भ झाली आहे, व प्रत्यक्षप्रमाणावांचून कोणतीही गोष्ट खरी न मानण्याकडे त्यांचा कल होत चालला आहे, अशा वेळीं आपलें सर्व ज्ञान गुंडाळून ठेवून अंधपरंपरान्यायानें माझ्यावर विश्वास ठेवा व माझ्याबरोबर तुम्हीही खड्ड्यांत पडा असें सांगणारा धर्म लोकांस कसा रुचावा बरें? ज्ञानसूर्याचा एकदां उदय झाल्यावर डोक्यावर बळेंच पांघरून घेतल्यानें रात्र होत नाहीं. मोठमोठे पगार दिले म्हणजे हवे तितके भाडोत्री ख्रिस्ती उपदेशक मिळतात; पण तेणेंकरून युरोपांत हल्लीं चोहोंकडे माजत चाललेलें नास्तिक्य झांकून रहात नाहीं. लार्ड बेकननें Knowledge is power ( ज्ञान ही शक्ति आहे ) असें सूत्र केलें खरें; पण त्यालाही ह्या ज्ञानशक्तीचा पूर्ण प्रभाव कळला नव्हता असें म्हणावें लागतें. एरव्हीं विचार व श्रद्धा ह्यांचा भेद करून विचारापासून धर्माला त्यानें दूर केलें नसतें. बेकननें धर्माचें विचारबाह्यत्व प्रतिपादन केलें तें सद्धेतूनें म्हणजे धर्मसंरक्षणार्थच केलें ह्यांत संशय नाहीं; पण त्याचा परिणाम मात्र अगदीं उलट झाला. बेकनच्या सिद्धांतावरच ह्यूमसारख्याला नास्तिकवादाची इमारत उभारतां आली, हें ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. तेव्हां ह्या प्रबळ ज्ञानशक्तीशीं विरोध करून आपला कोतेपणा जगास व्यक्त करण्याऐवजीं या ज्ञानालाच आपलें सहकारी करून घेण्यांत आमच्या वेदांताचार्यांनीं अलौकिक शहाणपण दाखविलें नाहीं काय ? जगांत जेवढें पाप उत्पन्न झालें तें ज्ञानामुळें असें म्हणणारा ख्रिस्तीधर्म, व सर्व पापांचा नाश केवळ ज्ञानापासूनच होतों असें प्रतिपादन करणारा हिंदुधर्म ह्या दोहोंत किती जमीन अस्मानाचें अंतर आहे ? ईडन बागेंत ज्ञानाचें फळ खाल्लें ह्या महान् अपराधाबद्दल आदमईव्हला ईश्वरानें अधश्च्युति दिली, असें ख्रिस्ती पवित्र शास्त्र सांगतें; व 'तरति शोकमात्मवित्', 'सर्वं ज्ञानप्लवेनैव वृजिनं संतरिष्यासि' असें वेदान्तग्रन्थ म्हणतात. ह्यांपैकीं पुढील पिढीला कोणतें मत ग्राह्य होईल ह्याविषयीं कोणाही समंजस मनुष्याला संशय राहणार नाहीं. वरील अवतरणांतील भगवद्वचनांत निर्दिष्ट केल्याप्रमाणें मोक्षप्राप्त्यर्थ जीं जीं साधनें निरनिराळ्या धर्मगुरूंनीं सांगितलीं आहेत, त्या सर्वांत ज्ञानय-

ज्ञाची कोणालाही सर येणार नाहीं. किंबहुना कित्येक तर उलट विप्रलंभक आहेत. अमक्या पुरुषावर किंवा पुस्तकावर डोळे मिटून विश्वास ठेवा असा मेषपात्र उपदेश हिंदुधर्म करीत नाही, तर ज्ञान मिळवा व विशेषेकरून स्वतःला ओळखा असें अत्याग्रहानें सांगतो. ' न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते ' ' ज्ञानाग्निः सर्व कर्माणि भस्मसात् कुरुते तथा ' इत्यादि अनेक प्रकारें ज्ञानाचा महिमा वर्णन करतांना आमच्या आचार्यांची वाणी थकून गेली आहे. ख्रिस्ती महमदीसारखे धर्म लोकांना अज्ञानसागरांत निमग्न ठेवण्याचा अहर्निश प्रयत्न करीत असतां पृथ्वीवर झपाट्यानें ज्ञानप्रसार होत आहे ही एकच गोष्ट त्या त्या धर्माचें अकिंचित्करत्व, व त्या मानानें अद्वैतमताचें श्रेष्ठत्व सिद्ध करण्यास पुरे नाही काय ? पूर्वी सांगितलेल्या विशिष्ट सिद्धांतांच्या सत्यत्वाविषयीं विचार एकीकडे ठेवून एवढ्या एकाच सामान्य मुद्यावर वेदांताची इतर कोणत्याही धर्माशी तुलना करण्यास आम्ही तयार आहों.

येणेंप्रमाणें ज्ञानाला प्राधान्य दिले, म्हणून श्रद्धादि इतर साधनांना हिंदुधर्म तुच्छ मानतो असें मात्र होत नाही. आत्मानात्मज्ञानाप्रमाणे भक्ति, सदाचरण इत्यादिकांचीही प्राणिमात्राला जरूर आहे; पण ती प्राधान्येन नाही, तर ज्ञानसाधकत्व रूपानें आहे. म्हणजे मोक्षाचें साधन ज्ञान, व त्या ज्ञानप्राप्तीला हीं बाकीचीं साधनें आहेत. केवळ भक्तीनें मुक्ति मिळावयाची नाही हें खरें; पण श्रद्धा, सदाचरण नसेल तर खरें ज्ञानही प्राप्त व्हावयाचें नाहीं, हा वेदांत्यांचा सिद्धांत आहे. व त्यावरून मोक्षाची व ज्ञानाची किती उदात्त कल्पना त्यांनीं केली होती तें ध्यानांत येईल. ज्या ज्ञानाचा वर निर्दिष्ट केल्याप्रमाणें महिमा वर्णिला आहे, ते सहज मिळणारें पुस्तकीज्ञान नव्हे, तर अत्यंत प्रयासानें प्राप्त होणारें अपरोक्ष ज्ञान होय. व हें अपरोक्ष ज्ञान सदाचरणानें व श्रद्धेनें मुमुक्षूच्या अंगीं पात्रता आल्यावांचून कधींही प्राप्त व्हावयाचें नाही. हरदाशी वेदांत कानावरून गेल्यानें किंवा गुरुमुखापासून उपनिषदांचा एकदां पाठ ऐकल्यानें अथवा त्यापेक्षांही स्वस्त झालेल्या छापील पुस्तकांचीं पानें चाळल्यानें ब्रह्मज्ञान होतें तर आज बहुतेकांना निर्वाण प्राप्त होऊन

पृथ्वी निर्मनुष्य होण्याची वेळ आली असती; व अनेक धर्मपंथ, नीतिग्रंथ व कायदे ह्यांचीही जरूर राहिली नसती. पण ज्याला आत्मसाक्षात्कार म्हणतात तो अपरोक्षानुभव होणें इतकें सुलभ नाहीं. 'तत्त्वमसि' वाक्यांचें कितीही शब्दार्थज्ञान झालें तरी याचकाला पैसा उचलून देण्यास हात धजत नाहीं. असलें शब्दज्ञान अवतरणांतर्गत ज्ञानयज्ञपदानें घ्यावयाचें नाहीं, तर आपपरभावाचा पूर्ण लोप होऊन ' वसुधैव कुटुंबकम्' अशी ज्याची स्थिति झाली आहे तोच खरा ज्ञानी म्हणावयाचा. ही स्थिति प्राप्त होण्याला अर्थातच प्रथम अहंकारादि मनोविकारांचा नाश केला पाहिजे, दुर्वासना टाकल्या पाहिजेत. व शमदमादिकांच्या योगानें मन स्वाधीन केलें पाहिजे. अर्थज्ञान करून घेणें ही ज्ञानार्जनाची पहिली पायरी होय; व तिचा "आत्मा वाऽऽरे द्रष्टव्यः श्रोतव्यो मन्तव्यो निदिध्यासितव्यः" ह्या वाक्यांतील श्रोतव्यपदानें निर्देश केला आहे. अर्थश्रवण झाल्यानतर त्याचें मनन केलें पाहिजे, तें मनन साध्य होण्याला अर्थात् चित्तविक्षेप करणाऱ्या सर्व वासना व मनोविकार दग्ध झाले पाहिजेत. मनन झाल्यानंतर एकाग्र चित्तानें ब्रह्माचें ध्यान केलें पाहिजे. आणि हें ध्यान श्रद्धायुक्त अंतःकरण असल्याशिवाय कधींही सिद्धीस जावयाचें नाहीं. येणेंप्रमाणें कित्येक दिवस निदिध्यास केल्यानंतर द्रष्टव्यपदानें बोधित केलेला आत्मसाक्षात्कार होतो. ज्याप्रमाणें आरशावरील मळ पुसला किंवा दीपावरील आवरण काढलें कीं, त्यांची स्वाभाविक स्वच्छता व तेजस्विता आपोआप व्यक्त होते, त्याचप्रमाणें हें अपरोक्ष ब्रह्मज्ञान मनननिदिध्यासांनीं भ्रमपारिवार दूर झाला कीं आपोआप प्रादुर्भूत होतें. पण श्रवण, मनन, निदिध्यास हीं श्रद्धा, सदाचरण वगैरे गुणावांचून कधींही प्राप्त व्हावयाचीं नाहींत. "श्रद्धावांल्लभते ज्ञानं तत्परः संयतेन्द्रियः । ज्ञानं लब्ध्वा परां शांतिमचिरेणाधिगच्छाति॥" ह्या भगद्वचनांतील तात्पर्य हेंच आहे. "श्रेयो हि ज्ञानमभ्यासाज्ज्ञानाद्ध्यानं विशिष्यते। ध्यानात्कर्मफलत्यागस्त्यागाच्छांतिरनंतरम् ॥" ह्या वाक्यांतही तीच परंपरा निराळ्या तऱ्हेनें व्यक्त केली आहे. तात्पर्य, इतर धर्मांत व संप्रदायांत एका साधनावरच भिस्त ठेवलेली असतें; पण वेदांतानें अपरोक्ष ज्ञानाचा उपदेश करून त्या सर्वांचा अंतर्भाव केला आहे

प्राचीनकाळीं ग्रीसदेशांत डेल्फास नामक देवलयावर Know Thyself [ स्वतःला जाण ] असें वाक्य लिहिलें होतें' त्याचें त्यावेळीं मोठमोठ्या पंडितांनाही गूढ पडलें होतें. "आत्मावाऽऽरे द्रष्टव्यः" ह्या आमच्या औपनिषद वाक्याची त्यांना ओळख झाली असती, तर त्यांच्या अंतःकरणांत ताबडतोब प्रकाश पडून आज शेंकडों वर्षें युरोपखंड जें अज्ञानांधकारांत चांचपडत आहे तें तसें खचित राहिलें नसतें. असो; झाली गोष्ट परत येत नाहीं. 'सत्यमेव जयते' हा सिद्धांत अबाधित असल्यामुळें कधीं तरी सर्व पृथ्वविरील लोकांना सत्स्वरूप परब्रह्माची ओळख होईल ह्यांत शंका नाहीं. मात्र सहजवृत्त्या ती होण्यापेक्षां आम्हीं हिंदुलोकांनीं ती करून देणें ह्यांत आमचा विशेष पुरुषार्थ आहे. रोमनलोकांनीं ग्रीसदेश जिंकला तरी ग्रीकाविद्येचा पगडा रोमनलोकांवर बसला; त्याचप्रमाणें हिंदुस्थानदेश सध्यां जरी परकीयाच्या ताब्यात गेला असला, तरी तेणेंकरून हिंदुधर्माची युरोपांत छाप बसण्याला हरकत येणार नाहीं. इंग्रज लोकांनीं आमचीं शरीरेंच फक्त जिंकलीं आहेत; पण आपणास सर्व युरोपियन व अमेरिकन राष्ट्रांचीं मनें जिंकावयाचीं आहेत हें हिंदुमात्रानें लक्षांत बाळगलें पाहिजे. पण स्वस्थ बसल्यानें हें साध्य व्हावें कसें ? लोकांना उपदेश करण्याची पात्रता येण्यास अगोदर आपली आपणालाच ओळख व्हावयाला नको काय ? दुसऱ्याचें अज्ञान घालवितां येण्यापूर्वी स्वतःचें अज्ञान जावयाला नको काय ? चंद्रबिंब घेऊं पाहाणाऱ्या बालकाप्रमाणें ईश्वर, आत्मा, मुक्ति इत्यादि अतींद्रिय परमगूढ वस्तूंविषयीं मनुष्यमात्राच्या हृदयांत स्वभावतःच उत्कट जिज्ञासा उत्पन्न होत असते, व तिजपासूनच सर्व धर्मप्रक्रिया व तत्त्वविचार ह्यांचा प्रादुर्भाव होतो. मी कोण आहें, आलों कोठून, जाणार कोठें वगैरे बिकट प्रश्न आयुष्यामध्यें प्रत्येक मनुष्याच्या अंतःकरणांत उद्भवून क्षणभर तरी वैराग्य उत्पन्न करतात.

But for those obstinate questionings
Of sense and outward things,
Fallings from us, vanishings;

Misgivings blank, of a creature
Moving about in worlds not realized.*

ह्या वर्डस्वर्थकवीच्या प्रासादिक वाणीनें ग्रथित केलेल्या विचारांनीं मनुष्यमात्राचें अंतःकरण ग्रस्त झालेलें असतें, व ते ते विचार तो स्वसामर्थ्यानुरूप प्रदर्शितही करीत असतो. ह्या नियमाला अपवाद आढळल्यास तो 'स वै मुक्तोऽथवा पशुः' ह्यांपैकीं एकाद्या कोटींत घालावा लागेल. हल्लीं सर्व प्रकारच्या उदात्त विचारांना फांटा देऊन केवळ उदरपोषणादि देहधर्म उरकण्यांत गढून गेलेले आम्ही हिंदुलोक कोणत्या वर्गांत जाऊं ह्याचा ज्याचा त्यानें विचार करावा. सध्यां आम्ही महानिद्रेंत घोरत पडलों आहों, यांतून केव्हां जागे होऊं तेव्हां खरें.

तात्पर्य, Plain living and high thinking are no more [ साधें आचरण व उदात्त विचार हीं समूळ नाहींशीं झालीं ] असें जें वर्डस्वर्थकवीनें फार हृदयद्रावक वर्णन केलें आहे तें हल्लींच्या आमच्या स्थितीस पूर्णपणें लागू पडतें.

असो. ह्या सच्चिदानंद ब्रह्मविषयक विचारांत दोन महिने घालवितां आल्यानें आम्हांस परम समाधान वाटत आहे. वाचकांना कंटाळा आला असल्यास तसदी दिल्याबद्दल माफी मागून ही अद्वैतमीमांसाष्टाध्यायी पुरी करतों.

*समाप्त*

---

* पण ते प्रत्यक्ष व बाह्यवस्तुसंबंधानें फिरफिरून उद्भवणारे प्रश्न, ते वयपरत्वें उत्तरोत्तर विसरत जाणारे पूर्वजन्मार्जित संस्कार, व नष्ट होणाऱ्या वासना, आणि काल्पनिक सृष्टीमध्यें संचार करणाऱ्या जीवाच्या अंतःकरणाला व्यापणारे दुरवगाह्य संशय, हे आम्हाला दिल्याबद्दल मी परमेश्वराचे आभार मानतों.